पंडित नेहरू



९४८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१९०


सांस्कृतिक दर्शन



REFBK-0015966

ल. ना. भावे

१७१७१
७५६९९६
२०।३।७१
२१९०



पंडित नेहरू : सांस्कृतिक दर्शन

मराठा ग्रंथ संग्रहालय, दादर. मुंबई.
क्रमांक ...५५.६.६६... दिनांक ...निर्बंध...
खरेदी ...२७१.०... मूल्य रु. २०।३।७१

ल. ना. भावे

REFBK-0015966

किंमत पाच रुपये

मराठा ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. १५६६६
मुंबई शाखा (स्वतंत्र प्रत)

श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन, लक्ष्मीरस्ता, पुणे २.

प्रकाशक :

श्री. ग. ल. ठोकळ
ठोकळ प्रकाशन
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता,
पुणे २.

●

प्रथमावृत्ति : २६ जानेवारी १९६७

●

© ल. ना. भावे
डोंबिवली.

●

मुद्रक :

वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०।३१ शनवार पेठ, पुणे.

निवेदन

पंडित नेहरूंचं जीवन आणि कार्य यांवर अनेक ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत व अजूनही होत आहेत. माझ्या वाचनांत आलेल्या या ग्रंथांतून नेहरूंच्या राजकीय जीवनाला आणि कर्तृत्वालाच प्राधान्य दिलं गेलेलं मला आढळून आलं. परंतु त्याबरोबरच नेहरूंच्या सांस्कृतिक जीवनाचाही थोड्या फार प्रमाणात परिचय झाला. आणि मग नेहरूंचं राजकीय जीवन आणि कार्य यांच्या इतकंच त्यांचं सांस्कृतिक जीवनही तितकंच समृद्ध असल्याची जाणीव माझ्या मनाला तीव्रतेनं झाली. या जाणिवेतूनच, नेहरूंच्या समृद्ध सांस्कृतिक जीवनाचाच फक्त परिचय करून देण्याची कल्पना माझ्या मनांत आली. प्रस्तुतचा "पं. नेहरू-सांस्कृतिक दर्शन" हा ग्रंथ हे त्याच कल्पनेचं प्रत्यक्ष स्वरूप आहे.

या ग्रंथात फक्त पं. नेहरूंचं सांस्कृतिक दर्शन करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हें 'दर्शन' घेऊन पं. नेहरूंच्या सांस्कृतिक जीवनाचा अधिक सखोल अभ्यास करण्याची इच्छा सर्वसाधारण वाचकांच्या मनात निर्माण व्हावी एवढाच या ग्रंथाचा हेतू आहे. त्यासाठी पं. नेहरूंच्या व त्यांच्या जीवनकार्यावर प्रसिद्ध झालेल्या काही प्रमुख संदर्भग्रंथांची यादी जोडलेली आहे.

हा ग्रंथ लिहिण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची गरज भागविण्याचं कार्य माझे मित्र श्री. शां. शं. रेगे, व श्री. पी. के. गद्रे व श्री. पु. आ. चित्रे यांनी मोठ्या आनंदानं केलं याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

'ठोकळ प्रकाशन'ने हा ग्रंथ प्रसिद्धीसाठी स्वीकारला व तो योग्य स्वरूपांत प्रसिद्ध केला याबद्दल त्या संस्थेचे चालक श्री. ग. ल. ठोकळ यांचा मी आभारी आहे.

माझ्या इतर साहित्याप्रमाणे सर्वसाधारण वाचक याही ग्रंथाचं स्वागत करतील अशी माझी खात्री व विश्वास आहे.

डोंबिवली
ता. २६-१-१९६७

ल. ना भावे

याच लेखकाची इतर पुस्तके :–

समरांगण – (नाटक)
पट्टे बापूराव – (नाटक)
बायकांची जात व इतर एकांकिका
विसावा – (कथासंग्रह)
विनोबा व भूदान
नाटक झाले जन्माचे (कादंबरी)

प्रमुख संदर्भ-ग्रंथ

MY AUTOBIOGRAPHY- (TOWARDS FREEDOM)-	*Jawaharlal Nehru*
Discovery of India	,,
Glimpses of World History	,,
Bunch of Old Letters	,,
Unity of India	,,
Speeches	,,
Nehru's Letters to his Sister	*Krishna Hutheesing*
Prison & Chocolate Cake	*Nayantara Sehgal*
NEHRU–The first sixty years	*Dorothy Wilson*
NEHRU-The years of Power	*Vincent Sheen*
The Gentle Colossus	*Hiren Mukerjee*
The Nahrus–Motilal & Jawaharlal	*B. R. Nanda*
Jawaharlal Nehru	*Frank Moreas*
With no Regrets	*Krishna Hutheesing*
NEHRU-A Political Bigography	*Michael Poreacher*
NEHRU-A Contemporary Estimate	*William Crocker*
Study of Nehru	*Ed. Rafiq Zackeria*
The Trials of Nehru	*Ram Gopal*
Jawaharlal Nehru–The man and his ideas	*Y. G. Krishnamoorty*
The Quintessance of Nehru	*K. T. Narasimha Char*
Profile of Nehru	,,
Conversation with Nehru	*Tibor Mende*
Glorious Thoughts of Nehru	*Ed. N. B. Sen*

अनुक्रम

१.	प्रयोजन	१–१३
२.	संस्कार	१४–२७
३.	कर्मयोग	२८–३९
४.	जीवनहेतू	४०–६२
५.	भारत-प्रेम	६३–७६
६.	कारावास	७७–९१
७.	पशुपक्षीप्रेम	९२–१०१
८.	निसर्गप्रेम	१०२–१२५
९.	संस्कृतिसंपन्नता	१२६–१४८
१०.	बालकप्रेम	१४९–१५९
११.	कौटुंबिक जीवन	१६०–१७९
१२.	रसिकराज	१८०–१९४
१३.	अभ्यासू वाचक	१९५–२०२
१४.	साहित्यिक	२०३–२४०

माझ्या नाती

चि. माधवी

व

चि. अलका

यांस

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई
वर्गक्रम ७५५.६६ दि: निवृत्त
दान २७१० दि. २०/३/७७



प्रयोजन

कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासात आपल्याला त्या राष्ट्रवासियांना शोककारक आणि दुःखदायक घटना घडून आलेल्या आढळून येतात. मग ते राष्ट्र कितीही वैभवसंपन्न, बलशाली, सामर्थ्यवान असो; किंवा मागसलेले आणि दुर्बळ असो. या घटनांचं स्वरूपही विविध असतं. टाकलेले राजकीय डाव स्वतःवरच उलटणं, योजलेल्या आणि निश्चित केलेल्या योजना सफल न होणं, परराष्ट्रावर टाकलेल्या विश्वासाचा घात होणं; आक्रमण परतवून लावण्यात आलेलं अपयश आणि त्यामुळं होणारी मानखंडना; इत्यादी दुःखदायक घटना कोणत्याही राष्ट्राच्या नशिबीं येणं अपरिहार्य असतं. आणि याचं प्रत्यंतर प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात नमूद करून ठेवलेलं असतं.

परंतु, या घटना चिरकालीन किंवा शाश्वत स्वरूपाच्या नसतात. उलटलेले राजकीय डाव, प्रतिडाव किंवा पेच टाकून परतवले जातात. अपुऱ्या राहिलेल्या योजना कालांतरानं सफल करता येतात; सर्व सामर्थ्य एकवटून, शौर्यानं आणि पराक्रमानं आक्रमण परतवून लावून, पूर्वीचं अपयश आणि झालेली मानखंडना पुसून टाकून, राष्ट्राची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करता येते. परंतु, राष्ट्राचा महान धुरीण, नेता कालवश होणं ही शोककारक घटना मात्र चिरंतन आणि शाश्वत स्वरूपाची व कधीही न बदलता येणारी, तीवर मात न करता येण्यासारखी असते.

या सत्याचा साक्षात्कार आणि अनुभव जगाला आणि प्रामुख्यानं भारतीयांना ता. २७ मे १९६४ रोजी आला. या दिवशी भारताच्या इतिहासात एक अत्यंत शोकदायक घटना घडून आली. अखिल भारतातील नागरिक, वय, जात, धर्म विसरून शोकसागरात बुडून गेले होते. माध्यान्हीचा सूर्य आकाशात तळपत असूनही सभोवती अंधकार दाटून आल्यासारखी कळा सर्वत्र पसरलेली दिसत होती. शरीरातील सारी चेतनाशक्तीच नष्ट झाल्यासारखं वाटत होतं. चित्तवृत्ती बधिर झालेल्या होत्या. जीवनाचा ओघ मधेच थांबल्यासारखा वाटत होता. भवितव्याविषयी चिंता वाटत होती. सारं वातावरण मलूल, उदास आणि निष्प्राण वाटत होतं.

दुर्वार्तेला वेग फार असतो; वाऱ्यापेक्षाही जलद गतीनं ती सर्वत्र पसरते. २७ मे १९६४ रोजी सकाळी पंडित नेहरू अत्यवस्थ असल्याची वार्ता भारतभर पसरली आणि त्या वार्तेनं सर्वत्र चिंतेची छाया पसरली. उदास आणि चिंतायुक्त मनानं अत्यंत हलक्या आवाजात दुसऱ्याच्या कानात ही वार्ता बोलली जाऊ लागली. लोकसभेत त्या वार्तेचा उच्चार करण्यात आला आणि मग हुरहुरत्या अंतःकरणानं आणि निराशायुक्त आशेनं पुढील बातमीकडे सर्वांचे कान लागून राहिले. माध्यान्ह उलटून गेली. परंतु अजूनही नेहरूंच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची बातमी येत नव्हती. अमंगळ वार्ता कानी पडण्याची लोक मनाशी तयारी करू लागले. परंतु त्याबरोबरच हुरहूर वाढत होती. आणि ती अमंगळ वार्ता कानी पडण्याची वेळ शक्य तितकी पुढं ढकलली जावी अशी आशा करीत होते. अनिश्चितता आणि चिंता वाढत होती. अशाच स्थितीत दुपारी ३ च्या सुमारास पं. नेहरूंचं निधन झाल्याची ती अमंगळ आणि दुःखद

वार्ता कानी आली आणि भारताच्या इतिहासातील २७ मे १९६४ हा दिवस दुःखकारक आणि शोकदायक असा ठरला.

सर्वसाधारणपणे भारतातील मृत्युवयाच्या मानानं पाहता पं. नेहरूंचं निधन अकाली झालं असं मुळीच म्हणता येणार नाही. मृत्युसमयी त्यांचं वय ७६ वर्षांचं होतं. परंतु, नेहरूंची त्या वेळपर्यंतची शरीरप्रकृती लक्षात घेतली असता, ते अकालीच निधन पावले असंच म्हटलं पाहिजे. नेहरूंच्या सबंध आयुष्यात त्यांच्या सुदृढ आणि निरोगी प्रकृतीनं त्यांना त्यांच्या, कष्टमय आणि खडतर जीवनकार्यात उत्तम साथ दिली होती. अनेक अल्प आणि दीर्घकालीन कारावास, भारत आणि जगभर काढलेले असंख्य दौरे आणि प्रवास, कोणत्याही पदावर असताना नेहरूंना करावं लागलेलं अविरत कार्य, त्यांच्या सुदृढ आणि निरोगी शरीरप्रकृतीमुळंच शक्य झालं होतं. एखाद्या निष्ठावंत आणि सामर्थ्यवान पाठीराख्या सहचराप्रमाणं त्यांच्या शरीरप्रकृतीनं त्यांना सहकार्य दिलेलं होतं. त्यामुळंच नेहरू आपल्या शरीरप्रकृतीवर विश्वास ठेवून सतत कार्यमग्न राहत असत. "मृत्यू, जीवनाचा आवश्यक अंत, केव्हा येईल तेव्हा येवो" हे त्यांचे उद्‌गारच शरीरप्रकृतीवर त्यांची केवढी श्रद्धा आणि भिस्त होती याचे द्योतक होते. मृत्यूपूर्वी चारच महिने अगोदर भुवनेश्वर येथे काँग्रेसच्या अधिवेशनाला ते उपस्थित असताना अतिश्रमामुळं त्यांची प्रकृती एकदम खूपच बिघडली. त्या वेळीच त्यांची सदैव पाठराखेपणा करणारी त्यांची प्रकृती ढासळली असल्याचा साक्षात्कार जनतेला झाला होता. परंतु खुद्द नेहरूंनी मात्र त्याची दखल घेतली नाही. आपल्या विशिष्ट स्वभाव-वैशिष्ट्याला अनुसरून, त्यांच्या जीवनशक्तींना पोखरून निःसत्त्व करू पाहणाऱ्या त्या अनोळखी रोगाशी तडजोड करण्याचं त्यांनी नाकारलं. डॉक्टरनी पाळण्यास सांगितलेली पथ्यं पाळण्याचं त्यांनी नाकारलं असा त्याचा अर्थ नव्हता. परंतु, जीवनात धोके पत्करून त्या धोक्यांना तोंड देण्याची त्यांची मनःप्रवृत्ती त्यांच्या आजारीपणातही दिसून आली. त्यांनी त्या आजाराला महत्त्व न देता आपलं कार्य चालूच ठेवलं होतं.

एवढंच नव्हे तर, तशाही शरीरस्थितीत १९६४ च्या मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात, म्हणजे निधनापूर्वी फक्त आठच दिवस अगोदर, मुंबईत

भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनाला ते उपस्थित राहिले होते व त्यात भागही घेतलेला होता. परंतु, त्या वेळी त्या वेळपावेतो, जनतेला अपरिचित असलेली, त्यांची श्रांत आणि व्यथित मूर्ती पाहून जमलेल्या प्रेक्षकांच्या मनात कालवाकालव झाली होती. व त्यांची त्या वेळी घेतलेली छायाचित्रे पाहून वाचकांच्या मनात दुःखद हुरहूर व नेहरूंविषयी चिंता उत्पन्न झाली होती. परंतु, नेहरू मात्र एखाद्या स्थितप्रज्ञासारखे शांत आणि निष्काळजी राहिले होते. मुंबईत असताना, त्यांच्या भगिनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांनी, नेहरूंची ढासळलेली शरीरप्रकृती लक्षात घेऊन, आणीबाणीच्या परिस्थितीत आपल्या प्रेमळ भावाजवळ आपण असलं पाहिजे या विचारानं, जानेवारीत भुवनेश्वर येथे नेहरूंची प्रकृती ढासळल्यानंतर, मार्चपासून पुढं तीनचार महिने चालणारा, अमेरिकेतील आपला व्याख्यानांचा दौरा रद्द केला होता. ते सहजताच नेहरूंनी मिस्किल हास्य करीत आपल्या बहिणीला म्हणाले होते, "मूर्ख कुठली ! तू दूर गेली असतीस तर मला काय होणार आहे, अशी तुझी कल्पना आहे ? मला आता पुष्कळच बरं वाटत आहे; आणि सहजासहजी मी माझा देह नष्ट होऊ देणार नाही." एवढंच नव्हे तर, पुढील महिन्यात, म्हणजे जूनमध्ये, आपल्याबरोबर कालिंगपाँग येथे येण्यास तिला सांगितलं होतं.

१८ मे १९६४ रोजी नेहरू मुंबईहून दिल्ली येथे गेले व लगेच विश्रांतीसाठी डेहराडून येथे गेले. परंतु, ता. २७ मे १९६४ पासून लोकसभेचं अधिवेशन दिल्लीत सुरू होणार होतं. आणि शरीरप्रकृती कशीही असली तरी, लोकशाहीच्या त्या एकनिष्ठ उपासकानं, त्या अधिवेशनाला उपस्थित राहायचं ठरवलं. हेलिकॉप्टरनं ते ता. २६ रोजी दिल्ली येथे येऊन पोहोचले. त्या वेळी वरून तरी त्यांची प्रकृती थोडीशी सुधारलेली व मुद्रा विश्रांतीमुळं उल्हसित दिसत होती. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सहास्य मुद्रेनं उत्तरं दिली. स्वतःच्या प्रकृतीविषयी पत्रकारांनी आस्थेनं केलेल्या चौकशीला त्यांनी स्मितपूर्वक सांगितलं होतं : "माझ्या जीवनाला इतक्या लवकर ओहोटी लागणार नाही."

ता. २७ मे १९६४ रोजी सकाळच्या वर्तमानपत्रात नेहरूंच्या दिल्लीतील आगमनाची आणि प्रकृतीस्वास्थ्याची ही वार्ता प्रसिद्ध झाली आणि भारता-

तील त्यांच्या कोट्यवधी हितचिंतकांनी समाधानाचे निःश्वास सोडले. या वार्तेवर त्यांचा विश्वास बसणं अगदी साहजिक होतं. यापूर्वी जरी नेहरू व्याधिग्रस्त, आजारी पडून अंथरुणाला खिळले नव्हते आणि ते श्रांत झालेले मधूनमधून दिसत असले तरी, थोड्याफार विश्रांतीनंतर ते पुनश्च पूर्ववत उल्हसित आणि आपल्या कष्टदायक अधिकारपदाचं कार्य करण्यास समर्थ होऊन परत येत असत. या वेळेलाही हीच परिस्थिति असेल अशी जनतेला खात्री निदान आशा तरी खचित वाटत होती.

परंतु, त्या आशा नष्ट झाल्या होत्या. नेहरूंच्या नित्याच्या निरोगी आणि सुदृढ शरीरयष्टीनं काळापुढं नमतं घेतलं होतं. सतत पन्नास वर्षं अत्यंत कष्टमय अशा नेहरूंच्या जीवनात त्यांना साथ देणारं त्यांचं शरीर थकून कायमचं विसावलं होतं. आठ तासांच्या अल्पावधीत हे सारं घडून आलं होतं. आकस्मिक आणि अकल्पित घटना होती ती. त्या घटनेचा कुणालाच अगोदर सुगावा लागला नव्हता. पन्नास वर्षांत, अनेक आपत्तींना, राजकीय झंझावातांत, मानसिक प्रचंड घडामोडींत, जनतेच्या समोर भारतीयांना दिलासा आधार आणि उत्साह देणारी, क्वचित त्यांच्यावर संतापणारी, त्यांच्या समवेत अनेक रूपे धारण करणारी, रुसणारी, हंसणारी, कधी कोमेजणारी तर कधी उत्फुल्ल अशी नेहरूंची मूर्ती इतक्या अल्पावधीत निष्प्राण होईल अशी कुणाचीही कल्पना नव्हती. दीर्घकालचा आजार नव्हता; रुग्णशय्येवर खितपत पडणं नव्हतं; दिवसानुदिवस डॉक्टरांची त्यांच्या प्रकृतीसंबंधी निवेदनं नव्हती. सारा कारभार आठ तासांच्या कालावधीत आटोपला होता. भारतीयांच्या मनाची अगोदर तयारी झालेली नव्हती आणि म्हणून नेहरूंच्या या आकस्मिक आणि अकल्पित निधनाचा धक्का त्यांना विशेष तीव्रतेनं जाणवला. तो सहन करावयास लागणारा धीर आणि सामर्थ्य यांचा अभाव होता. या दृष्टीनं पाहता नेहरूंचं निधन अकालीच झालेलं होतं.

खुद्द नेहरूंना तरी आपल्या मृत्यूची चाहूल लागली होती का, हे कळणं कठीण आहे. त्यांनी आपलं ते सुप्रसिद्ध मृत्युपत्र तयार करून ठेवलं होतं. त्याचप्रमाणे त्यांच्या लिहिण्याच्या मेजावर Robert Frost या इंग्रज कवीच्या पुढील काव्यपंक्ती लिहून ठेवल्या होत्या :—

The woods are lovely, dark and deep,
But I have promises to keep,
And miles to go before I sleep,
And miles to go before I sleep.

या दोनच गोष्टींच्या आधारे आपला मृत्यू जवळ आल्याची जाणीव नेहरूंना झाली असावी, अशी कल्पना करता येईल. परंतु, या दोनच गोष्टींव्यतिरिक्त या कल्पनेला दुसरा कशाचाही आधार सापडत नाही. नेहरूंच्या जीवनाचा अभ्यास केलेल्यांना हे माहीतच आहे की, कोणत्याही वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक अगर राजकीय आपत्तींना धीरानं तोंड द्यायची त्यांची वृत्ती होती; स्वभावधर्म होता आणि त्याच वृत्तीनं आणि स्वभावधर्मानं मृत्यूलाही हसतमुखानं आणि तत्परतेनं तोंड देण्याची त्यांनी आपल्या मनाची तयारी ठेवलेली असावी. "मृत्यू, जीवनाचा आवश्यक अंत" असल्याची त्यांना संपूर्ण जाणीव होती. आणि "तो येईल तेव्हा येवो" अशी निर्भय आणि मृत्यूविषयी उदासीन अशा वृत्तीनं आपलं जीवनकार्य त्या अंतापर्यंत करीत राहायचं असा निष्ठावंत कर्मयोग्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. आणि त्या दृष्टिकोनाला सर्वस्वी अनुसरूनच ते अंतापर्यंत कर्म करीत राहिले होते. मृत्युदिनाच्या आदल्या रात्री ते नित्याप्रमाणे बऱ्याच उशिरापर्यंत आपलं दैनंदिन कार्य करीत होते. नेहमीप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या सहीसाठी टंकलिखित करून ठेवण्यासाठी त्यांनी लघुलेखकांना पत्रे निवेदन केली होती. त्यांच्या अवलोकनार्थ व अभिप्रायार्थ त्यांच्या टेबलावर आलेले सर्व कागदपत्र वाचून व योग्य ते शेरे मारून त्यांनी हातावेगळे केले होते. सुस्तपणा, कानचुकारपणा, चालढकल किंवा अव्यवस्थितपणा त्यांच्या वृत्तीतच नव्हता. त्याचप्रमाणे आपल्या प्रकृतीचं– मग ती खालावलेली अगर आसन्नमरण असो,– तिचं प्रदर्शन करणं त्यांना अजिबात पसंत नव्हतं. या त्यांच्या प्रवृत्तींमुळं, आणखी थोड्याच तासांनी आपला अंतकाळ जवळ आला आहे, हे त्यांना खात्रीनं कळून चुकलं असलं तरी पण, ते नित्याप्रमाणं सकाळी उठले. मुखमार्जन व दाढीही केली. या वेळीही, लवकरच त्यांच्या देहाचा ग्रास घेणारी व्याधी आणि शारीरिक दुःख त्यांना जाणवत असलं पाहिजे. परंतु,

त्याची पर्वा न करता, दैनंदिन कार्यक्रमासाठी ते तयार राहिले. त्यांच्या जीवनात, सुष्ट-दुष्ट, सज्जन-दुर्जन अशा अनेक प्रकारच्या, प्रवृत्तींच्या, संस्कारांच्या, मित्र आणि कट्टर विरोधक अशा व्यक्तींना रोज भेटावे लागत असे; आणि त्या सर्वांची ते निर्लेप मनानं आणि हंसतमुखानं भेट घेत असत; आपल्या मनाची त्यासाठी तयारी ठेवीत असत. ता. २७ मे १९६४ रोजीही सकाळी नेहरूंना प्रथमच परंतु शेवटची भेट घेणाऱ्या मृत्यूचीही भेट घेण्याची मनाची व शरीराचीही त्यांनी तयारी ठेवली होती. आणि तो येताच त्यांनी त्याची गाजावाजा अगर कोणत्याही प्रकारचा देखावा न करता भेटही घेतली.

नेहरूंना कालवश झालेलं ऐकण्याची वा पाहण्याची कोणाचीच तयारी नव्हती आणि त्या दृष्टीनं नेहरूंचं निधन अकल्पित किंवा अकाली झालं असं म्हणता येईल. परंतु, खुद्द नेहरूंच्या दृष्टीनं पाहिलं तर तसं म्हणता येणार नाही. मृत्यू केव्हा, कसा आणि कोणत्या स्वरूपात यावा याविषयी नेहरूंच्या काय कल्पना अगर मत असावं याचं दर्शन, म. गांधींच्या निधनानंतर, नेहरूंनी काढलेल्या उद्गारात आपल्याला निःसंदिग्ध शब्दात पाहण्यास मिळेल. म. गांधींच्या निधनाबद्दल नेहरू म्हणाले होते— "अकस्मात मृत्यू यावा अशी सर्वांचीच इच्छा असावी त्याप्रमाणेच त्यांनाही अकस्मात मृत्यू आला. शरीर झिजत पडलं नव्हतं किंवा दीर्घकालीन आजार नव्हता किंवा वाढत्या वयाबरोबर येणारी मनाची विस्मरणावस्थाही त्यांना आली नव्हती." म. गांधींच्या मृत्यूसंबंधीची नेहरूंनी वर्णन केलेली ही वैशिष्ट्ये नेहरूंच्या मृत्यूच्या बाबतीतही तंतोतंत लागू पडतात. नेहरूंनाही दीर्घकाल रुग्णशय्येवर देह झिजत खितपत पडावं लागलं नव्हतं. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या विस्मरणानं पछाडलं नव्हतं. आणि नेहरूंनाही मृत्यूनं अकस्मात इहलोकातून उचलून नेलं होतं. नेहरूंच्या आत्म्यालाही त्यामुळं संतोषच खचित वाटला असेल.

म. गांधींच्या मृत्यूविषयी नेहरूंनी आणखीही काही वैशिष्ट्ये सांगितली होती. ते म्हणाले होते : "त्यांच्या मृत्यूतही भव्योदात्तता आणि अभिजात कलात्मकता होती. कोणत्याही दृष्टीनं पाहिलं तरी त्यांचं व्यक्तिमत्त्व आणि त्यांनी जगलेलं जीवन यांना पूर्णपणे शोभणारा असा परमोच्च बिंदू त्यांच्या

मृत्यूंत दिसून येतो. त्यांच्या जीवनहेतूवर त्यांच्या मृत्यूनं कळस चढविला आहे. कर्तृत्वशक्तीच्या परिपूर्णावस्थेतच त्यांना मृत्यू आला आहे..." नेहरूंच्या मृत्यूतही म. गांधींच्या मृत्यूतील भव्योदात्तता आणि कलात्मकता दिसून येते. त्यांच्या जीवनात पदोपदी दिसून येणारी कर्तृत्वाची आणि व्यक्तिमत्वाची भव्य उदात्तता त्यांच्या मृत्यूच्या वेळीही दिसून आली. भारतीय स्वातंत्र्यासाठी आपलं सर्वस्व पणाला लावून ते लढले. ते स्वातंत्र्य मिळालेलं त्यांनी पाहिलं आणि अनुभविलं, आणि ते स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी आणि भारतीयांचं जीवन समृद्ध करून जगात भारताला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी साऱ्या कर्तृत्वशक्तीनिशी ते मृत्यूच्या आधीन होण्याच्या क्षणापर्यंत झगडले व झगडत असतानाच त्यांना मृत्यू आला. नेहरूंना आलेला मृत्यू हा म. गांधींच्या मृत्यूविषयी त्यांनी काढलेल्या उद्गारांप्रमाणेच भव्योदात्त, जीवनहेतूंशी सर्वस्वी सुसंगत व त्यांच्यावर कळस चढविणारा आणि कर्तृत्वशक्तींच्या पूर्णावस्थेत आलेला होता, यात शंका नाही.

नेहरूंच्या या वैशिष्ट्यपूर्ण मृत्यूचा साक्षात्कार आणि प्रत्यय, त्यांच्या निधनाची वार्ता समजताच, जगातील प्रत्येक व्यक्तीला आल्यावाचून राहिला नाही. नेहरूंच्या अलौकिक जीवनानं आणि कर्तृत्वानं भारावून गेलेल्या व्यक्तींचं मन त्यांच्या मृत्यूनंही भारावून गेलं. नेहरूंबद्दल आदर, भक्ती व प्रेम बाळगणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या निधनामुळं अपरंपार दुःख झालं असणं साहजिकच आहे. पण नेहरूंच्या राजकीय विरोधकांनाही त्यांच्या निधनानं धक्का बसला. नेहरूंच्या निधनानं ज्याचं हृदय हेलावलं नाही, भारावलं नाही, धक्का बसला नाही अशा व्यक्तींची गणना मुक्त अथवा पशूंतच करायला पाहिजे. भारतात अशी एकही व्यक्ती नसेल की, नेहरूंच्या निधनाची वार्ता ऐकून तिला धक्का बसला नसेल. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून आसामपर्यंत दुःखाची एकच लाट पसरली. त्यांच्या निवासस्थानी त्यांचं अंत्यदर्शन घेण्यासाठी लोकांची संतत रीघ लागून राहिली होती. जात, वय, लिंग— हे भेद विसरले गेले होते. मतभेद लोप पावले होते. ऊन्ह, पाऊस, थंडी यांची बाधा कोणालाच होत नव्हती; किंवा त्या बाधेची कुणीच पर्वा करीत नव्हतं. रात्रंदिवस त्यांच्या दर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानी जनसागराच्या लाटा येऊन लोटत होत्या.

२८ मे १९६४ रोजी त्यांच्या महानिर्याणाचा दिवस उगवला. दिल्लीच्या त्यांच्या निवासस्थानी, आणि सबंध दिल्लीत जनतेचा महासागर उसळला होता. सारंच वातावरण जड, निःस्तब्ध, बधिर, विषण्ण व उदास झालं होतं. आणि अशा वातावरणात नेहरूंच्या पार्थिव देहाचं अंत्यदर्शन मूकतेनं लोक घेत होते. या महायात्रेला एवढा प्रचंड आणि अफाट जनसमुदाय लोटला होता की, त्याची मोजदाद करण्यासाठी संख्या अपुरी पडावी.

शांतिघाटावर तर जनतेचा महापूर उसळला होता. त्यात राष्ट्रपती, उप-राष्ट्रपती, मध्यवर्ती व राज्यसरकारातील मंत्री, विविध राष्ट्रांचे भारतातील राजदूत व शिवाय देशोदेशींचे आलेले खास प्रतिनिधी उपस्थित होते. लष्कर, आरमार आणि हवाईदल यांचे प्रमुख होते. त्याचप्रमाणे सर्व दर्जाचे थरातील, वयाचे, जातीचे अगणित लोक होते. पंडितजींच्या पार्थिव देहाला त्यांनी रुद्ध कंठानं, मूक तर काहींनी अश्रुपूर्ण आणि उद्रेकित मुक्त कंठानं आदरांजली वाहिली. पंडितजींचा पार्थिव देह अग्निनारायणानं आत्मस्वरूपात विलीन करून घेतला. भारतातील एका महान जीवनाला पूर्णविराम मिळाला. त्या जीवनाला कोट्यवधी जनतेनं अश्रुरूपानं तिलांजली वाहिली. शांतिघाटाला एका तीर्थाचं स्वरूप प्राप्त झालं.

नेहरूंच्या पार्थिव देहाचे रक्षाभूत अवशेष गंगा-यमुनांच्या संगमात आणि भारतातील सुप्रसिद्ध आणि पवित्र क्षेत्रांत, आदरपूर्वक, श्रद्धेनं आणि पावित्र्यानं विसर्जित करण्यात आले. त्याचप्रमाणे ती रक्षा, त्यांच्या अलौकिक आणि महान् इच्छापत्राप्रमाणं, त्यांना पवित्र वाटत असलेल्या भारताच्या धरित्रीच्या कणात मिसळले गेले. पंडितजींचा पार्थिव, नेत्ररूप देह जगाच्या नजरेआड कायमचा झाला. तरी पण, त्यांची स्मृती मात्र शाश्वत आणि चिरंतन स्वरूपात भारतीयांच्या अंतःकरणात घर करून राहिली.

नेहरूंच्या निधनाचे दुःखद पडसाद फक्त भारतातूनच उठले असं नव्हे, तर साऱ्या जगातून – जगाच्या कानाकोपऱ्यातून ते उमटले. चीनसारखा एखादा अपवाद वगळल्यास जगातील सर्व लहानमोठ्या राष्ट्रांच्या राजधान्यांतून आणि राजप्रासादांतून, कायदेमंडळांतून, राजकीय वर्तुळातून नेहरूंच्या बहुविध व्यक्तिमत्त्वाबद्दल व कर्तृत्वाबद्दल धन्योद्गार आणि निधनाबद्दल दुःखोद्गार

निघाले. परस्परविरुद्ध बहुढंगी आणि बहुरंगी अशा सर्व प्रकारच्या राजकीय पुढाऱ्यांपासून तो विविध क्षेत्रांतल्या सुप्रसिद्ध व्यक्तींनी हे उद्गार काढले होते. या व्यक्ती, संस्था अगर राजकारणी पुढारी कला, शास्त्र, राजकारण, इत्यादी विविध क्षेत्रांतील होते ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

नेहरूंच्या जीवनात त्यांच्या वाट्याला आलेली, भारतातीलच नव्हे तर जगातीलही अफाट लोकप्रियता आणि निधनानंतरही त्यांच्या कर्तृत्वाबद्दल निघालेले धन्योद्गार आणि निधनाबद्दल काढले गेलेले दुःखोद्गार, जगाच्या इतिहासातील फारच थोड्या व्यक्तींच्या वाट्याला आली असेल, ही गोष्ट संशयातीत आणि वादातीत आहे. नेहरूंना भारतात आणि जगात अफाट लोकप्रियता आणि प्रतिष्ठा व मान मिळाला; त्यांच्याविषयी आदर-भावना निर्माण झाली. याचं मुख्य कारण म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणात त्यांनी अत्यंत महत्त्वाचा भाग घेतला हे निःसंशय. धनाढ्य वडिलांचा एकुलता एक मुलगा, काहीसा लाडात, श्रीमंती आणि सुखासीन वातावरणात वाढलेला, बड्या लोकांच्या संगतीत वावरणारा आणि इंग्लंडमध्ये हॅरो आणि केंब्रिज येथे पाश्चात्त्य शिक्षण घेतलेला हा मुलगा भारतात आला आणि एखादी जादूची कांडी फिरावी किंवा मोहिनी विद्येच्या आधीन व्हावा त्याप्रमाणं सारी सुखं, श्रीमंती, भावी सुखासीन जीवन झुगारून देऊन राजकारणात पडला. आपलं सारं सामर्थ्य, बुद्धी आणि कर्तबगारी पणाला लावून भारतीय स्वातंत्र्यासाठी लढला. आपल्या कर्तबगार आणि बहुमोल आयुष्यातील एकूण ३२५१ दिवस ब्रिटिश तुरुंगात, निरनिराळ्या वेळी व्यतीत केले. तुरुंगात पहिलं पाऊल टाकलं तेव्हा ८७ दिवस लखनौ तुरुंगात काढले व नंतर कधी सहा महिने, कधी दोन वर्षे, कधी चार वर्षे अशा वाढत्या तुरुंगवासानं मजल मारीत शेवटचा सर्वांत दीर्घकालीन बंदीवास अहमदनगर येथील तुरुंगात ता. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ जून १९४५ पर्यंत काढला. वयाच्या ७६ वर्षांपैकी पहिली साधारणपणे तीस वर्षे सोडली तर, बाकीची ४६ वर्षे ते भारताच्या राजकारणात आघाडीवर राहिले. साध्या काँग्रेसमधील स्वयंसेकापासून तो पुढे जनरल सेक्रेटरी व अध्यक्षपदापर्यंत मानाच्या जागा भूषविल्या; अतिपरिश्रम केले; कष्ट भोगले; पडेल तो त्याग केला; सर्वस्वाचा होम केला; तनमनधनानं भारतीय स्वातंत्र्यासाठी संग्राम

केला. त्या साऱ्या श्रमांचं, कष्टांचं, त्यागाचं फळ १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळून एक भारतीय म्हणून त्यांच्या पदरात पडलं. त्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून सतत १८ वर्षे, भारताच्या प्रतिष्ठेसाठी आणि उन्नती-साठी त्यांनी अविरत श्रम चालूच ठेवले आणि, हे कार्य करीत असतानाच त्यांना मृत्यू आला. स्वातंत्र्याचं स्वप्न साकार झालं; पण भारताची प्रतिष्ठा आणि उन्नती होण्याचं कार्य अर्धवटच टाकून त्यांना इहलोकातून महानिर्वाण करावं लागलं.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील आघाडीचा झुंझार सैनिक, त्यासाठी त्यांनी भोगलेले दीर्घकालीन कारावास, सर्वस्वाचा केलेला त्याग, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्राचं धुरीणत्व स्वीकारून, पंतप्रधान पदावरून भारतात उभारलेली आणि सतत सतरा वर्षे नांदविलेली लोकशाही, भारताच्या उन्नतीसाठी केलेले प्रयत्न आणि दाखविलेल्या दिशा, भारताच्या व जगाच्या स्थैर्यासाठी आणि मागासलेल्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी केलेले प्रयत्न आणि विश्वशांतीसाठी केलेले परिश्रम या सर्व राजकीय कार्याविषयी आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल नेहरूंविषयी भारतात आणि साऱ्या जगात प्रेम, आदर आणि प्रतिष्ठा प्राप्त होणं अगदी साहजिकच आहे व तो त्यांच्या जीवनात आणि निधनानंतरही भरपूर– अगदी इतर त्यांच्यासारख्या राजकारणी पुरुषांना हेवा वाटण्याइतका मिळालाही. कोणत्याही राष्ट्रातील पुढाऱ्याला आणि खुद्द भारतातही कोणत्याही पुरुषाच्या वाट्याला इतर प्रमाणात मान, प्रेम, आदर आणि प्रतिष्ठा मिळाली; अगदी अलीकडील भारताच्या इतिहासातही, खुद्द म. गांधींनाही इतका आदर अगर प्रेम संपादन करता आलं नाही, असं विधान केलं तर ते अतिशयोक्तीचं किंवा विवाद्य ठरणार नाही. जगातील इतर राष्ट्रांतील पुढारी किंवा राजकारणधुरंधर यांच्याही वाट्याला, नेहरूंचाइतकी लोकप्रियता किंवा आदर, प्रेम, मान अगर प्रतिष्ठा आली नसेल अशी जर वस्तुस्थिती आहे तर मग असा प्रश्न उभा राहतो की, नेहरूंना भारतात आणि इतर राष्ट्रांत जो मान व प्रतिष्ठा प्राप्त झाली; त्यांच्याविषयी प्रेम, आणि आदर वाटतो तो केवळ त्यांच्या राजकीय क्षेत्रातील कर्तृत्वामुळेच? की त्याला अन्य काही कारणे आहेत? इतर राजकीय नेत्यांत नसलेले राजकीय कर्तृत्वाव्यतिरिक्त, गुण नेहरूंत होते? राजकीय कर्तृत्वाशिवाय इतर क्षेत्रातील त्यांचं वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्व त्यांच्या या लोकोत्तर प्रतिष्ठेला कारण

असेल का ? त्यांचं व्यक्तिमत्त्व, स्वभावधर्म, प्रकृतिधर्म, आचरण विचार, यांमध्ये असाधारण अशी काही वैशिष्ट्ये होती का ?

नेहरूंच्या जीवनापैकी फार मोठा काळ आणि भाग राजकीय कर्तृत्वानं व्यापलेला आहे. त्यांचं राजकीय कर्तृत्व विशाल आणि व्यापक, व म्हणून नेत्रदीपक आहे यात संशय नाही. नेहरूंचं नाव उच्चारलं की, त्यांचं राजकीय कर्तृत्वच प्रामुख्यानं डोळ्यापुढं उभं राहतं, परंतु, त्यांच्या चरित्राचं सर्वांगीण आणि डोळस परिशीलन केलं; राजकारणाशिवाय त्यांच्या जीवनाच्या इतर विविध आणि समृद्ध पैलूंचं सम्यक् दर्शन घेतलं; आणि राजकारणाशिवाय इतर अनेक क्षेत्रांतील त्यांचं कर्तृत्व, त्यांच्या आवडीनिवडी, प्रकृतिधर्म, स्वभाव-वैशिष्ट्ये, त्यांचा अभ्यास, आणि व्यक्त केलेले विचार लक्षात घेतले तर वर उपस्थित झालेल्या सर्व प्रश्नांचं उत्तर निःसंदिग्धपणे "होय" असंच द्यावं लागेल. नेहरूंच्या चरित्राकडे मुख्यतः आजपर्यंत राजकीय दृष्टिकोनातून आणि त्यांच्या चरित्राच्या आणि जीवनाच्या इतर विविध पैलूंकडे अत्यल्प प्रमाणातच पाहिलं गेल्यामुळं त्यांचं राजकीय चरित्रच डोळ्यासमोर उभं राहतं; मनात ठसतं. इतर पैलूंकडे तितकंसं लक्ष जात नाही; मनात भरत नाही; दृष्टिआड होतं. आणि म्हणूनच त्यांच्या जीवनात आणि निधनानंतर त्यांच्याविषयी जे लिहिलं गेलं, किंवा उद्गार काढले गेले ते मुख्यतः त्यांच्या राजकीय कर्तृत्वा-बद्दल. ज्याला सर्वसामान्यपणे नेहरूंचं 'सांस्कृतिक दर्शन' म्हणता येईल असं दर्शन त्या लिहिण्यात दिसून येत नाही. क्वचित दिसून येतं तेही अगदी अल्प-प्रमाणात; परंतु तेही त्यांच्या राजकीय कर्तृत्वाच्या संदर्भात. केवळ नेहरूंचं सांस्कृतिक दर्शन घडविण्याचा प्रयत्न झालेला आढळत नाही. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी पंडित नेहरूंच्या निधनदिनी, म्हणजे दि. २७ मे १९६४ रोजी राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून जे भाषण केलं त्यात नेहरूंचं ओझरतं सांस्कृतिक दर्शन करून दिलं आहे. या संदर्भात नेहरूंच्या भगिनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांनी आपल्या With No Regrets या पुस्तकात लिहिलेलं एक वाक्य उल्लेखनीय आहे. नेहरूंना मिळालेल्या अफाट लोकप्रियतेविषयी त्या लिहितात : "जवाहरला जर भारतात देवस्वरूप आज मानण्यात येत असेल तर ते त्याच्या सद्गुणांबद्दल, सामर्थ्याबद्दल किंवा धैर्याबद्दलच फक्त नव्हे; तर त्याच्या मानवी स्वभावधर्मांबद्दल होय." स्वातंत्र्यपूर्वकालातील आणि स्वातंत्र्य-

प्रातीनंतर काही काल नेहरूंचे एक श्रेष्ठ व ज्येष्ठ सहकारी पुढारी श्री. सी. राजगोपालचारी यांनी नेहरूंच्या निधनानंतर काढलेले उद्गारही या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आपल्या उद्गारात नेहरूंबद्दल गौरवोद्गार काढताना ते म्हणाले होते : " ...जिवलग मित्राला अंतरलो. आपल्या सर्वांमध्ये तो अत्यंत प्रगत होता. आपल्यामधील कित्येक व्यक्ती त्याच्याइतक्या अजूनही प्रगत नाहीत... "

—आणि म्हणूनच नेहरूंचं ' सांस्कृतिक दर्शन ' आपण करून घेणं– ते करून घेण्याचा निदान प्रयत्न तरी करणं अत्यंत आवश्यक आहे. ते दर्शन करून घेतलं तरच नेहरूंचं समग्र जीवन व कार्य यांचा परिचय करून घेतल्याचं श्रेय आपल्या पदरात पडणार आहे. हे श्रेय पदरात पाडून घ्यावयाचं असेल तर अर्थातच आपल्याला त्यांच्या राजकारणाचा विचार करता येणार नाही. राजकारण हा विषयच असा आहे की, त्यावर मतभेद होणं अगदी साहजिकच असतं आणि राजकारणावरूनच जर एखाद्या व्यक्तीचं मूल्यमापन करावयाचं झालं तर ते ह्या मतभेदातून निर्माण होत असल्याकारणानं ते मूल्यमापन समतोल किंवा त्या व्यक्तीला न्याय देणारं ठरत नाही. मूल्यमापन करणाऱ्या व्यक्तीची मतं, पूर्वग्रह, प्रकृतिभिन्नता, आणि दृष्टिकोण याचा परिणाम त्या मूल्य-मापनावर झाल्याशिवाय खचित राहणार नाही आणि म्हणूनच नेहरूंचं सांस्कृतिक दर्शन घेत असताना त्यांचं राजकारण– एकदंच नव्हे तर राजकारणात पडण्यापूर्वी त्यांच्या मनावर झालेले राजकीय संस्कार याकडे आपल्याला संपूर्ण दुर्लक्ष करणं आवश्यक ठरणार आहे.

卐 卐 卐

२

संस्कार

जगात कोणत्याही व्यक्तीला अलौकिक व श्रेष्ठ महत्पद प्राप्त होतं, ते पद त्या व्यक्तीला अल्पावधीत प्राप्त होत नाही. "एक दिवस तो सकाळी झोपून उठला आणि आपण जगप्रसिद्ध झाल्याचं त्याला आढळून आलं" असं एका पाश्चात्त्य कवीबद्दल म्हणण्यात येतं. परंतु, हे विधान वाच्यार्थानं न घेता लाक्षणिक अर्थानंच घ्यायला पाहिजे. कारण असं की, खरोखरच तो कवी काही एका रात्रीत प्रसिद्धीस आला नव्हता हे निश्चित. त्याची काव्यात्म वृत्ती आणि प्रतिभा याची त्यानं केलेली जोपासना व वाढ, काव्यलेखनात त्यानं केलेले परिश्रम व प्रयोग, त्या काव्याची प्रसिद्धी आणि असंख्य रसिकांपर्यंत ते काव्य पोहोचून, त्यांनी त्याचं केलेलं चोखंदळ वाचन

यामध्ये खूपच कालावधी गेलेला असणार हे निश्चितच. त्या कवीला प्रसिद्धी अल्पावधीत मिळाली एवढाच त्या विधानाचा अर्थ घ्यावयास हवा.

या कवीप्रमाणेच विविध क्षेत्रांत नामवंत झालेल्या, महत्पद प्राप्त झालेल्या व्यक्तींच्या बाबतीत म्हणता येईल. त्या व्यक्तीला मिळालेलं यश, त्याला जगात मिळालेली प्रसिद्धी किंवा मिळालेलं श्रेष्ठत्व हे अल्पावधीत मिळालेलं नसतं. यशप्राप्तीसाठी, कीर्तीसाठी किंवा महत्पदासाठी आवश्यक असणारे बाल्यपणापासूनचे संस्कार, शिक्षण, अनुकूल परिस्थिती व प्राप्त झालेल्या सुसंधी हे सारं जोपासून, वाढीस लावण्यासाठी त्या व्यक्तीनं केलेले परिश्रम आणि तपश्चर्या, या सर्वांची अत्यंत आवश्यकता असते. नेहरूही या सर्वसामान्य नियमाला अपवाद नव्हते. नेहरूंचं राजकारणातील श्रेष्ठत्व विवाद्य असू शकेल, परंतु एक राजकारणाव्यतिरिक्त विविधरंगी समृद्ध जीवन जगणारी एक श्रेष्ठ व्यक्ती म्हणूनही त्यांना मान्यता मिळालेली आहे. एक प्रगत विचाराचं सुसंस्कृत व्यक्तित्व नेहरूंमध्ये साकार झालेलं अनेकांनी पाहिलं आहे; त्या व्यक्तित्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. विचारवंत साहित्यिक, निसर्गप्रेमी रसिक, कलाप्रिय, इतिहासाचे डोळस अभ्यासी, थोर मानवतावादी, शांततेचे उपासक, निस्सीम कर्मयोगी, महान राष्ट्रवादी व एकनिष्ठ राष्ट्रप्रेमी, असा त्यांचा लौकिक सर्वत्र पसरलेला आहे. नेहरूंसारखं इतकं विविधरंगी सुसंस्कृत आणि प्रगत जीवन जगणारी व्यक्ती जगाच्या इतिहासात क्वचितच आढळून येईल.

नेहरूंच्या या जीवनाला, मिळालेल्या नावलौकिकाला आणि प्राप्त झालेल्या महत्पदाला वर सांगितलेल्या सर्वच गोष्टी अधारभूत झालेल्या आहेत, हे निःसंशय. परंतु, त्यांच्या जीवनाला आधारभूत झाले आहेत त्यांच्या मनावर बाल्यपणापासून झालेले सुसंस्कार होय. ही गोष्ट, त्यांच्या संपूर्ण चरित्राच्या अभ्यासकांच्या सहज ध्यानात येईल. त्यांच्या पुढील बहुविध समृद्ध जीवनाची बीजे त्या सुसंस्कारातच आढळून येतील.

" आपल्या संपन्न आईवडिलांचा मुलगा, विशेषतः भारतात, बिघडण्याचीच शक्यता जास्त. " आपल्या आत्मचरित्राच्या प्रारंभीच नेहरू लिहितात, " आणि जर तो मुलगा, आपल्या वयाच्या अकराव्या वर्षांपर्यंत परंतु,

एकुलता एक असेल तर तो बिघडून जाण्याची शक्यता अधिकच." नेहरूंच्या बाबतीत मात्र तसं झालं नाही.

नेहरू आपल्या आईवडिलांचे एकुलते एक पुत्र. त्यांच्या दोन्ही भगिनी त्यांच्यापेक्षा खूपच लहान होत्या. त्यामुळं नेहरूंच्या बालपणी त्यांना मुलांच्या संगतीचा लाभ झाला नाही. शाळेत न जाता घरीच शिक्षणाची स्वतंत्र सोय केली गेल्यामुळं समवयस्क सोबत्यांचा सहवासही होण्याची शक्यता नव्हती. त्यांच्या एकत्रकुटुंबात आतेभाऊ-मामेभाऊ वगैरे निकटच्या नात्यातील मुलं असली तरी ती सर्व नेहरूंपेक्षा मोठी होती आणि म्हणून ती सर्व आपल्या शाळा-कॉलेजातील समवयस्क मित्रांबरोबर अभ्यास करण्यात व खेळण्यात दंग असत. त्यामुळं नेहरूंचं बालपण एकलकोंडेपणात आणि समवयस्क मित्रांच्या आवश्यक सहवासाशिवाय गेलं होतं, त्यामुळं त्यांची प्रवृत्ती आत्मनिष्ठ आणि स्वप्नाळू बनून गेली.

भोवताली सर्व सुखं होती; समृद्धता होती. कशाचीही कमतरता नव्हती किंवा तुटवडा नव्हता. अशा सुखसमृद्धीच्या वातावरणात नेहरूंचं बालपण गेलं. या सर्व सुखसमृद्धीला कारणीभूत झालेले त्यांचे वडील स्व. मोतीलाल नेहरू यांच्याविषयी नेहरूंना नितांत परंतु भीतियुक्त आदर वाटत असे. आपल्या वडिलांविषयी वाटत असलेल्या भावना ते प्रगट करताना म्हणतात : "वडिलांविषयी मला नितांत आदर वाटत असे. सामर्थ्य, धैर्य आणि बुद्धिमत्ता या गुणांची ती मूर्तिच आहे असं मला वाटे. मी पाहिलेल्या इतर सर्व व्यक्तींपेक्षा ते श्रेष्ठ आहेत ही माझी त्यांच्याविषयीची भावना आणि मोठं झाल्याबरोबर त्यांच्याप्रमाणंच आपण व्हायचं अशी इच्छा मी माझ्या हृदयात जतन करून ठेवली होती. परंतु, त्यांच्याविषयी माझ्या मनात कितीही आदर वसत असला, प्रेम असलं, तरी मला त्यांची भीतीही वाटे. नोकरांवर आणि इतरांवरही संतापलेले मी त्यांना पाहिलं होतं; आणि त्या वेळी ते मला अतिशय उग्र वाटत. माझ्या अंगाचा भीतीनं थरकाप होई. अशा वेळी नोकरांना त्यांच्याकडून मिळणाऱ्या या वर्तणुकीबद्दल मला त्यांचा राग येई. त्यांचा संताप भयंकर असे आणि अनेक वर्षांनंतरही त्यांच्याइतका संतापी स्वभावाचा मनुष्य माझ्या आढळात आला नाही. परंतु, सुदैवानं त्यांना विनोदबुद्धीही होती. तशीच

पोलादी इच्छाशक्ती होती. आणि त्यामुळं स्वतःच्या मनाला आवर घालणं त्यांना शक्य होई. वय वाढत गेलं तशी स्वतःच्या मनावर ताबा ठेवण्याची त्यांची शक्तीही वाढत गेली. आणि पुढे पुढे तर त्यांचा पूर्वीचा संताप क्वचितच उफाळून येई.

मोतीलालांच्या या संतापाचा अनुभव नेहरूंनाही आलेला होता. नेहरू हे जरी मोतीलालांचे एकुलते एक चिरंजीव असले तरी, शिस्तीचे व उच्च संस्कारांचे मोतीलाल हे भोक्ते असल्यामुळे त्यांनी नेहरूंचे भलत्या बाबतीत लाड केले नव्हते, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. नेहरू हे त्या वेळी पाचसहा वर्षांचे असतील. एक दिवस मोतीलालांच्या टेबलावर नेहरूंना दोन फाउंटन पेन्स ठेवलेली दिसली व त्यांकडे ते अधाशी नजरेनं पाहू लागले. एकाच वेळी वडिलांना दोन पेन्स उपयोगात आणणं अशक्य आहे असा सोयिस्कर विचार मनाशी करून नेहरूंनी त्यातील एक पेन पळविलं. नंतर हरवलेल्या पेनचा तलास लावण्याचं कार्य जारीनं सुरू झाल्याचं समजताच नेहरू भयभीत झाले. पेनचा नंतर शोध लागला आणि नेहरूंचा अपराध जाहीर झाला. मोतीलालांचा संताप अनावर झाला आणि संतापाच्या भरात त्यांनी नेहरूंना भरपूर झोडपून काढलं.

आपल्या पितृतुल्य बंधूच्या मृत्यूनंतर साऱ्या मोठ्या कुटुंबाची जबाबदारी मोतीलालांवर येऊन पडली होती. त्या वेळी ते तरुण होते. आणि ती जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांनी अपरंपार कष्ट केले. वकिलीच्या धंद्यात यशस्वी होण्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावलं. आणि थोड्याच अवधीत ते नामवंत वकील म्हणून प्रख्यात झाले. या यशामुळं मोतीलालजी आर्थिकदृष्ट्या संपन्न झाले व त्याबरोबरच ते स्वाभिमानी आणि स्वावलंबी बनले. संकटांशी सामना देण्याची लढाऊ वृत्ती त्यांच्या स्वभावात आणि प्रवृत्तीत भिनून गेली. "यशःसोपानावरील त्यांची पकड घट्ट होती आणि पायरीपायरीने ते वर चढत गेले; दुसऱ्याच्या मदतीने नव्हे किंवा दुसऱ्या कुणाच्या उपकाराने नव्हे, तर स्वतःच्या इच्छाशक्तीवर आणि बुद्धिमत्तेवर!" नेहरूंनी आपल्या वडिलांच्या यशाविषयी लिहून ठेवलं आहे. परंतु, वाढत्या मिळकतीबरोबर, पैसा साठवून ठेवण्यापेक्षा तो जास्त जास्त खर्च करण्याकडे

मोतीलालजींची मनःप्रवृत्ती होती. खेळकर प्रवृत्ती आणि उच्च राहणीची आवड यामुळे मिळकतीबरोबरच खर्च करणं त्यांना जड वाटत नसे. आणि त्याचा परिणाम म्हणूनच ते जास्त जास्त पाश्चात्त्य राहणीकडे वळले.

सबंध दिवसभर केलेल्या परिश्रमानंतर सायंकाळी मोतीलाल घरी आले की, त्यांच्याभोवती मित्रमंडळी जमत व गप्पागोष्टींना रंग चढे. हास्यविनोदाला पूर येई. मोतीलालजी यांचा या गप्पाविनोदात महत्त्वाचा व प्रमुख भाग असे. नेहरू कधी कधी पडद्याआडून त्यांच्यात इतक्या गप्पा तरी कसल्या चालल्या आहेत हे जाणून घेण्यासाठी पहात. अशा वेळी मोतीलालजी नेहरूंना बाहेर बोलावून घेऊन आपल्या मांडीवर बसवून घेत असत. नेहरूंबद्दल मोतीलालजींच्या मनात असीम प्रेम होतं, परंतु ते अतिरिक्त किंवा आंधळं नव्हतं. नेहरूंवरील असीम प्रेमाचा अतिरेक त्यांनी कधीच होऊ दिला नाही, किंवा गैरवाजवी प्रदर्शनही केलं नाही. नेहरूंच्या बालमनावर उत्तम संस्कार व्हावेत, लाडावून भलत्या मार्गाने, श्रीमंत पित्याच्या इतर मुलांप्रमाणं, जाऊ नये यासाठी त्यांनी नेहरूंना, आपलं वात्सल्य आणि प्रेम अंतःकरणातच ठेवून, शिस्तीत आणि थोड्याफार धाकातच ठेवलं होतं. त्यामुळं योग्य तेच संस्कार नेहरूंच्या मनावर बालपणापासूनच झाले होते. मोतीलालजींच्या या धोरणामुळं नेहरूंच्या मनात त्यांच्याविषयी भीतियुक्त आदरभाव वास करीत होता. मोतीलालजींनी नेहरूंना कडक शासन केलं तरी नेहरूंच्या मनात त्यांच्याबद्दल कधीच अनिच्छा उत्पन्न झाली नव्हती. "शासनामुळं माझ्या पित्याविषयी माझ्या मनात वैरभाव निर्माण झाल्याचं मला आठवत नाही." नेहरू लिहितात : "ते शासन कठोर असलं तरी योग्य होतं अशीच माझी त्या वेळी भावना असावी असं वाटतं. परंतु, त्यांच्याविषयी माझ्या मनात आदरभाव आणि प्रेमभाव तीव्रतेनं वास करीत आले आहेत, तरीही त्यात भीतीचाही फार मोठा भाग होता."

नेहरूंना मोतीलालांविषयीच्या या धाकामुळं बालपणात तरी निदान त्या दोघांत दूरत्व निर्माण झालं होतं. परंतु, आईच्या बाबतीत मात्र अशी परिस्थिती नव्हती. आपल्या आईबद्दलची भावना व्यक्त करताना नेहरू लिहितात : "मला तिच्याबद्दल भीतीचा अंशही वाटत नसे; कारण, माझ्या वर्तनातील दोषांबद्दल ती क्षमा करील अशी माझी खात्री होती. आणि माझ्यावरील अतिरिक्त

आणि अभेद्य प्रेमामुळं, क्वचित मीच तिच्यावर अधिकार गाजवीत असे. माझ्या वडिलांपेक्षा तिच्याच सहवासात मी अधिक असे, आणि तीच मला अधिक जवळची वाटे. आणि वडिलांजवळ स्वप्नातही न बोलणाऱ्या गोष्टी मी तिला विश्वासात घेऊन, तिच्याजवळ बोलून टाकीत असे."

बालवयात मोतीलालजींचा मुनशी मुबारक अली यांचाही सहवास नेहरूंना घडत असे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात या मुनशींच्या सुखवस्तू अशा सर्व कुटुंबाची वाताहत झालेली असल्यामुळे, व त्या दुःखामुळे तो अतिशय शांत आणि सहनशील वृत्तीचा बनला होता. विशेषत; मुलांशी त्याची वर्तणूक अतिशय कोमल असे. एकलेपणात किंवा त्रासिक मनःस्थितीत असताना नेहरूंना या मुनशीजींचा फारच आधार वाटे. त्यांच्याजवळ "अरेबियन नाइटस्", किंवा अशाच प्रकारच्या गोष्टींचा व त्याचप्रमाणे १८५७ व १८५८ या साली झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या हकीगतींचा व त्यानंतरच्या परिस्थितिजन्य हकीगतींचा खूपच साठा होता. आणि आश्चर्यचकित मनानं त्या गोष्टी आणि हकीगती नेहरू मुनशीजींकडून तासनतास ऐकत असत.

मोतीलालजींचे बंधू पंडित नंदलाल यांच्या गतधवा पत्नी आणि नेहरूंची आई यांच्याकडूनही नेहरूंना रामायण व महाभारत यांतील पौराणिक कथा ऐकावयास मिळत असत. नेहरूंची काकू– पंडित नंदलाल यांची पत्नी– या जुन्या भारतीय पोथ्या व पुस्तके यात बहुश्रुत होत्या आणि त्यांच्याजवळ त्या गोष्टींचा फार मोठा साठा होता. या पौराणिक आणि प्राचीन पुराणांच्या आणि लोककथांच्या श्रवणामुळे नेहरूंचं त्याबद्दलचं ज्ञान खूपच वाढलं होतं.

उत्तर भारतात होळी, दिवाळी, जन्माष्टमी, दसरा व त्या वेळी करण्यात येणारी रामलीलांची नाटके, रक्षाबंधन, भय्यादूज वगैरे सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जात असतात. नेहरू–कुटुंबही या सर्व सणांत सारे भेद विसरून भाग घेत असे. नेहरूंच्या एकलकोंड्या बालसहवासविरहित या सणांना त्यांच्या बालवयात विशेष महत्त्व वाटत असे. व तेही मोठ्या आनंदानं व उत्साहानं भाग घेत असत. या सर्व सणांपेक्षा नेहरूंना त्यांच्या स्वतःच्या वाढदिवसाचं विशेष महत्त्व होतं. त्या दिवशी नेहरूंचं धान्य व इतर जिनसांसमवेत वजन केलं जाई व ते धान्य व वस्तू गोरगरिबांना वाटल्या जात असत. नवे कपडे

घालून ते अहेर स्वीकारीत. त्या दिवशी त्यांच्या घरी खूप मोठी मेजवानी असे. त्या दिवसाविषयी नेहरू म्हणतात : "त्या समारंभाचा मी नायक आहे असे मला वाटे. माझा वाढदिवस क्वचित येई एवढीच गोष्ट मला दुःखाची वाटे. माझे वाढदिवस जास्त प्रमाणात साजरे केले जावे असा हट्ट धरण्याचाही मी प्रयत्न केला होता ! वाढत्या वयाची अप्रिय आठवण करून देणारे असे हे वाढदिवस असतात याची जाणीव पुढे येणार आहे, हे त्या वेळी मला समजत नव्हतं."

नेहरू दहा वर्षांचे झाले आणि त्याच सुमारास मोतीलालजींनी नवीनच बांधलेल्या त्या काळच्या आधुनिक व प्रशस्त अशा "आनंद-भवन" या नवीन बंगल्यात ते सर्व कुटुंब राहण्यास गेले. या बंगल्यापुढे प्रशस्त बाग होती; त्याचप्रमाणे पोहण्यास तलावही होता. या नवीन सोयीमुळं नेहरूंची मनःस्थिती जास्तच उल्हसित झाली. नेहरू पोहण्यास शिकले आणि लवकरच ते पोहण्याच्या कलेत निष्णात झाले. उन्हाळ्याच्या दिवसात तर दिवसातून काही वेळ ते तलावात मनसोक्त पोहत राहत. सायंकाळच्या वेळी मोतीलालजींचे मित्रमंडळ जमा होई; आणि त्यातील काही मित्र या पोहोण्याच्या तलावाचा फायदा घेत. अशा वेळी नेहरूंचा आनंद द्विगुणित होत असे.

त्याच सुमारास मोतीलालजींनी काही घोडेही खरेदी केले होते. आणि नेहरूंसाठी खास एक तट्टूही त्यांनी पैदा केलं होतं. या तट्टावर बसून नेहरू नित्य फेरफटका करीत असत. प्रथम त्यांच्याबरोबर सैन्यातील सेवानिवृत्त घोडेस्वार असे. त्या वेळची एक आठवण नेहरूंच्या स्मरणात दीर्घकाल राहिली होती; आणि ती त्यांनी आपल्या आत्मचरित्रात दिली आहे. एके दिवशी संध्याकाळी ते आपल्या सुंदर छोट्या तट्टावरून पडले. ते तट्टू तसंच एकटंच सरळ घरी गेलं. मोतीलालजी त्या वेळी टेनिसच्या खेळात निमग्न होते. तट्टाला एकटेच परत आलेलं पाहून एकच खळबळ उडाली. आणि टेनिस खेळणारे, मोतीलालजींच्या मार्गदर्शनाखाली नेहरूंचा शोध घेण्यासाठी मिळतील त्या वाहनातून बाहेर पडले. त्यांच्या दृष्टीस नेहरू सुखरूप परत येताना दिसले. आणि एखादं वीरकृत्य करून आलेल्या वीराप्रमाणं नेहरूंना वागवण्यात आलं.

नेहरूंना अकरावं वर्ष लागण्याच्या सुमारास फर्डिनंड टी. ब्रुक्स या रहिवासी शिक्षकाची नेमणूक करण्यात आली. जवळजवळ तीन वर्षं या शिक्षकानं

नेहरूंना शिक्षण दिलं आणि त्याच्या शिक्षणाचा अनेकविध परिणाम नेहरूंच्या मनावर झाला. ब्रुक्सनं नेहरूंच्या मनात वाचनाची गोडी निर्माण केली. त्यामुळं त्या काळात नेहरूंनी अनेक इंग्रजी पुस्तकांचं, हेतुपूर्ण नसलं तरी, खूपच वाचन केलं. बालवाङ्मय आणि प्रौढ मुलांचं वाङ्मय नेहरूंनी भरपूर वाचून काढलं लेविस कॅरोल (Lewis Carroll) या लेखकाची पुस्तके व The Jungle Books आणि Kim ही त्यांची विशेष आवडती पुस्तके होती. (Don Quixote) या पुस्तकातील गुस्ताव डोरेच्या (Gustave Dore) चित्रांनी त्यांना मोहित केलं होतं आणि (Fridtj of Nausen च्या Farthest North या पुस्तकाच्या वाचनानं साहसकथांच्या एका नवीन विश्वात त्यांना नेऊन सोडलं. स्कॉट्, डिकन्स् आणि थॅकरे यांच्या कित्येक कादंबऱ्या, एच्. जी. वेल्सच्या अद्‌भुत कथा, मार्क ट्वेन आणि सर ऑर्थर कॉननडॉयल यांच्या शेर्‌लाक् होमच्या कथा, नेहरूंनी त्याच काळात वाचून काढल्या. प्रिझनर् ऑफ झेंडा या कादंबरीनं नेहरू भारावून गेले होते. जिरोम के. जिरोम या विनोदी लेखकाचं "बोटीतील तीन व्यक्ती" (Three Men in a Boat) हे पुस्तक तर विनोदाचा एक अत्युत्कृष्ट नमुना असं नेहरूंचं मत बनलं होतं. D. Maurieris चं Trilly आणि Peter Ibbetson ही पुस्तकं तर नेहरूंच्या प्रदीर्घ कालपर्यंत स्मरणात राहिली होती. याच काळात काव्यवाचनाची गोडी नेहरूंच्या मनात निर्माण झाली. आणि ती गोडी, त्यांच्या आयुष्यात अनेक बदल झाले तरी मृत्यूपर्यंत, त्यांच्या अंतःकरणात दृढ धरून आणि टिकून राहिली होती.

ब्रुक्सच्या शिक्षणानं आणि सहवासानं नेहरूंच्या मनात विज्ञानाच्या गूढ व्यवहारासंबंधीचं आकर्षण निर्माण केलं. एक छोटीशी प्रयोगशाळा त्यांनी सजविली होती. व या प्रयोगशाळेत पदार्थविज्ञानशास्त्र आणि रसायनशास्त्र यांचे प्राथमिक प्रयोग करण्यात नेहरूंनी अनेक परंतु अद्‌भुतरम्य तास घालविले असतील.

ब्रुक्सने आणखीही एका बाबतीत नेहरूंच्या मनावर, काही काळपर्यंत टिकणारा, असा परिणाम केला होता. ब्रुक्स थिऑसॉफिस्ट होता. त्यांच्या खोलीत तो दर आठवड्यास काही थिऑसॉफिस्ट मंडळींची बैठक भरवीत असे.

या बैठकीस नेहरू उपस्थित असत. आणि त्यामुळं ब्रह्मविद्येतील काही पारिभाषिक शब्द आणि तत्त्व नेहरूंना परिचित झाली. हे सर्वच नेहरूंना समजत नसे हे उघड होतं, परंतु, त्यामुळं हिंदू तत्त्वज्ञान, बुद्धाचं "धम्मपद", पॉय्थॉगॉरस् इत्यादी तत्त्वज्ञानी व तत्त्वज्ञान यांचं थोडंफार ज्ञान त्यांना झालं. तेथे चाललेल्या चर्चा व वादविवाद ऐकून हिंदुधर्मविषयीचा आदर खूपच वाढला. हिंदू संस्कारविधिपद्धती किंवा उपचार भागाविषयी नव्हे, पण उपनिषदे व भगवद्गीता या धार्मिक ग्रंथांतील तत्त्वज्ञानाचं त्यांना विशेष आकर्षण वाटूं लागलं. त्यांना ते तत्त्वज्ञान पूर्णपणे, त्या वयात, कळत नसे, पण त्याविषयी त्यांना तीव्र आकर्षण वाटत असे हे मात्र खरं. त्याचा परिणाम नेहरूंच्या मनावर कसा झाला हे नेहरू सांगतात : "आध्यात्मिक शक्तीच्या कल्पना माझ्या मनात तरळू लागून, मी स्वतः अनंत योजने अंतराळात विहार करीत आहे असा साक्षात्कार मला होत असे. माझ्या संबंध जीवनात (कोणत्याही साधनाशिवाय) मी अंतराळात विहार करीत आहे हे स्वप्न मला नित्य पडत आलं आहे. आणि कधी कधी ते इतकं स्पष्ट व वास्तव असे की, खाली सभोवार भू-भागाचा अफाट देखावा मला पसरलेला दिसे. फ्रॉईड् किंवा तत्सम इतर स्वप्नपरिभाषक या माझ्या स्वप्नाचं कसं पृथक्करण करतील हे मला सांगता येणार नाही."

ब्रुक्सच्या शिक्षणाचा आणि सहवासाचा आपल्या जीवनावर झालेल्या परिणामांबद्दल नेहरूंनी कृतज्ञतेचे उद्गार काढलेले आहेत. पुढं ब्रुक्स निघून गेले. नेहरू पंधरा वर्षांचे झाले आणि मे १९०५ मध्ये शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्यासाठी त्यांनी प्रस्थान ठेवलं.

आपल्या एकुलत्या एक पुत्राला, सधन अवस्थेत, आपल्यापासून दूर इंग्लंडसारख्या परदेशात पाठविण्यास मोतीलाल तयार झाले, या पाठीमागे त्यांचा एक महत्त्वाचा हेतू होता. इतर श्रीमंत आईबाप आपल्या मुलांना परदेशी शिक्षणासाठी पाठवताना, श्रीमंतीचं प्रदर्शन, पुढं मिळणारी लठ्ठ पगाराची नोकरी व आर्थिक स्वास्थ्य किंवा समृद्धता हा हेतू मोतीलालजींच्या मनात अंशतःही नव्हता. नेहरू इंग्लंडला गेल्यावर मोतीलालजींनी नेहरूंना जे पत्र लिहिलं होतं, त्या पत्रात त्यांनी नेहरूंना इंग्लंडला परदेशी शिक्षणासाठी

पाठविण्यामागील त्यांच्या हेतूचं मौलिक स्पष्टीकरण केलेलं आहे. ते जितकं हृद्य आणि भावनापरिपूर्ण आहे तितकंच अमोल व धडा घेण्यासारखं आहे. मोतीलालजी लिहितात : " या जगात, किंवा यापलीकडील पुढे येणाऱ्या विश्वातही, तुझ्यामध्ये साकार झालेला आमचा प्रिय अमोल ठेवा आम्ही दूर ठेवीत आहो हे तू लक्षात ठेवलं पाहिजेस. तुझ्या विरहाच्या दुःखाच्या यातना आम्ही सहन करीत आहो. त्या तुझं भलं व्हावं या फक्त एकाच हेतूनं. तुझ्या भावी जीवनाची तरतूद करून ठेवावी असाही हेतू नाही. कारण ते कार्य माझ्या एकाच वर्षाच्या उत्पन्नातून मी करू शकेन. मला तुझ्यातून खराखुरा माणूस (Real man) घडवायचा आहे; आणि तसा तू होशीलच. शिक्षणाशिवाय किंवा अल्प शिक्षण देऊन आमच्याजवळ तुला डांबून ठेवून, तुझ्यासाठी संपत्ती शिल्लक मागे ठेवणं ही गोष्ट स्वार्थीपणाची— पाप आहे असंच मी म्हणेन. "

आपल्या एकुलत्या एक लाडक्या पुत्राला आपल्यापासून दूर इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी पाठविण्यात मोतीलालजींच्या मनात असामान्य असा हेतू होता. आणि नेहरूंनीही हा उच्च हेतू सदैव मनात बाळगूनच ठेवला होता. असं इंग्लंडमधील त्यांच्या वर्तनावरून दिसून येतं. प्रथम काही दिवस नेहरूंना इंग्लंडमधील वास्तव्य जड वाटणं साहजिकच होतं. " यापूर्वी कधीही परकीयांत मला एकटंच स्वतंत्रपणे ठेवण्यात आलेलं नव्हतं, " नेहरू लिहितात : " आणि त्यामुळं मला एकलेपणा आणि घरची ओढ वाटे; परंतु ही स्थिती फार काळ टिकली नाही. शाळा, अभ्यास आणि खेळ यांत सदैव स्वतःला गुंतून ठेवून तेथील जीवनात समरस होण्याची मी धडपड केली. मी तेथील परिस्थितीत बसत नव्हतो. मी त्यातील एक नाही अशीच माझी भावना होती आणि माझ्याबद्दल इतरांचंही तसंच मत असावं. "

या काळात सुरुवातीला नेहरू थोडेफार एकलकोंडेपणानं वागत तेही वरील कारणामुळेच; परंतु, खेळांच्या बाबतीत ते माघार घेत नसत. खेळांत त्यांनी प्रावीण्य मिळवलं नसलं तरी शालेय खेळांत ते मनापासून भाग घेत. तरी पण खेळांव्यतिरिक्त मात्र ते अभ्यास आणि वाचन यांमध्ये आपला सारा वेळ घालवीत असत. त्यामुळं, त्यांच्या वयाच्या मानाने अभ्यासक्रमातील बऱ्याच

विषयांत– विशेषतः सर्वसामान्य ज्ञानात, त्यांचा क्रम बराच वरचा लागे. इतर विद्यार्थ्यांपेक्षा त्यांच्या मनाचा स्वाभाविक काल बऱ्याच विषयांकडे होता. म्हणून आपल्या सहकारी विद्यार्थ्यांपेक्षा ग्रंथ आणि वर्तमानपत्रे यांचं त्यांचं वाचन खूपच होतं.

जुलै १९०७ पर्यंत– म्हणजे दोन वर्षे नेहरू हॅरो येथे शिक्षण घेत होते. या दोन वर्षांत वर्तणूक आणि अभ्यास या दोन्हीही महत्त्वाच्या बाबतीत त्यांनी मुख्याध्यापकांपासून सर्व शिक्षकांचा विश्वास संपादन केला होता. मुख्याध्यापक डॉ. जोसेफ वुड् यांनी मोतीलालजींना जो वृत्तान्त पाठविला होता, त्यात त्यांनी त्यासंबंधी स्पष्टपणे निर्वाळा दिला होता :

" प्रत्येक शिक्षक तुमच्या मुलाविषयी, अभ्यास आणि वर्तन, या दोन्ही बाबतीत चांगलेच उद्गार काढतात. त्याचे गुण स्पष्टपणे दिसतात. वर्गाच्या तो पुढेच असतो, आणि पुढील सहामाहीत तो नक्कीच वर चढेल. प्रत्येक बाबतीत मला त्याच्याविषयी समाधानच वाटते. " आणि त्यांनी भाकीत केल्याप्रमाणे सहामाहीत नेहरू उत्तीर्ण झाल्यावर डॉ. वुड् यांनी मोतीलालांना पुढील वृत्तांत पाठविला. त्यांत डॉ. वुड् म्हणतात : " प्रत्येक विषयात तो पहिला आला. वर्गाभ्यास आणि आधुनिक वाङ्मय हे विषय तर अत्युत्तम. बीजगणितात ' उत्तम ', भूमितीत " पराकाष्ठेचा व्यवस्थित " आणि " अभ्यासू आहे. " " गृहपाठावर शिक्षकाचा अभिप्राय " अत्युत्कृष्ट "...तात्पर्य अत्यंत प्रशंसनीय प्रगती. त्यानंतरच्या एका वृत्तांतात डॉ. वुड् लिहितात : " तुमच्या मुलाबद्दल तुम्हांला अभिमान वाटला तर तो वाजवी आहे. त्याची प्रगती उत्तम आहे आणि शाळेत तो आपली छाप ठेवून आहे. त्याचे गुण आणि अभ्यासू वृत्ती यांविषयी प्रत्येक शिक्षक चांगलेच उद्गार काढतात. तो संपूर्णपणे आदर्श विद्यार्थी आहे आणि त्याचा भविष्यकाल उज्ज्वल असलाच पाहिजे."

नेहरूंच्या अभ्यासूवृत्तीमुळेच त्यांना बक्षिसेही मिळत असत. G. M. Trevelyaus या लेखकाची गॅरिबाल्डीची पुस्तके आणि लँबचे Essays of Elia ही पुस्तके त्यांत विशेष उल्लेखनीय होती. मोतीलालजींना साहजिकच आपल्या एकुलत्या एक पुत्राला दूर शिक्षणासाठी ठेवण्यामागील हेतू साध्य होत आहे हे पाहून समाधान व आनंद वाटणं साहजिकच होतं हे त्यांनी आपला

संग्रहालय, पुणे. स्वरूप
क्रमांक ५५६९६ दिः ..... निर्वाह
क्रमांक 2990 दिः 20/3/07

आनंद नेहरूंना लिहिलेल्या पत्रात पुढीलप्रमाणे नमूद केला : "तुझ्या प्रगतीमुळं मला फक्त समाधानच नव्हे तर, अभिमानही वाटतो. अशीच आपली प्रगती तू पुढे चालू ठेवशील, आणि त्याबद्दल माझी खात्री आहे, तर आपल्या राष्ट्रालाही तुझा अभिमान वाटेल असा दिवस लवकरच उजाडेल."

हॅरो येथील शालेय क्षेत्र नेहरूंच्या प्रगत मतांना आणि कर्तृत्वशक्तीला अपुरं आणि संकुचित वाटलं. आणि मग केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजमध्ये शिक्षण घेण्याचा आपला मनोदय मोतीलालजींना कळविला. त्यासंबंधी झालेल्या पत्रव्यवहारांत नेहरूंना योग्य ते करण्याचा सल्ला देताना स्पष्ट शब्दांत बजावलं होतं : "...या बाबतीत काहीच सल्ला न देता, निर्णय घेणं मी तुझ्याच कर्तृत्वशक्तीवर सोपवितो. असं करणं जीवनाच्या मूलभूत तत्त्वांनाच अनुसरून ठरेल. प्रेमळ आणि तत्पर मातापिता आणि मित्र तुझ्या पाठीशी आहेत. परंतु तुलाच...फक्त तुलाच तुझ्या जीवनात निर्माण होणारे लढे लढावे लागणार आहेत."

जीवनाच्या या मूलभूत आणि बहुमोल तत्त्वाकडे मोतीलालजींनी नेहरूंचं लक्ष वेधलं असलं, तरी पण नेहरूंना योग्य तो दिलासा, पाठिंबा आणि उत्तेजन देण्याचं पितृकर्तव्य ते विसरले नाहीत. आपल्या पुत्राच्या कर्तृत्वशक्तीवर विश्वास ठेवून अत्यंत अभिमानानं आणि आत्मविश्वासानं मोतीलालजींनी आपल्या ता. २६–७–१९०७ च्या पत्रात नेहरूंना लिहिलं होतं; "...तुझ्या बाबतीत मात्र, अत्यंत तेजस्वी विद्यार्थीरत्न म्हणून तुला आपला म्हणण्यात शिक्षणसंस्थांनाच अभिमान वाटेल. माझ्या प्रिय मुला, पूर्वीप्रमाणेच योग्य, भरीव आणि निश्चल कार्य करीत रहा. मधून मधून खेळ, करमणूक आणि व्यायाम घेत जा. आणि मग, तुझ्या कालखंडातील एक अग्रेसर प्रकाशदीप म्हणून तू तळपत राहशील."

ऑक्टोबर १९०७ च्या सुरुवातीलाच सतरावं वर्ष संपून अठराव्या वर्षात पदार्पण करीत असतानाच, केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजमध्ये नेहरूंनी प्रवेश मिळविला. त्या कॉलेजात तीन वर्षे शिक्षण घेऊन रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र या तीन निसर्गशास्त्रांतील 'त्रिमूर्ती' पदवी (Natural Science Tripos) त्यांनी संपादन केली.

परंतु नेहरूंचं सारं लक्ष या तीन विषयांवरच केंद्रित गेलं होतं असं मुळीच नव्हतं. वाङ्मय, इतिहास, राजकारण आणि अर्थशास्त्र या विषयांवरील ग्रंथांचं वाचन या तीन वर्षांच्या काळात त्यांनी खूपच केलं होतं आणि त्यामुळं या विषयांच्या मूलभूत तत्त्वांचं ज्ञान त्यांनी चगलंच संपादन केलं होतं.

१९१० साली पदवी संपादन केल्यावर केंब्रिज सोडून नेहरू वकिलीचा अभ्यास करण्यासाठी लंडनला आले. दोन वर्षं ते लंडनमध्ये होते आणि बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण झाले. अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन चालूच होतं. केंब्रिज आणि लंडन येथे वास्तव्य असताना सुट्टीमध्ये ते युरोपमध्ये प्रवास करीत. १९०९ साली काउंट झेपलीनचा पहिला वैमानिक प्रवास झाला त्या वेळी नेहरू मोतीललालजींसमवेत बर्लिनमध्ये होते. त्यानंतर दोन महिन्यांनी पॅरिसमध्ये इफेल टॉवरभोवताली प्रदक्षिणा करीत पॅरिस शहरावर फिरणारं पहिलं विमान त्यांना पाहण्यास मिळालं. त्याचप्रमाणे नॉर्वेमधील वास्तव्यात सहलीसाठी ते गेले असताना, पर्वतमय प्रदेशात हिंडत असताना जिवावर बेतलेल्या प्रसंगातून ते बचावले होते.

भारतात मातापित्याच्या छत्राखाली बाल्यदशेत, नंतर खाजगी शिक्षकांच्या सहवासात आणि नंतर इंग्लंडमधील वस्तव्यात नेहरूंच्या मनावर जे जे संस्कार घडून आले त्याचं स्थूल दर्शन वर घेतलेलं आहे. जीवनाच्या त्या संवेदनक्षम आणि संस्कारक्षम कालातील त्यांच्या मनावरील संस्कारांमुळेच नेहरूंना अनेक विषयांची गोडी लागली. हे संस्कार कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा किती तरी विविध होते. विविध वाङ्मय व खेळ, वादविवाद, प्रवास, निसर्गदर्शन, उत्साहवर्धक सण, शिस्त, हास्यविनोद, पदार्थविज्ञानशास्त्र, धर्म, समाजशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र अशा अनेक आणि विविध प्रकारच्या जीवनोपयोगी व जीवन बहुविध समृद्ध करणाऱ्या अनेक गोष्टींशी त्यांचा चांगलाच परिचय झाला होता. नेहरूंची अभिजात रसिकता, साहित्यिक प्रवृत्ती आणि मानवी जीवनाशी संलग्न असणाऱ्या अनेक गोष्टींत रस घेण्याची त्यांची वृत्ती याचा मजबूत पायाच त्या काळात घातला गेला. आणि त्यांच्या नंतरच्या जीवनात या प्रवृत्तींची वाढ झाली. भारतात परत आल्यावर ते राजकारणात ओढले गेले. राजकारणानं त्यांचं सारं जीवन व्यापून टाकलं. सारं

आयुष्य राजकारणात खर्ची पडलं. तरी पण बालपणी आणि विद्यार्थिदशेत त्यांच्या मनावर झालेले संस्कार कधीच पुसले गेले नाहीत; निर्माण झालेल्या प्रवृत्ती नष्ट झाल्या नाहीत. शेवटच्या क्षणापर्यंत त्या मूळ धरून जिवंत राहिल्या. त्या प्रवृत्तींच्या सरस्वतीवर राजकारणाचं वाळवंट पसरलं तरी कारावासात, प्रवासात किंवा राजकारणाच्या धकाधकीतून ही सरस्वती आपलं स्वरूप तात्काळ प्रकट करीत असे. त्यांच्या मनावर झालेल्या संस्कारांमुळं त्यांना ज्या जीवनपद्धतीचं आकर्षण वाटत होतं ते वर्णन करताना ते लिहितात : "आणि अशा रीतीनं, जीवनाच्या सौंदर्यशोधक रसिकतेच्या अंगाचं मला आकर्षण वाटू लागलं; आणि कोणत्याही असभ्य गोष्टीत न रमतां, योग्य मार्गानं जीवन व्यतीत करीत असताना, जीवनाचा जास्तीत जास्त उपभोग घेत, समृद्ध आणि बहुविध जीवन जगण्याच्या कल्पनेनं मी भारावून गेलो." या जीवनपद्धतीचं त्यांना नुसतं निष्क्रीय आकर्षण वाटलं अशी परिस्थिती त्यांनी आपल्या जीवनात कधीच निर्माण होऊ दिली नाही. ज्या कल्पनेचं त्यांना आकर्षण वाटत होतं, ती जीवनपद्धतीची कल्पना त्यांनी आपल्या पुढील आयुष्यात प्रत्यक्ष आचरणात आणून दाखविली; ती कल्पना प्रत्यक्षात साकार केली. त्यांच्या जीवनाचा त्यांनी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. राजकारणाला तर त्यांनी आपलं सर्वस्व वाहिलं होतं. परंतु कोणत्याही असभ्य गोष्टीत जीवन फुकट न घालविता राजकारणाव्यतिरिक्तही बहुविध असं समृद्ध जीवन ते जगले आणि म्हणूनच त्यांचं नाव आणि जीवन आदरणीय ठरलं. जीनवनाचा एक महान आणि उच्च आदर्श त्यांनी निर्माण केला. श्रेष्ठ मानव म्हणून ते अजरामर झाले.

卐 卐 卐

३

कर्मयोग

सर्वसामान्य माणसाचं जीवन एखाद्या प्रवाहपतितासारखं असतं. ठराविक जीवनप्रवाहावरोबर ते वाहत जात असतं. परिस्थितीची, संस्कारांची आणि कर्तृत्वाची एक ठराविक दिशा त्या जीवनाला मिळालेली असते. त्या जीवनाला स्वतंत्र गती नसते. प्रवाहाच्या धारेत जी गती लाभेल ती त्या व्यक्तीच्या जीवनाची गती. प्रवाहाची दिशा ती त्या व्यक्तीच्या जीवनाची दिशा. त्या जीवनात परिस्थितीशी झगडा असला तरी तो तरण्यापुरता; कर्तृत्व खर्च होत असतं डोकं वर ठेवण्यासाठी; बुद्धीचा उपयोग होत असतो आत्मसंरक्षण करण्याकडे. त्या जीवनाला विशेष अर्थ नसतो; स्वतंत्र अस्तित्व नसतं. " किती एक ते जन्मले आणि मेले "

अशी त्या जीवनाची अवस्था होऊन जाते. त्या 'किती एकांत' त्याची भर पडते आणि विस्मृतीच्या पडद्याआड ते जीवन समाप्त होऊन जातं.

परंतु, महापुरुषाच्या जीवनाची तशी अवस्था नसते. ते जीवन ठराविक-तेच्या पलीकडचं असतं. जीवनाच्या दिशा बदलत्या असतात. जीवनहेतूंवर दृष्टी ठेवून प्रसंगानुसार जीवनाच्या दिशेला वळण देऊन, तो हेतू साध्य करण्याची धडपड असते. परिस्थितीवर मात करण्याची जिद्द असते. त्यासाठी जीवनभर झगडा देण्यात कर्तृत्व खर्च होत असतं. कोणत्याही ठरीव चाकोरीच्या बाहेर पडून, नवीन पाऊलवाट शोधून वाटचाल करण्याची धडपड असते. स्वतंत्र गती ते आपल्या जीवनाला देऊ शकतात; कर्तृत्वाचे नित्य नवीन पैलू त्यांच्या जीवनात निर्माण होत असतात; केवळ "स्व"त्वाकडे न पाहता "पर"तत्त्वाचा विचार करण्यात प्रज्ञा गढून गेलेली असते; जीवनाची सार्थकता आत्मोन्नतीत–स्वार्थात आहे अशी संकुचित भावना न बाळगता, जीवन अधिक व्यापक, सर्वोपकारी व्हावं म्हणून, नित्य नव्या नव्या आणि विशाल क्षितिजांचा शोध घेण्यात त्यांची दृष्टी मग्न झालेली असते. आणि मग अशा व्यापक आणि विशाल जीवनाला एक महान अर्थ, सार्थकता आणि महात्मता प्राप्त होत असते. त्या जीवनाचं एक स्वतंत्र, निराळं असं तत्त्वज्ञान प्राप्त होत असतं. आणि त्या विशाल आणि महान जीवनाचं प्रतीक म्हणून, त्या महान जीवनाच्या पार्थिव अंतानंतरही, ते तत्त्वज्ञान जिवंत राहतं; सर्वसामान्य जीवनांना मार्गदर्शक ठरतं. देह पंचत्वात विलीन झाला तरी त्या व्यक्तीचं कर्तृत्व मागं राहतं, एक आदर्श म्हणून, त्या व्यक्तीचं जीवन समाप्त झालं असलं तरी ते तत्त्वज्ञान आणि कर्तृत्व, पाठीमागून येणाऱ्या व्यक्तींना वारसा म्हणून प्राप्त होत असतं.

नेहरूंचं जीवन असामान्य होतं. कर्तृत्व लोकोत्तर होतं. जीवनात उराशी बाळगलेलं ध्येय महान होतं. ही गोष्ट प्रस्थापित करायची जरूर नाही. त्यांची महात्मता प्रस्थापित झालेली आहे. अशा या महान जीवनाचं मूलभूत तत्त्वज्ञान कोणतं होतं ? अर्थातच तेही महान असलं पाहिजे याबद्दल शंका बाळगण्याचं कारण नाही. जीवनाचं ते तत्त्वज्ञान त्यांनी प्रत्यक्ष आचरणांत आणलं म्हणूनच त्यांचं स्थान महान आणि लोकोत्तर महापुरुषांत अजरामर झालेलं आहे. नेहरूंच्या सांस्कृतिक जीवनाचा परिचय करून घेताना त्यांच्या जीवनाचं हे तत्त्वज्ञान समजून घेणं आवश्यक आहे.

नेहरूंचं सारं जीवन आणि आपल्या साहित्यातून व्यक्त केलेले विचार यामधून आपल्याला त्यांच्या जीवित-तत्त्वज्ञानाचा शोध घेता येतो. " भारताचा शोध " या पुस्तकात ते लिहितात: " कार्याची हाक सदैव माझ्या अंतःकरणात ऐकू येत आली आहे, विचारांशी फारकत झालेली ही हाक नव्हे, तर विचारातून सातत्यानं वाहत आलेली कार्याची मालिका आहे. आणि जेव्हा, क्वचितच, विचार आणि कार्य यामध्ये संपूर्ण एकवाक्यता निर्माण होते, विचारांची परिणती कार्यातून होऊन ते सफल होतात, कार्यातून पुन्हा विचार आणि परिपूर्ण जाणीव निर्माण होते. जीवनाची काही सफलता आणि त्या जीवनाच्या त्या सफल क्षणाची उत्कट जाणीव त्या वेळी निर्माण होते. " जीवनातील विचार आणि कृती यांच्या संगमाची सफलता साधणं हीच नेहरूंची जीवनभर धडपड चाललेली होती. असे मोलाचे क्षण अर्थातच कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात सतत निर्माण होणं अशक्य आहे. नेहरूंच्या जीवनातही विचार आणि कृती यांचा एकजीव झालेले मोलाचे क्षण क्वचितच येत असत. कधी कधी विचारांची कृतीवर, तर कधी कृतींची विचारांवर मात होई, आणि या दोघांची एकवाक्यता साधण्यासाठी नेहरूंची सतत धडपड चालू असे. परंतु, प्रत्यक्ष कृतिमय जीवनाच्या प्रारंभाला ही परिस्थिती वारंवार निर्माण होत आली असली, तरी एकदा विचारांचा ठामपणा सिद्ध झाल्यावर त्यानुसार कृती करणं त्यांना सुलभ जाऊ लागलं.

कार्याची हाक नेहरूंच्या संबंध जीवनात त्यांना सदैव देत आलेली आहे. ती हाक त्यांच्या हृदयात सदैव खळबळ उत्पन्न करीत असे; विचारप्रवणता निर्माण करी. त्या हाकेला प्रतिसाद देताना अनंत धोके, संकटं यांना सामना देत प्रत्यक्ष मृत्यूलाही वाकुल्या दाखविण्याची त्यांच्या मनाची सदैव तयारी असे; आणि त्यांना असीम सुखाचा साक्षात्कार होई; आणि या साक्षात्काराचा प्रत्यय नित्य येत रहावा अशी त्यांची मनीषा असे व या मनीषेला अनुसरून जीवनात त्यांनी अनेक धोके पत्करले होते; संकटांशी सामने दिले होते आणि प्राणांचीही पर्वा न करता ती संकटे त्यांनी सहन केली होती. " मृत्यूचं मला आकर्षण कधीच वाटलं नाही, पण त्याबरोबरच मृत्यूच्या भीतीनं माझा कधीही थरकापही उडालेला नाही, " असं त्यांनी म्हटलेलं आहे. परंतु त्याबरोबरच अभावात्मक जीवनावर किंवा जीवनापासून परावृत्त होण्यावर

त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. जीवनावर त्यांची श्रद्धा होती, प्रेम होतं आणि अनुभवसमृद्ध जीवन जगण्याकडे त्यांच्या मनाचा कल होता.

ही कार्यप्रवणता, कार्यातून जीवन जगण्याची त्यांची इच्छा त्यांच्या साऱ्या विचारांच्या आणि कृतींच्या मागे शक्ती होती. कित्येक वेळा प्रत्यक्ष कृती न करता, सतत विचार करून, पुढे आचरणात आणावयाच्या कृतीची वैचारिक बैठक तयार करणे, हा सुद्धा प्रत्यक्ष कृतीचाच एक भाग आहे; प्रत्यक्ष कृती-आधी विचारांची बैठक तयार करणं आवश्यक आहे. विचारांशिवाय कृती म्हणजे अविचार होय, अशी नेहरूंची विचारसरणी होती. कृती ही सर्वस्वी अमूर्त, गूढ किंवा जीवितकार्य आणि प्रत्यक्ष जीवन यांशी असंबंधित असूच शकत नाही. विचारांच्या पार्श्वभूमीचा भूतकाल, वर्तमान कालाकडे वाहत जातो, कृतीचा क्षण अवतरतो आणि त्यातून भविष्यकाल जन्माला येतो, म्हणून या तिहींचाही परस्परसंबंध असून हे तीनही काल परस्परांत गुंतलेले आहेत अशी नेहरूंच्या मनाची भावना होती. आणि आजच्या कालाच्या संदर्भात ते भूत-कालाकडे– इतिहासाकडे पाहत. इतिहासाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. परंतु, इतिहासाकडे पाहून आजचं जीवन जगण्यातील धोके त्यांनी लक्षात घेतले होते. म्हणूनच चालू जीवनाला मार्गदर्शक आणि स्फूर्तिदायक होईल एवढ्याचपुरता ते इतिहासाचा आधार घेत. इतिहास हा एकदाच होऊन गेलेला नसून, तो गतिमान असतो. रोज घडत असतो. म्हणून आजच्या जीवनाशी संलग्न अगर संबंधित नसलेला इतिहास, आजच्या काळात उपयोगी पडत नाही. भविष्यकाळ गूढ आणि अंधुक असतो. म्हणून आजची शास्त्रीय प्रगती आणि आजच्या जीवनापुढील प्रश्न यांचंच आकर्षण त्यांना वाटत असे.

या कारणामुळेच विचार, भावना आणि इच्छाशक्ती यांच्या मिश्रणातून नेहरूंच्या हातून घडणाऱ्या कृतींचा जन्म होई. आणि मग पुन्हा मग त्या कृतीतूनच विचार आणि आजच्या काळाची जाणीव त्यांच्या मनात निर्माण होई. वर्तमानाची मुळे भूतकालात असतात. म्हणून इतिहासात ते अवगाहन करीत. आजचे प्रश्न सोडविण्यासाठी, काही उत्तरे किंवा रीत मिळाल्यास पाहत आणि त्यावरून वर्तमानकालाचा विचार करीत, परंतु, हे करीत असताना वर्तमानकालाचा विसर ते मनाला क्षणभरही पडू न देण्याची खबरदारी घेत.

इतिहासाच्या अभ्यासाची त्यांची दृष्टी अशा तऱ्हेने अत्यंत डोळस होती. परंतु, त्याबरोबरच वर्तमानकाल हा भूतकालावर– इतिहासावर आधारलेला आहे आणि भूतकालही वर्तमानाशी निगडित आहे हेही ते कधी विसरले नाहीत आणि त्याच दृष्टीनं त्यांनी "भारताचा शोध" घेतला आणि "जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" टाकलेला आहे.

इतिहासाप्रमाणेच धर्माच्या बाबतीतही नेहरूंची दृष्टी गतानुगतिक किंवा अंधानुयायी नव्हती. धर्म म्हणजे काय याची व्याख्या करताना नेहरू लिहितात : "बहुतकरून धर्म म्हणजे व्यक्तीचा आंतरिक विकास आणि ज्याला इष्ट म्हणता येईल अशा एका विशिष्ट दिशेने होणारी जाणीवेची उत्क्रांती होय. ही दिशा कोणती हा पुन्हा वादाचा विषय होऊ शकेल. परंतु माझ्या समजुतीप्रमाणे धर्म आंतरिक विकासावर भर देतो आणि बाह्योपचार म्हणजेच या आंतरिक विकासाचं दर्शन होय असं मानतो. बाह्य परिस्थितीवर या आंतरिक विकासाचा शक्तिशाली परिणाम होत असतो. यात मुळीच संशय नाही. पण त्याबरोबरच बाह्य परिस्थिती आंतरिक विकासावरही भयंकर परिणाम करू शकते हेही उघड आहे."

धर्म म्हणजे काय आणि मानवी जीवनावर त्याचे कसे परिणाम होतात याचे नेहरूंचे हे उद्गार उद्‌बोधक आहेत. नेहरूंच्या या एकाच वाक्यात 'धर्म' म्हणजे काय याविषयी नेहरूंची मते स्पष्ट होतात. धर्माचा खरा हेतू म्हणून मानवाचा आत्मिक विकास होय. मानवाच्या मनावर चांगले संस्कार व्हावे एवढ्याचकरिता धर्म मानणं आवश्यक आहे. मनाचा विकास होत जातो, त्याबरोबरच कल्पनांची क्षितिजंही विस्तारली जातात. या दृष्टीनं पाहता भगवद्गीता, उपनिषदं, वेद वगैरे आपल्या धार्मिक ग्रंथांनी आत्मिक विकास घडवून आणला एवढंच नव्हे तर, त्या विकासाच्या, क्षेत्रांचाही खूपच विस्तार केला. मानवी स्वभावाला काही आंतरिक गरज असते यांची धर्मानं शिकवण दिली. त्या गरजा कोणत्या आहेत, यांची जाणीवच करून दिली असंच नव्हे; तर त्या गरजाही धर्मग्रंथांनी पुरवल्या. अनेक सुसंस्कृत, विभूती या धर्माच्या शिकवणुकीमुळेच निर्माण झाल्या. मानवी जीवनाला महान मूल्यं प्राप्त करून दिली; नीतितत्त्वांची आणि कर्तव्याकर्तव्याची जाणीव करून दिली. आपल्या "भारताचा

शोध " या ग्रंथात त्यांनी वेद, उपनिषदं वगैरे ग्रंथांचा व त्यांतील शिकवणुकीचा परामर्श घेऊन, त्यांतील वैशिष्ट्ये सांगितल्यावर नेहरू भगवद्गीतेचा परामर्श व मूल्यतत्त्व सांगताना लिहितात :

" मानवी अस्तित्वाच्या आत्मिक पार्श्वभूमीचाच परामर्श गीतेत घेतलेला असून या संदर्भात दैनंदिन जीवनातील व्यावहारिक प्रश्नांचाही विचार केलेला आढळतो. जीवनातील कर्तव्ये आणि बंधने पार पाडता यावी यासाठी कर्म करीत राहण्याची हाक आहे, पण ती देताना आत्मिक पार्श्वभूमी आणि विश्वाच्या विशाल हेतूंना कधीही दृष्टीआड होऊ दिलेलं नाही. अकर्माचा धिक्कार केलेला आहे. कर्म आणि जीवन तत्कालीन उच्च हेतूंशी संलग्न असलं पाहिजे, कारण ते उच्च हेतू कालानुसार बदलत असतात. विशिष्ट कालाचा ' युगधर्म ' सतत दृष्टीसमोर ठेवला गेला पाहिजे. " गीतेची ही शिकवण सांगताना भारतातील आजची परिस्थिती नेहरू विसरत नाहीत. गीतेची ही शिकवण आजचा ' युगधर्म ' कसा ठरेल याचाही ते विचार करतात : " अर्वाचीन भारत विफलतेनं ग्रासलेला आहे आणि किंकर्तव्यमूढ झाल्यामुळं त्याला फार यातनाही सहन कराव्या लागल्या आहेत. आणि म्हणून या कार्याच्या हाकेचं महत्त्व विशेष आहे. सामाजिक उन्नती आणि समाजसेवा या अर्वाचीन कार्यांच्या स्वरूपातही ही कार्याची हाक आपल्याला उपयोगात आणता येईल. गीतेतील तत्त्वज्ञानाप्रमाणे हे कार्य आवश्यक आहे, पण त्यापाठीमागे आत्मिक हेतूही असलेच पाहिजेत. हे कार्य निःस्वार्थ असलं पाहिजे, परिणामांची फारशी क्षिती न बाळगता केलं पाहिजे, कार्य आणि परिणाम यांचा नियम कोणत्याही परिस्थितीत कायम असतो, योग्य कार्याची परिणती तात्काल प्रत्ययाला येत नसली तरी, योग्य फलप्राप्तीतच होते. "

या दृष्टीनं धर्मकल्पनेकडे पाहताना धर्माची महती नेहरूंना पटते, तिची उपयुक्तता त्यांना दिसून येते. " मानवाच्या विकासाला धर्मानं खूपच मदत केलेली आहे. " नेहरू कबूल करतात, " धर्माने मानवी मूल्य आणि मानदंड घालून दिले आणि मानवी जीवनाच्या मार्गदर्शनासाठी तत्त्वांचं दर्शनही करून दिलेलं आहे. " परंतु, नेहरू धर्माच्या बाबतीत अंधश्रद्धही नव्हते. धर्माच्या

उपयुक्त आणि योग्य शिकवणुकीकडे ज्याप्रमाणे त्यांनी डोळे उघडून पाहिलं, त्याचप्रमाणे अश्रेयस्कर आणि अनुपयुक्त बाजूही विचारात घेतली होती. धर्माच्या उपयुक्त बाजूसंबंधी चांगले उद्गार काढताना, त्यांच्या दुष्परिणामांचाही त्यांनी उल्लेख केला आहे. चांगली बाजू मांडल्यानंतर लगेच ते पुढे लिहितात: "पण त्यांनी (धर्मांनी) इतकं उपयुक्त कार्य केलं असलं तरी त्यांनी सत्याला विशिष्ट स्वरूपात आणि रूढीत बंदिस्त करून ठेवण्याचं कार्यही केलं आहे. मूलतत्त्वांचा विसर पडून केवळ रूढी म्हणून जगणारे असे अनेक उपचार समारंभ निर्माण होण्यास प्रोत्साहन दिले. भोवताली पसरलेल्या अज्ञाताच्या गूढ आणि आश्चर्यकारक स्वरूपाविषयी मानवाच्या मनावर परिणाम करताना अज्ञाताचं ज्ञान करून घेण्यापासूनच नव्हे तर, सामाजिक उन्नतीच्या मार्गातील अडथळे कोणते आहेत हे लक्षात घेण्यापासून धर्मांनी परावृत्त केलं आहे... अनंत मानवांना समाधान देण्याचं आणि धार्मिक मूल्यांमुळे समाजाला धर्मांनी स्थैर्य प्राप्त करून दिलं असलं तरीही मानवी समाजात अंतर्भूत असलेल्या प्रक्रियेला आणि उन्नतीला पायबंदच घातला आहे."

कोणत्याही धर्माचे हे गुणदोष लक्षात घेतल्यामुळेच कोणत्याही धर्मातील पूर्वी एकदा घालून दिलेले नियम व तत्त्वे कायम स्वरूपाची असू नयेत– असत नाहीत असं धर्मविषयक नेहरूंचं मत होतं. विशेषतः तत्त्वे आणि नियम बाजूलाच राहून रूढी आणि धर्माचे बाह्यावडंबर नेहरूंना मुळीच पसंत नसे; एवढंच नव्हे तर, त्यांचा त्यांना राग येई. प्राचीन धर्मांबद्दलच त्यांचं हे मत होतं असं नव्हे तर, अत्याधुनिक असा नवीन 'धर्म' जो उदयास आलेला आहे त्या "मार्क्सवादा"बद्दलही त्यांचं हेच मत होतं. "मार्क्सवाद" हा आता आधुनिक राहिलेला नाही, आजच्या परिस्थितीत त्या वादांतील तत्त्वांना मुरड घालणे किंवा त्यांत बदल करणे आवश्यक आहे हे त्याचं मत सर्वविश्रुतच आहे. तत्कालीन समाजाला उपयुक्त व मार्गदर्शक ठरलेले धार्मिक नीतिनियम सतत बदलत्या, उत्क्रांत होणाऱ्या पुढारलेल्या समाजाला तसेच्या तसे लागू पडतील– पडावेत, मार्गदर्शक ठरावेत हे म्हणणं हास्यास्पद आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीप्रमाणे, विचारांप्रमाणे आणि विशेषतः भौतिक शोधांमुळे निर्माण झालेल्या सुधारलेल्या समाजाला मार्गदर्शक ठरणारे नवीन नीतिनियम–

निदान जुन्या नीतिनियमांमध्ये बदल करणं आवश्यक आहे असंच त्यांचं मत होतं.

परंतु, असं त्यांचं मत असलं तरी आत्मिक विकासाची बैठक समाजाला किंवा मानवाला अजिबात नसावी असं मात्र नेहरूंना मुळीच वाटत नव्हतं. आणि म्हणूनच नेहरूंच्या धार्मिक मतांसंबंधी विचार करताना सुरुवातीला नेहरूंची धर्माची व्याख्या दिली आहे ती सूचक आहे. परंतु, आंतरिक विकास आणि भौतिक विकास यांच्यातील संघर्षाचंही दर्शन त्यांनी त्या व्याख्येत करून दिलेलं आहे. आंतरिक विकासाचा भौतिक–बाह्य विकासावर ज्याप्रमाणं परिणाम होतो त्याप्रमाणेच भौतिक विकासाचाही परिणाम आंतरिक विकासावर होत असतो हीही गोष्ट त्यांनी स्पष्ट केलेली आहे. आंतरिक विकासाचा परिणाम भौतिक विकासावर झाला तर ती गोष्ट योग्यच होईल. पण भौतिक विकासाचा परिणाम आंतरिक विकासाला घातक ठरल्याशिवाय राहणार नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांत भौतिक विकास होत गेला आणि त्याचा घातक परिणाम आंतरिक विकासावर झाला ही गोष्ट उघड आहे. ख्रिश्चन धर्माचा अंगीकार केलेली ही राष्ट्रे त्या धर्माची मूलतत्त्वे साफ विसरून जाऊन, त्या मूलतत्त्वांच्या सर्वस्वी विरुद्ध आचरण करीत आली आहेत. परंतु त्याबरोबरच भौतिक दृष्ट्या अविकसित असलेल्या राष्ट्रांत व समाजांत आंतरिक विकास साधलेला असतो अशी जर समजूत करून घेतली तर तीही भ्रामक ठरेल. सर्वसंगपरित्याग करून ऐहिकतेशी फारकत केलेल्या एखाद्याच व्यक्तीच्या बाबतीत आंतरिक विकास साधलेला आढळून येईल. परंतु, आजच्या सुधारलेल्या युगात भौतिक सुधारणांच्या बाबतीत मागासलेल्या राष्ट्रांत आणि समाजांत आंतरिक विकास साधलेला दिसून येणार नाही. सर्वच दृष्टींनी तो समाज किंवा राष्ट्र मागासलेलाच राहील. पददलित समाज आणि परक्यांकडून पिळणूक केली जाणारी राष्ट्रे आंतरिक विकास साधू शकणार नाहीत, याची उदाहरणं मागासलेल्या राष्ट्रांत अनेक सापडतील. म्हणून आंतरिक विकासासाठी स्वातंत्र्य आणि योग्य बाह्य वातावरण आणि परिस्थिती आवश्यक आहे.

धर्म आणि विज्ञान यांचा संघर्ष होईल किंवा काय अशी भीती मात्र वाटण्याचं कारण नाही. विशेषतः आधुनिक कालात विज्ञानाची वाटचाल आणि

प्रगती इतक्या तीव्र गतीनं होत आहे आणि अशा काळात धर्माच्या नावाखाली ती प्रगती रोखून ठेवणं अत्यंत घातुक आणि विनाशकारक आहे. पण त्याबरोबर धर्माचीही आवश्यकता आहे हेही निश्चितच. केवळ शास्त्रीय प्रगतीही मानवाला विनाशाप्रत नेऊन सोडील. या आधुनिक विज्ञानाच्या युगातही मानवी मनाला आंतरिक गरजा आहेतच; आणि त्या भागविण्यासाठी धर्माची गरज आवश्यक आहे. परंतु, तो धर्म रूढी, अंधश्रद्धा, गतानुगतिक धर्मभोळेपणा इत्यादी पारंपरिक वेष्टनांनी असता उपयोगी नाही. तसा जर तो असेल– आणि कित्येक समाजात तो अस्तित्वात आहे– तर त्याचेही परिणाम भयंकर होतात. त्यामुळे धार्मिक समाज निर्माण होतात आणि अशा समाजांमध्ये अंधश्रद्धा आणि परागती, रूढी, जात्यंधता, धर्मभोळेपणा आणि पिळणूक आणि वतनांची जपणूक चालूच राहते.

धर्म आणि विज्ञान यांमध्ये संघर्ष निर्माण न होता आंतरिक आणि भौतिक विकास साधावयाचा असेल तर यामधूनच मार्ग काढला पाहिजे. आणि तो मार्ग म्हणजे धर्मातीत तत्त्वज्ञानालाही काही पार्श्वभूमी काही ध्येयं असणं आवश्यक आहे; केवळ भौतिक सौख्य एवढाच हेतू असता उपयोगी नाही. या धर्मातीत तत्त्वज्ञानालाही " आत्मिक मूल्ये आणि आचरणाचे काही मानदंड असलेच पाहिजेत; आणि हे विचारात घेतल्यावर आपण तात्काळ धर्म म्हणून ज्याला संबोधितो त्या धार्मिकतेच्या क्षेत्रात प्रवेश करतो. "

" गीतेतील तत्त्वज्ञान किंवा शिकवण " म्हणूनच नेहरूंना " सांप्रदायिक किंवा एखादी विशिष्ट पंथीय वाटत नाही. कोणत्याही व्यक्तीला मार्गदर्शक ठरेल अशीच ती शिकवण सर्वव्यापी आहे. ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत ती सर्वांनाच उपयुक्त अशीच आहे. आणि या सर्वव्यापित्वामुळेच ती शिकवण सर्व थरांतील आणि पंथांतील बनतेला प्रिय होत आली आहे. तत्त्वचिंतन आणि कर्म, संघर्ष आणि परस्परभिन्नता असताही साधावयाचा मनाचा समतोलपणा यासंबंधीच्या प्रश्नोपप्रश्नांचे आणि उत्तरांचे असे काही उत्कृष्ट अंतर्गुण त्या शिकवणुकीत आहेत की, त्यामुळे कोणत्याही कालखंडात वस्तुस्थितीला लागू पडणारी व कालगतीबरोबर मागासलेली न ठरणारी ती शिकवणूक नाही. तीत समतोलपणा आहे आणि विविधतेत एकता आहे,

बदलत्या परिस्थितीवर मात करण्याची शक्ती आहे. ही शक्ती त्या परिस्थितीत सुटू पाहणारी नसून, तीत चपखल बसणारी आहे. गीतेच्या लेखनापासून अडीच हजार वर्षे लोटून गेली असली तरी या कालखंडात भारतीय जनता बदलत्या परिस्थितीत आणि प्रगती आणि परागती अनुभवामागून अनुभव, विचारामागून विचार यांमधून पुनः पुन्हा गेली आहे. परंतु नित्य त्या जनतेला गीतेमध्ये काही तरी शाश्वत, प्रगत विचारांत चपखल बसणारे, आणि मनाला त्रस्त करणाऱ्या आत्मिक प्रश्नावर अचूक उपाययोजना सुचविणारे आणि नित्य नवे, असे आढळत आले आहे."

हे नित्य नवे म्हणजे काय ? हिंदुधर्माचा किंवा भारतीय संस्कृतीचा विकास कसा झाला हे आपण पाहिलं तर असं आढळून येईल की, हिंदुधर्म आणि भारतीय संस्कृती यांचं स्वरूप चिरंतन किंवा शाश्वत असं कधीच राहिलेलं नव्हतं. भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोणातून प्रामुख्यानं निष्पन्न झालेल्या संकलनात्मक वृत्तीचा प्रभाव सांस्कृतिक आणि जातीयही विकासाच्या मुळाशी दिसून येतो. आपल्या हिंदुधर्माला व संस्कृतीला अनेक परकीय आक्रमणांना तोंड द्यावं लागलं आहे आणि ते देताना नवं संकलन आणि नवीन विचारांचं आत्मसाधन अनेक वेळा करावं लागलं. या पद्धतीनं हिंदुधर्माला आणि भारतीय संस्कृतीला नवचैतन्य प्राप्त होत गेलं आणि त्यामधून नवनवोन्मेषशाली संस्कृती जन्माला आली. धर्माची व संस्कृतीची पार्श्वभूमी आणि मूलतत्त्वे मात्र जवळ-जवळ प्राचीनच राहिली.

अर्थातच या सर्व संस्कारांतून जात असताना गीतेतील कर्मयोगाची शिकवण सतत आपल्या उपयोगी पडत आलेली आहे. प्राप्त परिस्थितीत रोजच्या जीवनात उत्पन्न होणारे प्रश्न, मानवी जीवनापाठीमागील आत्मिक पार्श्वभूमी नजरेसमोर ठेवून कसे सोडवायचे; आणि ते सोडविताना सतत कर्मरत कसं राहायचं हाच गीतेचा संदेश आहे. अकर्माचा त्यात धिक्कार केलेला आहे. कर्म आणि जीवन दोन्हीही त्या त्या युगातील अत्युच्च ध्येयांना अनुसरून असलं पाहिजे. त्या त्या युगातील युगधर्म सतत दृष्टीसमोर ठेवला पाहिजे.

हा युगधर्म पाळताना व्यक्तीनं आणि समाजानं स्वावलंबी असलं पाहिजे. मानवी मनाचा विकास होत असताना पूर्वीपासून एक मानसिक मूर्ती देवरूपानं

मनात उत्पन्न करण्याची इच्छा व प्रवृत्ती वाढत गेली आहे. परंतु, व्यक्तीला जर युगधर्म पाळावयाचा असेल आणि कर्मयोगी व्हायचं असेल तर देवावर अवलंबून राहून चालणार नाही. देव अगर दैव यावर भरंवसा टाकीत राहिलं तर साहजिकच त्यातून अ-कर्म आणि निष्क्रियता निर्माण होईल. परंतु, असं असलं तरी या ऐहिक जगात एखादं श्रद्धास्थान असणं आवश्यक आहे. नैतिक, आत्मिक आणि ध्येयात्मक श्रद्धास्थानाचा मानसिक आसरा घेणं प्राप्त आहे. मग ते श्रद्धास्थान देव असो; जीवनदायी शक्ती असो किंवा चलनवलन, बदल किंवा विकास घडवून आणणारी वस्तूजातातील स्वयंभू चेतनाशक्ती असो कोणतेही नाव त्या श्रद्धास्थानाला दिलं तरी परिणाम सारखाच आहे. याची जाणीव कोणाला असो किंवा नसो, पण आपणांपैकी बहुतेकजण अदृश्य शक्तीची देवरूपानं पूजा करीत असतो; उपासतापास करतो; भक्तीने त्या देवतेला आळवीत असतो. ती देवता ध्येयस्वरूप, संतरूप किंवा आपल्या कल्पनेनं निर्माण केलेल्या पुरुषोत्तमाच्या स्वरूपात असते. त्या देवतेप्रमाणं पुरुषोत्तम होणं शक्य नसतं; आपल्या मनातील चैतन्यशक्ती आज पिढ्यान पिढ्या त्यांच्याच ध्येयपथावरून विकासाचा मार्ग आक्रमीत आहे.

स्वर्गीय पंडित नेहरूंनी 'भारताचा शोध' घेताना हिंदुधर्म व भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेतला. त्यांच्या या प्रकरणातील संक्षेपावरून नेहरूंचा हिंदुधर्म व भारतीय संस्कृतीसंबंधीचा दृष्टिकोण स्पष्ट होतो. परंतु, नेहरू फक्त आढावा घेऊन थांबत नाहीत. त्यांचं हे ज्ञान किंवा आढावा हा फक्त पुस्तकी नाही. त्यांनी तो आपल्या जीवनात प्रत्यक्षात आचरणात आणून जीवन कृतार्थ केलं आहे. त्यांच्या जीवनाचा, चरित्राचा ज्यांनी परिचय करून घेतला आहे– त्यांच्या आत्मचरित्रावरूनच नव्हे तर अनेक देशी-परदेशी, आप्तसंबंधीय, मित्रमंडळी, परदेशी राजकारणी व अभ्यासू विवेचक यांनी नेहरूंविषयी जे अनेक लिखाण ग्रंथरूपाने व लेखरूपाने लिहून ठेवलं आहे त्यावरूनही– त्यांना हे पूर्वग्रहविरहित आणि निकोप मनानं कबूल करावं लागेल की, नेहरूंचं सारं जीवन एका निस्सीम कर्मयोग्याचं आहे. कोणतंही कार्य त्यांनी पत्करलं किंवा संघटनेनं त्यांच्यावर सोपवलं तर ते कार्य तळमळीनं आणि निष्ठेनं पार पाडण्यासाठी ते जीवनभर तनमनाने झटले आहेत. मुलाखती घेऊन वृत्तांत तयार करणं, निवडणुकीसाठी झंझावाती दौरे काढणं,

परदेश–संचार, भारताला अनुकूल मत प्राप्त करून घेण्यासाठी जगप्रवास, दुष्काळ, पूर, वगैरे दैवी आपत्तींनी संकटग्रस्त झालेल्या पीडितांना दिलासा व मदत देणं वगैरे संचलनात्मक कामं तर ते जिवाचं रान करून तहानभूक आणि शारीरिक व मानसिक श्रमांची पर्वा न करता ते करीत असत. त्यांच्या बरोबरची मंडळी थकून जात; हातपाय गाळीत; पण नेहरू मात्र कार्यमग्न असत. त्याबरोबर बैठी कामंही ते तितक्याच उत्साहानं व तळमळीनं आणि निष्ठेनं करीत. काँग्रेस-संघटनेच्या साध्या सैनिकापासून, कार्यवाह, अनेक समित्यांचे कार्यपदस्थ, अध्यक्ष या पदांपासून तो प्रधानमंत्रिपदापर्यंत ते चढले. अनेक वर्षे ते त्या पदांवर होते. पण कर्मयोग्याचं आचरण निधन क्षणापर्यंत त्यांनी सोडलं नाही. एखाद्या स्थित-प्रज्ञ योग्याप्रमाणे त्यांनी कामाचे कागद हातावेगळे करून टाकले होते. एवढंच काय, पण शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी चिरनिद्रेपूर्वी आपल्याला आपली ध्येयं–प्राप्त करून घेण्यासाठी आणि दिलेल्या वचनांच्या पूर्तीसाठी आपल्याला अनेक योजनांचा अजून प्रवास करावयाचा आहे. याचाच ध्यास घेतला होता.

नेहरूंचं सारं जीवन ध्यानात घेताच कोणत्याही निःपक्षपाती व पूर्वग्रह-विरहित व्यक्तीच्या मुखातून "आधुनिक युगधर्माचं पालन करणारा खरा कर्मयोगी" असे उद्गार बाहेर पडल्याशिवाय राहणार नाहीत.

卐 卐 卐

४

जीवन-हेतू

स्व. पंडित नेहरूंनी जीवनात सतत कर्मयोगाचं आचरण केलं असं मान्य केल्यावर अर्थातच तो कर्मयोग त्यांनी कोणत्या ध्येयाच्या, प्राप्तीकरिता आचरणात आणला. कोणत्याही व्यक्तीचा कर्मयोग हा निर्हेतुक, निर्ध्येयात्मक किंवा निष्फळही असूच शकत नाही; त्याचप्रमाणे तो अविवेकी, अविचारी आणि अकारण असणंही अशक्य आहे. कर्मयोगी व्यक्तीपुढं काही तरी ध्येय असलंच पाहिजे. निष्काम किंवा अनासक्त कर्मयोगालाही साध्य असणं आवश्यक आहे. दृष्टीपुढं साध्य असल्याशिवाय आणि तेही महान साध्य असलं पाहिजे व ते साध्य गाठण्यासाठी त्या कर्मयोग्याच्या नजरेसमोर मार्ग आणि साधनंही विचारपूर्वक त्यानं ठरवलेली असलेली

पाहिजेत. नेहरूंच्या कर्मयोगी जीवनापुढं असं कोणतं महान ध्येय होतं आणि ते साधण्यासाठी त्यांनी कोणते मार्ग आणि साधनं वापरली होती; त्यासाठी जीवनासंबंधी कोणता दृष्टिकोण किंवा तत्त्वज्ञान त्यांनी ठरवून ठेवलं होतं ?

या प्रश्नांचा विचार करतांना एक गोष्ट स्पष्टपणे आपल्या नजरेत भरते की प्राचीन भारतीय राम-कृष्णांपासून, परदेशीय ख्रिस्त आणि अर्वाचीन बुद्ध किंवा मार्क्सपर्यंत अनेक महान व्यक्तींपर्यंत, या महान आणि द्रष्ट्या पुरुषांनी आपापल्या स्वतंत्र तत्त्वज्ञानाचा एक पंथ (ism) निर्माण केला, त्याप्रमाणे नेहरूंनी आपला स्वतंत्र व नवीन असा पंथ निर्माण केलेला नाही. ज्याला सर्वार्थाने नेहरू-पंथ संबोधता येईल अस तत्त्वज्ञान अगर शिकवण नेहरूंनी दिलेली नाही. त्यामुळे अर्थातच नेहरूंचं तत्त्वज्ञान निश्चितपणे अमुकच होतं असं सांगणं किंवा त्यासंबंधीचं विवेचन करणं अशक्य आहे. मात्र जीवनाचं ध्येय ठरवताना त्यांनी जो विशाल दृष्टिकोण स्वीकारला होता व त्यासाठी जी साधनं वापरली होती, त्यांमध्ये अनेक पंथीय तत्त्वज्ञानांच्या, आधुनिक युगाला उपयोगी ठरेल, अशा तत्त्वांचा व शिकवणुकीचा विचारपूर्वक आणि संकलनात्मक दृष्टीनं अंगीकार केला होता असं दिसून येतं.

जीवनात एखादं तरी ध्येय प्रत्येक व्यक्तीपुढं असणं आवश्यक आहे, असंच नेहरूंचं मत होतं. ध्येयहीन जीवन असू शकतं यावर त्यांचा विश्वास नसे. आपल्या भगिनीला (श्रीमती कृष्णा हाथीसिंग) यांना लिहिलेल्या एका पत्रात नेहरू लिहितात : " जीवनात काहीच ध्येय नसलेली माणसं असतात हे वाचून मला किती चमत्कारिक वाटतं. अशी माणसं असू शकतात हे अर्थातच सत्य आहे. परंतु, तुझ्या लक्षात येईल की, असल्या ध्येयहीन व्यक्तींचा एक वर्ग बनून तो समाजवृक्षावरील बांडगूळ म्हणून ठरण्याचा फारच संभव आहे. आणि तसं झालं तरच मग ध्येयहीनतेचं सौख्य अनुभविता येईल. बहुसंख्य लोकांच्यासमोर मोठमोठी ध्येये नसतात, परंतु, दैनंदिन जीवनकलहात ते बुडून गेलेले असतात. परंतु, इतरांच्या बाबतीत मात्र, ध्येयहीन आणि उदासीन अवस्थेत ते तडफडत असतील तर तो त्यांचाच दोष आहे. "

ध्येयहीन जीवनाचा नेहरूंना अत्यंत तिटकारा व तिरस्कार वाटत होता हे या उताऱ्यावरून स्पष्ट होतं. बहुसंख्य व्यक्तींच्यापुढे महान ध्येयं नसतात हे

त्यांना मान्य होतं. अर्थातच नेहरूंची गणना सर्वसामान्य बहुसंख्य व्यक्तींत होत नाही. त्यांचा जीवनग्रंथ एक महान ग्रंथ होता ही गोष्ट स्पष्ट अगर विशद करण्याचं कारण नाही. अर्थातच, त्या महान जीवनापुढं ध्येयही तसंच महान असलं पाहिजे. ते ध्येय कोणतं होतं ? जीवनात त्यांच्यापुढे कोणते गूढ प्रश्न उभे होते व ते सोडविण्याच्या प्रयत्नात त्यांनी आपलं सर्व जीवन खर्च केलं ? ते प्रश्नही अर्थात सर्वसाधारण व्यक्तींच्या जीवनात उद्भवलेले व्यक्तिगत नसले पाहिजेत. तसे जर ते असते तर व्यक्तिगत जीवनात ते मोठे झाले असते. परंतु, जगतात नेहरूंना जे नेतेपद मिळालं आणि भारतातील जनतेत त्यांना जी अलौकिक लोकप्रियता लाभली ती काही त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील ध्येय किंवा कूटप्रश्न सोडविल्यामुळे नव्हे, भारतासाठी, भारतातील जनतेसाठी व अखिल विश्वासाठी त्यांनी आपलं जीवन सार्थकी लावलं म्हणूनच ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व मान्यतेचे महान पुरुष ठरले गेले. तेव्हा त्यांचं ध्येय व त्यांच्यापुढे उभे राहिलेले कूटप्रश्न भारतातील जनता व अखिल मानवजात यांच्या जीवनांशी संलग्न झालेले व त्यांच्याच सुखसमृद्धीचे व उत्थानाचे असणार ही गोष्ट उघड आहे. आणि नेहरूंपुढील ध्येय व ते कूटप्रश्न अखिल मानवजातीच्या कल्याणाचे व उद्धाराचे होते ही गोष्ट त्यांच्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट होतात. " भारताचा शोध " या त्यांच्या ग्रंथातील " जीवितांचं तत्त्वज्ञान " या प्रकरणात ते लिहितात :

" माझ्यापुढील प्रश्न व्यक्तिगत आणि सामाजिक प्रश्न होते; ते प्रश्न सुसंगत जीवनाचे, व्यक्तीचं अंतर्मन आणि बाह्य आचरण यांमधील योग्य समतोलपणा राखण्याचे, व्यक्ति–व्यक्ती आणि वर्ग–वर्ग यांमधील परस्परसंबंधांत व्यवस्था साधण्याचे, काही तरी सतत जास्त चांगले व उच्चतर होत जाण्याचे, सामाजिक प्रगतीचे, आणि अप्रतिहत मानवी प्रयत्नांचे ते प्रश्न होते. "

नेहरूंच्या या उताऱ्यावरून त्यांच्यापुढे कोणते प्रश्न उभे होते, त्यांचे स्वरूप कशा प्रकारचे होते व ते सोडविण्याचं कोणतं ध्येय त्यांच्यापुढं होतं या गोष्टी स्पष्ट होतात आणि नेहरू ज्याला सर्वसाधारणपणे " मानवतावाद " म्हणता येईल, त्या दृष्टीने मानवतावादी होते असे आढळून येईल. विश्वातील यच्चयावत मानवप्राणी समान आहेत. निदान तसे ते असावयास पाहिजेत.

परंतु, धर्म, वर्ण, वसाहतवाद, आर्थिक किंवा शारीरिक दास्यत्व इत्यादी कारणांमुळे मानवा–मानवात भेद निर्माण झाले आहेत. या भेदांपासून मानव विमुक्त झाला पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या भेदांमुळे त्याच्या मानवीपणाला बाध अगर कलंक लागता उपयोगी नाही. त्या भेदांमुळे त्याचं स्वातंत्र्य नष्ट होता कामा नये. त्याला त्याच्या जीवनात प्रगती करावयास इतरांप्रमाणेच समान संधी मिळाली पाहिजे. कुणीही कुणाचं दास म्हणून–मग ते वैयक्तिक दास्यत्व अगर गुलामगिरी असो, सामाजिक किंवा वर्णभेदीय फरक असो किंवा राष्ट्रीय गुलामगिरी असो– राहता उपयोगी नाही, असा नेहरूंचा मानवतावादी विशाल दृष्टिकोण होता. आणि याच त्यांच्या दृष्टिकोणामुळे त्यांना 'जगाचा नागरिक' या नात्यानं संबोधण्यात येत असे.

परंतु, आजच्या तथाकथित सुधारलेल्या, प्रगत आणि सुशिक्षित जगातही मानवा–मानवातील हे अनेक भेद अस्तित्वात आहेत यांचीही त्यांना जाणीव होती. आणि हे भेद नष्ट करावयाचे असतील तर प्रथम 'भारत' परकीय गुलामगिरी, वर्णभेद, अज्ञान, दारिद्र्य इत्यादी व्याधींपासून मुक्त झाला पाहिजे, अशी त्यांची विचारसरणी होती. भारत परकीय गुलामगिरीतून प्रथम मुक्त झाला तर, जगातील इतर परकीय गुलामगिरीत खितपत पडलेल्या राष्ट्रांना त्या गुलामगिरीतून मुक्त होण्यास मदत करील असा नेहरूंना विश्वास वाटत होता. आणि म्हणूनच आपली मायभूमी 'भारत' याबद्दल त्यांना नितांत आदर, व प्रेम वाटत होतं; भारताच्या इतिहासाबद्दल अभिमान वाटत होता आणि भारताची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी अविरत प्रयत्नांत मग्न राहून, त्या प्रगतीकडे डोळे लावून ते बसले असले, भारताच्या प्रगतीचा आणि विकासाचा अहोरात्र आणि शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी ध्यास बाळगला असला, तरी "राष्ट्रभक्तीतच आपण सार्थक मानता उपयोगी नाही, तर त्यापेक्षाही काही तरी उच्च, विशाल आणि उदात्त अशा गोष्टींची गरज आहे." आणि म्हणून त्यांचं राष्ट्रप्रेम किंवा राष्ट्रभक्ती राष्ट्रापुरतीच मर्यादित किंवा संकुचित नव्हती. सर्व मानवजात ही त्यांच्या उच्च, विशाल आणि उदात्त दृष्टीला एक वाटत असे. इतर महान व्यक्तींप्रमाणे साऱ्या मानवजातीचं सर्वांगीण कल्याण आणि प्रगती यांच्याकडे त्यांची नजर लागलेली होती. जगाच्या राजकारणात भारतानं का लक्ष घालावं किंवा जागतिक घडामोडींची भारतानं का उठाठेव करावी, या

प्रश्नाचा विचार करताना नेहरू म्हणाले होते : "जागतिक घडामोडींत 'शांतता' हा पण आम्हांला जिंकावयाचा आहे. त्याबरोबरच वर्ण-वंश-जात यामध्ये समानता निर्माण करणं आणि परकीय दास्यत्वाखाली अजूनही असलेल्या जनतेला मुक्ती देणं याकडे आम्हांला लक्ष द्यायचं आहे."

अखिल मानवजातीच्या कल्याणाशी आणि प्रश्नांशी नेहरू समरस झाले असल्यामुळेच नेहरूंना संकुचित किंवा मर्यादित राष्ट्रवाद मान्य नव्हता. भारत स्वतंत्र झाल्यावर ज्ञानविज्ञान आणि संस्कृती जगाच्या इतर राष्ट्रांतून भारतात यावी व त्यातील भारताला प्रगतिकारक व उपकारक जे जे असेल त्याचा भारताला फायदा मिळावा यासाठी भारतानं आपले दरवाजे खुले ठेवले पाहिजेत असं त्यांना वाटे. भारताच्या इतिहासात अशाप्रकारे ज्ञान आणि संस्कृती ग्रीस, रोम वगैरे परराष्ट्रांतून भारतानं आत्मसात केलेली होती; व अगदी अलीकडच्या काळातही ब्रिटन वगैरे राष्ट्रांकडूनही ज्ञानाचा आणि संस्कृतीचा अंगीकार आपण केलेलाच आहे; हाच प्रवाह पुढेही चालू ठेवणं भारताच्या प्रगतीच्या दृष्टीनं उपकारक व श्रेयस्कर आहे असं नेहरूंचं मत होतं. आणि म्हणूनच त्यांनी एका व्याख्यानात उद्गार काढले होते :

"प्रत्येक बाबतीत, मग ते शिक्षण असो, विज्ञान असो किंवा संस्कृती असो किंवा अन्य कोणत्याही बाबतींत असो, आपण ज्ञानाच्या शिखराला पोहोचलो आहो आणि आता जास्त काही शिकण्याची जरूरी नाही अशी विचारसरणी निर्माण होईल अशा प्रकारची संकुचित राष्ट्रीय दृष्टी आपण बाळगून चालणं यासारखी दुसरी कोणतीही गोष्ट मला अप्रिय वाटणार नाही. मिळेल त्या ज्ञानाला किंवा माहितीला आत्मसात करण्यात आपली मनं सदैव उघडी ठेवली पाहिजेत."

नेहरू सुख-समृद्धीत जन्मले आणि वाढले असले तरी भारतात आल्यानंतर त्यांनी भारतभर प्रवास केला. भारतीय जीवन समक्ष अवलोकन करून त्याचा अभ्यास केला; कारणपरंपरा शोधून काढली. भारतीय सर्वसामान्य नागरिक अज्ञान, दारिद्र्य, धार्मिक, वर्णीय आणि आर्थिक भेदांनी गांजून गेलेला आहे हे त्यांनी पाहिलं आणि त्यामुळं सर्वसामान्य भारतीयांविषयी त्यांच्या मनात हार्दिक प्रेम आणि सहानुभूती निर्माण झाली. त्यांचं जीवन, आणि जीवनातील अनेक प्रश्न, समजावून घेऊन, त्यांचं जीवनमान आणि राहणी

सुधारण्याचा प्रयत्न करण्यात त्यांनी स्वातंत्र्योत्तर कालातील आपलं आयुष्य खर्ची घातलं व तो हेतू साध्य व्हावयाच्या आतच 'अनेक वचनांची पूर्ती' करण्याच्या आतच त्यांना "चिरनिद्रेच्या" आधीन व्हावं लागलं. भारतीय नागरिकांचं जीवनमान व राहणी सुधारण्यास व त्यांना प्रगतिपथावर नेऊन ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या राष्ट्र-स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या जीवनाचा बहुमोल काल खर्च केला. राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाल्याचं त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलं. त्या स्वातंत्र्याचा उपयोग कोणत्या मार्गानं व कोणतं साध्य साधण्याच्या दृष्टीनं करावयाचा याचंही ध्येय त्यांनी आपल्या नजरेसमोर ठेवलं होतं. आपल्या आत्मचरित्राच्या उत्तरार्धात त्यांनी त्या मार्गाचं आणि साध्याचं स्पष्ट दिग्दर्शन करून ठेवलं आहे :

"आपलं अंतिम ध्येय सर्वांना समान आर्थिक न्याय आणि संधी मिळणारी वर्गभेदातीत समाजरचना हेच होय. हा समाज ऐहिक आणि सांस्कृतिक पातळी वरच्या दर्जावर नेण्यासाठी योजनाबद्ध मूलाधारावर उभारलेली, आत्मिक मूल्यांची जोपासना करणारी, सहकार्यावर, निःस्वार्थपणावर, सेवा-भावावर, योग्य तेच करण्याच्या इच्छेवर, सद्भावनेवर आणि प्रेमावर अंती जागतिक पातळीवर आधारलेली असली पाहिजे."

भारतात कोणत्या प्रकारच्या समाजरचनेची आवश्यकता आहे व कोणत्या प्रकारच्या समाजरचनेचं अंतिम ध्येय नजरेसमोर ठेवलं पाहिजे याचं स्पष्ट दिग्दर्शन नेहरूंनी केल्यानंतर त्या उच्च अंतिम ध्येयाला साजतील असे योग्य मार्गही त्यांनी दाखवून दिलेले आहेत. नेहरूंच्या मतानं ध्येय आणि मार्ग हे अभिन्न असले पाहिजेत; अंतिम ध्येय आणि त्या ध्येयसाधनाचे मार्ग यामध्ये सदैव अभिन्न आणि संलग्न असे संबंध असतात. ध्येय उच्च किंवा योग्य असेल, पण ते साधण्याचे मार्ग चुकीचे असतील तर ध्येय साध्य होणार नाही किंवा आपण भलत्याच दिशेला भरकटून जाऊ. म्हणून ध्येय व ध्येयसाधनाचे मार्ग यामध्ये संपूर्णपणे संलग्नता आणि एकवाक्यता– एकरूपता असावयास हवी. आणि म्हणूनच नेहरूंनी ज्या समाजरचनेचं अंतिम ध्येय डोळ्यासमोर ठेवलं होतं, त्या ध्येयाशी सर्वस्वी एकरूप व संलग्न असणारे मार्गही ठरवून दिले आहेत. "या अंतिम ध्येयसाधनाच्या" मार्गात अडथळा आणणारी प्रत्येक

गोष्ट, शक्य असल्यास सौम्यपणाने, पण जरूर पडल्यास बळजबरीनं, दूर सारली पाहिजे. आणि बळजबरीचा उपयोग करण्याची जरूर नेहमीच पडेल याविषयी शंका बाळगण्याचं कारण नाही. परंतु, शक्तीचा वापर करावयाचा असेल तर तो मात्र द्वेष किंवा क्रूरता या भावनेच्या पोटी केलेला नसावा; तर फक्त अडथळा दूर करावयाच्या विकारविरहित इच्छेनं करण्यात यावा. असं करणं कठीण आहे. ती सहजसाध्य गोष्ट नाही; परंतु, दुसरा साधा मार्गच नाही. आणि या मार्गात खाचखळगेही बरेच आहेत. परंतु, त्या अडचणी ब खाचखळगे यांच्याकडे दुर्लक्ष करून ते दूर होणार नाहीत; तर त्यांचं खरं स्वरूप जाणून घेऊन त्यांना तोंड दिलंच पाहिजे. हे सर्व विचार कल्पनारम्य आणि स्वप्नरम्य वाटण्याचा संभव आहे; आणि या उदात्त हेतूंनी बहुजनसमाज भारावून न जाण्याची शक्यताही अधिक आहे. पण ते हेतू आपण सतत नजरेसमोर ठेवलेच पाहिजेत आणि त्यांचा ध्यास घेतला पाहिजे. आणि त्यामुळे आपल्यापैकी बऱ्याच लोकांच्या हृदयात उफाळणाऱ्या द्वेष–विकारादि भावना हळूहळू कमीकमी होत जातील. "

नेहरूंनी आपल्या स्वतःसमोर आणि समाजापासून ते स्वतःला अभिन्न समजत असल्यामुळे भारतासमोर ठेवलेलं ध्येय व ते साधण्यासाठी उपयोगात आणावयाचे मार्ग किती उच्च व म्हणून दुर्लभ व कष्टमय आहेत याची स्पष्ट कल्पना नेहरूंना होती; आणि त्या कल्पनेचं प्रतिबिंब त्यांच्या वरील उद्गारांत प्रतिबिंबित होतं. परंतु, ते ध्येय किंवा मार्ग अनुल्लंघ्य किंवा असाध्य आहेत असं मात्र त्यांना कधीच वाटलं नाही. आणि याचं कारण म्हणजे स्वतःवर व पर्यायानं मानवावर व त्याच्या दुर्दम्य कर्तृत्वशक्तीवर आणि इच्छाशक्तीवर नेहरूंचा संपूर्ण विश्वास होता. आणि त्या विश्वासाच्या सामर्थ्यावरच त्यांनी वरील ध्येय व मार्ग पुढे ठेवलेले आहेत. हा विश्वास त्यांच्या साहित्यात आणि वक्तव्यात अनेकदा व ठिकठिकाणी प्रगट झालेला आहे.

१७ सप्टेंबर १९६२ रोजी नवी दिल्ली येथे अखिल–भारतीय–वर्तमानपत्र–संपादक–परिषदेत भाषण करताना नेहरूंनी उद्गार काढले होते : " मानवी कर्तृत्वावर आणि आपत्तींवर मात करून त्यांतून विजयी होऊन बाहेर पडण्याच्या सामर्थ्यावर माझा अपरंपार विश्वास आहे." मानवी कर्तृत्वावर

आणि मार्गात येणाऱ्या संकटांवर मात करून पुनश्च प्रगतीचा मार्ग आक्रमण करण्याच्या सामर्थ्यावर नेहरूंचा हा जो उदंड विश्वास बसला होता, तो काही तत्कालीन समाजाच्या किंवा काही व्यक्तींच्या उदाहरणांवरून नव्हे, तर प्राचीन आणि अर्वाचीन जगाच्या इतिहासाच्या डोळस व चोखंदळ वाचनानं व अभ्यासानं निर्माण झालेला होता.

साध्या प्राण्यांपासून जगाच्या व्यवहाराला सुरुवात झाली. त्या साध्या प्राण्यांचं रूपांतर प्रचंड आणि राक्षसी प्राण्यात झालं. आणि त्यामधूनच या प्राण्यावर व चराचरांवर आधिपत्य गाजवू पाहणारा बुद्धिवान मानवाचं अस्तित्व आणि त्याची सत्ता निर्माण झाली. त्या आदिमानवाच्या कालापासून मानवी प्रगतीचा इतिहास सुरू झाला आणि तो अप्रतिहत चालू आहे आणि पुढेही तो तसाच चालू राहणार आहे. कोणत्याही राष्ट्राच्या किंबहुना सबंध विश्वाच्या इतिहासाचा मानवी प्रगती आणि त्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेला लढा हाच महत्त्वाचा मध्यबिंदू आहे. आर्य–अनार्य, काळे–गोरे, प्रगत–अप्रगत अशा विविध शक्तींचे लहान–मोठे लढे झाले; संघर्ष झाले; अनेक लहान–मोठी राज्ये आली गेली. काही वैभव आणि सामर्थ्यशाली सम्राट निर्माण झाले; योद्धे झाले; क्रूर परंतु सामर्थ्यसंपन्न पाशवी वृत्तीचे सेनापती व राजे झाले; काही प्रजाहिततत्पर, सुसंस्कृत, विद्यासंपन्न आणि कलासक्त नृप–सम्राट झाले. महान तत्त्ववेत्ते, संशोधक, साधुसंत, महापुरुष जन्माला आले आणि तत्त्वांची, शोधांची आणि धार्मिक नीतितत्वांची अमोल भर इतिहासात घातली. या सर्व घडोघोडी चालू असतानाच कधी कधी दुर्जनांचा आणि दुष्कृत्यांचा जय झालेला दिसून आला. परंतु, तो अल्पकालीन ठरून सत्प्रवृत्तींनी त्यांचा पराजय करून पुन्हा सुसंस्कृतीची पताका फडकत ठेवली. सज्जनांचा, सद्धर्माचा सत्प्रवृत्तींचा, महान नीतितत्त्वांचा आणि तत्त्ववेत्त्यांचा अमानुष छळ झाला; कित्येकांना प्राणासही मुकावं लागलं. नवनवीन शोध लावून संस्थापित समजुतींना धक्का लावून नवीन तत्त्वांची प्रस्थापना करणाऱ्या संशोधकांना व तत्त्ववेत्त्यांना अनेक आपत्तींना तोंड द्यावं लागलं; प्रसंगी तत्त्वांसाठी प्राणार्पणही करावं लागलं. नवीन धर्म प्रस्थापित केले गेले; आणि धार्मिक मूलभूत तत्त्वे प्रेषितांच्या शिकवणुकीत आणि धर्मग्रंथातच राहून धर्माच्या संस्कृतीच्या नावाखाली परधर्मीय आणि परसंस्कृतीय लोकांचा अमानुष संहार करण्यात

आला. अनेक नव्या संस्कृती उदयाला आल्या; जुन्या गाडल्या गेल्या; त्या नव्या संस्कृती विलयाला गेल्या आणि नवीन संस्कृतीचं बीजारोपण झालं; त्या वाढीला लागल्या.

परंतु, ही पौराणिक आणि ऐतिहासिक गती चालू असतानाही मानवाची प्रगतीची वाटचाल अखंडितपणे चालू होती. उत्तरोत्तर ती अधिक वेगवान होत होती. आणि आज अनेक क्षेत्रांत, विशेषतः विज्ञानाच्या क्षेत्रात मानवानं प्रचंड व आश्चर्यजनक प्रगती केली आहे. आणि ही सर्व ऐतिहासिक गतिमानता आणि मानवाची प्रगतीच्या दिशेनं चाललेली अखंड धडपड व ती करीत असताना मानवी मनाचं आणि सामर्थ्याचं इतिहासात घडून येणारं दर्शन पाहून नेहरू भारावून जातात, व त्यांच्या लेखणीतून शब्द उतरतात :

"मानवी चैतन्य किती आश्चर्यजनक आहे ! अनंत उणीवा असूनही, मानवप्राणी, युगानुयुगं, ध्येयासाठी, सत्यासाठी, श्रद्धांसाठी, राष्ट्र आणि प्रतिष्ठेसाठी, आपल्या प्रिय गोष्टींचा आणि प्राणांचाही होम करीत आला आहे. ते ध्येय बदलले असेल, पण आत्मसमर्पणाची त्याची शक्ती मात्र जिवंत आहे, आणि त्यामुळेच, त्याच्यातील अनेक दोषांबद्दल क्षमता दाखवणं भाग आहे, आणि त्याच्याबद्दल निराश होणं तर अगदीच अशक्य आहे. कठोर आपत्तींतही जी मूल्यं त्यानं उराशी जतन करून ठेवली ती किंवा स्वतःची प्रतिष्ठा यांचा त्यानं कधीच त्याग केला नाही. निसर्गाच्या सामर्थ्यशाली शक्तींचं एक खेळणं अफाट विश्वातील एक धूलिकण असूनही, त्यानं भौतिक शक्तींविरुद्ध सर्वस्व पणाला लावलं आहे; आणि क्रांतीचं जन्मस्थान असं जे आपलं मन, त्यानं त्या सर्व शक्तींवर विजय मिळविण्याचा प्रयत्न चालवला आहे. परमेश्वरी शक्ती कितीही असोत, मानवातही सैतानी वृत्तींप्रमाणेच, काही ईश्वरी अंशही आहेत.

विश्वाच्या अफाट पसाऱ्यात आणि निसर्गाच्या सामर्थ्यवान शक्तीत मानवाचं अतिक्षुल्लक अस्तित्व मान्य करूनही, मानवी मनावर व चैतन्यशक्तींबद्दल नेहरू इतका विश्वास प्रगट करतात ही गोष्ट इथं लक्षात ठेवण्यासारखी आहे. त्याबरोबरच मानवी मनोव्यापारातील सैतानी व दुष्ट प्रवृत्तींचीही त्यांना जाणीव आहे. पण तरीही मानव आपल्या सर्व विधायक शक्ती खर्च करील तर तो त्या निसर्गशक्तींवर व भौतिक सामर्थ्यांवर मात करील याविषयी त्यांची खात्री

आहे. आणि त्याला आधार म्हणून आजपर्यंतच्या मानवी प्रगतीच्या इतिहासाचा दाखला देतात : "विश्वाच्या साबणाच्या फुग्यावरील आपण एक धूलिकण असलो तरी, या धूलिकणात मानवी मन व चैतन्यशक्ती म्हणून काही तरी खास आहे. युगायुगातून त्याची शक्ती वाढतच आहे आणि विश्वाचा तो स्वामी बनला आहे आणि पृथ्वीच्या अंतर्गाभ्यातून, त्याचप्रमाणे अवकाशातील उत्पातातूनही शक्ती खेचून काढली आहे. विश्वाच्या गूढांचा ठाव न घेण्याचा त्यानं प्रयत्न केला आहे आणि निसर्गाच्या लहरीचाच खुद्द त्यानं स्वतःसाठी उपयोग करून घेतला आहे. उत्तरोत्तर बलशाली होत जाणारं आणि पादाक्रांत करण्याच्या ईर्ष्येनं नवनवीन क्षितिजे शोधणारं हे मानवी मन आणि चैतन्यशक्ती पृथ्वीच्या आणि अनंत अवकाशाच्यापेक्षा किती तरी पटीनं आश्चर्यजनक आहे."

मानवी मनाच्या सामर्थ्यावर आणि चैतन्यशक्तीवर नेहरूंचा अपरंपार विश्वास आहे, त्याप्रमाणेच मानवी जीवनावर गाढ श्रद्धा आहे. इथं एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, नेहरू जीवनाविषयीचा विचार करतात, तेव्हा क्वचित् तो व्यक्तिगत असला तरीही, सामाजिक प्रश्नांच्या व सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात करतात. नेहरूंच्या जीवनात व्यक्ती आणि समाज यांमध्ये अद्वैतभाव होता. स्वतःचे प्रश्न ते सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात मांडीत व त्यांचा विचार करीत तेही सामाजिक दृष्टीनेच. म्हणूनच जीवनासंबंधीचे त्यांचे विचार कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात साहजिकच लागू पडतात. आणि याच दृष्टिकोणातून त्यांनी आपल्या नजरेसमोर जे ध्येय ठेवलं होतं त्याचा उल्लेख करताना जे उद्गार काढले त्याचं पुनश्च स्मरण करणं आवश्यक आहे. "माझ्यापुढील प्रश्न व्यक्तिगत आणि सामाजिक प्रश्न होते. ते प्रश्न सुसंगत जीवनाचे..." वगैरे. म्हणूनच जीवनासंबंधीचे त्यांचे विचार सर्वसाधारण व्यक्तीच्या जीवनालाही यथार्थ मानले पाहिजेत. अर्थातच हे विचार, निर्हेतुक निर्ध्येय आणि प्रवाहपतित किंवा नेहरूंच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास "समाजवृक्षावरील बांडगुळे" असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत उपयोगी नाहीत हेही लक्षात ठेवले पाहिजे. नेहरूंचे जीवनविषयक विचार त्यांच्यासारख्या

कर्मयोगी, ध्येयप्रवृत्त आणि त्यागी जीवनालाच उद्देशून असतात. सर्वसाधारण जगाचा व्यवहार कसा असतो याविषयी नेहरूंची मतं पुढीलप्रमाणे आहेत :

" जीवन हे माणसाचा माणसाविरुद्ध चाललेला, माणसाचा परिस्थितीविरुद्ध चाललेला एक झगडा आहे. हा झगडा शारीरिक, बौद्धिक आणि नैतिक पातळीवरून चाललेला असून त्यामधूनच नवीन गोष्टी साकार होतात आणि नवीन कल्पना जन्म पावतात. विनाश आणि उभारणी समांतर रेषेत जात असतात, आणि मानव आणि निसर्ग यांची दोनही स्वरूपे दृष्टीस पडतात. जीवन हे अचेतन अवस्थेचं नसून, वृद्धीचं, सतत घटनांचं मूलतत्त्व असून, अचेतन परिस्थिती त्याला अमान्य आहे. "

अनादिकालापासून चालत आलेल्या मानवी जीवनाचा समर्पक सारांश नेहरूंनी मोजक्या शब्दात वरीलप्रमाणे काढला आहे. मानवी जीवनाच्या इतिहासातील कोणतेही सोनेरी किंवा काळेकुट्ट पान उघडून पहा, त्या पानावर वरील मूलतत्त्वाचं दर्शन घडल्यावाचून राहणार नाही. विशेषतः आजच्या राजकारण आणि अर्थकारण या दोन महत्त्वाच्या गोष्टींनी व्यापून टाकलेल्या आजच्या जीवनात जीवनकलह शारीरिक, बौद्धिक आणि नैतिक, या तीनही पातळींवरून विशेष प्रखर झालेला दिसून येतो. राजकीय अधिकार मिळवून ते टिकवून धरण्याकडे मानवी मनाचा कल दिसून येतो. त्याचप्रमाणे अर्थकारणातही संपत्तीचा साठा आपल्यापाशी राहावा या स्वार्थी हेतूनं जगभर थैमान घातलेलं दिसून येतं. यासाठी कपटनीती आणि फसवणूक यांचा वापर सरांस केला जात आहे. आणि हे सर्व होत असताना, राजकीय सत्ता आणि संपत्तीचा साठा काबीज करताना व केल्यानंतरही इतर जीवनविषयक मूल्यांना जग मुकलं जात आहे. परंतु, असं असलं तरी मानवी झगडा—जीवनकलह करण्याचं माणसानं सोडलेलं नाही. मानवाची चैतन्यशक्ती आणि आत्मा नैतिक मूल्यांना हाकलून देऊन, आपलं अधिराज्य पृथ्वीवर प्रस्थापित करणाऱ्या त्या प्रकारांना आळा घालण्याचं, त्याचं निर्मूलन करण्याचं व्रत स्वीकारून दंड थोपटून उभा आहेच. कारण नेहरू म्हणतात : " सत्तेलाही मर्यादा आहेत; आणि सामर्थ्य शेवटी स्वतःवरच उलटतं. सत्ता आणि सामर्थ्य यांनी मानवी चैतन्यशक्ती जास्त कडवी आणि कठोर होत असली तरी या दोनही गोष्टी तिला आळा घालू शकत नाहीत. 'सैन्याचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वूमभ
क्रमांक ७५६९६ दिः निबंध
२७१० दिः २०/३/०७

सेनापती तुम्ही हिरावून घेऊ शकाल" कान्फ्यूशिअस म्हणतो : पण मानवाच्या इच्छाशक्तीला कधीच कोणी हिरावू शकणार नाही."

यांच इच्छाशक्तीच्या–अजिंक्य मानवी चैतन्यशक्तीच्या–सामर्थ्यावर जग पुढं चाललं आहे. कधी कधी मानवाला निराश होण्याची पाळी येते; नाही असं नाही. अन्याय, आपत्ती, जगातील पाशवी व्यवहार यांनी मन खचून जातं आणि मन अंधकारमय होऊन जातं. परंतु, दुष्काळ आणि युद्ध या आपत्ती-ओढवल्या तरीही, जीवनप्रवाह आंतरिक परस्पर विरुद्ध गोष्टींनी भरलेला असूनही त्या परस्परविरोधी गोष्टींतही त्यामधून निर्माण होणाऱ्या आपत्तीतून, धारणेची बीजे वेचीत वाहातच असतो. निसर्ग पुनर्जन्म घेतो आणि कालच्या समरभूमीवर पुष्पांचं आणि हरित तृणाचं आच्छादन घालतो आणि सांडलेल्या रक्तानं धरतीचं पोषण करून नवजीवनाला सामर्थ्य आणि रंगरूप देतो.... नकळतच वर्तमानकाल भूतकालात निसटतो. "काला" तून निर्माण झालेला "आज" स्वतः उद्याची प्रजा निर्माण करतो. क्षणिक विजय रक्ताच्या आणि चिखलाच्या खातेऱ्यात विलीन होतो. आणि सकृद्दर्शनी अपजयाच्या भयंकर दिव्यातून मानवी चैतन्यशक्ती, नवसामर्थ्य आणि विशाल दृष्टी संपादन करून उदय पावते. दुबळ्या मनाचे नतमस्तक होतात आणि मग नाश केले जातात; पण इतर दीपज्योती पुढे नेतात आणि उद्याच्या भाल्दारांच्या स्वाधीन करतात."

—या गोष्टी लक्षात घेतल्या तर, आपल्या सहज ध्यानात येईल की, राष्ट्र म्हणून आपल्याला स्वतंत्र झाल्यावर ते टिकवायचं असेल व ज्या समाजरचनेचं ध्येय आपण नजरेसमोर ठेवलेलं ते साध्य करावयाचं असेल तर आजच्या काळात व पुढील काळातही आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या अनेक उपस्थित असलेल्या व संभाव्य आपत्तींना तोंड देण्यासाठी दुबळे असून चालणार नाही. किंवा परिस्थितीपुढे वाकूनही चालणार नाही. त्याबरोबरच नुसतं अस्तित्व टिकवूनच चालणार नाही. आपत्तींना तोंड देण्याचं सामर्थ्य संपादन करीतो-पर्यंत अस्तित्व टिकवणं जरूर आहे. पण नुसतं अस्तित्व टिकवणं एवढंच कार्य आपण स्वीकारता उपयोगी नाही. कारण त्यात फार मोठे धोके आहेत. अस्तित्व टिकवणं एवढंच ध्येय डोळ्यासमोर असलं की, परिस्थितीशी तडजोड करण्याची प्रवृत्ती अंगी बाणते. नमतं घेण्याची वृत्ती बळावते, जीवना-

तील संकटांची भीती वाटू लागते; आणि त्यामुळे चैतन्यशक्ती नष्ट होते. मनुष्यातील मनुष्यपण नष्ट होत जातं. जीवनात शिथिलता येते. पलायनवादाची कास धरली जाते. आणि मग खरोखरच संकटांना तोंड देऊन आपलं अस्तित्व टिकविण्याची वेळ येऊन ठेपते तेव्हा असमर्थता निर्माण झालेली असते. अशा वेळी संकटांना ते बळी पडतात किंवा संकटमुक्त झाले तरी माणुसकीला मुकलेले असतात. भवितव्यता जिकडे नेईल तिकडे ते तिच्या हातातील खेळणे होऊन जातात.

व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या जीवनाची, भवितव्यतेच्या हातचे खेळणे बनून राहण्याची शोकांतिका टाळावयाची असेल तर व्यक्तीनं किंवा समुदायानं आणि राष्ट्रानं कर्माची कास धरली पाहिजे. कर्मानं भवितव्यतेला आपल्या इच्छेनुसार वाकविण्याची शक्ती निर्माण केली पाहिजे. गतकालीन कृतींवर वर्तमान आधारलेलं असतं आणि वर्तमान कालीन कृतींवर भविष्याचा पाया उभारला जातो. या त्रिकालीन कर्मावर भवितव्यतेची जडणघडण घडवली जाते. आणि भवितव्यतेची जडणघडण घडवताना जीवन अचेतन किंवा अचल, स्थितीविशिष्ट असून उपयोगी नाही; तर ते गतिमान असलं पाहिजे.

–आणि गतिमान जीवन असलं पाहिजे असं म्हटलं की त्या जीवनाला एक निश्चित दिशा, निश्चित मार्ग व निश्चित ध्येय असलं पाहिजे. दिशाशून्य, मार्ग-रहित आणि ध्येयहीन जीवन गतिमान असलं तरी निरर्थक होय. तेव्हा अर्थपूर्ण व सार्थ जीवन जगायचं असेल तर त्याला या तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

नेहरूंच्या जीवनाचं ध्येय व हेतू काय आहेत याचा आपण विचार केला आहेच. ते ध्येय व हेतू साध्य करण्यासाठी मार्गही निश्चित केलेला होता. ध्येय अणि ते साधावयाची साधनं यात एकवाक्यता– संलग्नता असली पाहिजे या मताचाही उल्लेख वर येऊन गेलाच आहे. पण ही एकवाक्यता आणि संलग्नता कशी साधावयाची असाही प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो.

" अंतिम ध्येय आणि साधने " नेहरू लिहितात; परस्परांवर आघात–प्रत्याघात करणाऱ्या, चुकीची साधने दृष्टीसमोर असलेल्या ध्येयाचं स्वरूप विच्छिन्न करणाऱ्या आणि कधी कधी ध्येयविनाश करणाऱ्या या दोन गोष्टी

इतक्या का अभिन्न आहेत ? परंतु योग्य साधने दुर्बल आणि स्वार्थी मानवी स्वभावाला पेलणारी नसतील. मग अशा परिस्थितीत काय करावयाचे ? अकर्म म्हणजे अपयशाची कबुली देणं, दुष्ट प्रवृत्तींपुढं मान वाकवणं ठरेल. कित्येक प्रसंगी कर्म करीत राहणं, दुष्ट प्रवृत्तींशी तडजोड करण्यात आणि अशा तडजोडींमुळे होणाऱ्या साहजिकच विकृत परिणामात अंत पावतं.

तेव्हा चुकीचे मार्ग पत्करून त्यामुळे ध्येयांची विकृती किंवा सर्वनाश होणं योग्य नव्हे; त्याप्रमाणेच दुष्ट प्रवृत्तींशी तडजोड किंवा कर्मविरहित राहून, त्या तडजोडींमुळे होणारे विकृत परिणाम भोगणं हेही ध्येयसाधनाच्या दृष्टीने अश्रेयस्कर आहे. मग साधनं कोणती कोणती उपयोगात आणावयाची हा प्रश्न शिल्लकच राहतो. या प्रश्नाचा विचर करताना नेहरू (Mr. Tibor Mende) यांच्याशी संभाषण करताना सांगतात :

"योग्य साधनं ही नेहमीच अत्यंत महत्त्वाची आणि आवश्यक असतात, अशी श्रद्धा माझ्या मनात निर्माण झाली आहे... मी मधूनमधून गीता वाचतो आणि (त्यातील शिकवणुकीचा) स्वीकार करीत आलो आहे. तत्त्वज्ञानाच्या किंवा वेदान्ताच्या दृष्टिकोनातून नव्हे, पण त्यात असे कित्येक भाग आहेत की, त्याचा माझ्यावर प्रबळ परिणाम झालेला आहे. उदाहरणार्थ, जर माणसानं योग्य कार्य केलं तर त्याचे परिणामही योग्य तेच होतात. हळूहळू, शास्त्रीय दृष्टीनं विचार करताना माझ्या मनात विचार येतो की प्रत्येक कृतीला साहजिकतः परिणाम हा असतोच. योग्य कृतीचा परिणाम त्या कृतीच्या योग्यतेनुसार, तशी खात्री नसली तरी, योग्यच होतो; आणि प्रत्येक अयोग्य कृतीचा परिणाम, केव्हा ना केव्हा तरी, खात्रीनं अयोग्यच होत असतो."

ध्येयसाधनाच्या दृष्टीनं साधनेही उच्च किंवा योग्य ध्येयाशी संलग्नता साधणारी उच्च व योग्यच असली पाहिजेत हे नेहरूंचं वरील मत त्यांनी निरनिराळ्या संदर्भात अनेक वेळा मांडलेलं आहे. ३ फेब्रुवारी १९५० रोजी लोकसभेत भाषण करतानाही त्यांनी सांगितलं होतं : "माझ्या गेल्या तीस किंवा चाळीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनात मी जर काही अनुभव मिळवला असेल किंवा आपल्याला अनेक गोष्टींची शिकवण देणाऱ्या सर्वोच्च गुरूकडून मी जर एखादा गुरुमंत्र घेतला असेल तर तो हाच की, कुटिल धोरणाचा, तात्पुरता विजय

झालेला दिसला तरी, अंती पराजयच होतो." त्याचप्रमाणे ७-९-१९४८ रोजी घटना परिषदेत बोलताना त्यांनी उद्गार काढले होते : "आपण आपल्या योग्य मार्गाला चिकटून राहिलो आणि तात्पुरता फायदा उठविण्याच्या संधिसाधू दृष्टिकोनातून न पाहताही, त्या मार्गापासून परावृत्त झालो नाही, तर आपण यशस्वी होऊ, आणि एखादं राष्ट्र जर असत्याची कास धरून त्याच्या आधारावर वस्तुस्थितीची उभारणी करील तर, त्याचे हेतू सफल होणार नाहीत, याबद्दल माझी खात्री आहे."

ध्येयसाधनासाठी योग्य मार्ग अनुसरले पाहिजेत यावर नेहरूंचा किती उत्कट कटाक्ष व आग्रह होता हे या उताऱ्यावरून स्पष्टपणे आपल्या प्रत्ययास येते. परंतु, योग्य मार्ग म्हणजे कोणते असा पुढील प्रश्न नजरेसमोर उभा राहतो. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या मानवी स्वभावानुसार योग्य मार्गही भिन्न भिन्न असू शकतील किंवा परिस्थितीच्या विचित्र आणि भयानक चक्रात सापडल्यावर आणि कठीण आपत्तीतून सुटण्यासाठी व्यक्तीला कोणताही मार्ग योग्यच वाटेल. सर्वसाधारण व्यक्तीच्या आयुष्यात असा प्रसंग एखादे वेळेस येतोच येतो. अशा वेळी मनुष्य निराश होतो, चिडतो, रागावतो, कावून जातो. "जीवनाकडे नैतिक दृष्टिकोनातून पाहण्याकडे माझ्या मनाचा प्रबळ कल आहे" किंवा "आत्मनाश करून घ्यावयाचा नसेल तर आपल्याला नैतिक मूल्यांचा विसर पडू देता उपयोगी नाही." अशा शब्दात नैतिकतेचा जीवनातील महतीचा गौरव करणाऱ्या नेहरूंवरही असे उद्वेगाचे व निराशेचे प्रसंग आलेले आहेत व त्या भावनांचे उद्रेक त्यांच्या उद्गारात प्रगटही झालेले आहेत. आपल्या भगिनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या एका पत्रात नेहरू लिहितात : "अनित्य घटनांमुळे आपल्या सर्वांच्या मनाचा तोल ढळणं अगदी शक्य आहे. आणि त्यामुळं जीवनविषयक योग्य बैठकीचा आपल्याला विसर पडेल. जिकडे-तिकडे आपल्यावर अनित्य घटनांचा मारा होत आला आहे आणि अजूनही होत आहे. आणि आपल्यापैकी प्रत्येकावर त्याचे अनेक प्रकारे परिणाम झाले तर त्यात आश्चर्य नाही. तरी पण, इतरांचे डोळे, तात्पुरते का होईना, पण खंदिरांगारासारखे लालभडक झाले असले तरी आपले डोळे तसेच होणे आपल्याला उपयुक्त नाही. आपली दृष्टी सरळ आणि वर्तनही सरळ मार्गानंच केलं पाहिजे;

आणि आपण जर तसं केलं तर, आपल्या मनाचा तोल आपल्याला सांभाळता येईल..."

पंजाब व दिल्ली येथील दंग्यांनंतर नेहरूंनी उद्गार काढले आहेत: "पंजाब आणि दिल्ली येथील गेल्या काही दिवसांत शिसारीचे घोट घेऊन माझं अंतःकरण भरून गेलं आहे... जे काय घडत आहे ते काही तरी सरळ सरळ शत्रुत्वाचं द्योतक आहे आणि म्हणून आपल्या ध्येयकल्पनांशी सरळ सरळ विसंगत आहे. त्याच्या नुसत्या विचारानंच माझी मान लाजेनं खाली जाते, आणि गेल्या कित्येक वर्षांत आपण जे उपयुक्त कार्य केलं, त्याचं फळ आपल्याला अजिबात मिळणार नाही की काय या संशयानं कधी कधी ग्रस्त होतो. आणि तरीही तो संशय फार काळ टिकत नाही. कारण युक्त कार्याचे परिणाम युक्त आणि वाईट कृत्यांचे परिणाम वाईटच होणार याविषयी मला विश्वास वाटतो."

सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणेच महनीय व पुढारी व्यक्तींच्याही मनाचा तोल अनिष्ट घटनांमुळे, ढळण्याचा संभव आहे याची जाणीव नेहरूंना आहे. या मनःस्थितीचा प्रत्यय त्यांनी स्वतःही अनेक प्रसंगी घेतलेला आहे, व त्यामुळं त्यांच्याही मनाचा समतोल अल्पकाळ का होईना ढळलेला अनेकवार प्रत्ययाला आलेला आहे. पण तशाही मनःस्थितीत मनाचा ढळलेला समतोल सावरून, ते आपल्या ध्येय व हेतूंना एकजीव होणाऱ्या अंगीकृत मार्गापासून विचलित झाले नाहीत. आणि कोणत्याही परिस्थितीत, पत्करलेली साधने कधीही न त्यजण्याचा हिरिरकारक सल्ला व उपदेश ते करतात.

जीवनात आवश्यक असणारं उच्च ध्येय, त्या ध्येय-हेतूंशी एकजीव व संलग्न असलेले आखावयाचे मार्ग, त्या मार्गांच्या व परिणामांच्या योग्यतेवर बाळगावयाची निष्ठा व कोणत्याही अनिष्ट घटना घडत असताही या तीनही गोष्टींपासून अविचलित राहण्यासाठी आवश्यक असणारी मनाची तयारी याबद्दल नेहरूंनी प्रगट केलेले विचार पाहिल्यानंतर या सर्व दुव्यांना एकसंध व परस्पर संलग्न राखणारी जीवनाची घडण व कृती असली पाहिजे ही गोष्टही तितकीच आवश्यक आहे, याविषयी ते कटाक्ष बाळगतात. आणि त्यासाठी ते मानवी मनालाही, कृतीबरोबरच आवाहन करतात.

नेहरूंच्या मतानं आधुनिक जग हे मानवी मनाच्या चैतन्यापासून किंवा सजीवतेपासून संपूर्णपणे दुरावत चाललेलं आहे. आधुनिक जग हे मानवी मनाचा आविष्कार आहे ही गोष्ट खरी आहे. आपल्याभोवताली जे विश्व दृष्टिगोचर होत आहे; ज्याचा आपण घडोघडी अनुभव घेत आहो ते मानवी मनानंच उभारलेलं आहे. आजची प्रगतीही मानवी मनाच्या कल्पक सृष्टीचं दृश्य स्वरूप आहे. परंतु, मानवी मनातून निर्माण झालेल्या या आधुनिक प्रगत जगाचा भस्मासुर मानवी मनावरच उलटला आहे; आणि त्यामुळे मानवी मनाची सजीवता किंवा भावनात्मकता दिवसेंदिवस अंतर्धान पावत चालली आहे. प्राचीन काळात मानवी व्यक्तित्वात एकतानता आणि सुसंगती दिसून येत असे. सर्वसामान्य मानवात ती खालच्या पातळीवर असेल. परंतु काही महान विभूतींच्या जीवनातील या दुर्यांची उंची फारच वरच्या दर्जाची निःसंशय होती. विज्ञानाच्या प्रगतीमुळं जीवनाकडे पाहण्याच्या मानवी दृष्टिकोनात महदंतर पडल्यामुळं जीवनाच्या इतर महत्त्वाच्या अंगांकडे दुर्लक्ष होत गेलं आहे. आणि त्यामुळे जीवनातील एकात्मता व सुसंगती नष्ट होत गेली आहे. एखाद्या विशिष्ट शाखेत मानवी मनाचं सामर्थ्य आवश्यक असतं आणि म्हणूनच जीवनाच्या पुष्कळशा संलग्न प्रांतांत आश्चर्यचकित करून सोडणारी प्रगती झालेली दिसून येते. परंतु, आजच्या प्रगत युगात मानवी मनाचं, मानवाच्या विचारांवर आणि कृतींवर सत्ता गाजविण्याचं सामर्थ्य कमी कमी झालेलं दिसून येतं. आजच्या काळात मानवी जीवनाच्या काही शाखांत झपाट्यानं प्रगती होत गेली आहे आणि त्यामुळं जगाच्या प्राचीन इतिहासात मानवी मनाची सजीवता जशी दिसून येत असे तशी तर दिसून येत नाहीच; उलट, मानवी मनाच्या सजीवतेला नख लागलं गेलेलं प्रत्ययाला येत आहे. ही गोष्ट जर खरी मानली तर ती काही उपयुक्त गोष्ट खासच ठरणार नाही. कारण त्यामुळं ज्यावर आपली संस्कृती वाढली, आज ज्या उंचीवर मानव गेला आहे, त्या उंचीवर तो हळूहळू चढत गेला तो पायाच, समूळ उखडला गेला आहे. मनाच्या या निर्बल अवस्थेमुळे, आत्मनाश करू पाहणाऱ्या त्याच्या मनोविकारांना, मानव ताब्यात ठेवू शकत नाही; किंवा व्यक्तीच्या अगर समाजाच्या नैसर्गिक भावनोद्रेकांना आळा घालण्यात असमर्थ होत आहे. आणि त्याचा

परिणाम एका अनर्थातून दुसऱ्या त्याहूनही भयानक अनर्थांचा जन्म होण्यात होत आहे.

मनाच्या जीवन्मृतावस्थेतून निर्माण होणारे हे सारे अनर्थ टाळावयाचे असतील तर मानवाला फक्त भौतिक जीवनाचा विचार करून चालणार नाही, तर मानवाच्या आंतरिक जीवनाकडेही लक्ष दिलं पाहिजे. भौतिक आणि आंतरिक जीवन या दोहोंचा समन्वय साधून, या दोनही जीवनांत संपूर्ण सुसंगती किंवा समतोल्पणा निर्माण केला पाहिजे. आज भारतात किंवा इतर राष्ट्रांतही, एक आत्मगौरवाची किंवा आत्मदयेची तरी प्रवृत्ती दिसून येते. या दोनही प्रवृत्ती अनिष्ट आणि घातकी आहेत. भावविवशता आणि विकारात्मकता या दृष्टिकोनातून जीवनाचं कोडं उलगडत नाही; तर प्रामाणिक आणि धैर्यशाली वृत्तीनं जीवनाच्या वास्तवतेला तोंड देऊनच जीवन जगता येईल. जीवनातील विविध प्रश्नांशी संबंध नसलेल्या गोष्टींचा, ध्येयहीन आणि कल्पनानिष्ठ शोध घेण्यात आपण आपलं जीवन उधळून लावण्यात अर्थ नाही. कारण, भवितव्यता गतिमान आहे आणि ती आपल्या फुरसतीच्या क्षणापर्यंत थांबून राहात नाही. म्हणून आपल्या राष्ट्रीय जीवनात भौतिक उन्नतीबरोबरच आंतरिक विकासही साधला पाहिजे. या दोन भवितव्यांत समतोल व सुसंगतपणा राखला पाहिजे.

आपल्या व्यक्तिगत जीवनातही, राष्ट्रीय जीवनाप्रमाणेच, शरीर आणि अंतर्मन यांमध्ये, निसर्गाचा मानवी अंश आणि समाजाचा एक भाग म्हणूनही समतोल्पणा राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पूर्णावस्था म्हणजेच अंत आणि म्हणून त्या अवस्थेला मानवाला पोहोचणं त्याच्या शक्तीबाहेरचं आहे. आपला जीवनप्रवास, सतत निसटून जाणाऱ्या कोणत्या तरी गोष्टींचा शोध घेत, चालूच असतो. आपल्यापैकी प्रत्येक व्यक्तीत विविध प्रकारच्या असंगत आणि परस्परविरुद्ध अशा अनेक व्यक्ती सामावलेल्या असतात, आणि एका व्यक्तीतील या अनेक व्यक्ती विविध दिशांना ओढीत असतात. अशा परिस्थितीत बाह्य जग आणि अंतर्मन यांमध्ये सुविचारपूर्वक समतोल्पणा राखला गेला नाही, एक व्यक्तित्वात सामावलेल्या विविध प्रकारच्या प्रवृत्तींत, कधी एका प्रवृत्तीचा तर कधी दुसऱ्या प्रवृत्तीचा पगडा त्या व्यक्तीच्या मनावर होत राहून, त्या व्यक्तीचं जीवन उध्वस्त होऊन जाईल.

नेहरूंच्या जीवनाचं आणि त्यांच्या जीवनहेतूविषयक विचारांचं आपण परिशीलन केलं तर, आपल्या सबंध आयुष्यात बाह्य जग व अंतर्मन यांमध्ये समतोलपणा राखण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे; व त्या प्रयत्नात ते यशस्वीही झाले आहेत असं दिसेल. जन्मजात मनःप्रवृत्तींमुळे कधीकधी ते नैसर्गिक मनोविकारांच्या आहारी जात असत. परंतु, त्यांच्या सुसंस्कृत आणि समतोल मनावर त्या मनोविकारांचा प्रभाव तात्कालिकच ठरे. बाह्य जगाप्रमाणेच मनावरही समतोलपणा राखण्याच्या प्रयत्नात ते यशस्वी होत असत. आणि मनोविकारांच्या आधीन झालेल्या मनःस्थितीत, त्यांच्या हातून घडलेल्या अल्पशा प्रमाणातील का होईना पण, प्रमादाचं मनोविकाराचं दमन झाल्यावर, ते लगेच परिमार्जन करून टाकावयास विसरत नसत. याचं प्रमुख कारण म्हणजे, जागृत मनानं आणि विकाररहित दृष्टीनं त्यांनी जीवनाकडे बघितलं, त्याचा शोध घेतला, अनुभव घेतला, आपण ज्या समाजात जगतो आहोत, त्याच समाजाचा एक भाग आहोत या भावनेनं त्यांनी सतत विचार केला. आणि या प्रयत्नांतूनच, जनतेत स्वतःला विसरून जाऊन, तिच्या सुखदुःखात, संकटात, मेळाव्यात, नाचगाण्यात इत्यादी समूहकार्यक्रमांत, ते रंगून जाण्याच्या, समरस होण्याच्या वृत्तींचा जन्म झाला होता. नेता म्हणून किंवा महामंत्री म्हणून आपल्या स्थानाचा आधार जनता आहे हे ते कधीच विसरले नाहीत. कर्तुमकर्तुम् सामर्थ्य स्वतःच्या अंगी असूनही व संपूर्ण अधिकाराच्या सत्तेचा लाभ, जनतेकडून किंवा सहकाऱ्यांकडून झाला असताही त्याचा दुरुपयोग स्वतःसाठी कधीच त्यांनी करून घेतला असे त्यांचे राजकीय विरोधकही म्हणू शकणार नाहीत. त्या सत्तेचा व अधिकाराचा उपयोग त्यांनी जनतेच्या कल्याणाकरताच केला. त्याकरिता उपयोगात आणलेली धोरणे, साधने आणि मार्ग यांविषयी किंवा यशस्वितेविषयी दुमत किंवा शंका घेतल्या गेल्या, व अजूनही जात आहेत व पुढेही घेतल्या जातील. त्या दृष्टिकोनातून त्यांच्यावर त्यांच्या हयातीतही अत्यंत कठोर व क्वचित निंदागर्भ टीका केली गेली. तरी, टीकाकारांचा टीका करण्याचा अधिकार त्यांनी सतत मान्य केला व, प्रवृत्तिधर्मानुसार कधीकधी ते क्रोधाच्या आहारी गेलेले दिसले तरी अशा टीकेचं त्यांनी स्वागतच केलं. आणि टीकाकारांविषयी व्यक्तिशः कधीच कटुता, राग किंवा तिरस्कार मनात बाळगला नाही याची उदाहरणे अनेक सापडतील. आणि त्यामुळेच त्यांच्या

निधनानंतर त्यांच्या कट्टर राजकीय विरोधकांनीही नेहरूंबद्दल गौरवोद्गार काढले. त्यांच्या कट्टर राजकीय विरोधकांमध्येही त्यांचे मित्र अनेक होते. व नेहरूंचा सज्जनपणा आणि सुसंस्कृतपणा याबद्दल त्यांच्या मनात आदरभाव होता.

वेशिस्तपणा, आळस, कामचलाऊ वृत्ती, घाणेरडेपणा, असंस्कृतपणा, परंपरागत खुळ्या समजुती व रूढी यांना चिकटून राहण्याची गतानुगतिक्व, धर्म व देव यांचा स्वार्थासाठी करण्यात येणारा उपयोग, अज्ञानात समाधान मानण्याची प्रवृत्ती, दारिद्र्य, इत्यादी अनिष्ट प्रकारांबद्दल जनतेवर त्यांनी अनेकवार प्रहार केले आहेत; पण तरीही जनतेचं नेहरूंवर प्रेम होतं, आदरभाव होता, भारताचा भाग्यविधाता म्हणून त्यांचा स्वीकार केला होता. आणि याच भावनेनं नेहरूंचे ते प्रहार व टीका ऐकण्यासाठी लोक गर्दी करीत. त्यांचं स्वागत करीत. त्यांना माहीत होतं की, नेहरू कितीही संतप्त झाले, त्यांनी प्रहार केले, टीका केली तरी ते जनतेवरील प्रेमामुळे, जनतेच्या सर्वांगीण कल्याणासाठी, अभ्युदयासाठी आणि आपणही जनतेतील एक आहोत याच भावनेनं. महान नेता आणि महामंत्री असूनही जनतेपासून ते कधीच दूर राहिले नाहीत. किंवा अधिकाराच्या व सत्तेच्या मदात स्वतःत व जनतेत त्यांनी अंतर निर्माण होऊ दिलं नाही. कोणत्याही दर्जाच्या, वयाच्या, धर्माच्या स्त्री-पुरुष बालकांना त्यांच्याकडे मुक्तद्वार होतं. सर्वसामान्य जनता व महान नेता किंवा महामंत्री यांच्यामधील असा मनोहर व अकृत्रिम संगम क्वचितच इतिहासात पाहायला मिळेल.

भारतात लोकशाही व नंतर समाजवाद रूढ, निदान विचारात तरी, होण्यात नेहरूंची ही समाजनिष्ठ व जनतामुख प्रवृत्तीतूनच निर्माण झाली आहे याबद्दल कोणत्याही जाणत्या व्यक्तीच्या मनात शंका येणार नाही. आणि या प्रवृत्तीचं त्यांनी आमरण जतन केलं होतं. आपला वारस म्हणून त्यांनी कधीच कुणाचं नाव उच्चारलं नाही. त्यांनी ते नाव उच्चारावं म्हणून अनेकदां प्रयत्न झाले. पण नेहरूंनी तो अधिकार भारतीय जनतेचा आहे, असं निःसंदिग्धपणे सांगून टाकलं होतं. नेहरूंनी ते नाव उच्चारलं असतं तर त्या व्यक्तीची वारस म्हणून निवड करण्यात भारतीय जनतेनं आनंदच मानला असता. परंतु, आपला वारस कोण हे ठरविण्याचा जनतेचा अधिकार मान्य करून, जनतेच्या अधिकारावर त्यांनी आपली आत्यंतिक निष्ठा व्यक्त केली.

आपण स्वतः समाजाचा किंवा जनतेचा एक अविभाज्य भाग आहे हे नेहरू कधीच विसरले नव्हते व त्या दृष्टीनंच ते वागत असत. परंतु, व्यक्ती म्हणून त्यांना प्राप्त झालेलं व्यक्तिस्वातंत्र्य व प्रथम नेता आणि नंतर महामंत्री म्हणून हातात असलेली सत्ता आणि अधिकारही कारणपरत्वे बजावण्यास त्यांनी कमी केलं नाही. भारतीय जनतेतील व विविध समाजातील अनिष्ट प्रवृत्तींवर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. परंतु, आपले अधिकार त्यांनी एकतंत्रीपणाने, हेकटपणाने किंवा अरेरावीपणाने वापरले नाहीत. एवढंच नव्हे तर, जनतेच्या प्रक्षोभांना, मागण्यांना व दडपणांना, कित्येक वेळा स्वतःच्या मनाविरुद्धही मान तुकविली आहे याची उदाहरणे पाहण्यासाठी फार लांब किंवा पूर्वकाळात जाण्याची जरूर नाही. ती जनतेच्या हृदयात ताजीतवानी आहेत. अशी उदाहरणे, अरेराव व हेकट एकतंत्री अंमलात किंवा महापदावर आरूढ होऊन बसलेल्या जनताविन्मुख व्यक्तीच्या कारकीर्दीत घडलेली आढळणार नाहीत. आणि नेहरूंच्या कारकीर्दीत ती घडली हेच नेहरूंचं वैशिष्ट्य आहे.

या वैशिष्ट्याचं कारण असं की, स्वतःचे व्यक्तिगत किंवा नेत्याचे व महापदाचे अधिकार आणि जनतेची सार्वभौम शक्तिसामर्थ्य व अधिकार यांच्यामध्ये त्यांनी निर्माण केलेली सुसंगती आणि एकवाक्यता होय.

४ जानेवारी १९५७ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीत लोकशाहीचं स्वरूप स्पष्ट करीत असता नेहरूनी उद्गार काढले होते : "लोकशाही राज्य-पद्धत निश्चितपणे स्वीकारली आहे, याची कारणं अनेक आहेत. या पद्धतीतच जनतेचा व्यक्तिगत व सामाजिक विकास होत जातो. आपण आपल्या राज्यघटनेत व्यक्तिगत स्वातंत्र्याचं महत्त्वपूर्ण मूल्य मान्य केलं आहे; आपल्याला मानवाची रचनात्मक आणि साहसी वृत्तीची वाढ करावयाची आहे. आपल्या फक्त जगातिल भौतिक वस्तूंचं उत्पादन व्हावं यांतच समाधान मानावयाचं नाही. जीवनमान उच्च दर्जाचं व्हावं हे आम्हांस पाहिजे आहे, परंतु, माणसाच्या विधायक रचनात्मक, प्रवृत्तीचा, चैतन्यशक्तीचा किंवा साहसी वृत्तीचा, किंवा युगानुयुगे मानवाला पराकोटीला नेऊन पोहोचविणाऱ्या उच्च जीवनमूल्यांचा बळी देऊन हा दर्जा आम्हांला सुधारावयाचा नाही."

व्यक्तीच्या अंतर्बाह्य विकासाबरोबरच समाजासाठी विकास साधण्यासाठी स्वीकारलेल्या लोकशाहीची मूलभूत वैशिष्ट्ये सांगितल्यावर, सरकारचे व जनतेचे

संबंध स्पष्ट करताना वरील व्याख्यानापूर्वी २७–१०–१९४९ रोजी शिकागो येथील विश्वविद्यालयापुढील भाषणात ते म्हणतात : "अंतिम विश्लेषणानंतर जनतेच्या सदिच्छेवर आणि सहकार्यावर बव्हंशी लोकशाही सरकार कार्य करीत असतं. जनतेच्या विरुद्ध सरकारला फार जाता येणार नाही. सरकारजवळ काही शक्ती असतात आणि सैन्य आणि पोलिस हे या शक्तीचं दृश्य स्वरूप होय. बहुसंख्य जनतेच्या विचारांशी सरकार सहमत असेल तर ते लोकशाही सरकार होय, आणि अशा सरकारचा जाच अल्पसंख्य लोकांनाच वाटेल. पण जर एखादी व्यक्ती जर सरकारच्या वरील दोन शक्तींना न भिता विरोध करील तर मग सरकारनं काय करायचं ? ती व्यक्ती कारावासाला व प्रसंगी मृत्यूलाही कवटाळील. अशा स्थितीत उत्पन्न झालेल्या पेचप्रसंगाला सरकारला तोंड द्यावं लागेल. म्हणजे असं की, वरील दोन्ही शक्ती असून सुद्धा त्या व्यक्तीवर खरोखरचा विजय मिळवू शकणार नाही. आणि इथंच सरकार अयशस्वी ठरतं. आणि इथंच वरील शक्तियुक्त सरकार आणि, त्या शक्तींना न भिणारी व्यक्ती यामध्ये संघर्ष निर्माण होतो."

ह्या संघर्षातून मार्ग कसा काढावयाचा ? लोकशाही पद्धतीत कोणत्या पद्धतीत हा संघर्ष सोडवायचा ? २१–१२–१९५५ रोजी लोकसभेत भाषण करताना नेहरूंनी या मार्गांचा व पद्धतीचा उल्लेख केला आहे : "चर्चा, वादविवाद, मतपरिवर्तन आणि अंतिम निर्णय, आणि आपल्या मताविरुद्ध जरी हा निर्णय असला तरी त्याचा स्वीकार हीच लोकशाहीची पद्धत आहे."

संघर्षाच्या वेळी नेहरूंनी ही पद्धत स्वीकारून, जनता व सरकार यामध्ये सुसंगती आणि एकवाक्यता निर्माण केली. ती करण्यात ते यशस्वी झाले. ही सुसंगती आणि एकवाक्यता राष्ट्राराष्ट्रांत निर्माण करण्यात ते अपयशी ठरले, ही गोष्ट काही प्रमाणात खरी आहे. पण प्रस्तुत विषयात राजकारणाचा अंतर्भाव होत नसल्यामुळे त्या अयशस्वितेच्या पाठीमागे कोणते राजकारण व तत्संबंधी इतर कारणांचा विचार करण्याचं कारण नाही. पण व्यक्तिगत नेहरू व जनता यांच्यामध्ये नेहरूंनी सुसंगती आणि एकवाक्यता राखली.

नेहरूंनी आपल्या नजरेसमोर सतत ठेवलेली ध्येयं, त्या ध्येयांच्या प्राप्तीसाठी अर्पिलेलं आपलं सारं जीवन, यातच नेहरूंच्या आत्म्याची तृप्तता साठ-

विलेली होती. आणि त्या तृप्तीच्या समाधानातच २८–१०–१९४१ रोजी आपल्या भगिनीला लिहिलेल्या पत्रातील उद्गार त्यांनी सार्थ करून दाखविले:– "मला मरण आलं तरी मला त्याची पर्वा नाही, कारण केव्हा तरी ते यावयाचं आहे. युद्ध किंवा इतर कारणांमुळे लाखो लोक मृत्यू पावत आहेत. लहान-सहान आणि जास्त व्यक्तिगत प्रश्नांचा प्रभाव माझ्यावर हळूहळू कमी होत आहे, आणि मला जास्तच अलिप्तपणा वाटत आहे. व्यक्तिशः मला, गुंतलेलं (व्यक्तिगत) असलेलं तरी, माझ्यावरील (व्यक्तिगत) भार नाहीसा करावयाचा आहे. मी त्यात यशस्वी होईन की नाही हे मला माहीत नाही, किंवा तशी माझी इच्छाही नाही. कारण जीवनात आणि जीवनाच्या विविधतेत आणि समृद्धीत मी पुरेसा रमलो होतो. माझ्या मानसिक मर्यादांच्या कक्षेत, परंतु शक्य तितक्या समाधानी वृत्तीने शक्य तितक्या आनंदानं मी (उर्वरित) जीवन जगण्यासाठी तयार आहे. परंतु, जेव्हा जीवनाला पूर्णविराम मिळण्याची वेळ येईल तेव्हा मी स्वेच्छेने आणि तयारीने त्यासाठी उभा आहे."

卐 卐 卐

५

भारतप्रेम

'माझ्या मृत्यूनंतर जर कुणाला माझ्याविषयी काही उद्गार काढण्याची इच्छा झाली तर, माझ्याविषयी पुढील उद्गार काढलेले मला आवडतील' नेहरूंनी मृत्यूपूर्वी काही वर्षे अगोदर सूचना केली होती : "या माणसानं भारत आणि भारतीय नागरिक, यांच्यावर मनापासून आणि अंतःकरणापासून प्रेम केलं; आणि त्यांनीही त्याच्यावर उलट, प्रेमाचा अलोट आणि अमाप वर्षाव केला व त्याच्या बाबतीत उदार अंतःकरणानं वागले."

नेहरूंच्या बाबतीत कोणतीही जाणती व्यक्ती असे उद्गार यापुढं केव्हाही काढील, आणि या वर्णनाला ते पात्र आहेत, यात तिळमात्रही शंका नाही.

विलेली होती. आणि त्या तृप्तीच्या समाधानातच २८–१०–१९४१ रोजी आपल्या भगिनीला लिहिलेल्या पत्रातील उद्गार त्यांनी सार्थ करून दाखविले:– "मला मरण आलं तरी मला त्याची पर्वा नाही, कारण केव्हा तरी ते यावयाचं आहे. युद्ध किंवा इतर कारणांमुळे लाखो लोक मृत्यू पावत आहेत. लहान-सहान आणि जास्त व्यक्तिगत प्रश्नांचा प्रभाव माझ्यावर हळूहळू कमी होत आहे, आणि मला जास्तच अलिप्तपणा वाटत आहे. व्यक्तिशः मला, गुंतलेलं (व्यक्तिगत) असलेलं तरी, माझ्यावरील (व्यक्तिगत) भार नाहीसा करावयाचा आहे. मी त्यात यशस्वी होईन की नाही हे मला माहीत नाही, किंवा तशी माझी इच्छाही नाही. कारण जीवनात आणि जीवनाच्या विविधतेत आणि समृद्धीत मी पुरेसा रमलो होतो. माझ्या मानसिक मर्यादांच्या कक्षेत, परंतु शक्य तितक्या समाधानी वृत्तीने शक्य तितक्या आनंदानं मी (उर्वरित) जीवन जगण्यासाठी तयार आहे. परंतु, जेव्हा जीवनाला पूर्णविराम मिळण्याची वेळ येईल तेव्हा मी स्वेच्छेने आणि तयारीने त्यासाठी उभा आहे."

卐 卐 卐

५

भारतप्रेम

'माझ्या मृत्यूनंतर जर कुणाला माझ्याविषयी काही उद्गार काढण्याची इच्छा झाली तर, माझ्याविषयी पुढील उद्गार काढलेले मला आवडतील' नेहरूंनी मृत्यूपूर्वी काही वर्षे अगोदर सूचना केली होती : "या माणसानं भारत आणि भारतीय नागरिक, यांच्यावर मनापासून आणि अंतःकरणापासून प्रेम केलं; आणि त्यांनीही त्याच्यावर उलट, प्रेमाचा अलोट आणि अमाप वर्षाव केला व त्याच्या बाबतीत उदार अंतःकरणानं वागले."

नेहरूंच्या बाबतीत कोणतीही जाणती व्यक्ती असे उद्गार यापुढं केव्हाही काढील, आणि या वर्णनाला ते पात्र आहेत, यात तिळमात्रही शंका नाही.

उलट, भारतीय स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, भारताच्या सर्वांगीण अभ्युदयासाठी अहोरात्र तनमनधनाने झिजणाऱ्या व शेवटी चिरनिद्रेपूर्वी आपल्याला आपण दिलेली अनेक वचने पुरी करावयाची याचा ध्यास घेत देह ठेवणाऱ्या नेहरूंसारख्या महान व लोकोत्तर व्यक्तींनं, आपल्या अवसानानंतर, आपली स्मृती इतक्या अत्यल्प प्रमाणात कायम ठेवावी, अशी अपेक्षा करावी यांतच नेहरूंचं सारं व्यक्तिमत्त्व दिसून येतं हे तर खरंच; पण नेहरूंच्या या उद्गारांत, त्यांच्या उदार, विनम्र आणि विनयशील व्यक्तिमत्त्वाशिवाय जर कशाचा प्रामुख्यानं प्रत्यय येत असेल तर त्यांच्या भारतप्रेमाचं होय. नेहरूंचं भारतप्रेम कुणालाच — इतिहासालाही नाकारता येणार नाही. त्यांच्या कट्टर राजकीय विरोधकालाही ते अमान्य करण्याचं मनोधैर्य होणार नाही. नेहरूंची भारतभक्ती, भारतीयांवरील प्रेम आणि भारतनिष्ठा तशीच उत्कट होती; एकनिष्ठ होती. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात जे निर्णय घेतले, धोरणं पत्करली आणि जे जे काही प्रत्यक्ष आचरणात आणलं ते चूक असेल, परिणामी घातक वाटलं असेल किंवा ते अचूक व हितकर असेल; पण हे सर्व करताना त्या पाठीमागे भारताबद्दलची निष्ठा व प्रेम आणि भारताच्या प्रगतीची आंतरिक तळमळ होती याबद्दल शंका कोणी घेईल असं वाटत नाही.

एप्रिल ते सप्टेंबर १९४४ या पाच महिन्यांत "भारताचा शोध" हा ग्रंथ त्यांनी लिहिला तो भारतावरील त्यांच्या प्रेमाचं, भक्तीचं आणि निष्ठेचं दृश्य प्रतीकच होय. परंतु, भारताचा शोध घेण्याचं त्यांचं कार्य मात्र या पाच महिन्यांपुरतं मर्यादित होतं असा त्याचा अर्थ नव्हे. विद्यार्थिदशेपासून तो निधनापर्यंत त्यांचं भारताचा शोध घेण्याचं कार्य अखंड चालूच होतं. किंबहुना सबंध आयुष्यभर ते भारताचा शोधच घेत होते. जगाच्या इतिहासाबरोबरच भारताच्या अतिप्राचीन कालापासून अद्यावत् इतिहासाचा त्यांनी डोळसपणे अभ्यास केला. काश्मीरपासून तो कन्याकुमारीपर्यंत, आणि कराचीपासून कलकत्त्यापर्यंत त्यांनी प्रवास केला. या प्रवासाला मर्यादा नव्हती, पर्वतराजींबरोबरच दऱ्या-खोरी, शहरांबरोबर खेडीपाडी, उजाड माळरानांपासून किंवा वालुकामय प्रदेशांपासून तो सुपीक प्रदेशापर्यंत, नद्यांबरोबरच सागरसंचारही केला. खेडूत, किसान, मजूर, रानटी, इत्यादी लोकांत ते मिसळले; त्यांचं जीवन त्यांनी प्रत्यक्ष पाहिलं. प्रासादतुल्य बंगल्यापासून तो झोपडपट्टीपर्यंत

पायपीट करून सर्व भारतवासीयांच्या जीवनाचाही शोध त्यांनी घेतला. संस्कृती, नाट्यसंगीतादि कला, वातावरण, विविध प्रकारचं जीवन, भाषा, राहणी, जीवनमान, सारं सारं काही यांचा त्यांनी अनुभव घेतला. ज्या आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळविण्याचं आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वांगीण विकास साधावयाचा आहे, त्याचं सम्यक आणि सचेतन दर्शन आपल्याला झालं पाहिजे; ज्या भारतावर आणि भारतीयांवर आपण मनानं आणि हृदयानं प्रेम करतो, त्यांचा शोध घेऊन त्यांच्या जीवनाचं ज्ञान व परिचय व्हावा हाच नेहरूंच्या या भारताचा शोध घेण्याच्या प्रयत्नामागे हेतू होता. वातावरण, प्रदेश, भाषा, पोषाख इत्यादी, सर्वच बाबतीत बहुरंगी व बहुढंगी असलेल्या भारतासारख्या प्रचंड व विशाल राष्ट्राचा शोध घेण्याचं तेवढंच प्रचंड आणि विशाल कार्य नेहरूंनी जीवनभर केलं. त्या बहुविध आणि बहुढंगी जीवनाशी व वातावरणाशी, ते कोठेही गेले, तरी समरस होत असत; ही गोष्ट या संदर्भात न विसरता ध्यानात ठेवण्यासारखी आहे. नृत्यादि कला, पोशाख, भोजन, ऐतिहासिक विभूतींच्या पुतळ्याचं किंवा एखाद्या पूर्ण झालेल्या प्रकल्पाचं उद्घाटन असो, भारतातील परस्परविरोधी जीवनाशी ते तात्काळ अंतःकरणपूर्वक समरस होत असत, ते नेहरूंच्या मनात सतत वास करीत असलेल्या भारतावरील प्रेमामुळं आणि निष्ठेमुळेच.

भारतात विभिन्नता किती फार मोठ्या प्रमाणात आहे याची त्यामुळं नेहरूंना संपूर्ण कल्पना होती. परंतु, भारतातील विविधतेमुळे किंवा वैचित्र्यामुळे भारताच्या एकतेला बाध येतो आहे असं त्यांना कधीच वाटलं नाही. उलट, या विविधतेतच भारताची एकात्मता साठवलेली आहे अशी नेहरूंची भावना होती. परदेशी पाहुण्यांच्या वरवरच्या नजरेला ही विविधता व वैचित्र्य जाणवतं आणि त्यामुळेच भारताच्या एकात्मतेबद्दल ते आजवर शंका घेत होते. परंतु, या विविधतेच्या आणि वैचित्र्याच्या मुळाशी असलेली एकात्मता त्यांना दिसत नसे; अजूनही दिसत नाही. भारत हे ऐतिहासिक राष्ट्र आहे आणि त्याच्या पाठीमागे हजारो वर्षांचा इतिहास आहे. भारत हे राष्ट्र हे एखाद्या महासागरासारखं आहे. भारताच्या इतिहासात अनेक परदेशीय लोक,

विजयी योद्धे आणि रहिवासी आले. परंतु, या भारतीय महासागराने त्या सर्वांना आपल्यात सामावून घेतलं. या परकीय आघातांमुळे भारतीय जीवनावर, कलांवर आणि संस्कृतीवर परिणाम झाले, हे खरं असलं तरी भारतीय अंतर्मन आणि आत्मा मात्र अविचलित व अभेद्यच राहिला आहे. याचं कारण म्हणजे भारतात इतिहासकालापासून रुजलेली व जीव धरून राहिलेली एकात्मतेची भावनाच होय. आणि या एकात्मतेच्या भावनेच्या सामर्थ्याच्या जोरावरच अनेक आघात पचविण्याचं आणि बदलण्याचं ऐतिहासिक कार्य होत आलं आहे. भारताच्या संस्कृतीचं वैशिष्ट्य हेच की, भारतीय तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोनच तत्त्वतः संकलनात्मक आहे. भारतावर होणारं प्रत्येक परदेशीय विविध भौतिक आक्रमण या संस्कृतीला एक आव्हानच होतं आणि संकलन आणि स्वीकार या दोन साधनांनी त्यांनी त्या आव्हानाला यशस्वी रीतीनं तोंड दिलं. त्यामुळं भारतीय संस्कृतीला नित्य नवं चैतन्य आणि बहर येत गेला. परंतु, तिचं मूळ स्वरूप मात्र होतं तेच राहत गेलं.

भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचं हे सामर्थ्य राजकीय स्वातंत्र्य टिकवूं शकलं नाही, किंवा राजकीय एकात्मता साधण्यासाठी असमर्थ ठरलं हेही ऐतिहासिक सत्य आहे. त्यासाठी प्रयत्न झालेच नाहीत आणि त्यांचं महत्त्वही उपेक्षिलं गेलं. आणि त्याचे दुष्परिणामही आपल्याला भोगावे लागले. पारतंत्र्य नशिबी आलं. आणि या पारतंत्र्यातूनच राष्ट्रीय अप्रतिष्ठा, दारिद्र्य इत्यादींचा जन्म झाला. दास्यत्वाचे अनेक दुष्परिणाम भोगावे लागल्यामुळे भारताचं शरीर जर्जर होऊन गेलं. परंतु, या जर्जर शरीराच्या अंतरंगात पाहिलं तर त्यातील आत्म्याची भव्यता मात्र अबाधित राहिली आहे. अनेक युगांच्या कालात या आत्म्यानं प्रवास केला आहे आणि या कालांतील प्रवासांत ज्ञानसाधना संपादन केली आहे; अनेक परकीयांशी संसर्ग येऊन त्यांना आपलंसं करून घेतलं आहे; उत्कर्ष आणि अधोगतीचे काल पाहिले आहेत; अप्रतिष्ठा आणि अनंत दुःखं भोगिली आहेत. परंतु, या अनंत प्रवासात आपल्या शाश्वत संस्कृतीला तो आत्मा चिकटून राहिला आहे; ती संस्कृती त्यामुळं अधिक बलशाली व तेजस्वी झाली आहे आणि तिचे परिणाम आपल्या शेजाऱ्यांच्या संस्कृतींवरही केले आहेत. इतिहासाच्या उदयाच्या वेळी उपनिषदांत भारतीय विद्वानांनी दिलेली परमोच्च शिकवण तो विसरला नाही. दुःखांपासून व्यक्तिगत

मुक्तता किंवा व्यक्तिगत मोक्ष त्यांनी कधीच अपेक्षिला नाही, तर तेज आणि ज्ञान यांचीच साधना त्यांनी शिकविली आहे. "अज्ञाताकडून ज्ञाताकडे, अंधारातून प्रकाशाकडे, आणि मृत्यूकडून अमरत्वाकडे ने" हाच त्या शिकवणुकीचा संदेश आहे. आजही गायत्रीमंत्राचा लाखो लोक रोज जप करीत आहेत, त्या मंत्राचा उद्देशही ज्ञान आणि प्रकाश यांची मागणी करण्याचा आहे.

अशा रीतीने इतिहास आणि संस्कृती या दोन्ही दृष्टींनी आपला भारत-देश अतिप्राचीन आहे. परंतु, त्याचा आत्मा मात्र नवचैतन्य आणि गतिमान वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. याच नवचैतन्याच्या आणि गतिमान प्रवृत्तीमुळे राष्ट्र स्वतंत्र झाले आहे. परंतु, ते स्वातंत्र्य प्राप्त करताना आपण केवळ आपल्या प्राचीन इतिहासाला किंवा संस्कृतीला चिकटून बसलो नाही. सामाजिक अथवा राजकीय असे विचार आणि विज्ञान आणि तांत्रिक शिक्षणाचे धडे आपण पाश्चात्त्यांपासून घेतलेले आहेत. आणि सामाजिक उन्नतीसाठी आणि सुखस्वास्थ्यासाठी आपल्याला अजूनही काही धडे घ्यावे लागतील. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याला आपल्या जनतेची आर्थिक अवस्था त्वरित सुधारावयाची आहे; दारिद्र्य आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध निकाराचा लढा द्यावयाचा आहे. आणि हे सारे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सर्व सामर्थ्यानिशी बद्धपरिकर झालो आहोत. आपल्याजवळ इच्छाशक्ति आहे-नैसर्गिक समृद्धता आहे; मानवी सामर्थ्य आहे आणि या सर्वांचा आपल्याला आपल्यापुढे असलेले विकट प्रश्न सोडवायचे आहेत आणि या सर्व साधने; साठी आपल्याला शांततामय प्रगतीची आणि इतर राष्ट्रांच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे.

ज्या वेळेस आपण भारत हे आपलं राष्ट्र आहे असं म्हणतो त्या वेळी आपली दृष्टी पुष्कळशी भौगोलिक असते हे खरं आहे. आणि त्याबरोबरच आपण आपल्या दृष्टीपुढे आपल्या राष्ट्राला साकार करण्यासाठी मानवी स्वरूप किंवा आकार प्राप्त करून देतो. भारताला आपण 'भारतमाता' म्हणतो याच दृष्टिकोनातून. 'भारतमाता' हे नाव उच्चारताच आपल्या दृष्टीपुढे, अतिशय वयातीत परंतु दिसायला चिरतरुण, दुःखी नजरेची आणि निराधार, परकीयांच्या आणि सुपुत्रांना शत्रूंच्या निष्ठुर प्रहारांनी गांजलेली आणि त्यामुळे आपल्या

संरक्षणाची हाक देणारी मूर्ती उभी राहते. अशाच तऱ्हेच्या मूर्तस्वरूपाच्या दर्शनानं लाखो लोकांच्या भावना उचंबळून येऊन कार्यतत्पर व त्याग करण्यास प्रवृत्त होतात. आणि असं असूनही प्रत्यक्षात मात्र भारत म्हणजे शेतकरी आणि कामकरीच आहेत आणि त्याचं दर्शन सुखावह नाही. त्यांच्या त्या अर्धनग्न आणि वाकलेल्या शरीराकडे पाहिल्यावर आपण आपल्या अंतश्चक्षूंसमोर साकार केलेली 'भारमाता' ती हीच का असा संभ्रम आपल्याला पडतो. की, युगानुयुगे जनतेला दडपून आणि पिळणूक करणारे, जनतेवर निर्दय रूढी लादणारे आणि जनतेतील फार मोठ्या वर्गाला अस्पृश्य समजणारे मूठभर लोक ? आपण आपल्या कल्पनेत एखादे सजीव चित्र उभे करून त्याच्याआड सत्य दडवून ठेवण्याचा आणि वास्तवस्थितीपासून पळ काढण्यासाठी स्वप्नसृष्टीचा आसरा घेण्याचा प्रयत्न करीत असतो, हेच खरं आहे.

परंतु, नेहरूंनी मात्र वस्तुस्थितीपासून पळ काढण्यासाठी अशा तऱ्हेने स्वप्नसृष्टीचा आसरा कधीच घेतला नाही. आसेतुहिमाचल भारत त्यांनी प्रत्यक्ष दृष्टीनं पाहिला. डोळसपणे पाहिला आणि खऱ्या भारताचे साक्षात् मूर्तस्वरूप, स्वप्नमय सृष्टीत चितारल्या जाणाऱ्या उदात्त स्वरूपापासून किती भिन्न, किती भीषण, कुरूप आणि निराशामय आहे याची खात्री करून घेतली. आणि म्हणूनच भारतमातेच्या नितांतसुंदर अशा स्वप्नसृष्टींतल्या स्वरूपात त्यांनी कधीच भारत पाहिला नाही. आणि इतरांनीही भारतमातेचं असं सुंदर स्वरूप पाहण्याचा प्रयत्न न करता वास्तव भारत कसा आहे हे जाणून घेण्याची दृष्टी ठेवावी असा त्यांचा कटाक्ष असे. आपल्या "भारताचा शोध" या ग्रंथात यासंबंधीचे अनुभव वर्णन केले आहेत :

"कधीकधी मी एखाद्या सभास्थांनी पोहोचलो की, "भारत-माता की जय" या घोषणेनं माझं स्वागत होई. अनपेक्षित असा प्रश्न मी लोकांना विचारी : त्या घोषणांचा मतितार्थ काय ? भारतमाता कोण आहे ? आणि त्यांना जय कुणाचा हवा आहे ? माझ्या प्रश्नांनी त्यांची गंमत उडे व ते गोंधळून जात आणि माझ्या प्रश्नाचं नक्की उत्तर काय आहे ते न कळल्यामुळे ते एकमेकांकडे आणि माझ्याकडे पाहत. मी माझ्या प्रश्नांच्या उत्तराविषयी नेटच धरला. शेवटी पिढ्यान् पिढ्या मातीशी संबंध असलेला एक तगडा जाट पुढे आला

ब माझ्या प्रश्नाचं उत्तर "धरती"–भारतातील सुपीक माती असाच त्या घोषणेचा अर्थ आहे, असं त्यानं सांगितलं. कोणती माती ? त्यांच्या गावचा धरतीचा तुकडा, की जिल्हा किंवा प्रांतातील सारी शेतजमीन ? की, साऱ्या हिंदुस्थानची धरती ? अशा रीतीने प्रश्नोत्तरे होत गेली आणि शेवटी त्यांनीच अधीरतेनं त्यासंबंधी सारं काही सांगण्याचा आग्रह केला. मी तसा प्रयत्न केला आणि हिंदुस्थानचाच विजय त्यांना त्या घोषणेत अभिप्रेत होता; परंतु, त्या घोषणेत आणखीही फार मोठा अर्थ आहे. हिंदुस्थानातील पर्वत आणि नद्या, जंगलं आणि अन्नोत्पादन करणारी विस्तीर्ण शेतजमीन, ही सारी आपणास प्रिय आहेत, परंतु, शेवटी हिंदुस्थानातील जनतेची गणना, त्यांच्यासारखी व माझ्यासारखी जनता, हिंदुस्थानच्या विस्तीर्ण प्रदेशभर पसरलेली जनता, यांचीच गणना आपल्याला करावी लागेल. भारतमाता म्हणजेच मुख्यत्वे हीच कोट्यवधि जनता, आणि "भारतमाता की जय" म्हणजेच या जनतेचा विजय होय. तुम्ही स्वतः भारतमातेचे अंश आहात, मी त्यांना सांगितलं, आणि एका अर्थानं तुम्हीच भारतमाता आहांत; आणि हा अर्थ हळूहळू त्यांच्या मेंदूत शिरून, त्यांचे डोळे, एखादा महान शोध लागावा अशा भावनेनं, प्रफुल्लित होत."

भारतमाता म्हणजे भारतीय जनता असा खोल आणि विशाल अर्थ नेहरूंनी केला आणि याच भारतमातेवर–भारतीय जनतेवर मनःपूर्वक प्रेम केलं. भारतमातेच्या कल्पित आणि स्वप्नमय साकार मूर्तीवर, नकाशातल्या निर्जीव भारतापेक्षा, या सजीव, दरिद्री, गांजलेल्या आणि पीडलेल्या भारतीय जनतेवर, त्या जनतेच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय उन्नतीवर श्रद्धा ठेवून अंतःकरणपूर्वक त्यांनी तेच ध्येय आमरण नजरेसमोर ठेवून देह झिजविला.

"भारताला फार मोठा भव्योदात्त वारसा प्राप्त झाला आहे; आणि अर्थातच-आपल्याला त्यात मोलाची भर घालून तो पुढे चालवायचा आहे." असं नेहरूंनी एका व्याख्यानात भारतवासीयांना आवाहन केलं आहे. "आपल्या सेवेने आणि एकत्रित प्रयत्नांनी आपल्या प्रिय मातृभूमीची उन्नती आणि भरभराट व्हावी म्हणून प्रयत्न करणारा मी तिचा एक सुपुत्र होण्यास लायक आहे याचाच प्रत्येकाने विचार केला पाहिजे," असा प्रत्येक भारतवासीयाला

त्यांचा संदेश आहे. भारताचा व स्वतःबद्दलचा सार्थ अभिमान प्रगट करताना, लंडन येथे झालेल्या नेहरूंच्या उत्स्फूर्त आणि भव्य स्वागताला उत्तरपर भाषण करतांना "हे स्वागत माझं व्यक्तिशः नसून भारताच्या कर्तृत्वाचं, भारतानं दिलेल्या स्वातंत्र्यलढ्याचं आणि भारताच्या वैभवाचं स्वागत आहे" असे ते विनयानं म्हणतात व बजावतात की, "भारताचा एक नागरिक आणि विशेषतः स्वातंत्र्याच्या लढ्यातील संघर्षात आणि दुर्धर अवस्थेत आपला हविर्भाग अर्पण करणारा एक या नात्यानं आज (आपल्यापुढे उभे राहण्याचा) भारतीय म्हणवून घेण्याचा अभिमानपूर्वक हक्क प्राप्त झाला आहे."

--आणि नेहरूंनी अभिमानपूर्वक बजावलेला हा हक्क कोणीच नाकारू शकणार नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्योत्तर कालात त्यांनी राष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी, एकतेसाठी, अभ्युदयासाठी तनमनधनपूर्वक सारं जीवन खर्ची घातलं; त्यासाठी लाठीचे घाव सोसले, आपल्या आयुष्याचा बहुमोल भाग कारावासात काढला आणि जीवनाचा प्रत्येक क्षण राष्ट्रकार्यासाठी खर्च केला. तेव्हा तो हक्क बजावण्याचा हक्क त्यांना प्राप्त झाला होता हे निश्चित. आणि राष्ट्रसेवेचा जो बहुमोल आणि दुर्मिळ मान मिळाला व भाग्य लाभले याचाही त्यांना तितकाच अभिमान वाटत होता. १९२२ साली त्यांच्यावर खटला चालू असता अत्यंत सार्थ आणि समर्पक शब्दात त्याबद्दलचा अभिमान प्रगट केला. आपल्या जबाबात ते म्हणतात : "सद्भावना आणि राजनिष्ठा या भावना हृदयातून उगम पावतात. बाजारात त्या विकत घेता येत नाहीत आणि त्याहूनही संगिनीच्या टोकाच्या धास्तीनं मिळविता येत नाहीत. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आणि श्रद्धेसाठी आमचा लढा चालू आहे. उत्कट इच्छेनं आणि आनंदानं मी फिरून तुरुंगात जाईन. तुरुंग हाच आता आमचा स्वर्ग, पवित्र तीर्थक्षेत्र झालं आहे. माझ्या सद्भाग्याबद्दल मला खरोखरच आश्चर्य वाटतं. स्वातंत्र्यलढ्यात भारताची सेवा करण्याची संधी मिळणं हा मी एक बहुमान समजतो... परंतु, आपल्या प्रिय देशासाठी दुःख भोगावं लागणं. अंगीकृत कार्यासाठी मृत्यू येणं किंवा आपलं उदात्त स्वप्न साकार होणं यांपैकी एका गोष्टीचा लाभ होणं याशिवाय भारतीयाच्या वाट्याला येणारं अन्य बहुमोल सद्भाग्य कोणतं असू शकेल?

३१ ऑक्टोबर १९४० रोजी गोरखपूर येथे त्यांच्यावर भरण्यात आलेल्या खटल्याच्या वेळीही त्यांनी असेच तेजस्वी व धीरोदात्त उद्गार काढले होते :

" महाराज, सरकारच्या विरुद्ध काही गुन्हे केल्याबद्दल एक व्यक्ती म्हणून मला आपल्यापुढं, चौकशीसाठी, उभं करण्यात आलं आहे. आपण त्या सरकारचं प्रतीक आहांत. पण मी मात्र व्यक्तीपेक्षा काही तरी श्रेष्ठ नात्यानं आपल्यापुढं उभा आहे. आजच्या क्षणाचं, भारतीय राष्ट्रीयतेच, ब्रिटिश साम्राज्यापासून फारकत घेण्याचा आणि भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचा निश्चय केलेलं, एक प्रतीक आहे. माझी एकट्याचीच नव्हे तर, भारतातील लाखो लोकांची चौकशी करून निवाडा करण्याचा प्रयत्न तुम्ही करीत आहा आणि गर्विष्ठ साम्राज्यालाही हे कार्य झेपणार नाही. कदाचित, मी तुमच्या-समोर चौकशीसाठी उभा नसून, जगाच्या न्यायासनासमोर ब्रिटिश साम्राज्यच चौकशीसाठी उभं आहे. कायद्याच्या कोर्टापेक्षा आज जगात सामर्थ्यशाली शक्ती कार्यान्वित झाल्या आहेत...आणि त्यामुळे इतिहासाला नवीन वळण मिळत आहे...या चौकशीत किंवा नंतरही माझं जे काय होईल ही गोष्ट क्षुल्लक आहे...यापूर्वी सात वेळा मी कारावास भोगला आहे. यापुढे आठवा किंवा नववा आणखी काही वर्षांचा कारावास घडला तरी असा काय फरक पडणार आहे ? परंतु, भारताला आणि त्याच्या लाखो पुत्रपुत्रींना काय भोगावं लागणार आहे ही गोष्ट क्षुल्लक नाही आणि हाच मुद्दा तुमच्या-पुढे आहे. आजपर्यंतच्याप्रमाणेच पुढेही आपण भारतीयांची पिळवणूक करून त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना नाचवू अशी जर ब्रिटिश सरकारची कल्पना असेल तर ती त्यांची भयंकर चूक आहे. "

१९४० साली नेहरूंनी दाखवून दिलेली चूक ब्रिटिश सरकारच्या १९४७ साली लक्षात आली आणि संगिनीच्या जोरावर आपण भारतवासीयांची पिळवणूक करून आपल्या इच्छेप्रमाणे त्यांना नाचवू शकू ही त्यांची कल्पना फोल ठरली. भारताला स्वातंत्र्य मिळालं. परंतु, नेहरूंचं भारतप्रेम एवढ्यावरच समाधान मानणारं नव्हतं. भारत म्हणजेच भारतीय जनता. राजकीय स्वातंत्र्य मिळालं असलं तरी, अनिष्ट रूढी, दारिद्र्य, आर्थिक पिळवणूक अज्ञान, अशिक्षण इत्यादी शृंखलांतून ती भारतीय जनता मुक्त झाली नव्हती. आणि म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीच्या अत्यंत परमोच्च आनंदाच्या क्षणीही त्यांना भारतीय जनतेचा विसर पडला नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्व भाषणांतून भारतीय जनतेच्या उन्नतीचे विचार सतत प्रकट होत राहिले होते आणि याचं कारण

म्हणजे आपला भारत परदास्यातून मुक्त व्हावा या उत्कट इच्छेबरोबरच त्यांना ते स्वातंत्र्य भारतीय जनतेच्या कल्याणासाठी साधन म्हणून उपयोगात आणावयाचं होतं. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीच्या उत्कट आनंदात त्यांनी मनाचं समाधान मानलं नाही. स्वातंत्र्यप्राप्तीचा परमोच्च आनंद त्यांच्यासारख्या स्वातंत्र्ययुद्धावरील आघाडीवरील एक सेनाधिकाऱ्याला होणं अत्यंत साहजिकच होतं व तो त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ च्या रात्री केलेल्या आपल्या सुप्रसिद्ध भाषणात अत्यंत समर्पक शब्दात आणि उत्कट भावनेनं प्रकटही केला. "कित्येक वर्षांपूर्वी आपण भवितव्याबरोबर संकेत केला होता, आणि आता वचनपूर्तता करण्याची वेळ येऊन ठेपली आहे; ही पूर्तता संपूर्ण किंवा परिपूर्णावस्थेत नसेल परंतु ती भरीव प्रमाणात असणारच. मध्यरात्रीच्या प्रहराच्या घटकेला, जेव्हा सारं जग निद्रावस्थेत असेल, त्या वेळी भारत सचेतन आणि जाग्रत होत आहे. असा एक क्षण येतो, की जो इतिहासात क्वचितच येतो, की त्या क्षणाला आपण जुन्यातून नव्यात पदार्पण करतो, जेव्हा एक काळ संपतो, आणि जेव्हा दीर्घकाल दडपून टाकलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला वाचा फुटते."

परंतु हे उद्गार काढल्याबरोबरच लगेच नेहरू बजावतात : "या गंभीर क्षणी, भारताची आणि त्याच्या जनतेची आणि विशाल मानवतेच्या कल्याणासाठी सेवा करण्याकरिता स्वतःला वाहून घेण्यासाठी आपण प्रतिज्ञाबद्ध होणं, हेच सुयोग्य ठरणार आहे."

नेहरूंना, स्वातंत्र्य हे भारतीय जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी साधन म्हणून उपयोगात आणावयाचं असल्यामुळे, स्वातंत्र्य आणि अधिकारपद यांच्याबरोबरच आपल्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडते याची संपूर्ण जाणीव होती. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीच्या आनंदात त्यांनी समाधान मानलं नाही. "स्वातंत्र्यजन्माच्या पूर्वी आपण साऱ्या प्रसववेदना सहन केल्या आणि त्याच्या दुःखाच्या स्मृतींनी आपली हृदये भारावून गेली आहेत. त्यातील काही वेदना अजूनही चालूच आहेत. असं असलं तरी भूतकाळ संपला आहे आणि भविष्यकाळ आपल्याला संकेत करीत आहे. हा भविष्यकाळ स्वास्थ्याचा किंवा विश्रांतीचा काळ नाही, तर आपण अनेक वेळा घेतलेल्या आणि आज घेत असलेल्या प्रतिज्ञापूर्तीसाठी निरंतर झगडण्याचा काळ आहे. भारताची सेवा

म्हणजेच भारतातील लाखो दुःखी जनतेची सेवा होय. दारिद्र्य, अज्ञान, रोगराई आणि असमानता यांचा अंत करणे हाच त्या सेवेचा अर्थ आहे. प्रत्येक नेत्रातील प्रत्येक अश्रू पुसून टाकणं आपल्या शक्तीबाहेरचं असलं तरी पण जोपर्यंत अश्रू आणि दुःख या देशात नांदत आहेत तोपर्यंत आपलं कार्य संपणार नाही." असा इशारा याच भाषणात त्यांनी देऊन ठेवलेला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर येऊन पडलेल्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि घेतलेल्या प्रतिज्ञा यांची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने करावयाचे प्रयत्न यासंबंधीचं हे दिग्दर्शन आणि भारतीय जनतेची करावयाची असलेली सर्वांगीण उन्नती यासंबंधीचे उद्गार नेहरूंनी फक्त याच भाषणात काढले असंच नव्हे तर त्यानंतरही जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा प्रत्येक भाषणात ते आमरण काढीत होते व जनतेच्या कर्तव्यांची जाणीव ते सतत देत राहिले होते. बिंबहुना, अशी संधी वारंवार मिळावी म्हणून ते सर्व मेळाव्यांना, आपल्या कार्यमग्नावस्थेतही उपस्थित राहत असत. हे मेळावे बहुविध प्रकारचे असत. वर्तमानपत्रकार, शास्त्रज्ञ, अर्थकारणी, व्यापारी, विज्ञानसंशोधक, सैनिक, परिषदा, सभासंमेलनं, वाङ्मयीन परिषदा इत्यादी बहुविध व नानाप्रकारच्या मेळाव्यांना आणि जनतेच्या विराट सभांना ते उपस्थित राहत. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत; चर्चा-वादविवाद, करीत आणि अशा प्रसंगी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन त्या कार्याने आत्मसंतुष्ट न राहता पुढील करावयाचा अमाप कार्याची रूपरेषा आणि कल्पना याची जाणीव करून देत. परंतु, या सर्व प्रकारात त्यांचं लक्ष्य एकच असे. भारतीय जनतेचं कल्याण, तिची सर्वांगीण उन्नती, भारताची प्रतिष्ठा याच एका ध्येयावर त्यांचं लक्ष केंद्रित केलेलं असे. त्यांच्या मनाला तोच एक ध्यास लागून राहिला होता. जीवनाचं एकमेव क्षेत्र व ध्येय बनलेलं होतं.

परंतु, ही ध्येयसाधना किती खडतर, कष्टप्रद आणि लांबच्या पल्ल्याची आहे याचीही त्यांना जाणीव होती. हे कार्य एका व्यक्तीचं, एका पक्षाचं, एका पिढीचं नाही. ते कार्य सर्व भारतीयांच्या एकात्म प्रयत्नांचं, सर्व पक्षांचं व अनेक पिढ्यांचं आहे. त्या कार्याला अंत नाही असं जरी असलं तरी हे कार्य आत्मविश्वासानं आणि सातत्यानं करीत राहिलं पाहिजे. तरच हे महान

काय उत्तम रीतीनं पार पाडण्यास आपण समर्थ होऊ अशी नेहरूंची खात्री होती. हे महान कार्य पार पाडण्याचा प्रयत्न करीत असतानाच भारतीयांना श्रेष्ठत्व प्राप्त होणार आहे. ३ जून १९४७ रोजी आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात याची जाणीव आपल्या कोट्यवधि श्रोत्यांना करून देताना नेहरू म्हणाले होते : " आपण सर्व लहान माणसे एका महान कार्यासाठी झगडत आहोत; पण ते कार्यच महान असल्यामुळे त्या महानतेचा थोड्याफार अंशाचा आपल्यालाही लाभ होतो. आज जगात आणि भारतातही सामर्थ्यशाली शक्ती कार्यान्वित झाल्या आहेत. आणि भारतासाठी आपण एका महान युगाला आरंभ करीत आहोत; भौगोलिक भारत, ऐतिहासिक आणि परंपरा असलेला भारत, आपल्या मनातील आणि हृदयातील भारत बदलणार नाही याची मला खात्री वाटते."

भारतीय जनतेचं सर्वांगीण कल्याण हे भारताच्या वैभवावर आधारलेलं असल्यामुळे, भारतीय नागरिकांनी फक्त त्यासंबंधी अपेक्षा करून चालणार नाही. भारत स्वतंत्र झाला म्हणून आपल्या अपेक्षापूर्तीसाठी जनतेकडून भारतालाही काही तरी हविर्भाग अर्पण केला पाहिजे. स्वातंत्र्यदिनाच्या पहिल्या वाढदिवशीच्या भाषणात त्यांनी या मुद्द्याचं विवरण केलं होतं. " भारतासंबंधी आपण सारेच खूप बोलत असतो आणि भारताकडून आपण अनेक गोष्टींची अपेक्षा करतो. पण त्या बदल्यात आपण भारताच्या चरणी काय अर्पण करणार आहोत ? आपण जेवढं अर्पण करू त्याच प्रमाणात लाभ करून घेणं योग्य होणार आहे. प्रेमभावना, सेवा, उत्पादन आणि विधायक कार्य यांचं जेवढं आपण दान करू त्याचीच आपल्याला अंती भारत परतफेड करील. आपण जसे असू तसाच भारत असणार आहे. आपले विचार आणि कार्य यानेच भारताची घडण घडणार आहे. भारतमातेच्या फलदायी गर्भातून जन्म घेतलेली आपण तिची बालके आहोत आणि म्हणून तिचे आपण लहान लहान अंश आहोत. आणि तरीही उद्याच्या भारताचे आपण जन्मदाते आहोत. आपण जर मोठे असलो तर भारतही मोठा होईल; आणि आपण जर क्षुद्रमनस्क आणि संकुचित दृष्टीचे झालो तर भारतही तसाच झाल्याशिवाय राहणार नाही."

भारतीय जनतेचं भवितव्य भारतीय जनतेच्या कर्तृत्वावरच अवलंबून आहे. आणि यासाठी प्रत्येक भारतियाने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, " भारतात

असा एकही गट, पक्ष, धार्मिक समाज, नाही की जो भारत वैभवसंपन्न झाला नसला तरी वैभवसंपन्न होऊ शकेल. जर भारताची अधोगती झाली तर आपण सारेच भारतीय रसातळाला जाऊ... आपण कोणत्याही समाजाचे किंवा धर्माचे असलो तरी, भारत बलवान स्वतंत्र देश म्हणून जर प्रस्थापित झाला तरच भारत आणि आपण, दोघांच्याही ते हिताचं ठरणार आहे."

आपण एक भारतीय आहोत याचा नेहरूंनी अभिमान बाळगला. भारत आणि भारतीय जनता हे दोघे घटक त्यांनी अविभाज्य मानले. भारताच्या म्हणजेच भारतीय जनतेच्या स्वातंत्र्याकरिता, स्वातंत्र्यपूर्व कालात सदैव झगडत राहिले. वैभवाचा वारसा झुगारून दिला. स्वास्थ्यपूर्ण, सुखप्रद आणि विलासी जीवनाचा त्याग करून एका सैनिकाची भूमिका पत्करली. स्वतःच्या कर्तृत्वावर धुरीणत्व व नेतेपद प्राप्त करून घेतलं. जनतेच्या गळ्यांतील 'जवाहर' बनले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतप्रेमानं आणि भारतनिष्ठेनं ते आमरण भारतीय जनतेच्या प्रगतीसाठी कार्यरत राहिले. जीवनाचा प्रत्येक क्षण भारताच्या भावी वैभवासाठी, प्रतिष्ठेसाठी आणि प्रगतीसाठी विचारानं आणि आचारानं परिस्थितीशी झगडत राहिले. या झगड्यात अनेक वेळा निराशा त्यांच्या पदरात पडली. परंतु, ध्रुवताऱ्यावर दृष्टी ठेवून नाव हाकणाऱ्या सुकाणूवरील कप्तानाप्रमाणे ध्येयावर नजर ठेवून, वाट्याला आलेली निराशा पचवून, भारताची नाव मार्गावर ठेवण्याचा अहर्निश प्रयत्न केला.– आमरण केला. आणि मृत्यूपर्यंत त्यांनी त्याच ध्येयप्राप्तीचा आणि वचनपूर्तीच्या ध्यास घेतला. जीवनभर त्यांनी भारतासाठी आणि भारतीय जनतेसाठी आचाराने आणि विचाराने प्रत्येक क्षण देह झिजविला; देह ठेवला. एवढंच नव्हे तर मृत्यूनंतरही आपला देह भारतभूमीत विलीन व्हावा अशी इच्छाही प्रदर्शित करून ठेवली. आपल्या काव्यमय आणि अलौकिक अशा मृत्युपत्रात त्यांनी लिहून ठेवलं आहे : "माझ्या देहाची राख, ज्या भूमीत भारतातील शेतकरी कष्ट करून अहोरात्र राबतो त्या मातीत विखरून टाकावी; माझ्या पार्थिव देहाचा प्रत्येक कणन् कण भारताच्या पवित्र मातीत मिसळून मला तिच्याशी एकात्म होऊ द्या. भारताची प्राचीन परंपरा, वर्तमान. कालातील प्रयत्न आणि भविष्यकालीन उज्ज्वलता यांचं प्रतीक असलेल्या गंगा नदीत माझ्या देहाची मूठभर राख आणि अस्थी विसर्जित करण्यात याव्यात- हे विधी धार्मिक भावनेनं व्हावेत अशा इच्छेनं मी हे लिहून ठेवीत नाही, तर

गंगा-यमुना या नद्यांविषयी लहानपणापासून मी मनाने बांधला गेलो आहे म्हणून...भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात आहे..."

भारतप्रेमाचे आणि भारतनिष्ठेचे ज्वलंत व असामान्य प्रतीक ठरणाऱ्या नेहरूंच्या या मृत्युपत्रात आपल्या सहकाऱ्यांचे ऋण आणि भारतीयांचे त्यांच्यावरील प्रेम मान्य केले आहे. सहकाऱ्यांचे ऋण मान्य करताना ते लिहितात : "माझे अगणित सहकारी-मित्र यांचे ऋण माझ्याकडून कधीच न फिटणारं आहे. हातात हात घालून अनेक महान् कार्ये आम्ही पार पाडली आहेत. ती करताना विजय मिळाला तर विजयाचे सुख आणि पदरी पडणारे अपयशाचे दुःख या दोहोंचेही आम्ही वाटेकरी झालो होतो."

भारतीयांनी नेहरूंवर जो प्रेमाचा वर्षाव केला त्याबद्दल नेहरूंनी लिहून ठेवलं आहे : "भारतीय जनतेनं माझ्याबद्दल इतका अमाप जिव्हाळा व प्रेम व्यक्त केलं की, त्यांची फेड अत्यल्प अंशानंही करणं मला अशक्य आहे. प्रेम ही अशी पवित्र भावना आहे की, त्याची परतफेड तरी कशी होणार ? माझ्या वाट्याला भारताच्या सर्व भागातील आणि सर्व थरांतील जनतेचं प्रेम आलं त्यामुळं माझं हृदय भारावून गेलं आहे."

नेहरूंच्या या भारतप्रेमामुळं आणि भारतनिष्ठेमुळं आपल्या मृत्यूनंतर आपल्याबद्दल कोणते उद्‌गार काढावेत अशी जी इच्छा प्रदर्शित केली होती ती त्यांची अपेक्षा "या माणसानं भारत आणि भारतीय नागरिक यांच्यावर मनापासून आणि हृदयापासून प्रेम केलं; आणि त्यांनीही त्याच्यावर उलट प्रेमाचा अलोट आणि अमाप वर्षाव केला व त्याच्या बाबतीत उदार अंतःकरणानं वागले" असे उद्‌गार भारतीय जनतेच्या मुखातून सदैव निघत राहून, पूर्ण होईल यात शंका नाही.

卐 卐 卐

६

कारावास

"मी माझ्या दुसऱ्या घरी काही काळाकरिता जात आहे." इंदिराला लिहिलेल्या एका पत्रात, कारावासात जाण्यापूर्वी लिहिलं होतं. स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरू तुरुंगाला आपलं दुसरं वास्तव्यस्थान समजत होते. आणि वस्तुस्थितीही तशीच होती.

नोव्हेंबर १९२१ मध्ये नेहरूंना त्यांच्या आयुष्यात प्रथम अटक झाली. "तुरुंग अद्याप अज्ञात स्थळ होतं; तिथं जाण्याची कल्पनाच अद्‌भुत वाटत होती." नेहरू आपल्या पहिल्यावहिल्या अटकेबद्दल लिहितात : "तशा प्रकारचा माझा तो पहिलाच अनुभव होता; म्हणून मी भारावून गेलो होतो; परंतु, वरील भावनोद्रेक बाह्यंतरी न दाखविण्याची आणि पोलिसांच्या येरझाऱ्या-

मुळं आपल्यावर काहीच परिणाम झाला नाही, व आपण अगदी मनानं शांत व संयमी आहोत हे भासविण्याची इच्छा प्रबळ होती."

आपल्या पहिल्यावहिल्या अटकेच्या वेळी नेहरू भारावून जाणं अगदी साहजिक होतं. परंतु, तरीही त्यांनी मनातील खळबळ बाहेर दिसू न देण्याची तत्परताही दाखविली. परंतु पुढेपुढे अटक आणि तुरुंगवास त्यांच्या जीवनाचा एक प्रमुख आणि नित्याचा भाग होऊन बसला होता. नेहरूंचे राजकीय चरित्रकार मायकेल ब्रेचर यांनी लिहिल्याप्रमाणे " तुरुंग ही संवय " होऊन राहिली होती. नोव्हेंबर १९२१ मध्ये अटक होऊन त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. आणि तेव्हापासून १५ जून १९४५ पर्यंतच्या साडेतेवीस वर्षांच्या कालावधीत नेहरूंना नऊ वेळा एकंदर कारावास घडला. कमीत कमी सहा महिने व जास्तीत जास्त १०४० दिवस असा त्या नऊ कारावासांचा कालावधी होता. या साडे-तेवीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी एकंदर ३२६२ दिवस, म्हणजे जवळ जवळ नऊ वर्षे कारावासात काढली. प्रत्यक्षात त्यांना एकंदर शिक्षा सतरा वर्षांची झाली होती; परंतु विविध राजकीय व कौटुंबिक कारणांमुळे शिक्षेची सारीच वर्षे त्यांना कारावासात न काढावी लागता नऊच वर्षे प्रत्यक्ष कारावास घडला व अंतिम कारावासातून ते १५ जून १९४५ रोजी बाहेर पडले. त्या वेळी त्यांचे वय ५६ होते ही गोष्ट विचारात घेण्यासारखी आहे. याच कालावधीत कारा-वासात असताना पत्नी, पिता आणि माता या अत्यंत निकटच्या नातेवाइकांच्या निधनाच्या आपत्तीही त्यांच्यावर कोसळल्या. मनाविरुद्ध अनेक गोष्टी राजकारणात व खाजगी आयुष्यात घडून त्यांना भयंकर मनस्ताप व प्रक्षोभ सहन करावे लागले. पण तरीही भारतप्रेमामुळे व भारतनिष्ठेमुळे ते सारे आघात आणि मनःक्षोभ त्यांनी सहन केले आणि कारावासात सदैव पडलेले एक पाऊल कधीच मागं घेतलं नाही. कारण त्यांना जाणीव होती की : " इतिहासात माझे अगर अन्य कोणा व्यक्तीचे काय होईल ही गोष्ट अगदी कमी महत्त्वाची आहे. परंतु, भारत व भारतातील लाखो लोक यांचे काय होईल ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे." आणि भारत व लाखो भारतीय नागरिक यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कारावास, यातना, दुःख ही सोसलीच पाहिजेत. परंतु, त्यामुळे भारताचा आत्मा मुळीच पराभूत होणार नाही.

" आपले आशास्थान आपल्यापासून फार दूर असेल आणि आपल्याला वाळवंटातून खडतर प्रवास करावा लागेल; परंतु, फाशी आणि अनंत यातना आणि दुःखे यामधूनही टिकून राहिलेली मृत्युंजय आशा आपल्याजवळून कोण हिरावून घेणार आहे ? अनेक वेळा शृंखलबद्ध होऊनही पुनः पुन्हा नवजीवन प्राप्त करून घेतलेला भारताचा आत्मा चिरडून टाकण्याची कोणाची प्राज्ञा आहे ?" असे तेजस्वी उद्गार नेहरूंनी काढले ते, आपण व आपल्यासारख्याच भारतप्रेमी आणि भारतनिष्ठ सुपुत्राच्या बलिदानांच्या व त्यागाच्या सामर्थ्यावर भारत स्वतंत्र होऊन त्याला पुनर्जीवन प्राप्त होईलच या दृढ आशेच्या व आत्मविश्वासाच्याच शक्तीवर काढले होते. आणि म्हणूनच कारावासाला त्यांनी आपलं दुसरं घर मानलं व त्यात ठेवलेलं पाऊल कधीही मागं घेतलं नाही. आपले मार्ग बरोबर आहेत आणि त्याच मार्गानं गेलं तर विजय नक्कीच प्राप्त होणार आहे ही नेहरूंची श्रद्धा होती. आणि त्या श्रद्धेच्या पाठबळावरच, २४ ऑक्टोबर १९३० रोजी नैनी सेंट्रल प्रिझनमध्ये त्यांच्यावर झालेल्या खटल्याच्या प्रसंगी केलेल्या आपल्या निवेदनाच्या वेळी भारतीयांना संदेश दिला : " हसतमुख रहा ! शत्रू आपलं माथं आणि मनस्वास्थ्य खुशाल भडकू दे. कारण पराजय त्याला समोर दिसत असल्यामुळे तो तसाच वागणार. पण आपला सत्पक्ष आहे आणि आपण जिंकणारच हे आपण जाणून आहो. झगड्याचं स्वरूप भयानक अवतार घेत असताना व कारणपरत्वे मेघांनी क्षितिज काळवंडून गेलं तरी का हसत मुख का राहू नये ? त्या मेघांच्या मागे स्वातंत्र्याचा सूर्य अस्तित्वात आहे आणि लवकरच तो धुके आणि अभ्रपटल छेदून बाहेर येईल आणि आपल्या जीवनदायी तेजाने आपल्याला नवजीवन देईल."

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सतत कारावास सहन करीत परकीय सत्तेशी झगडा देत राहण्याचा मार्ग निःसंशय योग्य आहे व त्या मार्गाने गेल्यानेच स्वातंत्र्याचा सूर्य उदयास येईल याबद्दल नेहरूंची खात्री असल्यामुळे जीवनात घडलेल्या कारावासाबद्दल कधीच खंत किंवा खेद बाळगला नाही; आपण चुकत आहोत असं विचार करूनही त्याना कधीच वाटलं नाही. त्यासंबंधीचे विचार कारावासाच्या एकांतात क्वचित येत असत, नाही असं नाही. पण पत्करलेल्या जीवनाबद्दल त्यांच्या मनात संदेह नव्हता. आपल्या आत्मचरित्राच्या उपसंहारात आपल्या दुसऱ्या वास्तव्यस्थानाबद्दल, कारावासाबद्दल थोडेफार सिंहावलोकन करणं

अत्यंत साहजिकच होतं. " तुरुंगात मी घालविलेली ती वर्षे ! एकाकी बसून, विचारात मग्न झालो असताना, एकामागून एक विस्मृतीच्या पडद्याआड जाणारे किती ऋतू मी पाहिले होते ! वाढत जाणारी आणि कमी कमी होत जाणारी किती चंद्रबिंबे, आणि अविश्रांत अवस्थेत भव्य स्वरूपात भ्रमण करीत राहिलेली तारांगणे मी किती तरी पाहिली आहेत. माझ्या यौवनाचे भूतकालातील किती दिवस इथे पुरले गेले आहेत; आणि कधी कधी त्या मृत दिवसांची भुते उभी राहिलेली दिसतात. आणि आपल्याबरोबर मर्मभेदक स्मृती घेऊन, ती माझ्या कानात कुजबुजतात. " याचा काही उपयोग आहे का ? " त्याच्या उत्तराबद्दल संदेह वाटत नाही. माझं जीवन पुन्हा जगण्याची संधी मला मिळाली तर, आणि त्यात आजचं ज्ञान आणि अनुभव तर मी त्या माझ्या व्यक्तिगत जीवनात बरेच बदल करीन यांत शंका नाही; कृतकर्मात सुधारणा करण्याचे मी प्रयत्न करीन; परंतु सार्वजनिक जीवनात घेतलेले महत्त्वाचे निर्णय मात्र अबाधित राहतील. खरोखरच मी त्यात फरक करणार नाही. कारण ते माझ्यापेक्षा सामर्थ्यवान आहेत आणि माझ्या नियंत्रणाखाली नसलेल्या शक्तींनी मला ते घेण्यास उद्युक्त केले होते. "

नेहरूंची वरीलप्रमाणे श्रद्धा असल्यामुळे कारावासाचे दुःख त्यांनी कधीच मानले नाही; किंवा, त्याबद्दल त्यांना पश्चात्ताप वाटला नाही. परंतु, तुरुंगातील जीवनाचा उबग आणणारा निराळेपणा त्यांच्यासारख्या जीवनाचा क्षणोक्षणी विविध अनुभव घेत राहणाऱ्या, बहुरंगी जीवन जगणाऱ्या, विविध कलांत आणि घटनांत प्रत्ययकारी रस घेत राहणाऱ्या जनतेशी सतत संपर्क ठेवून त्यांत मिसळणाऱ्या जगाशी सतत संपर्क ठेवणाऱ्या आणि सतत कार्यरत राहणाऱ्या व्यक्तीला तुरुंगातील सर्वच बाबतीतील मर्यादित जीवन प्रयत्न करूनही असह्य होण्याचे अनुभव आले असल्यास तर ते साहजिकच आहे. विशेषतः " भारत आणि जग " यांचे सतत विचार करीत राहणाऱ्या नेहरूंना तर कारावासातील मर्यादित जीवन जाचक व बंदिस्त वाटल्यास नवल नाही. " उंच भिंती आणि तुरुंगाचे दरवाजे बाह्य विशाल जगापासून, तुरुंगातील अल्पांश जीवन तोडून टाकतात. या तुरुंगाच्या जगात सारंच काही निराळं आहे; विविध रंग नाहीत, फरक नाहीत, गती नाही, आशा नाही, आनंद नाही, लांब मुदतीच्या बंदीवानाला यांचा लाभ होत नाही. भयंकर एकसुरी अवस्थेत जीवनात कंटाळवाणे

फेरे घेत राहते. उंच शिखरे नसलेलं, व्यक्तीची तृष्णा भागविणारी किंवा ज्वलंत उष्म्यापासून बचाव करणारी हिरवळ नसलेलं एक सपाट वाळवंट आहे. दिवसांचं रूपांतर आठवड्यांत, आठवड्यांचे महिन्यांत आणि वर्षांत, जीवनातील कालगणना थांबेपर्यंत, परिणती होत राहाते. राज्याचं सारं सामर्थ्य त्याच्या विरुद्ध उभं असतं आणि सर्वसामान्य नियंत्रणंही त्यांच्या हाताशी नसतात. दुःखाचे निःश्वासही दाबून टाकले जातात आणि वेदनांचे आक्रंदन उंच भिंतीपलीकडे ऐकू जात नाहीत. या जीवनाला नियंत्रक अशा काही गोष्टी नियमात असतात आणि भेट घेणारे अधिकारी बाहेरून तपासणीसाठी येत असतात. परंतु, त्यांच्याजवळ तक्रार करण्याचं धाडस क्वचितच कुणी कैदी दाखवतो आणि असं धाडस दाखविणाऱ्यांना, या धाडसाबद्दल यातना भोगाव्या लागतात. परके पाहुणे निघून जातात; पण तुरुंगाधिकारी कायम असतात, आणि त्यांच्याजवळच कैद्यांना दिवस काढावयाचे असतात. कैदी त्यामुळं त्रास सहन करणं, त्या त्रासात भर पडण्याचा धोका पत्करण्यापेक्षा स्वीकारतो यात आश्चर्य नाही."

अत्यंत समर्पक आणि शैलीयुक्त भाषेत नेहरूंनी वर्णन केलेलं हे एकसुरी, एकाकी आणि त्रासिक जीवन त्यांच्या वाट्याला आलं होतं. त्यांनी स्वतःवर तत्परतेनं आणि आनंदानं ओढवून घेतलं होतं. एक प्रकारे हे त्यांचं जीवन काळातीत होतं. वर्तमान, भूत अगर भविष्य यांपैकी कोणत्याच काळाचं अस्तित्व तुरुंगातील जीवनात अनुभवास येत नाही. " तुरुंगात काळ आपला प्रकृतिधर्मच बदलीत असतो. भावना आणि संवेदना यांच्या अभावामुळे भूतकाळापासून अलग राहणारा वर्तमानकाळ क्वचितच अस्तित्वात असतो. एवढंच काय; पण कृतिपूर्ण, जिवंत आणि मरणाधीन होणाऱ्या जगाच्या वार्ता भूतकालातील घटनांप्रमाणे स्वप्नसदृश, अवास्तव, गतिशून्य आणि अचेतन भासू लागतात. बाह्य विश्वातील वास्तव काळ संपतो, उरतात फक्त खालच्या पातळीवरील आंतरिक आणि व्यक्तिनिष्ठ संवेदना; विचारशक्तीच त्यांना वर्तमानकाळातून खेचून काढून भूत अगर भविष्यकाळातील एक प्रकारच्या वास्तवतेचे अनुभव कधी कधी देऊ शकते. ऑगस्ट कॉम्टे (Auguste Comte) म्हणतो त्याप्रमाणे आमच्या गतायुष्यात गुरफटून जीवन्मृत जीवन जगत असतो; ही परिस्थिती विशेषतः तुरुंगात अनुभवास येते. कारण तुरुंगातच, आमच्या दबलेल्या आणि

बंदिस्त भावनांच्या, गतायुष्यातील स्मृती किंवा भविष्यकालीन कल्पना, यांच्यावरच पोषण करीत असतो."

परंतु, या भूतकाळालाही 'निश्चलतेच्या आणि शाश्वततेच्या' मर्यादा पडतात. "एखाद्या चित्रित तसविरीप्रमाणे ब्रॉंझच्या किंवा संगमरवरी दगडाच्या पुतळ्याप्रमाणे चेतना नसून, फक्त शाश्वतता असते. वादळे आणि उल्कांती ह्यांचा परिणाम न होता फक्त त्याची प्रतिष्ठा आणि स्थिती अस्तित्वात राहाते; आणि विचलित आत्म्याला आणि यातनायुक्त मनाला आपल्या बंदिस्त शववापिकेत आसरा देण्याचा प्रयत्न करीत राहातो. तेथे शांतता असते, सुरक्षितता असते आणि एखाद्याला आध्यात्मिक गुणाचाही तिथे आढळ होतो."

नेहरूंना असल्या आयुष्यात मनाचे समाधान वाटत नाही. "संघर्ष आणि प्रश्न यांनी भरलेला वर्तमानकाळ आणि भूतकाळ यांना जोडणारे दुवे" शोधून काढण्याकडे त्यांच्या मनाची ओढ असते. "जीवनाचा गाभा म्हणजे कार्य-प्रवणता व कार्यांची तळमळ" असल्यामुळे, त्याचं अस्तित्व नसलेलं जीवन म्हणजे "कलेकरिता कला" होय. या प्रवणतेच्या आणि तळमळीच्या अभावी आशा आणि चिच्छक्ती यांचा लोप होत जातो आणि खालच्या पातळीवर जीवनाचं अस्तित्व स्थिरावून, नास्तित्वात त्याची परिणती होत जाते. कार्याची बंदी असल्यामुळे तुरुंगातील जीवनात तशी मनाची अवस्था होणे सुलभ जातं आणि मग कारावासीय जीवनाचा मनुष्य गुलाम बनतो."

आपल्या मनाची अशी निष्प्राण–अचेतन अवस्था होणं नेहरूंच्या सदैव कार्यप्रवण मनाला क्षणभरही रुचणारी नव्हती. कारावासाबाहेरच्या नेहरूंच्या जीवनात आणि मनातही ज्याप्रमाणे विचारांचे आणि विविध व्यवहारांचे संघर्ष सतत निर्माण होत असत, त्याप्रमाणेच कारावासातही, तेथील अकार्यात्मक, बदिस्त अशा मनाची–शरीराचीही कुचंबणा किंवा कोंडी करणाऱ्या जीवनातही विचार आणि परिस्थिती याबाबत संघर्ष निर्माण झाला होता. यातून मार्ग काढणं आवश्यक होतं. कारावासातील परिस्थिती आणि सतत कार्य करीत राहण्याची प्रवृत्ती या दोहोंना सांधणारा दुवा त्यांना निर्माण करावयाचा होता. कारावासीय परिस्थितीला काही काल तरी मान तुकविणं भाग होतं; आणि

त्याबरोबरच काही तरी कार्य करावं अशी त्यांच्या मनाला तळमळ आणि ओढही लागून राहिली होती. परिस्थिती आणि मन, या दोन परस्पर भिन्न गोष्टींचा सांधा त्यांना घालावयाचा होता आणि तो घातला होता हे निश्चित. तो त्यांनी कसा घातला याचं शब्दचित्रण आपल्या भगिनी श्री. कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या पत्रांतून वारंवार केलेलं आढळतं.

" कोणत्याही परिस्थितीत मी माफक प्रमाणात का होईना; पण समाधानी राहण्यास शिकलो आहे. " एका पत्रात ते लिहितात, " थोड्या फार प्रमाणात का होईना, नवीन वातावरणाशी मिळतं घेण्याची कला मी शोधून काढल्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो. " असंही ते दुसऱ्या पत्रात लिहितात. कारण परिस्थितीशी मिळतं घेऊन आपला कार्यभाग साधणं ही एक श्रेष्ठ गोष्ट आहे हे त्यांना माहीत होतं. " कारावासाचा अनुभव घेण्याची संधी ज्यांना लाभलेली आहे त्यांना धीर धरून राहण्याचं महत्त्व पटलेलं आहे. आणि त्या अनुभवामुळे त्यांना शहाणपणा आला असेल तर आलेल्या परिस्थितीचा स्वीकार करण्यास ते खात्रीने शिकले असतील. आणि हीच गोष्ट फार महत्त्वाची आहे."

प्राप्त परिस्थितीशी शरीरानं आणि मनानं मिळतं घेण्याशिवाय गत्यंतर नाही. तसं न केलं तर शरीर आणि मन, दोन्हीही खचून दुबळी बनतील, याची परिपूर्ण जाणीव दीर्घ कारावासामुळे नेहरूंना पहिल्या काही कारावासांत झाली. आणि मग त्यांनी परिस्थितीशी व वातावरणाशी जुळवून घेण्याचा सराव करून घेतला. थोड्या फार अभ्यासानं त्यांना तसं करणं साध्य झालं. " प्रयत्नपूर्वक मी स्थगित कराव्या लागलेल्या उद्योगांशी सतत संबंध येत असलेल्या माझ्या मनाचे विविध कप्पे बंद करून ठेवून, स्वतःतच गुरफटून घेण्यास शिकलो आहे."

अशा परिस्थितीत नेहरूंचा कारावासातील " काळ कठोरपणे पण संथगतीने सरपटत जात होता. " त्यांच्या इच्छेविरुद्ध हे सारं घडत होतं; पण त्याला त्यांचा इलाज नव्हता. आणि त्या काळाबरोबर स्वतःही कार्यरहित अवस्थेत वाहत जाणं त्यांना भाग होतं. कारावासात कोणतीही महत्त्वाची घटना न घडता दिवस जात होते. काही क्षुल्लक प्रसंगांमुळे मनःस्थिती बिघडत असे; त्याचबरोबर बाहेरून येणाऱ्या बातमीनं मनःक्षोभही होई; परंतु, " मनःसागराच्या पृष्ठभागा-

चर, सर्वसाधारणपणे काहीशी शांतताच अस्तित्वात होती; परंतु अंतरंगात मात्र बहुतेक काळ खळबळ माजलेली असे; आणि एखाद्या चेटकिणीच्या कढईप्रमाणे असलेल्या आजच्या जगाबद्दल प्रक्षोभकारक विचारांचं थैमान माजलेलं असे. भवितव्याचा पडदा फाडून पलीकडे पाहण्याचा प्रयत्न सुरू असे....." कारण भवितव्याविषयीच मला आस्था वाटते. भवितव्याचा शोध घेणं मला फारच उत्तेजनक वाटतं आणि अज्ञाताबद्दलचा मोह हा घातकी असतो. एखादा कुंभार मातीला आकार देतो, त्याप्रमाणे वर्तमानकालीन चिखलमातीला आपण आपल्या इच्छेप्रमाणे साकार करू शकू ही कल्पना व्यक्तीच्या अहंकाराला समाधानही देत राहते."

कारावासातील काळात नेहरूंचं मन आजच्या जगातील परिस्थिती पाहून व्यथित होत असे. आणि अशा वेळी साऱ्या विश्वात शांतीचे आणि मानवतेचे 'एक विश्व' साकार करण्याचे स्वप्न त्यांच्या नजरेसमोर तरळत राही. या स्वप्नांना त्यांनी अनेक वेळा शब्दांकित केलं आहे. "मानवी व्यवहारात आज अशी वेळ येऊन ठेपली आहे की, 'एक विश्व' कल्पना किंवा विश्व-संघराज्या-सारखी एखादी व्यवस्था अत्यंत आवश्यक वाटत आहे. या मार्गात अनेक धोके आणि अडथळे आहेत हे खरं आहे. या ध्येयासाठी आपण झटलं पाहिजे; या विश्वसंघराज्याच्या आड येणारे लहानमोठे गट स्थापन करण्यासाठी नव्हे..." एक विश्व" हे फार मोठं ध्येय साध्य करण्यासाठी, एशियातील राष्ट्रांमध्ये सहकार्य निर्माण करणे आवश्यक आहे." हा विचार २३ मार्च १९४७ रोजी केलेल्या भाषणात त्यांनी पुढे मांडला होता. आंतरराष्ट्रीय राजकारणात अवास्तवता आणि ढोंगबाजी चाललेली आहे याबद्दल त्यांना उबग आला होता. शस्त्रसंधी हे त्याचं उत्तम उदाहरण आहे. "केलॉग्-ब्रियाँ तहान्वये युद्ध न्यायबाह्य ठरविले गेले; पण त्याची पुढं आठवणही कुणी ठेवली नाही. प्रत्येकजण शांततेच्या बाता मारीत असतो, पण एकीकडे युद्धाची तयारी करीत राहतो." ही परिस्थिती त्यांच्या ध्यानात आलेली होती. त्यासाठी विश्व-सहकाराची आवश्यकता आहे असं त्यांचं मत बनलं होतं. हे सहकार्य नसेल तर जगाला सर्वनाशाचा धोका आहे हे त्यांना आजपर्यंतच्या अनुभवामुळे प्रत्यक्ष दिसत होतं आणि जगाला सर्वनाशापासून वाचवावयाचं असेल तर वैश्विक

सहकार्याचा, 'एक विश्व' कल्पनेचा किंवा विश्व-संघराज्याचा एकच तोडगा किंवा उपाय त्यांच्या स्वप्नात सदैव येत होता.

भवितव्याबद्दलचे असले विचार करण्यास किंवा स्वप्ने रंगविण्यास कारावासात नेहरूंना स्वस्थता आणि वेळही भरपूर मिळे आणि ही दिवास्वप्ने रंगविण्यात व त्यांना मानसिक आकार देण्यात त्यांचा बराच वेळ जाई हे खरं. परंतु, केवळ विचार करण्यात किंवा दिवास्वप्ने पाहण्यात नेहरूंच्या कार्यप्रवण प्रवृत्तींना किंवा मनाला समाधान लाभणं अशक्य होतं. त्यांच्या मनाला सदैव प्रत्यक्ष कार्याची ओढ लागलेली असे. कारावासाबाहेर असतांना भारतनिष्ठेमुळे आणि भारत प्रेमामुळे, भारताच्या स्वातंत्र्यासाठी झगडे करण्यात, भारतीयांच्या अडचणी व दुःखे निवारण करण्यात व त्यांच्या सुखस्वास्थ्यासाठी त्यांची सेवा करण्यात व दिलासा देण्यात त्यांचं सारं जीवन व्यतीत होत असे. परंतु, कारावासात या कार्यांना संपूर्ण मज्जाव होता. आणि कारावासातील परिस्थितीशी मिळतं घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. अशा स्थितीत कारावासात ज्या गोष्टी किंवा जे कार्य करणं शक्य होतं, त्या गोष्टी किंवा ते कार्य करण्याचा निश्चय त्यांनी केला. इच्छा असेल तिथं मार्ग सापडतो. अंगी कर्मयोग किंवा सतत कार्यप्रवणता बाणली असेल तर व्यक्तीच्या शोधक दृष्टीला अनेक विविध कार्यांचा आढळ होत असतो. नेहरूंसारख्या अनेकविध रसिक व्यक्तीला तुरुंगातील अतिमर्यादित जगात अनेकविध कार्यांचा आढळ, ओढ स्वाभाविक व सहज शक्य होतं. आणि तेच मार्ग त्यांनी स्वीकारले. आणि आपल्या मनाला लागलेली सतत कार्याची ओढ व भूक काही प्रमाणात का होईना भागवली.

नेहरूंच्या ज्ञानप्रिय आणि रसिक मनाला अमुक एका विषयाचे वावडे होते किंवा एखाद्या विषयात त्यांना आवड किंवा गम्य नव्हतं अशातला प्रकार नव्हता. जवळजवळ सर्वच विषयांत, ज्ञानाच्या आणि शास्त्रांच्या शाखांत आणि कला-प्रकारात त्यांचं मन रममाण होई; रस घेई व त्यासंबंधीचे ज्ञान मिळविण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ती होती. ही आवड अगर गती काही विषयांच्या बाबतीत प्रमाणानं कमीजास्त असणं साहजिक होतं. पण ती होती हे निश्चित. याची साक्ष "भारताचा शोध" या त्यांच्या ग्रंथातील प्रत्येक प्रकरणात दिसून येते. आणि विविध विषयांचे, शास्त्रांचे व कलाप्रकारांचे ज्ञान संपादन करण्यास आवश्यक

अरुणारा वेळ शांतता आणि सवड, कारावासाबाहेरील जगात, त्यांच्या अविरत कार्यमग्नावस्थेत अत्यंत थोडी मिळे. आणि म्हणून हे ज्ञान संपादन करण्यासाठी कारावासात त्यांना मुबलक वेळ, व स्वास्थ्य मिळत असे. आणि त्या वेळाचा आणि स्वास्थ्याचा यथायोग्य आणि भरपूर उपयोग त्यांनी करून घेतला. " मी काही शब्दसृष्टीचा मनुष्य (Man of letters) आणि कारावासात मी घालविलेली बरीच वर्षे, हा माझ्या आयुष्यातील सुखद काल होता असे म्हणावयास मी तयार नाही. तरी पण ती वर्षे घालविण्यासाठी वाचन आणि लेखन यांनी मला आश्चर्यकारक मदत केली आहे हे मात्र मला कबूल केलंच पाहिजे." अशी स्पष्ट मान्यता " विश्वाच्या इतिहासावरील दृष्टिक्षेप " या ग्रंथातील शेवटच्या पत्रात त्यांनी देऊन ठेवलेली आहे.

कारावासात असताना अर्थातच नेहरूंनी खूपच वाचन केलं असलं पाहिजे हे उघड आहे, त्याची साक्ष कारावासात लिहिलेल्या त्यांच्या ग्रंथावरून सहज मिळू शकेल. " मी खूपसं वाचन करणार आहे, कारण खरोखरच इथं दुसरं काही क्वचितच करण्यासारखं आहे.—फक्त वाचन, मनन आणि रोजच्या ठरीव नित्यक्रम पार पाडणं आणि मी जेव्हा बाहेर येईन– तो फारच लांबचा पल्ला आहे– तेव्हा मी थोडाफार ज्ञानसंपादन केलेला असा बाहेर येईन. ज्ञानसंपादन (Wisdom) ही फार निसटून जाणारी आणि पकडण्यास दुर्लभ अशी गोष्ट आहे. पण तरीही तो कधी कधी अकस्मात आणि अनपेक्षित प्राप्तही होते. मध्यंतरीच्या काळात मी तिचा एकनिष्ठ उपासक राहून तिच्या कृपेची प्रतीक्षा करीन. एखाद्या दिवशी ती माझ्यावर आपली कृपा दाखवील. काहीही असो, तिच्या कृपेची याचना करीत राहण्यास तुरुंग हे काही अयोग्य स्थान नाही." असं नेहरूंनी आपल्या भगिनीला लिहिलेल्या पत्रात आश्वासन दिलेलं आहे.

अखंड व भरपूर वाचन करण्यास तुरुंग हे स्थळ योग्य मानून नेहरूंनी वाचनयज्ञ आरंभिला व प्रत्येक कारावासात तो अखंड प्रज्वलित ठेवून आपल्या ग्रंथाच्या रूपाने त्यांची सांगताही केली. आपल्या भगिनीला आश्वासन देऊनच ते थांबले नाहीत तर, ते आश्वासन कोणाच्याही अपेक्षेबाहेर पुरंही केलं. त्यांच्या सर्व ग्रंथसंभारात आधारभूत मानलेली व उल्लेखिलेली पुस्तके, त्यांचा वाचनयज्ञ अखंडित व समृद्ध होता, याची साक्ष पटवून देतील.

वाचनाबरोबरच लेखनातही नेहरूंचा कारावासातील भरपूर वेळ व्यतीत होत असे. "आत्मचरित्र", "जगाच्या इतिहासावरील दृष्टिक्षेप" आणि "भारताचा शोध" हे महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी कारावासातच लिहिले. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर पहिल्या राष्ट्रकुल परिषदेसाठी नेहरू लंडनला गेले असता, त्यांच्या एका साहित्यभक्त महिलेने "आता आपणाला कुणीच तुरुंगात बंदिस्त करून ठेवणार नाही त्यामुळं आपलं नवीन साहित्य वाचावयास न मिळाल्यामुळे आहे त्याच ग्रंथांचा आपल्याला पुनः पुन्हा स्वाद घेण्यावर समाधान मानून रहावं लागणार आहे." अशा शब्दात खेद प्रगट केला होता. याचा मंथितार्थ हाच आहे की, कारावासात नेहरूंच्या हातून साहित्य निर्माण होत असे. कारावासातील आपल्याला मिळालेल्या वेळेचा व स्वास्थ्याचा इतका सत्कार्यी केलेला उपयोग अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या, लाखो लोकांपैकी, किती लोकांनी केला असेल! आणि तोही नेहरूंच्या मानाने कमीच म्हणावा लागेल.

नेहरू तुरुंगाबाहेर असत तेव्हा त्यांना शरीर आणि मन यांचं स्वास्थ्य क्वचितच लाभत असे. दौरे, व्याख्याने, चर्चा, वादविवाद, सभासंमेलने, भेटी-गाठी, वगैरे अनंत गोष्टींच्या स्वरूपात त्यांचं राष्ट्रकार्य अखंड चालू असे. भूक, तहान, शरीरस्वास्थ्य अगर मनःस्वास्थ्य यांची तमा न बाळगता ते सदैव कार्यान्वित झालेले असत. त्यामध्ये त्यांनी कधीच कुचराई केली नाही की, मागेपुढं पाहिलं नाही. शरीर अगर मन यांचं स्वास्थ्य संभाळून, होईल तेवढे किंवा करीन तेवढे कार्य करण्याची मेहेरबानी दाखविण्याची त्यांची प्रवृत्ती नव्हती. कोणत्याही स्वार्थाने किंवा प्रलोभनाने अगर भावी हिताची दृष्टी ठेवून राष्ट्रकार्य केलं असा यत्किंचितही आरोप करण्यास कुणी धजेल असंही वाटत नाही. त्यामुळे त्यांच्या शरीरावर जसा परिणाम होई, तसाच मानवी स्वार्थ, अंग व स्वहित राखून काम करण्याची प्रवृत्ती, अज्ञान, हेकेखोरपणा, क्षुद्रमनस्कता इत्यादी राजकारणात सदैव आढळणाऱ्या किंवा त्यांच्याशी संलग्न असलेल्या प्रवृत्तींच्या आढळानं किंवा दर्शनानं त्यांच्या मनावरही तेवढाच ताण पडत असे; मनःताप होई व त्याचा परिणाम त्यांच्या मनावर होऊन ते चिडखोर, रागीट व कधी कधी उद्धटही झालेले दृष्टीस पडत असत.

शरीरावर व मनावर पडणारा हा ताण शिथिल करून, शरीर पुनश्च सुदृढ व निरोगी करण्यात व मन पुन्हा शांत, संयमी आणि उत्साही

राखण्याकडेही नेहरू कारावासातील वेळेचा व स्वास्थ्याचा उपयोग करीत. कारावासाच्या मर्यादित जागेत त्यांना शरीरस्वास्थ्याचा दुर्मिळ असा लाभ होई. नियमित व्यायाम आणि भरपूर झोप घेऊन शरीराची झालेली झीज व आलेला थकवा ते दूर करीत असत. त्यांना जाणीव होती की, कारावासातून बाहेर पडल्यावर पुनश्च धकाधकीचे, धावपळीचे, मनःक्षोभाचे जीवन सुरू होणार आहे. आणि त्यासाठी विचार करून मनाची विश्रांती व व्यायाम घेऊन शरीराची जोपासना व तयारी आपणांस करून ठेवावयास हवी. या दृष्टीनेही त्यांनी कारावासाच्या अतिमर्यादित जगाचा भरपूर उपयोग करून घेतला होता.

परंतु, केवळ सुटकेनंतर कराव्या लागणाऱ्या अनंत कार्याच्या दृष्टीने शरीराची तयारी ठेवली पाहिजे हा एकच उद्देश त्यांच्या कारावासातील व्यायामाच्या किंवा शारीरिक हालचालीपाठीमागे नव्हता. कारावासाबाहेरील जगातील त्यांच्या चळवळींना तुरुंगात बंदी असल्यामुळे मन आणि शरीर यांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनेही त्यांना कारावासातही कामाचे नवीन मार्ग शोधावे लागले. शिवाय, शारीरिक कष्टांची महती तुरुंगातील जीवनाचे अनुभव जसजसे मिळत गेले, त्यानुसार पटली होती. कारावासातील जीवनात शारीरिक हालचालींना वाव नसल्यामुळे मनावर असह्य ताण बसतो; विविध प्रकारचे स्वातंत्र्ययुद्ध, कौटुंबिक प्रश्न, जगातील राजकारण व घडामोडी, त्यांना मिळणारं इष्टानिष्ट वळण, यासंबंधीचे विचार कारावासातील जीवनात मनात थैमान मांडतात आणि त्यामुळं मनावर असह्य ताण पडून त्याचा परिणाम मनावर व शरीरावर होऊन दोन्ही दुबळी, अचेतन होऊन जातात. या परिस्थितीचा थोडाफार अनुभव नेहरूंनी घेतला असल्यामुळे, विचारांमुळं मनावर व शरीरावर पडणारा ताण कमी करण्यासाठी शारीरिक कष्टाची जरूरी व त्यांचे महत्त्व नेहरूंना पटले होते. त्यामुळं लेखन-वाचनाबरोबरच शारीरिक कामेही त्यांनी शोधून काढून, ती करण्याची सवय स्वतःला लावून घेतली होती. आपल्या भगिनी श्री. कृष्णा हाथिसिंग यांना लिहिलेल्या पत्रांतून त्यांनी या शारीरिक कामांचा तपशील दिलेला आहे. "कारावासातही शारीरिक हालचालींची किरकोळ कामे करता येतात. साफसफाई व कपडे धुणे इत्यादी आपले वसतिस्थान स्वच्छ ठेवण्याची कामे करण्यात माझा बराच वेळ जातो.

त्याचप्रमाणे जमीन खणण्याच्या कामाला मी हात घालतो. जमीन कठीण असल्यामुळे हे काम जरा जडच वाटतं. नाही तरी खणणं हे काही हलकंफुलकं काम नाही; आणि ते करताना मी सहज थकून जातो हे मला आढळून आल्यामुळे तर मी स्वतःवरच चिडून गेलो. सवयीनं मला या कामाचा सराव झाला. जमीन खणून झाल्यावर मग मी त्या मातीशी खेळ करू लागलो. किती सुखकारक वाटतं म्हणून सांगू? मी त्या मातीत फुलझाडांचे बी-बीयाणे व रोपे लावली, जीवन जितकं प्रेमळ तितकंच मूर्खपणाचं असतं! फार लक्ष दिल्यामुळं माझ्या कामाचा मीच नाश करण्यास सुरुवात केली. जरूरीपेक्षा जास्त पाणी मी दिलं असं मला वाटतं आणि त्यामुळं बरीचशी बी-बियाणी कुजून गेली."

कारावासात असताना बहुतेक प्रसंगी बाग तयार करण्याकडे नेहरूंनी बराच वेळ घालविला होता. "माझ्या हातांना काही तरी उद्योगाची आवश्यकता आहे. विशेषतः तुरुंगात त्याची फारच जरूर आहे. बागायत करण्यात मला खूपच समाधान वाटते. आणि त्यामुळे, दुसऱ्या कोणत्याही कारणांमुळे मला न मिळणारं मानसिक समाधान मिळतं." आणि हे मानसिक समाधान अगदी शेवटच्या कारावासापर्यंत बागायतीत आपलं मन रमवून नेहरू प्राप्त करून घेत असत.

नेहरूंना स्वयंपाकघराचं विशेष आकर्षण नसे. स्वच्छ व भरपूर जेवण मिळालं की, ते संतुष्ट असत. परंतु, तुरुंगातील जीवनात मात्र स्वयंपाकघरात उपस्थित राहून, ते जेवणाचे पदार्थ तयार करण्यात आपला काही वेळ घालवीत. आणि आपल्या सहकाऱ्यांना त्यांचा मासला देऊन त्यांच्यावर 'अत्याचार' करीत.

कारावासातील जीवनात नेहरूंचं निसर्गप्रेमी रसिक मन, निसर्गाचे विविध खेळ पाहण्यात रममाण होऊन जात असते. त्याचप्रमाणे तुरुंगात आढळणाऱ्या प्राण्यांशी खेळ करण्यात आणि त्यांच्या जीवनाशी समरस होण्यात नेहरू संकोच करीत नसत. याविषयीची माहिती पुढे स्वतंत्र प्रकरणात येणारच आहे.

नेहरूंनी अनेक वर्षे कारावासात काढली. त्याची प्रत्यक्ष फलश्रुती राजकीय क्षेत्रात काय, ते पाहण्याचं या लिखाणाच्या मर्यादेत बसत नसल्यामुळं आपण ते

सोडून देऊ. परंतु, त्यांच्या सांस्कृतिक जीवनावर त्यांच्या या दीर्घ कारावासाचा कोणता परिणाम झाला ? किंवा, या दीर्घ कालात त्यांना काही फायदा उठविता आला का ? हे प्रश्न सकृद्दर्शनी विचित्र वाटण्याचा संभव आहे आणि सर्वसाधारण कैद्याच्या बाबतीत कारावासामुळे फायदा होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु, कारावासातही आपल्या मनाची व शरीराची जोपासना करीत राहण्याची, आणि सतत कार्य करीत राहण्याची कर्मयोगी मनःप्रवृत्ती असणाऱ्या व कारावासातही काही चांगल्या गोष्टींचा आढळ होतो किंवा काय हे डोळसपणे पाहून, कारावासालाही चांगली बाजू आहे असं म्हणणाऱ्या नेहरूंच्या बाबतीत मात्र हे प्रश्न अवास्तव व विचित्र ठरू नयेत. आणि आपल्या भगिनी श्री. कृष्णा हाथिसिंग यांना लिहिलेल्या एका पत्रात कारावासाची फलश्रुती काय आहे यासंबंधीचे विचार वाचल्यावर तर उलट, हे प्रश्न वास्तव व सार्थ आहेत ही गोष्ट पटल्यावाचून राहणार नाही. नेहरू या पत्रात लिहितात :

" कारावासातील विविध उद्योग करण्याची प्रवृत्ती माझ्यातील अनावश्यक किंवा वाढीव चैतन्यशक्तीतून निर्माण झालेली नाही. मनाची शांतता व सुसंगत आणि शिस्तबद्ध जीवन घडविण्यासाठी मी ते उद्योग विचारपूर्वक करीत असतो. मला त्यात यश येतं. शारीरिक दृष्ट्या मी निरोगी राहतो आणि मानसिक दृष्ट्याही मी समतोल व विशुद्ध बनतो. कारावासातील माझ्या भेटीनं या ना त्या प्रकारे फायदाच झाला आहे. काही प्रत्यक्ष काम केलं एवढाच हा फायदा नाही. पण, मला आशा आहे की, योग्य त्या दिशेनं माझी प्रगती झालेली आहे. कारावासाबाहेर माझ्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या व काळज्या यांच्यापासून स्वतःला विलग करून घेण्यात बऱ्याच प्रमाणात मी यशस्वी होत आहे. मी त्या विसरू शकत नाही. परंतु, त्यांच्याबद्दल शांत मनाने आणि विकाररहित रीतीने व विशाल पार्श्वभूमीवर विचार करू शकतो. युद्ध आणि विनाश यांनी विच्छिन्न झालेल्या आणि प्रचंड उलथापालथीच्या कड्यावर उभ्या असलेल्या आजच्या जगांत तसं न केलं तर त्याचा परिणाम मानसिक अधःपातात होईल. दीर्घ मुदतीच्या कारावासाचा परिणाम एक तर, शारीरिक आणि मानसिक अपंगपणात होईल किंवा ती व्यक्ती तत्त्वज्ञानी तरी बनेल. इतक्या वर्षांच्या कारावासातही मी उत्तम प्रकारे राहू शकलो याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो.

कारावासामुळे माझी तत्त्वज्ञानाकडे किती दूरवर मजल गेली आहे हे मला माहीत नाही. ”

नेहरूंनी वरील शेवटलं वाक्य विनयानं लिहिलं असलं तरी कारावासातील जीवनामुळे त्यांच्या विचारात व ज्ञानात मोलाची अशी खूपच भर पडलेली दिसून येते. त्यांचे ग्रंथ, त्यामधील विचारात प्रत्येक कारावासामुळे होत जाणारी प्रगती खात्रीनं त्यांच्या ज्ञानात भर पडत जात होती यांचे निदर्शक आहेत.

卐 卐 卐

७

पशुपक्षी-प्रेम

नेहरूंच्या भगिनी श्री. कृष्णा हाथिसिंग यांनी, नेहरूंच्या पत्र-संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत, नेहरूंच्या जीवनातील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचं दिग्दर्शनं केलं आहे. त्या प्रस्तावनेत त्या लिहितात : "भाईबद्दल महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ज्ञान हे अमर्याद आहे आणि म्हणून जीवनाच्या प्रत्येक अवस्थेत फार शिकण्यासारखं आहे हे समजून, त्यानं स्वतःच्या जीवनातील प्रत्येक अवस्थेला तोंड दिलं आहे. आपण 'वाढत जात आहो' याची कबुली त्यानं स्वतःच दिलेली आहे, आणि या वाढीबरोबरच त्याचा चिरतरुण उत्साह आणि जीवनाविषयी आसक्ती, त्यामुळे त्यानं जीवनाला मोल प्राप्त करून घेतलं."

नेहरूंच्या साऱ्याच जीवनाला हे वर्णन यथार्थतेनं लागू पडत असलं तरी पण ते त्यांच्या कारावासातील जास्त व विशेष प्रमाणात उचित ठरतं. कारावासात असताना तेथील परिस्थितीशी मिळतं घेण्याच्या व तेथील वातावरणाशी एकरूप होऊन, त्या मर्यादित जीवनातही मनाचं समाधान, विरंगुळा किंवा करमणूक शोधून, मिळेल त्या रीतीनं, कारावासीय एकलकोंडे, मर्यादित, निष्क्रीय आणि कंटाळवाणे जीवन सुसह्य व ज्ञानसंपादित करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्या प्रवृत्तीला अनुसरून त्यांच्या कारावासीय जीवनाचा बराचसा परिचय मागील प्रकरणात करून घेतलाच आहे. परंतु, नेहरूंच्या चतुरस्र, रसिक व बहुरंगी मनाचं समाधान तेवढ्यानं झालं नाही. कारावासीय जीवनात त्यांनी त्यांना आढळात आलेल्या पशुपक्ष्यांचा परिचय करून घेतला; त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला; काही प्राण्यांवर माया केली. आणि त्या पशुपक्ष्यांच्या जीवनाशी समरस होऊन मनाच्या विरंगुळ्याबरोबरच त्यांच्या जीवनासंबंधीचं जेवढं मिळालं तेवढं ज्ञानही संपादन केलं. "बाह्य जगातल्यापेक्षा कारावासातच प्राण्यांशी माझा संबंध आला. कुत्र्यांविषयी मला जिव्हाळा वाटत आला आहे. काही मी पाळलेही होते; परंतु, इतर अनेक गोष्टींनी माझं लक्ष वेधून घेतलं असल्यामुळे त्यांच्याकडे मला लक्ष देता आलं नाही. परंतु, कारावासात मात्र त्यांचा सहवास लाभल्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे." असं नेहरूंनी, कारावासीय जीवनात पशुपक्ष्यादि प्राण्यांनी त्यांनी दिलेल्या सहवासाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. पशुपक्ष्यादि प्राण्यांविषयी सर्वसाधारणपणे भारतीय जनतेत उदासीनता असून, 'प्राण्यांवर दया करा' ही जरी भारतीय संस्कृती असली तरी पशुपक्ष्यांना निष्काळजीपणानं व निर्दयपणानं वागविण्यात येतं; एवढंच काय, गाय हा प्राणी पवित्र मानण्यात येत असून तिची पूजा करीत असले, व तिच्यावरून दंगेधोपे होत असले तरी तिलाही सहानुभूतीपूर्वक वागविण्यात येत नाही, अशी नेहरूंची तक्रार होती व त्यावरून "भक्ती व सहानुभूती नेहमीच एकत्र येतात अशी वस्तुस्थिती नाही." असा त्यांनी निष्कर्ष काढला होता.

परंतु माणसाच्या जीवनात व विशेषतः कारावासासारख्या एकलकोंड्या जीवनात पशुपक्ष्यांना केवढं मोठं स्थान आहे, सुखासमाधानाचं साधन आहे. आणि सोबत आहे, याची पूर्ण कल्पना नेहरूंना अनुभवावरून आली होती आणि म्हणूनच प्राण्यांच्या अस्तित्वाबद्दल त्यांनी वरील कृतज्ञतेचे उद्गार काढले.

" हे रुबाबदार प्राणी आणि पक्षी पाह्यला व खेळायला मिळाले नसते तर जीवन कंटाळवाणे आणि रंगहीन झालं असतं." या शब्दात, माणसाच्या जीवनात पशुपक्ष्यांना केवढं स्थान आहे याची जाणीव करून दिली आहे. आणि ही जाणीव नेहरूंना असल्यामुळेच कारावासीय जीवनात ते तेथे आढळात आलेल्या पशुपक्ष्यांच्या जीवनाशी जाणीवपूर्वक समरस झाले. आणि आजपर्यंत कोणाही महनीय व्यक्तीनं आपल्या आत्मचरित्रात स्थान न दिलेल्या, व क्षुद्र व उपेक्षणीय वाटणाऱ्या पशुपक्ष्यांना, आपल्या आत्मचरित्रात एक स्वतंत्र प्रकरण लिहून महत्त्वाचं स्थान दिलेलं आहे.

कारावासातील विविध प्राण्यांच्या संगतीत कधीच एकलेपणाची जाणीव झाली नाही. डेहराडून येथील तुरुंगात नेहरू साडेचौदा महिने होते, व त्यांना एका स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आलं होतं. पण तरीही " मी त्या कोठडीत एकटाच नव्हतो; कारण गांधीलमाश्या व कुंभारणी यांच्या वसाहती तेथे वसलेल्या होत्या, आणि सायंकाळी भक्ष्याच्या शोधार्थ बाहेर पडणाऱ्या पालींनी छपराच्या तुळयांच्या मागे वास्तव्य केले होते." आणि अशा प्रकारे त्यांच्या साऱ्या कारावासीय जीवनात कोठडीतून आढळणाऱ्या प्राण्यांना आणि कीटकांना पाहण्यात व त्यांच्या हालचालींचे अवलोकन करण्यात नेहरूंचा काही वेळ जात असे. आणि मग जो जो नेहरू जास्त निरीक्षक बनले तो तो त्यांना अशा प्रकारचे अनेक प्राणी व कीटक यांचा परिचय होऊ लागला. प्रथमदर्शनी उजाड व निष्प्राण वाटणारी त्यांची कोठडी व समोरील अंगण, अवलोकन करताच, आपल्याला एकाकी जीवन कंठावं लागणार आहे अशी रास्त तक्रार करणाऱ्या नेहरूंना पुढे पुढे ते उजाड व निष्प्राण वातावरण, जीवनानं गजबजलेलं आहे, फुललेलं आहे असं दिसून आलं. हे सगळे सरपटणारे, रांगणारे आणि उडणारे प्राणी आपलं जीवन जगत होते, आणि नेहरूंनाही त्यांच्या जीवनात ढवळाढवळ करण्याचं कारण पडत नव्हतं. परंतु, हे निरुपद्रवी व स्वतंत्र जीवन जगणारे कृमिकीटक आणि प्राणी, याव्यतिरिक्त ढेकूण, डास आणि माश्या असे उपद्रवी प्राणीही होते आणि त्यांचा प्रत्यक्ष त्रास नेहरूंना होत गेल्यामुळे, त्यांच्याशी झटापट व युद्ध करण्याचे नेहरूंवर प्रसंग येत असत. गांधीलमाश्या व कुंभारीण यांचं अस्तित्व नेहरूंना सुसह्य वाटे, आणि हे प्राणी शेकड्यांनी त्यांच्या कोठडीत वास्तव्य करून असत. एकदाच फक्त, गांधीलमाश्यांचा प्रतिकार

करण्याचा प्रसंग नेहरूंवर आला होता. एक गांधीलमाशी नेहरूंना चावल्यामुळं हा प्रसंग उद्भवला. " रागाच्या भरात सर्व गांधीलमाश्यांना नेस्तनाबूद करण्याचा मी चंग बाधला. परंतु आपल्या तात्पुरत्या निवासस्थानाचा, कदाचित त्या स्थानात त्यांची अंडी असल्यामुळे, बचाव करण्यासाठी त्या गांधीलमाश्यांनी असा काही शौर्यशाली प्रतिकार केला की, मी माघार घेतली आणि त्या जर माझ्या वाटेला गेल्या नाहीत तर त्यांनाही आपण शांततेनं राहू देण्याचा मी निर्णय घेतला. एक वर्षापेक्षा जास्त काल मी त्या कोठडीत होतो आणि त्या काळात त्यांनी माझ्यावर कधीच हल्ला केला नाही. आणि आम्ही परस्परां-विषयी आदराची भावना बाळगून होतो. " अशा मनोरंजक शब्दात नेहरूंनी गांधीलमाश्या व ते स्वतः यांच्यामधील " पंचशील तत्त्वाचे " वर्णन केले आहे. गांधीलमाश्यांसारख्या हिंसक प्राण्यांबरोबर " पंचशील तत्वा "चे आचरण सुलभ गेलं व ते यशस्वीही झालं; पण मानवी प्राण्याशी मात्र ! —

वाघळं नेहरूंना आवाडत नसली तरीही त्यांचं अस्तित्व नेहरूंना सहन करणं भाग होतं. आवाज न काढता सायंकाळच्या संधिप्रकाशात उडताना काळवंडत जाणाऱ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसत. नेहरूंच्या कोठडीत संचार करताना ती नेहरूंच्या अगदी तोंडाजवळून उडत जात, तेव्हा तोंडाला फटका बसेल की काय असे त्यांना वाटे. आणि मग नेहरूंना त्यांची शिसारी वाटे.

मुंग्या, वाळवी आणि इतर कीटक यांचं अवलोकन करण्यात नेहरूंचे तासन तास जात असत. त्याचप्रमाणे, गंमतीदार रीतीने शेपट्या हलवीत एकमेकांचा पाठलाग करणाऱ्या व भक्ष्यापाठोपाठ चोरट्या पावलांनी, सायंकाळच्या वेळी सरपटणाऱ्या पालीकडेही ते पाहात राहत. मात्र हे अवलोकन वरवरचे नसे. त्या प्राण्यांच्या विशिष्ट रीती व व्यवहार हेही नेहरू ध्यानी घेत. गांधीलमाश्यांच्या वाटेस पाली सहसा जात नाहीत; परंतु, अत्यंत सावधगिरीने चोरट्या पावलांनी गांधीलमाश्यांच्या पुढून जाऊनही पालीनं गांधीलमाशीला पकडल्याचे त्यांच्या लक्षात आलं होतं. आणि मग गांधीलमाशीच्या डंख मारणाऱ्या काट्याला सलणं ही पालीची क्रिया हेतुःपुरस्सर होती की सहज घडून आली होती याचा त्यांना विचार पडला होता.

नेहरूंच्या कोठडीच्या आसपास झाडे असली तर खारींचे थवेही त्यांना वावरताना दिसत. कधी कधी त्या खारी धीटपणाने नेहरूंच्या अगदी जवळही

जात. लखनौच्या तुरुंगात खूपच वेळ एकाच शरीरावस्थेत नेहरू वाचीत बसले असतांना एक खार त्यांच्या पायावरून चढून गुडघ्यावर येऊन बसे आणि आजूबाजूचं निरीक्षण करीत असे. नंतर ती खार नेहरूंच्या डोळ्यांकडे बघे त्या वेळी हा एक वृक्ष नसून, तिच्या तर्काप्रमाणे दुसराच कुणी तरी आहे हे तिच्या लक्षात येई. एक क्षणभर भीतीनं ती स्तब्ध होई व लगेच पळ काढून निघून जाई. कधी कधी खारीची पिलं झाडावरून खाली पडत. त्यांची आई लगेच पाठोपाठ खाली येई पिलाचा चेंडू करी आणि सुरक्षित जागी घेऊन जाई. प्रसंगी एखादं पिलू मातेला सापडत नसे. नेहरूंच्या एका सोबत्याने अशी तीन हरवलेली पिले उचलून आणून त्यांचा सांभाळ केला होता. ती पिलं इतकी चिमुकली होती की, त्यांना अन्न कसे भरावयाचे हा एक प्रश्नच होता. आणि हा प्रश्न अत्यंत अभिनव पद्धतीनं सोडविण्यात आला. फाउंटनपेनमध्ये शाई भरण्याच्या काचेच्या नळीपुढे कापूस लावून त्याच्यातून त्यांना दूध पाजण्यात येऊन, अशाप्रकारे दुधाच्या बाटलीची सोय करण्यात आली होती. . .

डोंगरमाथ्यावरील अलमोरा हा एक तुरुंग सोडला तर बाकी सर्व तुरुंगांतून कबुतरांचे थवे नेहरूंना पाहायला मिळत. ही कबुतरे हजारोंनी असत आणि त्यांच्या थव्यांनी सायंकालीन आकाश झाकळून जात असे. कधी कधी तुरुंगाधिकारी बंदुकीनं त्यांची शिकार करीत व त्यावर स्वतःचं उदरंभरण करीत. मैनाही अर्थातच आढळून येत, कारण त्या सर्वत्र असत. डेहराडून तुरुंगातील कोठडीतील दरवाजावर दोघांनी घरटं बांधलं होतं आणि त्यांना नेहरू स्वतः अन्न देत असत. त्या चांगल्याच माणसाळल्या होत्या, आणि त्यांच्या सकाळच्या किंवा सायंकाळच्या भोजनाला जरा उशीर झाला तर त्या दोघी मैना नेहरूंच्या जवळ येऊन आपल्या भाषेत अन्नाची मागणी करीत. "त्यांच्या खाणाखुणा आणि अधीर ओरडणं ऐकणं मोठं गंमतीचं वाटे."

नैनी तुरुंगात पोपट हजारोंनी होते आणि तुरुंगाच्या भिंतीच्या खबदाडातून त्यांचं वास्तव्य असे. त्यांच्यात चालत असलेलं प्रियाराधन आणि कामक्रीडा नेहमीच नजरेला भुरळ घालणाऱ्या असत; आणि कधी कधी एका मादीवरून दोन नर-पोपटांत उग्र भांडणेही होत; अशा वेळी ती मादी भांडणाच्या निकालाची वाट बघत, विजयी वीराला आत्मदान करण्यासाठी बसलेली असे.

डेहराडून तुरुंगात विविध प्रकारचे पक्षी असत, आणि तेथे नियमितपणे त्यांचे गायन आणि रंगेल चिवचिव आणि बडबड चालत असे. या सर्वांमध्ये कोकिळेची आर्त हाक उच्चरवाने ऐकू येई, पावसाळ्यात व पावसाळ्याच्या आरंभी भ्रमिष्ट पक्षी आम्हांला भेट देई, आणि त्या पक्ष्याला हे नाव का पडलं हे नेहरूंना लवकरच कळून आलं. दिवसा आणि रात्री, सूर्यप्रकाशात किंवा मुसळधार पावसात, तेच तेच सूर काढण्याची त्याची चिकाटी आश्चर्यजनक होती. कोठडीच्या पुढील छोट्या अंगणात झाडे नसल्यामुळं नेहरूंना हे सारे पक्षी अवलोकन करता येत नसत. पण त्यांचे आवाज मात्र नियमानं ऐकू येत, परंतु, आकाशात उंच कौशल्यपूर्ण भ्रमणमंडले घेत, कधी खाली झेपावत व नंतर पुन्हा वायुलहरीवर तरंगत वर जाणारे गरुड पक्षी व घारी यांकडे मात्र नेहरूंना लक्षपूर्वक पाहण्याचा लाभ होई. बहुत करून, पाणकोंबड्यांचा थवा नेहरूंच्या डोक्यावरून जाताना त्यांना दिसे.

बरेली तुरुंगात माकडांची मोठीच वसाहत होती आणि त्यांच्या माकडचेष्टा पाहण्यासारख्या असत. एक घटना तर नेहरूंच्या मनावर परिणाम करून गेली. एक माकडाचं बच्चं नेहरूंच्या कोठडीच्या प्रांगणात उतरलं होतं; मात्र त्याला पुन्हा भिंतीवरून चढून जाणं जमत नव्हतं. रखवालदार व कैद्यांनी त्याला पकडून त्याच्या गळ्याला दोरी बांधली. उंच भिंतीवरून त्याच्या आई-बापाने (गृहीत) हा प्रकार पाहिला आणि त्यांना संताप आला. अकस्मात, त्या दोघांपैकी एक जाडजूड माकड उडी मारून खाली आलं आणि त्या माकडाच्या छबकड्याभोवती जमलेल्या घोळक्यामधेच जवळजवळ त्यानं हल्ला चढविला. अतिशय अलौकिक शौर्याचं कृत्य होतं ते; कारण रखवालदार, कैदी वगैरेंजवळ काठ्यासोटे होते, आणि ते ते फिरवीत होते. आणि अशा बऱ्याच लोकांचा तो घोळका होता. वेछूटपणे केलेल्या धाडसाचा विजय झाला. मानवी प्राण्यांचा घोळका, भयभीत होऊन, काठ्यासोटे टाकून, पळून गेला ! माकडाचं पोर बचावलं गेलं.

नको असलेले प्राणीही बहुतेक पाहुणे येत असत. आमच्या कोठडीत, विशेषतः वादळानंतर विंचू नेहमी दिसून येत. जिथं आढळणार नाहीत, अशा

बिछान्यात, किंवा वाचण्यासाठी उचललेल्या पुस्तकावर, वगैरे ठिकाणीही ते नेहरूंना आढळत; त्यामुळे एकही विंचवाचा दंश त्यांना झाला नाही, ही गोष्ट आश्चर्यकारक होती. एका काळ्याकुट्ट आणि विषारी दिसणाऱ्या विंचवाला नेहरूंनी मुद्दाम एका बाटलीत काही काळ भरून ठेवला होता व माशा वगैरेंचं खाद्यही त्याला ते पुरवीत होते. परंतु, जेव्हा त्याला दोरीनं बांधून नेहरूंनी भिंतीवर ठेवला तेव्हा मात्र त्यानं पलायन करण्याची करामत करून दाखविली. त्याला पुन्हा मुक्तावस्थेत पाहण्याची त्यांची इच्छा नव्हती आणि म्हणून कोठडी स्वच्छ झाडून त्यांनी त्याचा शोध केला; परंतु तो विंचू अंतर्धान पावला होता.

नेहरूंच्या कोठडीत आणि आसपास तीन-चार सापही त्यांना आढळले होते. त्यांपैकी एक बाहेर आला असल्याची बातमी बाहेर पडून वर्तमानपत्रांत ठळक अक्षरांत ती प्रसिद्धही झाली होती. प्रत्यक्षात नेहरूंना तसा विरंगुळा हवाच होता. करावासातील जीवन भकास असतं आणि एकसुरीपणाचा भंग करणारी प्रत्येक गोष्ट स्वीकारली जाते. "सापांचा मी स्वीकार करतो किंवा त्यांचं आगमन स्वागतार्ह वाटतं असा याचा अर्थ नव्हे. पण इतरांच्याप्रमाणे, मला त्यांचं भय वाटत नाही. त्यांच्या दंशाची अर्थातच मला भीती वाटते आणि साप दिसला तर त्यापासून मी माझं जरूर संरक्षण करीन, पण सापाच्या दर्शनानं माझ्या मनात तिटकाऱ्याची भावना निर्माण होत नाही किंवा माझा भीतीनं थरकापही होत नाही." घोणीचं दर्शन मात्र नेहरूंना जास्त भीतिदायक वाटत असे; भीतीपेक्षा आंतरिक किळसच जास्त. अलीपूर तुरुंगात असताना एकदा मध्यरात्री नेहरू जागे झाले आणि आपल्या पायावर कुणी तरी सरपटत असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांच्याजवळ असलेला 'टॉर्च' त्यांनी लावून पाहिलं आणि बिछान्यात त्यांना घोण आढळली. अंतःप्रवृत्तीनं ताडकन त्यांनी बिछान्यावरून बाहेर उडी मारली. थोडक्यात चुकलं नाही तर भिंतीवर त्यांचा कपाळमोक्षच व्हावयाचा !

हे सर्व प्राणी नेहरूंच्या परिचयाचे होते व त्यांची नावेही त्यांना माहीत होती. परंतु, डेहराडूनच्या तुरुंगात असताना एक नवीनच प्राणी त्यांच्या पाहण्यात आला. जेलरशी गप्पा मारीत नेहरू तुरुंगाच्या दाराशी उभे असताना, त्यांनी

एका माणसाला तो विचित्र प्राणी नेत असताना पाहिला. जेलरने त्याला बोलावून घेतलं. पाल आणि सुसर यामधील दोन फूट लांबीचा, नखे असलेल्या पंजांचा व खडबडीत अंगाचा एक प्राणी नेहरूंच्या नजरेस पडला. तो हेंगाडा प्राणी संपूर्ण जिवंत असूनही त्याची गाठ मारून, त्या गाठीतून काठी घालून तो माणूस भोळ्या मजेत ती काठी घेऊन चालला होता. त्या माणसानं त्या प्राण्याचं नाव " बो " असं सांगितलं. जेलरनं त्या माणसाला त्या प्राण्याचा तो काय उपयोग करणार असा प्रश्न विचारल्यावर, त्या माणसाने मनःपूर्वक हसत त्या प्राण्याचं कालवण करणार असल्याचं सांगितलं. तो माणूस आदिवासी होता. त्यानंतर एफ्. डब्ल्यू. चॅपियन यानं लिहिलेल्या " दि जंगल इन् सनलाईट अँड शॅडो " या पुस्तकात या प्राण्याचं वर्णन आणि त्या प्राण्याला " पँगोलिन " म्हणतात असं आढळून आलं.

तुरुंगात असताना नेहरूंना एकदा एका मांजराच्या पिलाशी मैत्री करण्याचा प्रसंग आला होता. ते मांजर एका तुरुंगाधिकाऱ्याचं होतं, परंतु त्याची बदली झाल्यावर त्या पिलाला तो अधिकारी घेऊन गेला आणि मग त्या पिलाच्या सहवासाला नेहरूंना मुकावं लागलं.

तुरुंगात कुत्र्यांना मज्जाव असला तरी, डेहराडूनच्या तुरुंगात नेहरूंना अकस्मात कुत्र्यांचा सहवास घडून आला होता. एका तुरुंगाधिकाऱ्यानं एक कुत्री पाळली होती. परंतु, त्याची बदली झाल्यावर, त्यानं त्या कुत्रीला तिथंच सोडून दिली. ती गरीब बिचारी धरदारविरहित भटकी झाली. गटारात, उष्ट्या अन्नावर पण बहुतेक उपाशी दिवस काढीत होती ती. नेहरूंना प्रत्यक्ष तुरुंगाच्या बाहेरील कोठडीत ठेवण्यात आल्यामुळं ती कुत्री अन्नाच्या आशेनं नेहरूंकडे येई. नेहरू तिला नियमितपणे अन्न देत असत. तिनं काही पिलांना गटाराच्या कडेला जन्म दिला. त्या पिलांपैकी काही पिलांना पळविण्यात आलं. पण तीन पिलं मात्र तिथंच राहिली. नेहरूंनी त्यांना अन्न दिलं. त्यांपैकी एक पिल्लू भयंकर पिसाळलं होतं व त्यानं नेहरूंना खूपच त्रास दिला. त्या पिलाची नेहरूंनी शुश्रूषा केली. कधी कधी तर एका रात्रीत दहा-बारा वेळा नेहरूंना उठावं लागलं होतं. ते पिल्लू सुधारलं; आणि आपल्या शुश्रूषेमुळे त्याला जीवदान मिळाल्याबद्दल नेहरूंच्या मनालाही समाधान व आनंद वाटला.

तुरुंगात असतानाच तुरुंगातील प्राण्याकडेच नेहरूंचं लक्ष असे; तुरुंगात वेळ घालवायचं एक साधन म्हणून ते पाहत असत; व तुरुंगाबाहेर त्यांना प्राण्यांचा

विसर पडे किंवा प्राण्यांची ओढ वाटत असे असा प्रकार मुळीच नव्हता. विविध प्राण्यांची आवड अंतःकरणापासून होती व ती आवड ते संधी मिळेल तेव्हा पुरवीत असत. श्री. कृष्णा हाथीसिंग यांच्याकडे असलेल्या "स्पार्क" कुत्रीबरही त्यांचं हे प्राणिप्रेम व्यक्त होत असे व त्या कुत्रीसमवेत काढलेला नेहरूंचा फोटोही प्रसिद्ध आहे. श्री. कृष्णा हाथीसिंग यांनी नेहरूंना लिहिलेल्या एका पत्रात ही "स्पार्क" बाळंतीण झाल्याची व तिची दोन बाळे व बाळंतीण सुखरूप असल्याची वार्ता नेहरूंना तुरुंगात कळविली होती. त्या पत्राला उत्तर लिहिताना नेहरूंनी लिहिलं होतं : "स्पार्क"च्या अपत्यांची खुशाली वाचून आनंद वाटला. ती अपत्ये गोंडस व गोजिरवाणी असणारच. मला त्यांना योग्य नावे सुचत नाहीत. पण अँथनी व क्लिओपात्रा ही नावे सुसंगत नाहीत. मी जरी सुचवू शकत नसलो तरी भारतीय नावांना काही वाण नाही. बाजबहादर व रूपमती हे प्रेमी युगुल गुजराथेत (की माळव्यात) प्रसिद्ध होऊन गेली. परस्परांच्या प्रेमाखातर त्यांना आपल्या राज्याची वाताहत होऊ दिली. अनेक लोकप्रिय गाणी आणि आख्यायिका आपल्याला त्यांची अजूनही आठवण करून देतात. "बाज" आणि "रूप" ही नावं कशी काय वाटतात? या नावांचं मला विशेष आकर्षण म्हणून नव्हे, पण सहज सुचली म्हणून ही नावं मी तुला आणि राजाला सुचवीत आहे."

आपल्या भगिनीला व तिचे पती राजा हाथीसिंग यांना त्या दोन कुत्र्यांना "बाज" व "रूप" ही नावे सुचविताना त्या पिलांबद्दल वाटणारी ओढ व प्रेम आणि त्याबरोबरच उदात्त व एकनिष्ठ प्रेमिकांची ती नावे कुत्र्यांना सुचविण्यात नेहरूंची अभिजात रसिकता व माणुसकीही दिसून येते.


विविध राष्ट्रांतील बालकांनी भेटीदाखल हत्ती, वाघ वगैरे भेटी पाठविण्यातही नेहरूंचं प्राण्यांबद्दलचं प्रेम व्यक्त होतं. स्वतःच्या घरीही त्यांनी रुबाबदार कुत्रे पाळले होते. त्याचप्रमाणे हिमालयातील "पंडा" प्राणीही त्यांचे आवडते होते. रोज स्वतःच्या हातांनी त्यांना घास भरविल्याशिवाय नेहरूंच्या दैनंदिन कार्याला सुरुवात होते नसे.

राष्ट्रीय जीवनातही प्राण्यांना फार महत्त्वाचं स्थान आहे हे नेहरूंना माहीत होतं व त्यामुळेच प्राण्यांच्या बाबतीत ते स्वतः लक्ष घालीत असत. गीर जंगलातील

अनुक्रम ...10/12/66 दिः ...तिवर्ष...
क्रमांक ...2990... दिः 2013/10

सिंहाची वस्ती व वसाहत यांची जोपासना व्हावी व मानवी हिंसावृत्तीला त्यांचा बळी पडू नये म्हणून जी उपाययोजना करण्यात आली त्यात नेहरूंचा हात होता. एवढंच नव्हे तर, प्राण्यांचा राष्ट्रीय जीवनावरही परिणाम होतो असं त्यांचं मत होतं. आपल्या आत्मचरित्रातील "कारावासातील प्राणी" या प्रकरणाचा समारोप करताना ते लिहितात : "विविध देशांनी, आपल्या महत्त्वाकांक्षा व स्वभावधर्म यांचं प्रतीक म्हणून, विविध प्राण्यांचा स्वीकार केला आहे.— अमेरिकेची संयुक्त संस्थाने व जर्मनी यांनी गरुड; सिंह, बुलडॉग यांचा इंग्लंडनं, लढाऊ कोंबडा फ्रान्सनं, आणि अस्वलाचा प्राचीन रशियानं. राष्ट्रीय स्वभाव प्रवृत्तींची घडण या पुरस्कृत प्राण्यांकडून किती घडविली जात असेल? या प्राण्यांपैकी काही हल्लेखोर, लढाऊ, शिकारी प्राणी आहेत. या प्राण्यांची उदाहरणे डोळ्यांसमोर ठेवून, त्यांच्याप्रमाणेच स्वतःला घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आणि चढाईखोर प्रवृत्ती अंगी बाणवीत, डरकाळ्या फोडीत आणि दुसऱ्यांची शिकार करीत ही राष्ट्रे आहेत यात आश्चर्य नाही. त्याप्रमाणे हिंदू नेभळा आणि अहिंसक बनत आहे यातही आश्चर्य नाही; कारण त्यांचा पुरस्कृत प्राणी गाय हा आहे."

卐 卐 卐



८

निसर्ग-प्रेम

" यौवनऋतूचा विजयी हर्षाचा, अजिंक्य लढाऊ वृत्तीचा आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाशी तडजोड न स्वीकारणाऱ्या एकनिष्ठतेचा जवाहरलाल प्रतिनिधी " ऋतुराज " आहे."...

८ मार्च १९३६ रोजी शांतिनिकेतनात स्व. कमाला नेहरू यांच्या अकाली निधनानिमित्त शोकप्रदर्शन करण्यासाठी भरलेल्या सभेत गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी नेहरूंबद्दल वरील उद्गार काढले होते. ऋतुराज म्हणजे वसंत. नेहरूंचं बाह्य स्वरूप व सदा उत्फुल्ल असणाऱ्या अंतरंगाचं स्वरूप या एका वाक्यात यथार्थपणे प्रकट केलं होतं.

नेहरूंचं व्यक्तिमत्त्व वसंत ऋतूप्रमाणंच प्रफुल्ल, प्रसन्न आणि टवटवीत होतं. त्यांच्या त्या असाधारण व मनोहर व्यक्तिमत्त्वानं त्यांचे भक्त, अनुयायी, चाहते, एवढंच काय, पण विरोधकही भारावून जात असत. गौर गुलाबी वर्ण, रेखीव चेहरा, त्यावरील मोहक हास्य, किंवा बदलत्या भावछटा, वृत्तींतील शैशवता आणि अवखळपणा, या त्यांच्या व्यक्तिमत्त्वात वसंत ऋतूचा साक्षात्कार पाहणाऱ्याला होत असे. पण त्यांच्या अंतर्मनातही सदैव वसंत बहरलेला असे; व त्याचे दर्शन त्यांच्या पारदर्शी चेहऱ्यावर होत असे. त्याचं प्रतीक म्हणूनच की काय, त्यांच्या लांब कोटाच्या काजात, त्यांच्या छातीवर मोहक आणि टवटवीत गुलाब विराजमान झालेला असे. नेहरूंना अनेक गोष्टींचा हव्यास होता. परंतु, त्या गोष्टींचा रसास्वाद रूपगंधादि माध्यमांच्या द्वारे घेताना त्यांची सौंदर्य आणि कलासक्त दृष्टी सदैव जागृत असे. सौंदर्य मग कुठेही आढळो; कलाकृतीत, व्यक्तीत किंवा वस्तूत असो त्यांना त्याचं विलक्षण पण निर्लेप आकर्षण वाटे. निसर्गातील विविध सौंदर्य तर त्यांच्या वृत्तींना मोहून टाकीत असे. निसर्गाच्या विविध स्वरूपाबद्दल त्यांना विलक्षण आकर्षण व प्रेम वाटे. निसर्गातील विविध सौंदर्य त्यांची सौंदर्यशोधक दृष्टी व कलासक्त मन टिपून घेई. त्यांच्या तरल आणि संवेदनाक्षम प्रवृत्ती मोहरून जात. आणि मग एखादा कुशल चित्रकार ती सौंदर्यस्थळे आणि स्वरूपे कुंचला आणि रंग यांच्या सहाय्याने चित्रांकित करतो, त्याप्रमाणे नेहरूंना भारावून टाकणारी निसर्गाची विविध स्वरूपे शब्दांकित करून टाकीत असत. आणि अशा प्रकारे मोहक आणि यथार्थ शैलीदार भाषेत त्यांनी लिहिलेली निसर्गाच्या स्वरूपाची वर्णने त्यांच्या साहित्यात ठिकठिकाणी आढळतात.

नेहरूंच्या सौंदर्यशोधक दृष्टीला निसर्गाच्या कोणत्याही स्वरूपाचं वावडं नव्हतं. त्यांच्या निसर्गप्रेमाला मर्यादा नव्हती. वृक्ष, वनराजी हिम, पहाड, पर्वतराजी दऱ्याखोरी, नद्या, सागर, आकाश, तारांगण वगैरे, विश्वाच्या विशाल स्वरूपात दिसणाऱ्या सौंदर्याचा त्यांनी समान दृष्टीनं व भेदातीत वृत्तीनं अनुभवपूर्वक उपभोग घेतला. विश्वातील निसर्गसौंदर्य अफाट आणि अमर्याद आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आणि ते सौंदर्य मनमुराद लुटण्याचा त्यांच्या वृत्तीला किती जरी हव्यास आणि हौस असली तरी त्यांनी अंगीकारलेल्या धकाधकीच्या आणि सदैव कार्यमग्न कर्मयोगी जीवनात, ती हौस तृप्त करून घेण्याची संधी त्यांना क्वचितच मिळे. परंतु, तरीही

विश्रांतीच्या अत्यशा काळात किंवा, प्रवासात जेव्हा जेव्हा त्यांना निसर्ग-सौंदर्याचं दर्शन घेण्याची संधी मिळाली तेव्हा परिस्थिती काही काल विसरून त्यांनी दृष्टीस पडणाऱ्या निसर्गसौंदर्याचा लाभ पदरात पाडून घेतला. परंतु, तरीही आपल्याला निसर्गाचं सान्निध्य व सौंदर्य पाहण्यास वेळ मिळत नाही याबद्दल त्याना खेद वाटे. "आपला खतःचा देश, हा अनेकविध वस्तूंनी व शोध घेण्यालायक स्थळांनी भरलेलं एक स्वतंत्र विश्वच आहे. या देशात मी खूपच प्रवास केला आहे व वयानं मोठाही झालो आहे. आणि तरीही, ज्याच्यावर आपण इतकं प्रेम करतो आणि ज्याच्यासाठी आपण झगडतो आहोत त्या देशाचे बरेचसे भाग मी पाहिलेले नाहीत. मला जास्त वेळ मिळेल तर भारताचे अनेक कोनेकोपरे यांना मी भेट देईन."

नेहरूंनी भारतात जेवढा प्रवास केला, विविध स्थळे पाहिली, निसर्गदृश्यांचा भरपूर रसास्वाद घेतला, तेवढा भारतातील कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीनं वा पुढाऱ्यानं घेतला नसेल. परंतु, तरीही नेहरूंना भारताचा प्रत्येक कोपरान कोपरा हिंडून निसर्गाची विविध स्वरूपे पाहावयाची इच्छा होती. निसर्गसौंदर्यानं नटलेल्या स्थलांना भेटी देऊन तेथील निसर्गसौंदर्याचा उपभोग घेण्याची ही इच्छा त्यांच्या विद्यार्थीदशेपासून होती. इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी वास्तव्य करीत असताना सुटीच्या दिवसांत ते युरोपमध्ये प्रवासासाठी जात असत. व त्या वेळी प्रसिद्ध स्थळांना ते भेटी देत असत. त्यामध्ये निसर्गाच्या विविध स्वरूपांत नटलेल्या स्थळांचाही अंतर्भाव होता. अशा वेळी ते अनेक धोकेही पत्करीत असत. विशेषतः १९१० साली केंब्रिज विश्वविद्यालयाची पदवी संपादन केल्या-नंतर नॉर्वेमध्ये सहलीसाठी ते गेले होते. नॉर्वेमधील डोंगरी मुलखातून हिंडत असताना थकल्यानंतर ते आपल्या मुक्कामाच्या म्हणजे लहानशा हॉटेलात परत आले. थकलेल्या आणि उबलेल्या शरीराला आराम मिळावा म्हणून परत येताच स्नानासाठी पाणी तयार ठेवण्याची वर्दी त्यांनी दिली. परंतु, त्या हॉटेलात स्नानाची कसलीच व्यवस्था नव्हती. त्यामुळे जवळच असलेल्या ओढ्यावर जाऊन वाटल्यास नेहरूंनी हस्तमुखप्रक्षालन करून यावं असं त्यांस सुचविण्यात आलं. तेव्हा, टॉवेल वगैरे घेऊन नेहरू आपल्या एका सोबत्यासह जवळच्या ओढ्यावर गेले. तो ओढा वरून येणाऱ्या एका हिमप्रवाहाचा भाग होता. पाणी खळाळत उतारावरून धाव घेत होतं. नेहरू व त्यांचा इंग्लिशमन सोबती त्या

ओढ्याच्या काठाशी जाऊन पोहोचले. तेथील एकंदर दृश्य व खळाळत जाणारा जलप्रवाह पाहताच भारावून जाऊन नेहरू प्रवाहात शिरले. पाणी खोल नव्हतं, पण बर्फाप्रमाणं थंडगार होतं आणि तळ निसरडा होता. त्या निसरड्यावरून नेहरूंचा पाय घसरून नेहरू सपशेल पाण्यात पडले. थंडगार पाण्याच्या प्रभावानं नेहरूंची गात्रं गोठून गेली होती, त्यामुळे शरीरावर नियंत्रण ठेवणं त्यांना अशक्य होऊन गेलं होतं. पुनश्च पायांवर उभं राहणं शक्य न झाल्यामुळं प्रवाहाच्या जलद गतीबरोबर नेहरू वाहत चालले. तो इंग्रज सोबती कसाबसा बाहेर पडला व प्रवाहाच्या काठाकाठाने धावत सुटला. नेहरूंचा पाय हाती लागताच त्यानं नेहरूंना खेचून बाहेर काढलं. त्या प्रसंगातील भयंकर धोका नंतर नेहरूंच्या ध्यानात आला. पुढे सुमारे तीनशे यार्डांवर तो जल-प्रवाह उंच कड्यावरून खाली कोसळत होता. आणि तो धबधबा हे प्रवाशांचं प्रेक्षणीय स्थळ होऊन बसलं होतं.

जीवन संपुष्टात आणणाऱ्या या प्रसंगामुळं नेहरू विचलित झाले नाहीत किंवा, धास्ती घेऊन निसर्गाच्या सान्निध्यात अवखळपणाने तद्रूप होण्याची त्यांची वृत्ती नष्ट झाली नाही. पुढील आयुष्यातही त्यांनी आपल्या वृत्तीला त्याच अवखळपणाने भरपूर खाद्य दिलं. १९१६ साली त्यांचा विवाह झाल्या-नंतर उन्हाळ्यात नेहरू काश्मीरमध्ये गेले होते. काश्मीर खोऱ्यात आपल्या कुटुंबीय मंडळींना ठेवून जवळच्या नातेवाइकांबरोबर नेहरू उंच पर्वतराजीवरून फिरत होते. त्या वेळी ते लडाख रस्त्यापर्यंत जाऊन पोहोचले होते. समुद्रसपाटी-पासून किती तरी उंच असलेल्या अरुंद पायवाटा असलेल्या व निर्जन अशा तिबेटच्या पठाराकडे जाणाऱ्या दऱ्यांचा आणि पर्वतांचा त्यांना त्या वेळी प्रथमच परिचय होत होता. एका बाजूला खाली पसरलेल्या विशाल आणि हिरव्यागार वनश्रीनं नटलेल्या पर्वतांचे उतार व दुसऱ्या बाजूला उघडेबोडके ओसाड शिलाखंड त्यांनी पहिले. उन्हात तळपणाऱ्या बर्फाचं आवरण शिरोभागी घेतलेली गिरिशिखरे एका बाजूला उंच गेलेली दिसत होती. आणि नेहरू वर चढत असताना, पर्वतराजीवरून खाली दऱ्यात उड्या घेणारे हिमप्रवाह त्यांना दिसत होते. थंडगार व बोचरा वारा वाहत होता. पण तरीही सूर्यकिरण थोडीशी ऊब निर्माण करीत होते. वातावरण इतकं स्वच्छ होतं की, दृष्टिपथात येणाऱ्या अनेक वस्तू त्यांच्यामधील अंतराची काहीच कल्पना येत नसल्यामुळं

प्रत्यक्षात असलेल्या अंतरापेक्षा किती तरी जवळ आहेत असा भास निर्माण होत होता. एकाकीपणा वाढत होता. सोबतीला नजिकच झाडेझुडपेही नव्हती. सर्वत्र, उघडेबोडके शिलाखंड, बर्फ आणि हिम, तर कधी कधी मधूनच दृष्टीला सुखविणारी व हवीशी वाटणारी रानटी फुलं. या सर्व दृश्यांची, आपल्या मनावर झालेली प्रतिक्रिया नेहरू वर्णन करतात : "तथापि, या वन्य आणि निर्जन प्रदेशातून भटकण्यात मनाला अननुभूत समाधान गवसत होतं. ओसंडून जाणाऱ्या उत्साहानं मन भरून गेलं होतं आणि उच्च पदाला पोहोचल्याची भावना मनात निर्माण होत होती."

सभा, राजकारण, चर्चा, मुलाखती, पत्रपरिषदा, व्याख्याने, दौरे यांना नेहरू कित्येकदा विटून जात असत. या सर्व गोष्टींचा त्यांना उबग वाटे, आणि मग ते वैतागून जात. अशा मनःस्थितीत असताना एखाद्या निसर्गरम्य एकांत स्थळी जाण्याची इच्छा त्यांच्या मनात उफाळून येई. ही इच्छा होण्यात शारीरिक थकवा नसून मानसिक श्रांतताच असे. त्यामुळं त्यांच्या मनाला विरंगुळा, बदल किंवा पुनर्जीवन हवंसं वाटे. राजकारण म्हणजे पूर्णपणे मानसिक दमछाक करणारा जगाचा व्यवहार असं त्यांना वाटे. अंगवळणी पडलेल्या व स्वीकारलेल्या नित्यनैमित्तिक कार्यक्रमांत ते सारा वेळ बुडून गेलेले असत. तरीही मधूनमधून त्यांना त्या सर्व कार्याबद्दल उबग वाटून ते वैतागून जात. चर्चा करताना किंवा प्रश्नांची उत्तरं देताना, तसेच सहकाऱ्यांशी वागताना ते वरून शांत दिसत असत. पण त्यांचं मन मात्र दुसरीकडेच लागलेलं असे. खोल दऱ्या, हिमाच्छादित गिरिशिखरे, आणि पर्वतांचे कडे, देवदार वृक्षांनी आच्छादिलेले उतार, इत्यादी निसर्गाच्या स्वरूपांनी विनटलेल्या उत्तरेकडील पर्वतराजीवर त्यांचं मन भ्रमण करीत असे. नेहरूंच्या मनाला सदैव गुरफटून टाकणाऱ्या विविध मनःस्तापाच्या गोष्टी व प्रकार आणि ज्वलंत प्रश्न, यांमधून, तात्पुरती का होईना. पण स्वतःची मुक्तता करून घेण्यासाठी, शांत व निर्जन वातावरणात घुमणाऱ्या वायुलहरींचं संगीत श्रवण करण्यासाठी त्यांचं मन आसुसलेलं असे. आपल्या मनातील ही तळमळ व्यक्त करताना नेहरू थोडसे चिडूनच म्हणतात : "फार काळ मनात दडून राहिलेली सुप्त इच्छा तृप्त करून घेण्यासाठी मी माझ्या मार्गानं जाणार आहे. समोर त्या मार्गाचा दरवाजा उघडा दिसत असताना, मंत्रिमंडळातील फेरबदल किंवा उफाळतं आंतरराष्ट्रीय राजकारण, यांची बाधा मी

माझ्या मनाला का होऊ द्यावी ? मी तात्काळ अलाहाबादला जाऊन पोहोचलो. आणि लगेच त्या शहरात काही खळबळजनक घटना घडणार आहेत असं मला आढळून आलं... पण आता पर्वतांकडे जाण्याचा माझा मार्ग कोण रोखून धरणार आहे की विरोध करणार आहे ? "

आणि मग खरोखरच सर्व प्रश्न आणि उलाढाली मागे ठेवून नेहरू आपल्या मार्गाला लागले. प्रथम कुमाव टेकड्यांवरील अलमोरा येथे ते गेले. नंतर अलमोऱ्याहून " खाली "पर्यंत ते जाऊन पोहोचले. हा सारा प्रवास त्यांनी पायी व खेचरारून केला.

" दिवसांमागून दिवस जात होते आणि डोंगरी हवा मी यथेच्छ प्राशन करीत होतो. " नेहरू वर्णन करतात : " आणि दऱ्याखोरी आणि बर्फमय प्रदेश यांची दृश्ये डोळ्यात साठवीत होतो. निसर्गसुंदर आणि किती शांतिमय दिसत होती ती दृश्ये ! या ठिकाणी आल्यावर जगातील संकटं किती दूर आणि कृत्रिम वाटतात. पश्चिमेकडे आणि नैर्ऋत्येकडे दोन किंवा तीन हजार फुटांवर, आमच्या पायांखाली वक्रगतीनं दूरदूर जाणाऱ्या खोल दऱ्या पसरल्या होत्या. उत्तरेकडे शुभ्रवर्णीय सरव्यांच्या सहवासात नंदादेवी उन्नत मानेनं उभी होती. मधूनमधून सरळ कापून, ठेवलेले भयंकर कडे खोलवर जात होते. परंतु, बहुशः टेकड्यांच्या बाजूंची अर्धवर्तुळे स्त्रीच्या वक्षःस्थलाप्रमाणे, गोलाकार आणि मृदू दिसत होती. "

त्या मुक्कामात सकाळी लवकर उठून नेहरू उघड्यावर पडून असत. सूर्याचे कोवळे किरण त्यांना आपल्या मिठीत घेत. बर्फावरून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे त्यांना हुडहुडी भरे, पण सूर्यकिरणे तीपासून त्यांचं संरक्षण करण्यासाठी धावून येत आणि मग ऊब आणि नीरव सौख्य नेहरूंच्या शरीराला व मनाला भारून टाकीत.

निसर्गाच्या सान्निध्यात असताना नेहरूंच्या मनाची अवस्था विलक्षण होऊन जाई. वाहत्या वाऱ्याचं संगीत त्यांच्या कानांत वैचित्र्यपूर्ण गुजगोष्टी करी आणि त्यामुळे त्यांच्या संवेदनांना मोहक गुंगी येई. तप्त मेंदू थंड होई. अशा वेळी नेहरूंना जणू काय वेसावध गाठून, धूर्तपणानं खालील जगातील माणसांचे मार्ग, त्यांच्यातील न संपणारे संघर्ष, त्यांचे मनोविकार आणि द्वेष, धर्मांधता, राजकीय नीतिभ्रष्टता आणि ध्येयच्युति यांकडे त्यांचं लक्ष वेधलं जाई. मग

साहजिकच नेहरूंच्या मनात, प्रश्न उभा राही: "त्यांमध्ये परत जाणं आणि त्यांच्याशी झगडण्यत जीवनशक्ती खर्च करण्याचा काही उपयोग होणार आहे काय? त्यापेक्षा इथं किती शांत, निःस्तब्ध आणि सुखद वातावरण आहे! आणि शिवाय सोबतीला बर्फ, पर्वतराजी, विविध प्रकारच्या वृक्षांच्या राई आणि पुष्पांनी बहरलेल्या टेकड्यांचे उतार आणि पक्ष्यांचं संगीत आहे!"

मोहक निसर्गसौंदर्यानं नटलेल्या अविस्मरणीय वातावरणातील दृश्ये नेहरू वेहोशीनं आणि धुंद मनानं अंतःकरणात साठवीत होते. त्यांचं वास्तव्य होतं त्या निवासस्थानासमोरच सहाशे मैलांच्या हिमालयाच्या बर्फाच्छादित रांगा, तिबेटपासून नेपाळपर्यंत पसरलेल्या होत्या. मध्यभागी नंदादेवी शिखर उन्नत मस्तकानं उभं होतं. त्या विशाल प्रदेशात बद्रीनाथ, केदारनाथ आदि सुप्रसिद्ध ठिकाणं असून, त्यापलीकडेच कैलास आणि मानसरोवर ही पवित्र स्थानं होती. या दृश्याकडे पाहताना नेहरू उत्स्फूर्त उद्गार काढतात: "केवढं भव्योदात्त विशाल दृश्य नजरेसमोर दिसत होतं. स्तिमित होऊन मंत्रमुग्ध मनःस्थितीत मी त्या दृश्याकडे पाहत होतो. आणि मग इतकी वर्षे भारतभर फिरलो आणि दूरदूरच्या राष्ट्रांना भेटी दिल्या. परंतु, माझ्या स्वतःच्या प्रातातील या भागातील अमाप निसर्गसौंदर्याला मी पारखा झालो होतो, याबद्दल मला माझाच राग आला. किती भारतवासियांनी हे दृश्य पाहिलं असेल किंवा निदान त्यासंबंधी वाचलं-ऐकलं असेल? किती हजारो लोक पाश्चात्त्य संगीत आणि ब्रिजच्या शोधात सुलभ आणि दिखाऊ हवेच्या ठिकाणी दरवर्षी जात असतात!"

रम्य निसर्गाच्या सान्निध्यात नेहरू वास्तव्य करीत असताना रोजचं टपाल येऊन आपल्या निसर्गसमाधीचा भंग होऊ नये म्हणून दहा मैल दूर असलेल्या टपालकचेरीत आपलं टपाल पडून राहावं अशी नेहरूंना तीव्र इच्छा होई. परंतु, आपल्या प्रिय नातेवाइकांकडून इतर टपालाबरोबरच येणारी पत्रेही आपल्याला वाचावयास मिळतील या अपेक्षेनं, आणि रोजचं टपाल पाहण्याच्या दीर्घकालीन संवयीमुळं, त्यांना टपालाच्या आगंतुक पाहुण्याला दार उघडं ठेवावं लागत होतं. आणि मग, हिटलरची ऑस्ट्रियावरील स्वारी, अलाहाबादमधील जातीय दंगे वगैरे आपत्तींच्या प्रक्षोभजनक बातम्या त्यांच्या कानी टपालद्वारा पडत. मग नेहरूंचं मन अस्वस्थ होई. मनाच्या अशा अवस्थेत नेहरू लिहितात:

" त्या वार्ता ऐकून 'खाली' येथेही मला मनःशांती लाभणं शक्य नव्हतं. पण त्यांतून सुटकेचा मार्ग दिसत नव्हता. माझ्या मनाला यातना देणाऱ्या विचारांपासून मी माझी मुक्तता कशी करून घेणार ? माझ्या हृदयस्पंदनापासून मी कसा सुटून जाणार ? मला समजून चुकलं की, जगातील मनोविकारांना तोंड हे दिलंच पाहिजे, आणि मनाला होणाऱ्या यातना सहन करीत, जगावर ओढविणाऱ्या आपत्तीतून जगाची मुक्तता करण्याची स्वप्नं कधी कधी पाहिलीच पाहिजेत." या विचारानं, निसर्गसौंदर्यानं मंत्रमुग्ध अवस्थेत गुंगून गेलेले नेहरू, जगातील भीषण व्यवहारांशी सामना देण्यासाठी परत जगात आले. परंतु, परत निघताना शुभ्र गिरीशिखरांचं शेवटचं दर्शन घेऊन, त्यांच्या भव्य रूपरेषाकृती, आपल्या मनाच्या चित्रफलकावर त्यांनी चित्रित करून ठेवल्या होत्या.

काश्मीर तर नेहरूंच्या पूर्वजांचं वसतिस्थान, आणि तशातही जगाचं नंदनवन म्हणून त्याची ख्याती झालेली ! निसर्गसौंदर्याचे उपासक नेहरू यांनी काश्मीरला भेट न दिली तरच नवल ! कारावासात असताना, भारतात प्रवास करताना, स्वातंत्र्ययुद्धात भाग घेताना आणि राजकारणाच्या धकाधकीत गुंतून पडलेले असताना, नेहरूंना मधूनमधून काश्मीरचं सारखं स्मरण होत असे. परंतु, " सारा वेळ मी कार्यमग्न असताना, माझी नेत्रभूक भागविण्यासाठी आणि हृदयातील इच्छा तृप्त करून घेण्यासाठी मी माझ्या जीवनकार्याकडे पाठ का फिरवावी ? " असाही विचार त्यांच्या मनात येई; आणि मग मनातील काश्मीर-भेटीची इच्छा मनातच ठेवून ते अंगीकृत कार्यात गढून जात. अशा स्थितीत दिवस, महिने व वर्षेही गेली. जीवन मर्यादित आहे याची जाणीव त्यांच्या मनाला टोचणी देतच होती. काश्मीरमधील निसर्गसौंदर्याच्या भावनिक प्रक्रियेचा अनुभव घेण्याची आपली शक्ती वयोमानाबरोबर कमी होईल किंवा काय याची भीतीही नेहरूंना वाटत असे. मनाच्या या द्विधा अवस्थेचं नेहरू वर्णन करतात : " जीवन अपुरं आहे; आणि काल निसटून जात असताना, माझं मनं भीतिग्रस्त झालं. वयोमानाचे काही फायदे आहेत. वाढत्या वयोमानामुळे मानसिक स्थिरता आणि समतोलपणा, शहाणपणा आणि विविध स्वरूपांतील सौंदर्याचा सूक्ष्म स्वाद घेण्याची वृत्ती येते, किंवा यावयास पाहिजे. पण वयोमानाच्या वाढीबरोबरच दुराग्रह, तिरसटपणा, संज्ञाशून्यता आणि बाह्य उत्साहाला प्रतिसाद देण्याची असमर्थताही अंगी येत जाते. अशा वयात मनावर संस्कार घडून येणं कठीण

होतं आणि भावनिक प्रक्रिया मर्यादित होऊं लागते. उत्साहानं दृष्टी बेभान होण्यापेक्षा, स्वास्थ्य आणि सुरक्षितता यांकडे लागते. निसर्ग आणि कला यांमधील सौंदर्य नेमस्तपणानं आणि विचारी वृत्तीनं टिपलं जातं हे खरं; पण त्या सौंदर्याचं चित्र वयातीत व्यक्तीच्या नेत्रात प्रतिबिंबित होत नाही किंवा त्यामुळे हृदयात भावनांचा कल्लोळ निर्माण झालेला दिसत नाही." ही जाणीव नेहरूंना असल्यामुळं दिवस जात होते आणि संथपणे पण अविरोध गतीनं वाढत जाणारं त्यांचं वय, यामुळं काश्मीरमधील सौंदर्याचा उत्कट आस्वाद घेण्यास आपण असमर्थ होऊ अशी नेहरूंना भीती वाटणं साहजिकच होतं. अशा मनःस्थितीत असतानाच काश्मीरला भेट देण्याची संधी नेहरूंना मिळाली. आणि मग मनात काश्मीरची जी चित्रं त्यांनी रंगविली होती व जतन करून ठेवली होती ती प्रत्यक्षात पाहण्याचा आनंद त्यांना मनसोक्त अनुभवण्यास मिळाला. तो अनुभव वर्णन करताना नेहरू लिहितात : "पर्वतराजीतून व अरुंद दरीतून मी बाहेर आलो आणि खोलवर तारुण्यसुलभ स्वच्छंदीपणानं खळाळत उड्या घेत जाणारी झेलम नदी व भोवतालच्या दरीचं दृश्य माझ्या नजरेसमोर दिसू लागलं. सडपातळ आणि रुबाबदार पहारेकऱ्याप्रमाणं दिसणारे पॉप्लर् वृक्ष, स्वागतासाठी खडे होते. शेकडो वर्षांची वाढ असलेले वृक्षराज चिनार आपल्या इतमामानिशी उभे होते. तेथल्या भूमीचं स्वरूप पाहून मी गुंग होऊन गेलो आणि माझं सर्वांग मोहरून आलं. मंत्रमुग्ध होऊन मी भटकत होतो. निसर्गाचं सौंदर्य नजरेनं पिऊन घेत होतो; आणि उन्मादानं माझं मन भरून गेलं. नद्या आणि दऱ्या आणि जलाशय यांच्या त्रिगुणात्मक सौंदर्यानं आणि सुबक वृक्ष यांनी समृद्ध असलेलं काश्मीर, एखाद्या व्यक्तिविरहित आणि मानवी वासनांच्या पलीकडील असं स्वरूप असलेल्या एखाद्या लावण्यवती स्त्रीप्रमाणं आहे. कणखर पर्वत आणि कडे, बर्फाचं शिरोभूषण परिधान केलेली शिखरे, हिमप्रवाह, खालील दऱ्यांत उड्या घेणारे निष्ठुर आणि भयानक जल-प्रवाह अशा दुसऱ्या पौरुषयुक्त स्वरूपाचंही दर्शन घडतं. कधी आनंदी, कधी दुःखी आणि शोकमग्न अशी विविध रूपे आणि आकारही पाहण्यास मिळतात. दाल तलावामधून धुकं हळूहळू वर येई आणि पारदर्शक बुरख्याप्रमाणं त्यातून पलीकडील दृश्याचं अस्पष्ट दर्शन होई. पर्वतशिखराला आलिंगन देण्यासाठी मेघमाला बाहू पसरून पुढे होताना किंवा बालकाप्रमाणं हळूच खाली उतरताना

दिसतात. हे चंचल दृश्य मी एकाग्र नजरेनं पाहात होतो आणि कधी कधी त्यातील निर्मळ मोहकता मला मंत्रमुग्ध करी आणि भाव हरपून जाई. आपल्या मनात घर करून राहिलेल्या पण क्वचितच फलद्रूप होणाऱ्या आशा आणि आकांक्षा यांच्याप्रमाणंच स्वप्नमय आणि अवास्तव अशी ती दृश्ये मला वाटत. स्वप्नात दिसणाऱ्या परंतु जागृती येताच पुसल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या चेहऱ्याप्रमाणं ते दृश्य भासमान होई."

काश्मीर खोऱ्यातील हे निसर्गसौंदर्य नेहरूंनी मनमुराद अवलोकन केलं आणि प्रत्येक दृश्य त्यांनी आपल्या स्मृतिफलकावर चित्रित करून ठेवलं. परंतु तरीही काश्मीरमधील भयंकर दारिद्र्य पाहताच मात्र त्यांचं भावनाप्रधान व संवेदनाक्षम मन तळमळून उठलं. "निसर्गाच्या अपार वैभवानं नटलेल्या या भूमीतील जनता इतकी दरिद्री का?" असा कठोर प्रश्न नेहरूंच्या पुढे उभा राहिला. आणि मग त्या दारिद्र्याची कारणं आणि त्यावरील उपायही त्यांनी शोधून काढले. काश्मीर हा प्रदेश एक उत्तम विश्रांतीचं आणि सहलीचं ठिकाण होऊ शकेल याबद्दल नेहरूंना खात्री वाटत होती; परंतु, निसर्गाचं अवलोकन करीत असतानाच काश्मीरमधील जनतेतील अखंड ग्रीष्मकाल त्यांच्या नजरेनं दृष्टीआड केला नाही.

हिमप्रवाहाची दृश्यं पाहण्याचा तर नेहरूंना अतिशय उत्कट छंद होता. आवड होती. आणि काश्मीरमध्ये सहल करीत असतानाच ते पुढं श्रीनगरहून वर्नाग, अलबल, अनंतनाग, मार्तंड वगैरे उंच स्थलांनाही त्यांनी भेटी दिल्या. त्या वेळी पाऊस अतिशय पडत होता. तरी पण अमरनाथ रस्त्यावरील चंदनवाडीला भेट दिल्यावाचून नेहरूंना राहवलं नाही. त्यांच्या सोबत्यांपैकी बऱ्याच जणांना ही सफर मानवली नाही, सहन झाली नाही. आणि मग त्रासून आणि थकून ते परत गेले. परंतु, नेहरू मात्र तसेच पुढं, कधी घोड्यावरून तर कधी पायी, असा प्रवास करीतच होते. ते त्रासून किंवा थकून तर गेले नाहीतच; पण उलट, "माझ्या चेहऱ्यावर नित्य शिडकावे करणाऱ्या पावसामुळं उलट मला उल्हसित वाटू लागलं आणि नागमोडी वळणानं खळाळत जाणाऱ्या जलप्रवाहाचं त्यांच्या जवळून जाताना घडणारं सान्निध्य आणि दृष्टिसुख मला अतिशय सुखकारक वाटत होतं." चंदनवाडीला आपले सोबती मागे ठेवून एका मित्राबरोबर

ते काही मैल पुढं खूप उंचीवर गेले. शिशुनाग येथे जाऊन तेथील पर्वतावरील जलाशय पाहण्याची इच्छा असूनही नेहरूंना जाण्यास वेळ नव्हता म्हणून त्यांना खेद होत होता.

चंदनवाडीहून पहलगामला येऊन लगेच दुसऱ्या दिवशी नेहरूंचा काफिला लिडार नदीच्या संगतीनं, लिडारवत्तपर्यंत गेला. आणि मग एक दिवस विश्रांती घेऊन लगेच दुसऱ्या दिवशी कोलाहोई हिमप्रवाह पाहण्यासाठी ते निघाले. त्या प्रवासाच्या दिवसांत हवा स्वच्छ होती. नेहरूंना तो शुभशकुनच वाटला. कारण रस्ता खडकांमधून आणि कड्यांवरून जात होता. आणि मधून मधून पर्वतावरून खाली उड्या मारीत वाहणाऱ्या जलप्रवाहांना उलंघून त्यांना जावयाचं होतं. हिमप्रवाहाच्या पायथ्याशी दुपारचं जेवण करून मग वाटेतले खाचखळगे आणि बर्फातील भेगा टाळीत ते वर गेले. तेथे त्यांना फार काळ थांबणं अशक्य होतं. पण त्या सुप्रसिद्ध हिमप्रवाहाचं दर्शन घेऊन त्यांनी आपली इच्छा तृप्त करून घेतली. त्या हिमप्रवाहाच्या दर्शनानं प्रमुदित होऊन नेहरूंच्या लेखणीवाटे शब्द बाहेर पडतात : "हिमप्रवाहाला दिलेल्या त्या अल्पकालीन भेटीनं माझं अंतःकरण उत्साहानं भरून आलं आणि कित्येक दिवसांची माझी इच्छा पूर्ण झाल्याचं समाधान मला लाभलं."

या प्रवासात नेहरूंच्या सहप्रवाशांतील काही व्यक्तींना लहानमोठे अपघात झाले. काही प्रारंभीच्या प्रवासातच घोड्यावरून पडले; काही कड्यावरून घसरले; तर काही खुद्द हिमप्रवाहात सापडले. पण त्याबरोबरच मनावर परिणाम करणारं, विशाल मानवी अंतःकरणाचं दर्शनही नेहरूंना झालं. त्या भागातील गुजार वस्तींना नेहरूंनी भेट दिली. त्यांच्या वस्तीत वास्तव्य करणाऱ्या लोकांखेरीज, परकी लोकांनी तेथे जाणं गुजार जमातीतील लोकांना आवडत नाही. पण नेहरूंचं मात्र तेथे उत्साहानं स्वागत झालं. आपल्याबरोबर भाकरी खाण्याचा, तेथील गुजार लोकांनी नेहरूंना आग्रह केला. कोणत्याही जातीच्या, वर्णाच्या किंवा संस्काराच्या हिंदी जनतेशी एकरूप होण्याच्या नेहरूंच्या स्वभावामुळं त्यांनी त्या आमंत्रणाचा स्वीकार केला. नेहरूंना ती भाकरी फारच चविष्ट लागली. हे गुजार लोक तेथे कसे व केव्हा आले हे नेहरूंना माहीत नव्हतं. "पण ते लोक दिसण्यात सुंदर होते आणि त्यांच्या स्त्रियांचे अवयव रेखीव

होते. त्यांची मुलेही आकर्षक दिसत होती. त्या गुजार स्त्रिया चेहऱ्याकडे सरळ बघत. त्यांच्या दृष्टीत लाजाळूपणा किंवा आत्मजाणीव (Self-Conciousness) अत्य प्रमाणातच आढळून येई." नेहरूंनी त्या जमातीत स्त्री-पुरुष-बालकांचे थोडक्यात वर्णन केले आहे. एका झोपडीशी नेहरू गेले असताना आतून एक स्त्री बाहेर आली. नेहरूंचा हात आपल्या हातात घेऊन तिनं त्यांचं स्वागत केलं. नेहरूंना या प्रकाराचं आश्चर्य वाटलं. त्या स्त्रीनं नेहरूंना व त्यांच्या बरोबरच्या मंडळींना झोपडीत नेलं व ती शिजवीत असलेली भाजी व भाकरी खाण्याची तिनं विनंती केली. "त्या स्त्रीचं हे वर्तन आणि शिष्टाचारानं वागण्याची पद्धत इतकी प्रतिष्ठित आणि प्रत्ययकारी होती की, एखादी मोठ्या प्रतिष्ठेची स्त्री, आपल्या भव्य प्रासादात माझं स्वागत करीत असल्याचा भास मला तिच्या वर्तनात झाला." असे उद्गार त्या सर्वसामान्य मागासलेल्या वन्य गुजार जमातीतील स्त्रीच्या प्रतिष्ठित आणि गृहिणीच्या वर्तनानं भारावून जाऊन नेहरूंनी काढले आहेत.

ब्रिजवेहरा येथे नेहरू गेले असताना एका विस्तीर्ण वृक्षाच्या पारावर त्यांच्या सभेसाठी व्यासपीठ तयार केलं होतं. या वृक्षासंबंधी नेहरू लिहितात : "ज्या व्यासपीठावर मी उभा होतो ते व्यासपीठ एका प्राचीन, भव्य आणि विस्तीर्ण अशा चिनार वृक्षाच्या पारावर बनविले होते. त्या वृक्षाच्या खोडाचा तळाकडील परीघ पंचावन्न फूट तरी सहज असेल. तो वृक्ष सुमारे ४०० वर्षांचा जुना असल्याचं आम्हांला सांगण्यात आलं. आणि त्या शीतल वृक्षतळी उभे असताना इतिहासाच्या प्रदीर्घ कालखंडाचा ओघ माझ्या दृष्टीसमोरून सरकून गेला. या शतकात किती वैचित्र्यपूर्ण घटना, क्रांत्या आणि मानवी मूर्खपणा या वृक्षानं पाहिला असेल ! किती मानवप्राणी आले आणि गेले; आपली सुखदुःखपूर्ण जीवनं जगले; पिढ्यामागून पिढ्या आल्या आणि गेल्या. परंतु, हा वृक्षराज मात्र मानवी व्यवहाराची अनंत दृश्ये, स्थितप्रज्ञ अवस्थेत आणि अविचलित वृत्तीनं पाहत इथं उभा आहे."

निसर्गसौंदर्याची विविध स्वरूपे पाहण्याच्या हव्यासामुळे स्तिमित करून टाकणारी दृश्ये त्यांना पाहण्यास मिळाली, व विविध अनुभवही घ्यावयास

मिळाले. परंतु, त्याबरोबरच प्राणावर बेतणारे चित्तथरारक अनुभवही त्यांना आले. निसर्गात जशी मोहक, नेत्रसुखकारक आणि सौंदर्यपूर्ण, रंगीबेरंगी दृश्य पाह्यला मिळतं हे तर खरच. पण निसर्गाचं स्वरूप कधी कधी रौद्र, भयानक आणि घातकही असतं याचा प्रत्यय नेहरूंनाही मागे एकदा आला तसाच पुनश्चही एकदा आला. पहिला अनुभव अजाणतेमुळे आला होता. आताचा अनुभव मात्र नेहरूंच्या साहसी व निसर्गाशी तद्रूप होण्याच्या वृत्तीमुळं आला.

झोजी-ला खिंडीच्या पलीकडे, मातायन या नावानं संबोधिल्या जाणाऱ्या प्रदेशातून प्रवास करीत असताना, अमरनाथची सुप्रसिद्ध गुहा, तेथून फक्त आठ मैल दूर असल्याचं नेहरूंना सांगण्यात आलं. बर्फ आणि हिम यांनी आच्छादिलेला एक भव्य पर्वत मधे खडा होता आणि अमरनाथला भेट देण्यासाठी तो उल्लंघून जाणं आवश्यक होतं; पण नेहरूंना ते समजताच त्यांच्या मूळच्या साहसी स्वभावानं व अमरनाथच्या निसर्गनिर्मित गुहेचं दर्शन घेण्याच्या इच्छेनं त्यांच्या मनानं उचल खाल्ली आणि त्यांच्या आहारी गेल्यामुळं नेहरूंना त्या पर्वताची पर्वा वाटत नव्हती. आठ मैल अंतर त्यांना फार किंवा तो पर्वत अनुल्लंघनीय थोडाच वाटणार ? उत्साहाच्या भरात, तशा प्रवासाचा अनुभव गाठीशी नसताही ते आठ मैल अंतर, वाटेतील तो पर्वत उल्लंघन करून, चालत जाण्याचं नेहरूंनी ठरवलं. ११,५०० फूट उंचावर असलेली आपली छावणी सोडून नेहरू आपल्या मूठभर सोबत्यांसमवेत तो पर्वत चढू लागले. एक स्थानिक गुराखी वाटाड्या म्हणून त्यांनी बरोबर घेतला होता. काही हिमप्रवाह दोरखंडाच्या सहाय्यानं त्यांनी ओलांडले व वर चढत गेले. चढणीचा त्रास वाढतच होता आणि त्यातच विरळ हवेमुळे श्वासोच्छ्वासही नीट घेता येत नव्हता. त्याच वेळी बर्फ पडण्यास सुरुवात झाली होती, आणि हिमप्रवाहही भयंकर निसरडे बनले होते. सर्वांचीच दमछाक झाली होती. आणि पाऊल उचलताना विशेष परिश्रम घ्यावे लागत होते. पण तरीही ते पुढचा प्रवास करीतच राहिले.

बारा तासांच्या खडतर प्रवासानंतर त्यांच्या प्रयत्नांचं सार्थक झालं. एक विस्तीर्ण बर्फमय प्रदेश समोर पसरलेला नेहरूंना दिसला. बर्फमय गिरिशिखरानं वेढलेल्या त्या प्रदेशाचं दृश्य भव्य होतं. देवाचा एखादा मुकुट किंवा भरलेल्या दरबारासारखं !— पण थोड्याच वेळात बर्फवृष्टी होण्यास आणि धुकं पडण्यास

सुरुवात झाली, आणि ते दृश्य नजरेसमोरून पुसलं गेलं. पंधरा ते सोळा हजार फूट उंचीवर ते ठिकाण असावं. आणि शिवाय अमरनाथच्या उंचीपेक्षा हे ठिकाण जास्त उंच होतं. तो बर्फमय प्रदेश ओलांडून अर्धा मैल चालून गेल्यावर परत पलीकडे उतरल्यास अमरनाथला जाणं शक्य झालं असतं. श्रमित झाले असले तरी उत्साहानं नेहरूंनी पुनश्च सुरुवात केली. बर्फाच्छादित खड्डे आणि पडत असलेल्या ताज्या बर्फानं झाकून गेलेली धोकादायक स्थळं वाटेत असल्यामुळं तो प्रवास काळजीपूर्वक करणं भाग होतं. पण तरीही ताज्या बर्फवृष्टीमुळं झाकून गेलेल्या एका विस्तीर्ण व 'आ' वासून पसरलेल्या खड्ड्यांवरील बर्फावर नेहरूंचा पाय पडताच, ते एकदम त्या खोल खड्ड्यात पडले. ती फट भयंकर खोल होती आणि आत पडलेली वस्तू भूगर्भशास्त्रीय कालापर्यंत आत सुरक्षित राखली गेली असती. परंतु, दोर मजबूत होता आणि शिवाय त्या खड्ड्याच्या एका बाजूला नेहरूंनी घट्ट पकडून ठेवलं होतं. त्यामुळं त्यांना वर ओढून काढणं नेहरूंच्या सोबत्यांना शक्य झालं. नेहरूंचे सोबती अर्थातच या प्रकारानं घाबरून गेले होते. परंतु नेहरूंनी प्रवास पुढं चालूच ठेवण्याचा हट्ट धरला संरक्षित जीवनाकडे नेहरूंची वृत्तीच नव्हती. इथं नेहरूंनी आपल्या भगिनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या एका पत्रातील वाक्यांची या संदर्भात आठवण होते. "सुरक्षितता प्रथम (Safety First) हे आपल्या जीवनाचं ब्रीदवाक्य कधीच नव्हतं, आणि पुढंही असणार नाही. धोके आणि संकटे यांनी परिपूर्ण असलेल्या या जगात आपण आपला वाटा पत्करलाच पाहिजे आणि तो टाळता कामा नये." या धोरणानुसार प्राणघातक संकटातून बचाव झाल्यावरसुद्धा नेहरू प्रवासापासून परावृत्त झाले नाहीत. त्यांनी प्रवास चालूच ठेवला. परंतु, निसर्गशक्तीपुढं मानवप्राण्याला हार खावी लागते याचा प्रत्यय नेहरूंना आला. पुढे पुढे बर्फाने आच्छादिलेल्या खड्ड्यांची संख्या आणि त्यांच्या रुंदीचं प्रमाण वाढत गेलं होतं आणि त्यामुळं पुढील प्रवास अशक्य झाला.

काश्मीर व भोवतालच्या प्रदेशाचं मनोहारी दर्शन घेऊन श्रीनगरमार्गे जम्मूच्या दिशेनं परत प्रवास करीत असताना, मार्गातील मुख्य बोगद्याच्या तोंडाशी उभे राहिले आणि मागे वळून त्या प्रदेशाचं पुन्हा एकदा दर्शन घेतलं. त्या वेळच्या त्यांच्या मनःस्थितीचं शब्दचित्रण नेहरू करतात : "बोगद्याच्या

तोंडाशी उभं राहून, खाली दिसणाऱ्या काश्मीर खोऱ्याचं आम्ही दर्शन घेतलं. अनेक गीतांतून आणि इतिहासात वर्णन केलेलं ते सुप्रसिद्ध काश्मीरचं खोरं आपल्या अतुलनीय मोहकतेनं पसरलेलं होतं. त्या खोऱ्याच्या काही भागात धुकं पडलं होतं आणि मंद प्रकाशानं, त्या दृश्य चित्राच्या स्पष्टपणाला मर्यादा घातली गेली होती. मेघमालांतून हिमाच्छादित गिरिशिखरे वर आलेली होती. आणि खाऱ्याच्या तळातून लांबवरून जलप्रवाहांचं अस्फुट संगीत ऐकू येत होतं. आम्ही मूकपणानं त्या दृश्याचा निरोप घेतला आणि जड हृदयानं मागं फिरून आम्हांला निसर्गाच्या दृष्टीनं कमी प्रिय असलेल्या प्रदेशाकडे आम्हांला घेऊन जाणाऱ्या त्या काळोख्या बोगद्यात प्रवेश केला."

काश्मीरच्या रम्य स्वप्ननगरीचं दर्शन घेऊन परत आल्यावर, नेहरूंचं पुन्हा नित्याचं, धावपळीचं, अनेक प्रश्नांचं आणि आपत्तींचं जीवन सुरू झालं. परंतु, काश्मीरच्या दर्शनानं नेहरूंच्या मनावर अनुकूल व उत्साहवर्धक परिणाम झाला होता. त्यांच्या कर्मयोगी कार्यमग्न जीवनात त्यामुळं नवचैतन्य ओतलं गेलं होतं. याचं नेहरू वर्णन करतात : "बाराच दिवस ! तेवीस वर्षांनंतर फक्त बाराच दिवस ! तरी पण अगतिक आणि स्थिर अशा अनेक वर्षांच्या कालावधीपेक्षा, एकच जीवनदायी क्षण हा फारच मोलाचा असतो. आणि काश्मीरमध्ये मी घालविलेले बाराच दिवस अतिशय भाग्याचे दिवस मानतो. परंतु, अजूनही काश्मीरची हाक मला ऐकू येत आहे; त्या प्रदेशाची ओढ पूर्वीपेक्षाही जास्त तीव्रतेनं माझ्या मनाला जाणवते आहे. कानांत स्वप्नामय जादूचे मंत्र गुणगुणत आहेत आणि काश्मीरची स्मृती मन अस्वस्थ करीत आहे. काश्मीरच्या प्रभावानं मंत्रमुग्ध झालेल्यांना त्या अवस्थेतून सुटका करून घेणं कसं शक्य आहे ?"

निसर्गसौंदर्याची नेहरूंच्या भावनाशील, संवेदनक्षम आणि काव्यप्रिय मानाला विलक्षण ओढ होती आणि त्या सौंदर्याच्या सान्निध्यात त्यांचं मन प्रफुल्लित आणि चैतन्यशील होत असे. धकाधकीचं दैनंदिन राजकारण आणि इतर अनेक कार्ये आणि पुढे उभे राहणारे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न यामुळं तप्त आणि श्रमित झालेलं शरीर आणि मन निसर्गाच्या संगतीत पुन्हा प्रफुल्लित आणि चैतन्यमय होत असे. आणि त्यासाठी मधूनमधून विश्रांतीसाठी व शरीराला

आणि मनाला उल्हसित आणि चैतन्यमय करण्यासाठी ते कुलू खोरं, नैनिताल, मसुरी वगैरे उत्तरेकडील निसर्गाच्या विविध स्वरूपांनी विनटलेल्या स्थली जात असत. आणि हा त्यांचा क्रम आमरण चालू होता.

परंतु, केवळ निसर्गाचं सौंदर्य त्यांना मोहून टाकीत होतं अशातला भाग नव्हता. सृष्टीतील निसर्गसौंदर्याव्यतिरिक्त इतर, म्हणजे मानवनिर्मित सौंदर्याचं त्यांना बावडं होतं किंवा नावड होती अशातला मुळीच प्रकार नव्हता. सृष्टीतील यच्चयावत व्यवहारात जिथं जिथं त्यांना सौंदर्य मनोवेधकता आणि आकर्षक दृश्ये आढळतील तिथं तिथं त्यांची सौंदर्यवेधक वृत्ती आणि दृष्टी जागृत राहून ती दृश्ये टिपून घेत असे. काश्मीर आणि मुंबई ! सर्वच बाबतीत परस्परविरुद्ध ! काश्मीर निसर्गराजाचं वैभव धारण केलेलं, तर मुंबई मानव-निर्मित ! तरी पण नेहरूंना मुंबईचंही आकर्षण वाटे. " मुंबईचा सागरकिनारा त्यावरून वाहणाऱ्या शीतल वायुलहरी, मुंबईतील उष्म्याची तीव्रता कमी करतात. असंख्य दीपपक्तीनं बंदर चकाकत असतं ... बँकबे अजूनही आकर्षक वाटतो आणि रात्रीच्या समयी लांबलचक दीपमाला विलक्षण दृष्टिसुख देतात. "

" मुंबईत होणारी पहिली पर्जन्यवृष्टी म्हणजे मुंबईच्या जीवनात एक घटना असते. वर्षाऋतूचं आगमन थाटाचं आणि विशिष्ट वातावरण घेऊन येतं, आणि आपल्या सढळ दानाचा वर्षाव करून मुंबापुरीला स्तिमित करून टाकतं. " असा नेहरूंचा अनुभव होता. आणि म्हणून नेहरूंचं स्वागतशील मन मुंबईतील पर्जन्यराजाच्या भेटीला, ते वर्षाऋतूत मुंबईस असले तर, आतुर झालेलं असे. मुंबईत असताना ते " आशाकाकडे दृष्टी लावून प्रत्यक्ष हल्ल्यांच्या आधी होणाऱ्या विनीच्या दूताचं आगमन टिपून घेण्यासाठी बसून राहात असत. "

अशा पावसाचा अनुभव नेहरूंनीही घेतला होता. तो त्यांचा पहिलाच अनुभव होता. विमानातून प्रवास करीत असताना सृष्टीचं अभिनव आणि मनोहारी दर्शन नेहरूंना घडलं : " वाळलेल्या जमिनीवर पाऊस पडून तिचं उदास स्वरूप पर्जन्यराज पालटून टाकतो, आणि सर्वत्र हरित आणि प्रफुल्लित दृश्ये दिसू दिसतात. हवेतही गारवा येतो. परंतु, हे दृश्य अति उंचावरून पाहिलं तर त्याचं स्वरूप अधिक स्पष्टपणे नजरेस पडतं. सर्वत्र हिरवागार रंग दिसू लागतो, आणि या एका रंगातही अनेक प्रकारच्या छटा आढळून येतात. शेते जलमय

झालेली असतात. न्हालेली व तृप्त झालेली झाडे नजरेत भरतात. आणि भूभागावर छोट्या ठिपक्यांसारख्या दिसणाऱ्या छोट्या खेड्यांचं भकास स्वरूपही पालटून जातं. या दृश्यांवरून, न कंटाळता, नजर घुटमळत राहते. अशा वेळी भारतभू हरितरम्य आणि मनोहर, सौंदर्यसमृद्ध आणि वैभवशाली आहे याची खात्री पटते. अगदी खालून विमान जात असल्यामुळं भूभाग काहीसा तपशीलवार दिसत होता. आणि शेतात काम करणारे शेतकरी स्त्री-पुरुष आणि संथपणे चरत फिरणारी गुरेही दिसत होती. मधेच एखादी टेकडी दिसे आणि लगेच आमचं विमान प्रलीकडे जाऊन तिला मागे टाकी. कधी कधी आमच्यावर आणि खिडक्यांच्या तावदानावर जोराची पर्जन्यवृष्टी होई. परंतु त्याचा त्रास मात्र आम्हांला मुळीच होत नव्हता."

पर्जन्यवृष्टी होत असताना भूभागापासून थोड्याच अंतरावरून केलेल्या प्रवासाचं हे वर्णन नेहरूंनी केलं. त्याचप्रमाणे अति उंचावरून केलेल्या प्रवासाचाही अनुभव त्यांनी शब्दांकित करून ठेवला आहे. अठरा हजार फुटांवरून केलेल्या त्या प्रवासाचं गंमतीचं वर्णन त्यांनी केलेलं आहे. "प्रभातकाल होता आणि चोरट्या पावलांनी प्रभात पृथ्वीवर पावले टाकीत होती. खाली पसरलेला एक विशाल हिमप्रदेश मला दिसत होता. विस्मयानं डोळे चोळून मी पुन्हा पुन्हा पाहिलं. छे! तो भास नव्हता. पण त्याबरोबरच आम्ही सिंधवरून जात असल्यामुळे सिंधमधे बर्फ दिसणं हास्यास्पद ठरणार होतं. मग काय कापसाच्या गठड्या खोलून सर्वत्र उधळल्या होत्या? ही कल्पनाही तितकीच छांदिष्टपणाची होती. आम्ही अति उंचावर होतो आणि वर निळं आकाश दिसत होतं. खाली बऱ्याच अंतरावर ढगही नव्हते. आणि असं असूनही भूभागाला आच्छादून टाकणारं शुभ्र चकाकणारं छत तर खाली दिसत होतं. हे गूढ आम्ही पाच हजार फूट खाली उतरलो आणि ढगात लुप्त झालो तेव्हाच आम्हांला उलगडलं."

बाह्य जगात स्वतंत्रपणे भारतभर संचार करीत असताना निसर्गसौंदर्याची विविध आणि मनोहर दृश्ये पाहिली; त्यातील सौंदर्याचा नेत्रावाटे आस्वाद घेतला आणि त्यातील काही दृश्यांचा त्यांच्या मनावर शाश्वत परिणाम झाला. ती त्यांच्या साहित्यात मधूनमधून चित्रित करून ठेवलेली आहेत. परंतु, तुरुंगाच्या सर्वस्वी परतंत्र आणि अतिशय मर्यादित वातावरणातही त्यांची निसर्गसौंदर्य

टिपून घेणारी दृष्टी, कारावासामुळे अबाधितच राहिली होती. बाह्य जगात आढळणारं निसर्गसौंदर्य त्यांना कारावासात पाहावयाला मिळत नव्हतं हे खरं. व त्या दृश्यांची त्यांना उणीवही भासत असे. "कोणत्या गोष्टींची मला उणीव भासत असेल तर ती ही की, पर्वतांचं दर्शन मला होत नाही. आकाशाला भिडणाऱ्या त्यांच्या रूपरेषा किंवा मसुरीचे लुकलुकणारे दिवे मी पाहू शकत नाही. परंतु, कल्पनेत मी त्यांना पाहतो आणि माझी कल्पनाशक्ती सामर्थ्यशाली आहेच!" कारावासात भासत असलेली ही उणीव नेहरूंनी आपल्या भगिनीला लिहिलेल्या एका पत्रात व्यक्त केलेली आहे. निसर्गाची दृश्ये पाहण्यांची नेहरूंच्या मनाला केवढी तळमळ लागून राहिलेली असे हे यावरून सहज लक्षात येईल.

परंतु, ही तळमळ कारावासाच्या मर्यादित जगात राहूनही जे निसर्गसौंदर्य दिसेल त्याचा आस्वाद घेऊन तृप्त करीत असत, नंतरच्या एका पत्रात अशा प्रकारच्या एका निसर्गसौंदर्याचं ते वर्णन करतात. हे वर्णन खगोलातील दृश्याचं आहे.

"एके दिवशी, चार्ल्स् लॅम्ब ("एलियाचे निबंध" व "शेक्सपियरच्या कथा" लिहिणारा लेखक) यांची काही जुनी पत्रे वाचीत असताना, दोन पद्यपंक्ती माझ्या वाचनात आल्या. तो म्हणतो, अजूनही आपल्याला काही गोष्टींचं दर्शन घडत आहे—

> "सूर्याचं आणि चंद्राचं आणि ताऱ्यांचं
> वर्षभर,
> आणि पुरुष आणि स्त्रियांचं—"

होय, माझ्या मनात विचार आला, आपल्याला अजूनही सूर्य आणि चंद्र आणि तारे यांचं दर्शन घडत आहे. आणि काल तर शरद् पौर्णिमा होती. प्रभातसमयी लवकरच मी जेव्हा जागा झालो तेव्हा एका इमारतीवरून गुरू डोकावताना दिसला. त्या वेळी अजूनही अंधारच होता. पण त्याचं दर्शन ही उठण्याची सूचना होती. सायंकाळी, सायंतारा शुक्र दिसू लागतो. रात्रीचं आकाश हळूहळू बदलत जातं आणि हेमंत ऋतूचा मुखवटा धारण करतं– ही

सर्व दृश्ये पाहण्याचा लाभ होतो आणि त्यातील नावीन्य कधीच हरपलेलं नसतं."

"जीवनातील लहानसहान गोष्टींचं मूल्य समजण्याची शक्ती कारावासातच प्राप्त होत जाते," असं नेहरूंनी म्हटलं आहे त्याची आठवण या संदर्भात आल्यावाचून राहत नाही. स्वतंत्र असताना वरीलप्रमाणे दृश्ये बाह्य जगात दररोज पाहाण्यात येतात. परंतु, कारावासात असताना मुक्त संचाराला प्रतिबंध असल्यामुळे कोठडीत किंवा कोठडीसमोरच्या छोट्या प्रांगणात दिसणाऱ्या गोष्टींचं महत्त्व तुरुंगात असतानाच प्रत्ययास येतं. या प्रत्ययाचा प्रत्यक्ष अनुभव नेहरूंनी विविध ठिकाणच्या तुरुंगांत दिसणाऱ्या, विविध प्रकारच्या निसर्गसौंदर्याच्या दर्शनानं घेतला आहे.

१९२१ साली तुरुंगात असताना— हा त्यांचा पहिलाच कारावास होता— प्रथम त्यांनी वरील अनुभव घेतला. त्या अनुभवाचे ते वर्णन करतात : "तो वर्षाऋतू होता आणि उघड्यावर बसणं ढगांच्या आवरणामुळं शक्य होत होतं. भयंकर उकाडा आणि पावसाची रिमझिम सहन करीत, जितका मिळेल तितका काळ, बराकीच्या बाहेर मी उघड्यावर काढीत होतो. उघड्यावर पट्टन राहत असताना मी आकाश आणि ढग यांकडे लक्षपूर्वक पाहत असे. त्यांची बदलती स्वरूपे किती मनमोहक आहेत याची जाणीव पूर्वीपेक्षा किती तरी जास्त तीव्रतेनं मला होत होती. काळ आम्हांला सुखावह वाटत नव्हता. परंतु वर्षाऋतूतील त्या बदलत्या मेघमालांकडे एकाग्रतेनं पाहण्यात माझा जो काळ जात असे, तो आनंददायी आणि दिलासा देणारा होता. त्या वेळी आपण नवीन एखादा शोध लावीत असल्याचा आणि कारावासातून मुक्त झाल्याचा साक्षात्कार मला होई. त्या विशिष्ट वर्षाऋतूचा इतका मोठा परिणाम माझ्यावर का झाला हे मला माहीत नाही. परंतु पूर्वी किंवा पुढेही तसा परिणाम कधी झाल्याचे मला आठवत नाही. पर्वतराजीवरील आणि सागरावरील अनेक सूर्योदय आणि सूर्यास्त मी पाहिले आहेत आणि त्यांची रमणीयता वाखाणलेली आहे आणि त्यांच्या भव्यतेमुळं मी त्या त्या क्षणी भारावून गेलो होतो. ते पाहून झाल्यावर मी ते मनात बाळगून दुसऱ्या विषयांकडे लक्ष दिलं, परंतु तुरुंगात सूर्योदय आणि सूर्यास्त पाहायला मिळत नव्हते. क्षितिज आमच्या नजरेआड होतं,

आणि दिवस वर आल्यावर बागेच्या भिंतीवरून ततकिरणांचा सूर्य वर येई. रंग कुठंही उधळलेले दिसत नव्हते. आणि रोज रोज चिखल-मातीची भिंत आणि बराकी यांचं तेच तेच दृश्य रोज पाहून आमची नजरच मेली होती. छाया-प्रकाश आणि रंग यांच्यासाठी आमचे डोळे भुकेले असावेत. मग जेव्हा जलमय मेघ आश्चर्यजनक आकार घेत, आणि उधळलेल्या रंगातून खेळत रसिकतेनं विहार करीत जात तेव्हा मी त्यांच्याकडे विस्मयपूर्ण आनंदानं, विस्फारित नेत्रांनी जणू काय मोहविद्येनं भारावून जाऊन त्यांकडे बघत राही. कधी कधी त्या ढगांचे तुकडे होत आणि त्यामधील गवाक्षातून वर्षा ऋतूची आश्चर्यकारक प्रक्रिया, विस्मयकारक निळे आकाश जणू काय अनंताचा एक खंडच, दिसू लागे... नंतर हिवाळ्यातील लांबलचक सायंकाळ आणि भारतीय निरभ्र निळे आकाश, आमचे लक्ष तारकापुंजांकडे वेधून घेई आणि नक्षाशाच्या मदतीने आम्ही त्यांतील बरेच ग्रह आणि तारे ओळखले होते. रोज रात्री त्यांच्या आगमनाची वाट पाहत असू आणि ते दिसताच, आमच्या जुन्या मित्रांच्या दर्शनाचा लाभ झाल्याच्या समाधानात आम्ही त्यांचं स्वागत करीत असू."

१९३१ साली डेहराडून येथील तुरुंगात असताना नेहरूंना ज्या कोठडीत ठेवलं होतं ती अगदीच लहान होती. त्यामुळं जेलच्या आवारात त्यांना फिरण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळं सकाळ आणि संध्याकाळ तुरुंगाच्या आवारात ते फिरत असत. त्यामुळं पर्वतराजी आणि शेतं व थोड्या दूरवरून जाणारा रस्ता त्यांच्या दृष्टीस पडे. त्यासंबंधी ते लिहितात : "मोकळ्या जागेत फिरणं आणि दूरची दृश्ये यांना किती असाधारण मानस-शास्त्रीय मूल्य असतं याचा अनुभव प्रदीर्घकाल उंच भिंतींच्या आत कारा-वासात असणाऱ्यांनाच येईल. मला तर हे फिरणं खूपच आवडे आणि ते मी वर्षाऋतूत मुसळधार पाऊस पडत असला तरी सोडलं नाही. अशा वेळी मला गुडघाभर पाण्यात फिरावं लागे, मोकळ्या हवेत कुठंही फिरण्यास मी नेहमीच तयार असतो. परंतु, जवळच दिसणाऱ्या उत्तुंग हिमालयाचं दर्शनही मला विशेष आनंदाची गोष्ट वाटे. त्यामुळं कंटाळवाणा बंदीवास सुसह्य होई. अनेक महिने आप्तांच्या भेटीशिवाय मला एकट्यानं राहावं लागे. अशा वेळी मला आवडणाऱ्या पर्वतराजींकडे मी पाहात बसे. कोठडीतून पर्वत दिसत नसत. पण

त्यांनी माझं मन इतकं भारावून टाकलेलं होतं की, मला कोठडीतही त्याचं सान्निध्य भासमान होई आणि त्यांच्या-माझ्यात एक गुप्त नाते निर्माण झाले होते."

कोठडीबाहेरच्या मोकळ्या जागेत फिरत असताना पर्वताशी नाते निर्माण करणाऱ्या नेहरूंना वसंताचं रूप जास्त सुखद वाटल्यास आश्चर्य नाही. "डेहराडून येथे वसंत अतिसुंदर रूप धारण करतो. विशेषतः त्याचं अस्तित्व खाली सपाट प्रदेशात जास्त काळ टिकून राही. शिशिर ऋतूत सर्व वृक्षावरील पर्णराजी झोडपून टाकली गेल्यामुळं ते नग्न आणि उघडेबोडके दिसू लागत. जेलच्या दरवाजासमोर असलेल्या चार पिंपळवृक्षांनी आपली सारी पाने फेकून दिली होती याचं मला आश्चर्य वाटे. वसंताचं आगमन त्यांच्या नसानसात जीवन भरून टाकीपर्यंत ते वृक्ष रोड आणि उदास अवस्थेत तेथे उभे असत. अकस्मात त्या पिंपळवृक्षात आणि इतर वृक्षातही चैतन्य निर्माण होई आणि अगोचर अशी गूढ प्रक्रिया त्यांच्यात होत असलेली दिसून येई, आणि त्या वृक्षातून हिरवे कोंब डोकावून पाहात असताना मला दिसले की, माझं मन थरारून जाई. ते दृश्यच मनोहारी आणि चैतन्यकारक होतं आणि मग अति जलद गतीने, लाखोच्या संख्येनं पानं तरारून फुटत. सूर्यकिरणात चकाकत आणि वायुलहरीवर नाचत. लहान कोंबापासून पानापर्यंत होणारा हा अकस्मात बदल किती आश्चर्यकारक असतो."

तुरुंगात असतानाही तेथील एकांतवासामुळं किंवा बाह्य जगाशी वा आप्त-स्वकीयांशी संपर्क तुटल्यामुळं नेहरूंची रसिक आणि निसर्गप्रेमी वृत्ती मूक झाली नव्हती किंवा उदासही झाली नव्हती. किंवा बाह्य जग नजरेस पडत नाही म्हणून स्वतःशी कुढत किंवा खंत करीत ते बसले नाहीत. सर्वसाधारण कैद्यांची अशा तुरुंगवासात जी शारीरिक आणि विशेषतः मानसिक अवस्था होते तशी त्यांची अवस्था होऊन गेली नव्हती. उलट, बाह्य जगातील अनेकविध कार्यात लोपून गेलेली त्यांची रसिक व निसर्गप्रेमी दृष्टी कारावासाच्या मर्यादित जगात, आजूबाजूच्या परिसरात किंवा कोठडीतून दिसणाऱ्या मर्यादित छोट्याशा जगेत दिसणारं षड्ऋतूतील निसर्गसौंदर्य शोधकतेनं टिपून घेत होती. परंतु, त्यांचे खंडित कारावास नेहमी एकाच तुरुंगात न गेल्यामुळं नेहमीच त्यांच्या वाट्याला

एकच तुरुंग येत नसे. एखाद्या वेळेस असा एखादा तुरुंग त्यांच्या नशिबी येई की, सदैव निसर्गसौंदर्य शोधून ते टिपून घेणाऱ्या त्यांच्या नजरेला निसर्गाचं दर्शनही दुर्लभ होऊन जाई. कधी कधी त्यांना अशा एखाद्या तुरुंगात ठेवण्यात येई की, तेथील वातावरण उदास व भकास असे आणि तो तुरुंगवास त्यांना उद्वेगजनक वाटे. अलिपूर येथील तुरुंग अशाच प्रकारचा होता. या तुरुंगात नेहरूंच्या वाट्याला दहा × नऊची कोठडी आली होती. त्या कोठडीपुढं एक व्हरांडा व त्यापुढं अंगण होतं. अंगणाभोवतालची भिंत ठेंगणी म्हणजे फक्त सात फूट उंचीची होती आणि त्या भिंतीवरून त्यांना दर्शन कशाचं होई तर एकमजली, दुमजली, गोल, चौकोनी चमत्कारिक छपरांच्या घरांचं; एकामागून एक वर आलेली.

या दृश्यानं अलिपूरच्या तुरुंगात असताना नेहरूंच्या मनावर आघातच झाला. इतर तुरुंगात पाहिलेल्या दृश्यांपेक्षा हे दृश्य त्यांना वेगळं खरं; पण भयानक वाटलं.

नेहरूंचा नववा आणि शेवटचा बंदीवास दीर्घकालीन होता. १९४५ साली अहमदनगर किल्ल्यातील त्यांच्या या बंदीवासाचं वैशिष्ट्य असं होतं की, त्याला कुणी मुदत घालून दिली नव्हती. यापूर्वीचे कारावास न्यायाधिशाने मुदत घालून दिलेल्या शिक्षेचे होते. त्यामुळं प्रत्येक कारावासाची कालमर्यादा निश्चित होती. परंतु, अहमदनगर येथील कारावास अनिश्चित होता. रात्रीच्या वेळी त्यांना अहमदनगर येथील किल्ल्यात आणून ठेवलं. त्या किल्ल्यात प्रवेश करताना आपलं स्वागत कशा प्रकारानं केलं याचं नेहरू वर्णन करतात : " काळोखानं व्यापल्या गेलेल्या आकाशातील शुक्लपक्षातील लुकलुकणाऱ्या चंद्रकोरीनं आमचं स्वागत केलं. रोज वृद्धिंगत होत जाणाऱ्या चंद्राचा तो उज्ज्वल पक्ष सुरू झाला होता. त्यानंतर, शुक्लपक्ष सुरू होताच बंदीवासातील आणखी एक महिना गेल्याचं स्मरण मला होई. दीपावलीनंतर, शुक्लपक्षाच्या प्रारंभीच सुरू झालेल्या या शेवटच्या तुरुंगवासात हीच परिस्थिती होती. माझा नेहमीचा सहचर चंद्र, अधिक सहवासानं, माझा मित्र बनला होता. त्यामुळे विश्वसौंदर्याची, जीवनाच्या चढउतारांची, अंधःकारामागून येणाऱ्या प्रकाशाची, आणि आळीपाळीने येणारा मृत्यू व पुनरुत्थान यांची मला आठवण होई. सावल्या लांब होत जाताना,

रात्रीच्या निवांत वेळी, आणि प्रभातकालीन निःश्वास आणि किलबिल होत असताना, उगवत्या दिवसाचं अभिवचन देत असता, नित्य बदलत्या स्वरूपात, पण मूलतः तोच असलेल्या चंद्राच्या विविध कलांकडे आणि भावनांकडे मी पाहत बसत असे. दिवस-मासांच्या गणनेला चंद्र किती मदत करीत असतो! कारण जेव्हा चंद्र आकाशात दिसतो त्या वेळी त्याचा आकार, बहुंशी बिनचूक, महिन्याचा कोणता दिवस आहे हे दर्शवीत असतो."

स्वतंत्र असताना आणि कारावासातही नेहरूंनी भारतातील निसर्गसौंदर्याचा भरपूर अनुभव घेतला, परंतु, खऱ्या निसर्गसौंदर्यपूजकाची वृत्ती आणि दृष्टी स्थलकालातील असते; निसर्गसौंदर्य, मग ते कुठल्याही राष्ट्रातील असो, ती वृत्ती आणि दृष्टी अचूक टिपून घेते, नेहरूही त्याला अपवाद नव्हते : "सिलोन-(लंका) मधे असताना त्यांच्या निसर्गसौंदर्याचा वेध घेणाऱ्या दृष्टीने तेथील सौंदर्य टिपून घेतलं. लंकेचा किनारा दूर विरत गेला होता आणि उंच माड क्षितिजापाशी छोटे ठिपक्यांसारखे दिसत होते. तेथील आमचं वास्तव्य अविस्मरणीय होतं. कारण, लंका ही मोहमयी भूमी आहे आणि तिचं सौंदर्य आणि निसर्गाची उधळण नजरेची तृप्ती करण्यास समर्थ अशी आहे. तेथे नित्य तिसरा प्रहरच आहे असा भास होतो आणि उन्हाळ्यातील वायुलहरी रुबाबदार तालवृक्षातून सळसळत वाहत असतात. विशाल हिरवा सागर, मनोहर हरित किनाऱ्याचं अलगद चुंबन घेत असतो आणि ऐकणाऱ्याचं सांत्वन करून त्याला प्रफुल्लित करणारं अंगाईगीत गात असतो. त्या ठिकाणी व्यवहारी जगातील झगडे आणि दुःख कोणीही विसरून जातो."

आपल्या समग्र जीवनात, निसर्गाच्या विविध सौंदर्याचा नेहरूंनी रसास्वाद घेतला, तरी त्यांची इच्छा व नजर अतृप्तच राहिली होती. स्वप्नं प्रत्यक्षात आली नव्हती. १९१६ साली नेहरू काश्मीरमध्ये गेले होते आणि अमरनाथचा प्राणघातक प्रवासही त्यांना अर्धवट सोडून द्यावा लागला होता. त्या वेळी त्यांनी एक स्वप्न उराशी बाळगून ठेवलं होतं. "काश्मीरमधील उंचावरील दऱ्या आणि पर्वत याचं मला नेहमीच आकर्षण वाटत आलं आहे. आणि त्यामुळं लवकरच परत काश्मीरमध्ये प्रवास करण्याचा मी निश्चय केला. या प्रवासाच्या मी पुष्कळ योजना आखल्या आणि प्रवासाचे मार्गही निश्चित केले आणि त्यातील एक प्रवास तर, त्याचा नुसता विचारच माझ्या मनाला रोमांच-

कारक करणारा होता. तिबेटमधील मानस-सरोवर आणि त्या नजिकच्या बर्फाच्छादित कैलास शिखराला भेट, हाच तो प्रवास होय. परंतु; आज या गोष्टीला अठरा वर्षे झाली, अजूनही मी कैलास आणि मानससरोवर यांजपासून पूर्वीप्रमाणेच दूरदूर राहिलो आहे. कितीही उत्कंठा वाटत असली तरी, पुन्हा मी काश्मीरला भेट दिलेली नाही. आणि राजकारण आणि सामाजिक कार्य यांच्या जंजाळात जास्त जास्तच गुरफटत गेलो आहे. पर्वतावरील प्रवास किंवा सागराचं उल्लंघन यांऐवजी नित्य तुरुंगात येण्यात माझी प्रवासाची भूक भागवावी लागत आहे; परंतु, अजूनही मी योजना आखीतच असतो, कारण तुरुंगातील, त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला कुणीच बंधन घालू शकत नाही. शिवाय, तुरुंगात तरी दुसरं काय करणार? आणि ते कैलास शिखर आणि ते मानस सरोवर यांजपर्यंत जाऊन पोहोचण्यासाठी, हिमालयात प्रवास करून आणि पर्वतांचं उल्लंघन करून, माझी इच्छा तृप्त करणाऱ्या त्या दिवसाचं स्वप्न मी पाहत असतो; परंतु, मध्यंतरीच्या काळात, जीवनसरिता वाहत राहील, यौवनावस्था मध्यम वयात पदार्पण करील आणि नंतर त्याची जागा काही तरी अघटित अदृष्ट घेईल; आणि कधी कधी माझ्या मनात विचार येतो की, कैलास आणि मानससरोवर यांजपर्यंत पोहोचण्यास वृद्धत्वामुळं मी असमर्थ होईन. परंतु, अंतिम यश नजरेला दिसत नसलं, तरीही तो प्रवास अमोल असाच आहे."

१९३६ साली प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रात, त्यांनी आपलं १९१६ सालापासूनचं हे रम्य स्वप्न लिहून ठेवलं आहे. त्यानंतर राजकारणानिमित्त काश्मीरमध्ये ते गेले होते हे खरं. पण १९६४ साली 'अघटित अदृष्ट' घडून त्यांचं निधन होईपर्यंतच्या त्यांच्या पुढील जीवनात, सतत ४८ वर्षे, कैलास आणि मानससरोवर यांचं दर्शन घेण्याचं, ते स्वप्न कधीच साकार झालं नाही.

卐 卐 卐

१

संस्कृतिसंपन्नता

"संपन्न मातापित्याचा एकुलता एक मुलगा. विशेषतः भारतात, बिघडण्याचीच शक्यता असते. आणि त्याच्या वयाचा अकरा वर्षांच्या पहिल्या जीवनात तो एकच मूल असेल तर, बिघडण्यापासून याची सुटका होण्याची आशा कचितच करता येईल."

आपल्या आत्मचरित्राची सुरुवात स्व. पंडित नेहरूंनी वरील शब्दांनी केलेली आहे.

परंतु, नेहरूंच्या बाबतीत मात्र, ते न बिघडण्याची आशा करण्यास खूपच जागा होती. एवढंच नव्हे, सर्वसामान्यपणे श्रीमंत आईबापांच्या पोटी आलेल्या

एकुलत्या एक, आणि विशेषतः त्या मुलाच्या नंतर अकरा वर्षे दुसऱ्या अपत्याचा जन्म झालेला नाही, असा मुलगा बिघडण्याची शक्यता, विशेषतः भारतात आढळात येत असली तरी, नेहरूंच्या बाबतीत मात्र हे विधान किंवा शक्यता साफ खोटी ठरली— त्यांच्या पुढील सुसंस्कृत जीवनानं खोटी ठरविली गेली. अर्थातच, ही परिस्थिती आपोआप घडून आली नव्हती. मुलगा बिघडण्यास जी परिस्थिती कारणीभूत होते त्या परिस्थितीचा अभाव, नेहरूंच्या मातापित्यांनी जाणीवपूर्वक निर्माण केलेला होता. आपला एकुलता एक मुलगा न बिघडता, सुसंस्कृत, उच्च आचार-विचारसरणीचा, ध्येयमार्गी व आपल्या कुळाला ललामभूत व्हावा यासाठी त्याच्या बालमनावर तसलेच उच्च संस्कार घडले जातील याची योग्य खबरदारी त्याच्या मातापित्यांनी घेतली होती. हे उच्च संस्कार कोणते होते आणि ते कशा पद्धतीनं नेहरूंच्या बालमनावर घडवले गेले याचा धावता आढावा दुसऱ्या प्रकरणात घेतला आहे त्यावरून कोणालाही सहज करून घेता येईल. असले उच्च संस्कार नेहरूंच्या मनावर झाल्यामुळंच अत्यंत थोर सुसंस्कृत पुरुष म्हणून नेहरूंची साऱ्या जगात ख्याती झाली. १९११ साली म्हणजे नेहरूंच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी, अलाहाबाद हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश सर रॉबर्ट आइक्मन् यांची व नेहरूंची इंग्लंडमध्ये भेट झाली होती. त्या भेटीत नेहरूंच्या आचरणातील सभ्यता आणि शिष्टपणा यांनी ते इतके भारावून गेले होते की, आपले मित्र पंडित मोतीलाल नेहरू यांना त्यांनी पत्र लिहिले. त्या पत्रात सरसाहेबांनी लिहिलं होतं : " अभिमान वाटावा असाच तुमचा पुत्र आहे. किती निर्दोष शिष्टाचार ! "

तरुण वयात, आणि विशेषतः इंग्लंडमधील वास्तव्यात, नेहरूंच्या आचरणात दिसून येणारी सभ्यता आणि सुसंस्कृतपणा, शेवटपर्यंत, वाढत्या वयाबरोबर आणि जीवनातील विविध कटू अनुभव येऊनही, टिकून राहिला. १९५९ साली, म्हणजे नेहरूंच्या निधनापूर्वी, फक्त पाचच वर्षे प्रसिद्ध झालेल्या " नेहरू—राजकीय चरित्र " या ग्रंथात, कॅनेडियन प्रो. मायकेल ब्रेचर, यांनी नेहरूंची प्रदीर्घ मुलाखत घेतली; त्या वेळी त्यांच्या मनावर नेहरूंच्या आचार-विचारांचा परिणाम झाला तो वर्णन करताना त्यांनी लिहिलं आहे : " त्यांच्या (नेहरूंच्या) उत्कट निष्ठेचा, जिव्हाळा आणि मृदुता याचे निःश्वास प्रकट करणाऱ्या त्यांच्यातील मानवी स्पर्शाचा सर्वांत सुस्पष्ट असा ठसा उमटला. "

नेहरूंच्या अमाप लोकप्रियतेच्या कारणांची चिकित्सा करताना प्रो. ब्रेचर पुढे लिहितात : " भारतातील आणि अति दूरच्या प्रदेशातील सर्व विविध जीवन-मार्गांवरील व्यक्ती फार काळपर्यंत नेहरूकडे आकर्षिल्या गेल्या, या नेहरूंच्या असामान्य आकर्षणाची त्यांच्यातील व्यक्तिगत गुणसमुच्चयात, ही गुरुकिल्ली असल्याचे दिसून येते.....त्यांचा ज्यांना माहिती आहे. त्यांनी नेहरूंचा प्रामाणिकपणा आणि निःस्वार्थ वृत्ती, हेतूंविषयीची निष्ठा, आणि त्यांना प्रिय असलेल्या कार्याबद्दलची भक्ती विशेषतः भारतीय स्वातंत्र्य आणि जागतिक शांततेसंबंधी एकनिष्ठता याबद्दल गौरव केलेला आहे. त्यांच्या उदारपणामुळं आणि सहकाऱ्यांबद्दलच्या आत्मीयतेमुळे काही व्यक्ती त्यांच्या अगदी निकटच्या झाल्या, आणि इतर स्पष्ट प्रतीत होणारी त्यांच्या हेतूंबद्दलची शुद्धता आणि प्रामाणिकपणा यामुळे त्यांच्याकडे आकर्षिले गेले. त्यांच्या मोहक व्यक्तिमत्त्वाला बळी न पडलेले क्वचितच. अनेकांना त्यांच्यातील विरक्तपणा, आणि बौद्धिक सहिष्णुता, त्यांचा ध्येयवाद आणि सर्वसत्ताधीशतेचा त्याग याबद्दल आदर वाटतो. इतरांना अजूनही नेहरू भावनाविवश, यौवनयुक्त आणि जनतेचा धैर्यशाली पुढारी, पराकाष्ठेचा मानवी, निर्भय आणि दलितांचा कैवारी अशी राजकारणातील अद्‌भुतरम्य नायकाची प्रतिमाच वाटते."

जॉन गुंथर आपल्या " अंतर्गत एशिया " नेहरूंचं थोडक्यात वर्णन करताना म्हणतात : " असामान्य मानव,... देखणा, सुसंस्कृत आणि अपवादात्मक चोखंदळ आति भावनाविवश...पाश्चात्त्य बनलेला भारतीय, समाजवादी झालेला उमराव, जनतेचा थोर पुढारी झालेला व्यक्तित्ववादी... आधुनिक मनाचा, तर्कशुद्ध विचारसरणीचा पूर्णपणे प्रागतिक, अज्ञेयवादी, मध्ययुगीन विशाल भारतासमोर उभा ठाकलेला नेहरू हा आधुनिक पुरुष आहे. "

" सत्तेची वर्षे " या ग्रंथात नेहरूंसंबंधी विस्तृत चिकित्सा करीत असता " व्हिन्सेंट शीन् " लिहितात : " चूक घडून येण्याच्या शक्यतेबद्दल ते नेहमी जागरूक असतात. आपल्या मनातील विचार ते बोलून दाखवितात हे खरं आहे, परंतु एखाद्या विषयावरील आपलं मतच शहाणपणाचं आहे असा दंभ ते कधीच बाळगीत नाहीत. इतरांनी आपले विचार प्रगटपणे बोलून, शक्य असेल तर आपली खात्री पटवून द्यावी अशी नेहरूंची इच्छा असे ....."

उत्स्फूर्त, अंगभूत सौजन्य, असभ्यता आणि दांभिकता यांचा तिटकारा आणि उच्च जोपासना केलेली विनोदबुद्धी नेहरूंमध्ये होती. परंतु विनोदाचा उपयोग शस्त्रासारखा त्यांनी कधीच केला नाही. तर सभ्यपणाने आनंदासाठी केला. इतर सर्व गोष्टींप्रमाणं विनोदाचा उपयोग स्वतःचे बाबतीतसुद्धा ते करीत. खोडकरपणा त्यांच्यात असला तरी त्याला ताब्यात ठेवण्याची इच्छाशक्ती त्यांच्यात होती. विचार आणि उच्चार यांचं स्वातंत्र्य तर त्यांच्या बुद्धीमत्तेच्या रक्तातच भिनलं होतं; आणि स्वतःप्रमाणेच इतरांनाही असावं असा त्यांचा दावा असे."...

नेहरूंची सभ्यता आणि सौजन्य, मनाचा उदारपणा आणि मोकळेपणा, मानवी मूल्यांची त्यांनी केलेली जोपासना, आपल्याला जे हक्क आहेत किंवा हवे आहेत, त्याप्रमाणेच ते इतरांनाही आहेत हे मानण्याची प्रवृत्ती, इतरांच्या विचारांबद्दल आणि मतांबद्दल आदर वगैरे गुणांबद्दल ज्यांना एकाच शब्दात सुसंस्कृतपणा असं म्हणता येईल त्याबद्दल भारताबाहेरील राष्ट्रांतील काही थोर विचारवंतांची मते थोडक्यात वर उद्धृत केलेली आहेत. ही अवतरणे नेहरूभक्तांची नाहीत ही गोष्ट सहज लक्षात यावी. परंतु, त्या उताऱ्यांवरून ते नेहरूभक्त – निदान नेहरूंच्याविषयी आदर असलेले असावेत अशी शंका कोणालाही येणं साहजिकच आहे. परंतु, नेहरूंच्या सुसंस्कृतपणाबद्दल त्यांच्या विरोधकांनाही आदर होता. प्रा. हिरेन् मुकर्जी हे काही नेहरूंचे भक्त नव्हते, ही गोष्ट जगजाहीर आहे. "सभ्य महापुरुष" (The gentle colossus) या नेहरूंवरील आपल्या ग्रंथात नेहरूंच्या सुसंस्कृतपणाबद्दल ते लिहितात : "त्यांच्या जीवनाकडे मागे नजर टाकून पाहताना त्यांचं जीवन म्हणजे एक यशस्वी जीवनाची कथा नसून, सर्वसाधारणपणे क्षुद्रता आणि स्वार्थ यांपासून अलिप्त असलेल्या जीवनाची कथा आहे, आणि जीवनाचं सौंदर्य, रात्रींच्या ताऱ्याप्रमाणं प्रकाशमान होत आहे...वैशिष्ट्यपूर्ण सौजन्य आणि आत्मिक सौंदर्य हीच त्यांच्या (इतर महापुरुषांमध्ये) असामान्यतेची कारणे आहेत. "द्वेषविरहितता आणि निर्भयता" एवढीच कारणे नव्हेत तर, आपल्या मनात आणि हृदयात जे दुःख सतत बाळगलं आणि ज्याच्यामुळं ते विशाल जगाचे मित्र बनले, तेही त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे."

प्रा. हिरेन् मुकर्जीप्रमाणेच कै. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांनीही आपल्या "पथिक" (दुसरा खंड) यामध्ये नेहरूंच्या "थोर व्यापक आणि द्वेष-विरहित हृदयाची प्रचीती" आल्याचं नमूद करून ठेवलेलं आहे.

भारतातील व जगातील काही थोर विचारवंतांची व राजकीय पुरुषांची नेहरूंच्या सुसंस्कृतपणाबद्दल वर दिलेले विचार मान्य करण्याबाचून गत्यंतरच नाही. प्रा. हिरेन मुकर्जी यांनी लिहिल्याप्रमाणं नेहरूंचं "सांस्कृतिक दर्शन" 'ताऱ्याप्रमाणं प्रकाशमान' झालेलं आहे. आणि नेहरूंचा सुसंस्कृतपणा हेच, त्यांच्या असामान्य लोकप्रियतेचं कारण आहे. नेहरूंच्या राजकारणाबद्दल तीव्र व क्वचित हिंसक असंतोष प्रगट करणारे त्यांचे राजकीय विरोधकही नेहरूंच्याबद्दल काही करू शकले नाहीत, धजले नाहीत किंवा असमर्थ ठरले ते नेहरूंच्या सुसंस्कृत आणि विरोधकांबद्दलही त्यांच्या मनात वास करीत असलेल्या सौजन्यशील आणि उदार वृत्तीमुळेच होय, असं म्हणणं मुळीच घाडसाचं होणार नाही.

नेहरूंच्या सुसंस्कृतपणाबद्दल भारतीय आणि परकीय विचारवंतांची आणि त्यांच्याद्वारे सर्वसामान्य जनतेची मते आणि विचार आपण ध्यानात घेतले व त्याचे इष्ट परिणाम काय झाले हे आपण अत्यंत सूत्ररूपानं पाहिले. परंतु सुसंस्कृतपणा म्हणजे नक्की काय; सुसंस्कृत म्हणून घ्यायला कोणते गुण आवश्यक असतात याबद्दलची खुद्द नेहरूंची मते आणि विचार काय होते? आणि ते विचार व मतं त्यांनी आचरणात कितपत आणली? त्यांच्या दृष्टीनं सुसंस्कृत व्यक्तींच्या अंगात आवश्यक असलेले किती गुण खुद्द नेहरूंमध्ये होते? संस्कृती म्हणजे काय? संस्कृती ही एकच परंपरागत चालत आलेली असते? की काल-प्रवाहाबरोबर तिच्यात बदल घडत जातो? या प्रश्नांबद्दल नेहरूंची कोणती मते होती?

"जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" या पुस्तकात संस्कृती आणि सुधारणा यांचा उगम आणि वाढ कशी होत गेली याचा आढावा नेहरूंनी थोडक्यात घेतला आहे. आदिमानवांना उदरंभरणासाठी अन्नशोधन करणेही कठीण पडत असे. ते शिकार करीत आणि कंदमुळे आणि फळे यांचा शोध घेत दिवसानु-दिवस हिंडत-फिरत असत. आणि त्यासाठी दशादिशांना फिरत असत. हळूहळू

त्यांच्यात टोळ्या निर्माण झाल्या. एकत्र वास्तव्य आणि एकत्रपणाने शिकार करणं सुरक्षित असल्यामुळे टोळ्यांनी राहणे सोईस्कर होते. या टोळ्या कुटुंबाप्रमाणे राहत. अशा परिस्थितीत शेतीचा शोध लागून त्यांच्या जीवनात एकदम क्रांती झाली. आणि त्यामुळे खेड्यांचा जन्म झाला. परंतु त्याबरोबरच आणखीही एक बदल घडून आला. गरजेपेक्षा जास्त निर्माण झालेल्या अन्नाचा साठा करण्याची प्रथा निर्माण झाली. त्यामुळे जीवनात थोडेफार प्रश्न निर्माण झाले. काही मानव प्रत्यक्ष शेतात खपत, तर काही व्यवस्था बघणे व रचना करणे, संघटना करणे ही कामे करू लागले. साहजिकच व्यवस्थापक आणि संघटक प्रबळ बनले. आणि त्यातूनच जमीनदार, राजेमहाराजे हा सामर्थ्यशाली वर्ग निर्माण झाला. त्याचा परिणाम असा झाला की, हा वर्ग उत्तरोत्तर संपन्न होत गेला व प्रत्यक्ष शेतात राबणारे शेतकरी मात्र पोटापुरत्या अन्नाचेच धनी राहिले. पुढे पुढे संघटक व व्यवस्थापक-वर्ग निष्क्रिय व आळशी बनला; परंतु, शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नातील मोठा वाटा हक्काने मिळवू लागले. शेतीच्या शोधामुळे पूर्वीच्या एकसंध मानवी जीवनात वर्ग निर्माण होऊन समाजाची सारी बैठकच बदलली गेली. शेतीबरोबर आनुषंगिक व इतरही अनेक धंदे निर्माण झाले. परंतु, सत्ता मात्र सामर्थ्यशाली वर्गाच्या हातातच राहिली. तरी पण शेतीच्या व इतर व्यवसायात अल्पकाळात जास्तीत जास्त उत्पादन करण्याचे शोध निर्माण होत होते. त्याबरोबरच धंदे व व्यवसायही वाढत होते. परंतु, सर्व सत्ता आणि उत्पादनापासून होणारे फायदे मात्र मूठभर सामर्थ्यशाली लोकांनाच मिळू लागले. या वर्गानं स्वतःला सर्वच सामाजिक बाबतीत, सामर्थ्याच्या व संपन्नतेच्या बळावर, आपल्या वर्गाला प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली. एकीकडे हा वर्गही प्रबळ होत होता; आणि प्रत्यक्ष शरीरकष्टाने उत्पादन करणारा वर्गही वाढत गेला तरी दरिद्रीच राहिला.

तरीही पूर्वकालीन मानव प्रगती करीतच होता आणि त्याने हळूहळू निसर्गावरही आक्रमण करण्यास सुरुवात केली. अरण्ये कापून खेडी व नगरे निर्माण केली; व त्यासाठी निसर्गाच्या साधनांचा भरपूर उपयोग करून घेतला. निसर्गाचं भय आणि त्याच्या प्रक्रियेतील खुळ्या समजुती दूर करू लागला. निसर्गाला समजून घेऊ लागला. मानवसमाज निर्माण होऊन मूळ धरू लागला. उत्पादनाबरोबरच काही वर्षांत स्वास्थ्य निर्माण झालं. आणि या स्वास्थ्यातूनच पालन-पोषणाच्या प्रश्नापलीकडे असलेल्या सृष्टीतील अनेक गोष्टींचे विचार त्याच्या

मनात निर्माण होऊ लागून, त्या प्रश्नाची उत्तरेही शोधून काढण्याच्या उद्योगाला तो लागला. विचारांच्या प्रगतीबरोबरच कला, कसब आणि संस्कृतीचा जन्म होऊन, त्यांचीही वाढ आणि प्रगती होऊ लागली. लोकसंख्येच्या वाढीबरोबर, मानवातील परस्परसंबंध दृढ होत गेले. देवाणघेवाण, व्यवहार वाढला आणि उत्पादनाचा देवघेवीचा धंदा सुरू झाला. परस्पर विचारविनियम होऊन, सहिष्णुता व समजूत वाढीस लागली. समाजधारणेस आवश्यक असणारं परस्पर-सहकार्य आणि सहकारी व शेजारी यांच्यात आप्तभावही वाढीस लागला. अशा रीतीने लोकसंख्येच्या वाढीबरोबरच अधिक निकटच्या सामाजिक जीवनाकडे मानवाची प्रवृत्ती वाढू लागली; इतरांच्याबद्दल सहिष्णुता आणि वर्तनातील संयमही निर्माण झाला. संस्कृतीचा आणि सुधारणांचा जन्म आणि प्रगती याच क्रमाने होत गेली. मानवावर सामाजिक बंधने पडू लागली. नैतिक मूल्ये निर्माण झाली, सामाजिक प्रतिष्ठेच्या, सातत्याच्या आणि दृढ बैठकीसाठी शास्त्रे निर्माण झाली.

हे सर्व घडत गेलं तरी "संस्कृती आणि सुधारणा यांच्या व्याख्या करण कठीण आहे" म्हणून नेहरू त्या व्याख्या करीत नाहीत. "परंतु, संस्कृती-मध्ये ज्या अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्यांमध्ये आत्मसंयमन आणि इतरांच्याबद्दल जाणीव या दोन गोष्टींचा खात्रीने समावेश होतो" असं नेहरू बजावतात. "माणसाचा स्वतःवर ताबा नसेल आणि दुसऱ्यासंबंधीची जाणीव नसेल तर तो माणूस खात्रीनं असंस्कृत आहे असंच म्हणावं लागेल."

इतिहासाच्या अभ्यासानं, जग हे हळूहळू परंतु निश्चितपणे प्रगतिपथावर आहे, ही शिकवण मिळते. रानटीपणाच्या अवस्थेतून सुधारणेपर्यंत मानवाचा जो विकास होत गेला त्याचंच दर्शन इतिहासात घडतं. सहकार आणि सहकार्य हेच एकमेव ध्येय, सामाजिक हिताच्या दृष्टीनं डोळ्यापुढं ठेवलं गेलं होतं. कधी कधी, या ध्येयाचा विसर पडलेला इतिहासाच्या काही भागातून दिसून येतो हे खरं आहे. आजही तीच परिस्थिती कायम आहे. स्वार्थानं एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करीत आहे; एक मनुष्य दुसऱ्या माणसाची पिळणूक करीत आहे. या प्रकारानं कधी कधी मानव प्रगत होत आहे की त्याची अधोगती होत आहे असा संभ्रम पडतो. असं जरी असलं तरी आपल्या राष्ट्राच्या इति-हासात वैभवाचे काळ येऊन गेले आहेत. आजच्या काळातील कोणत्याही

गोष्टींच्या बाबतीत ते काळ निःसंशय किती तरी पटीने श्रेष्ठ होते. प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात असे चढउतार, वैभवाचे व त्याबरोबरच अधोगतीचे काळ निर्माण होत असतात. आणि त्याबद्दल निराश होण्याचं कारण नाही. आपल्या देशावरही अनेक साम्राज्ये निर्माण झाली, लयाला गेली. आक्रमणं झाली, फार मोठ्या प्रमाणात नाश करण्यात आला, लुटालूटही झाली. सुधारणांचं किंवा प्रगतीचं सातत्य कधीच एकसंध राहिलं नाही. तरी पण या सर्व प्रकारांमुळं प्रगतीचा धागा कधींच तुटला नाही. आपण आपल्या जुन्या वर्तनापासून परावृत्त झालो, जुन्या संस्कृतीवर धुळीचे थर बसले तर कधी घाणही फेकली गेली आणि अनेक वर्षे ती तशीच राहिली. परंतु, तरीही ती प्रगती आणि संस्कृती जिवंत आहे आणि आजही भारतीय जीवनाचा ती आधार आहे. विज्ञानामुळं त्यांच्यात बदल होईल हे निश्चित. परंतु, शतकानुशतकांपासून, इतिहासाच्या प्रातःकालापासून आपल्यापर्यंत चालत आलेल्या भारतीय प्रगतीचा आणि संस्कृतीचा विचार मनात येतो तेव्हा मन चकित होऊन जातं. एका दृष्टीने या शतकानुशतकांचे आपण भारतीय वारस आहोत.

एका संस्कृत पुस्तकात एक श्लोक नेहरूंच्या वाचनात आला होता, त्याचं इंग्रजी भाषांतर करून ते नेहरूंनी उद्धृत केलं आहे.

"कुटुंबाकरिता व्यक्तीचा, समाजाकरिता कुटुंबाचा, देशाकरिता समाजाचा आणि आत्म्यासाठी सबंध जगाचा त्याग करावा." हा श्लोक उद्धृत करून नेहरू म्हणतात की, आत्मा म्हणजे नक्की काय हे आपल्यापैकी थोड्याच लोकांना माहीत असेल किंवा सांगू शकतील, आणि प्रत्येक व्यक्ती निराळ्याच रीतीने त्याची व्याख्या करील. परंतु, हा संस्कृत श्लोक, विशाल गोष्टींकरिता सहकार्य आणि त्याग याची आवश्यकता असल्याचंच प्रतिपादन करतो. या तत्त्वाचा विसर आपल्याला पडल्यामुळंच आपला अधःपात झाला. परंतु, त्याची जाणीव झाल्याचा प्रत्यय स्वातंत्र्ययुद्धात दिसून आला. हे कार्य विशाल होतं यात शंका नाही. परंतु, मानवतेचं कल्याण व स्वातंत्र्य हे त्याहून मोठं आहे. आणि म्हणून साऱ्या मानवजातीचा उद्धार आणि स्वातंत्र्य हे मानवी संस्कृतीचं कार्य आणि ध्येय असलं पाहिजे. राष्ट्रीय स्वातंत्र्य हे संस्कृतीचं एक महत्त्वाचं अंग आहे.

"मानवाचा आंतरिक विकास असा अर्थ संस्कृतीचा होऊ शकेल का?" असा प्रश्न, नेहरूंनी ९ एप्रिल १९५० साली इंडिअन् कौन्सिल फॉर कल्चरल

रिलेशन्स् " या संस्थेच्या उद्घाटन-प्रसंगी केलेल्या भाषणात उपस्थित करून त्यांनी त्याचं उत्तर ' अर्थातच तो तिचा अर्थ असला पाहिजे ' असंच दिलेलं आहे. त्याबरोबरच, दुसऱ्यांशी व्यक्तीची होणारी वागणूक, दुसऱ्या व्यक्तीची जाणीव आणि दुसऱ्या व्यक्तींना स्वतःचीही जाणीव करून देणं या गोष्टीही सांस्कृतिक कक्षेत येतात. दुसऱ्याचा दृष्टिकोन एखाद्या व्यक्तीला समजू शकत नाही याचाच अर्थ, त्या व्यक्तीच्या मानसिक आणि सांस्कृतिक विकासाला मर्यादा पडल्या आहेत, असाच होतो. कारण, काही असामान्य महापुरुष बगळले तर, सर्वसाधारण माणसाला पूर्ण ज्ञान किंवा शहाणपण असत नाही. दुसरे पक्ष, अगर गट यांनाही थोड्याफार प्रमाणात ज्ञान, शहाणपण किंवा सत्य समजत असतं, आणि त्याकडे आपण दुर्लक्ष केलं तर आपण स्वतःचाच तोटा करीत नसून, सुसंस्कृत मानवाचा विरोध असणारी मनःप्रवृत्ती आपण स्वीकारीत असतो. सुसंस्कृत मन, खंबीरपणे आपलं अस्तित्व टिकवूनही, आपल्या खिडक्या आणि दरवाजे उघडे ठेवीत असतं. दुसऱ्यांचा दृष्टिकोन मनाला सदैव पटला नाही तरी त्याला तो दृष्टिकोन समजून घेण्याची शक्ती असावी लागते. एखाद्या गोष्टीचा समज आला तरच संमतीचा किंवा विरोधाचा प्रश्न उभा राहत असतो. असं नसेल तर, अंधपणानं प्रगट केलेला विरोध हा सुसंस्कृत मार्ग नव्हे.

" संस्कृती म्हणजेच मनाचा आणि आत्म्याचा विकास होय. संकुचित मन, किंवा मानवी आणि राष्ट्राच्या चैतन्याला घातलेलं बंधन म्हणजे संस्कृती असं कधीच घडता उपयोगी नाही " असाही एक विचार २२ एप्रिल १९५० रोजी केलेल्या एका भाषणांत नेहरूंनी प्रगट केलेला आढळतो.

संस्कृतीच्या गप्पा सर्व ठिकाणी मारल्या जातात आणि त्यामुळे सर्वत्र संस्कृतीचं अस्तित्व आहे असा भास होत असतो. परंतु, नेहरूंच्या मतानं, सर्वसाधारणपणे जे लोक संस्कृतीचा उदोउदो करताना आढळतात, त्यांच्यात संस्कृतीचा संपूर्ण अभाव असतो. सर्वप्रथम, संस्कृती ही कधीच उच्चरवात बोलण्याची गोष्ट नाही. ती अबोल, संयमित आणि सहिष्णू असते. एखाद्या व्यक्तीची संस्कृती, तिच्या अबोलपणात, हावभावात, एखाद्याच शब्दसमूहात किंवा विशेषेकरून तिच्या प्रत्यक्ष जीवनात प्रगट होत असते. वापरण्यात येणाऱ्या विशिष्ट शिरस्त्राणात, घेण्यात येणाऱ्या अन्नात किंवा अशाच प्रकारच्या दिखाऊ

गोष्टींवर संस्कृती अवलंबून आहे असा एक चमत्कारिक समज रूढ होऊ पाहात आहे. या गोष्टींना थोडं फार महत्त्व असलं तरी जीवनाच्या विशाल संदर्भात त्या अगदीच गौण ठरतात. (१२ जून १९५० रोजी सिलोन विश्वविद्यालयात नेहरूंनी केलेले भाषण.)

संस्कृतीला जर काही मूल्य प्राप्त होत असेल तर ते तिच्या सखोलतेत आहे, आणि त्याबरोबरच तिला काही गतिमान प्रवृत्तीही असावयास पाहिजे. काहीही असलं तरी संस्कृती असंख्य गोष्टींवर अवलंबून असते. राष्ट्राच्या अगर समाजाच्या विकासात घडत गेलेलं मूलभूत स्वरूप काही काळ आपण विचारात घेतलं नाही तरी, संस्कृतीवर भूगोलातील स्थान, हवा वगैरे अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. हिमालय, अरण्ये, नद्या इत्यादिकांचा परिणाम जुन्या भारतीय संस्कृतीवर झाल्याचा प्रत्यय आपल्या वाङ्मयावरून आपल्याला होतो. हा परिणाम अभावतःच होत असतो. परंतु, नैसर्गिक रीतीनं विकास होत नसलेल्या आणि मूलतः उखडून न जाता घडण न घेणाऱ्या गोष्टींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला तर नेहमीच संघर्ष निर्माण होत असतो; आणि त्यांतूनच संस्कृतीच्या कल्पनेला विरोधक अशा गोष्टींना वाव मिळत जातो. मनाचा अलिप्तपणा आणि इतर आघातांपासून बचाव करण्यासाठी त्याची करण्यात, येणारी हेतुपुरःसर कोंडी यांचा अंतर्भाव अशा गोष्टीत होतो. भारताच्या प्रगतीचा आणि अधोगतीचा इतिहास, हा अशा रीतीने भारतीय मनाच्या स्वागतमय प्रवृत्तींवर आणि संकुचित मनाच्या अवस्थेवर, घडत गेल्याचं आपल्याला दिसून येतं. जीवन, मग ते एखाद्या व्यक्तीचं, गटाचं किंवा समाजाचं असो, ते प्रामुख्यानं गतिमान, बदलतं आणि विकसनशील, असलं पाहिजे. गतिमान विकासाला पायबंद घालणारी प्रत्येक गोष्ट त्या जीवनाला घातक आणि त्याचा पायाच उखडून टाकीत असते. (९–४–१९५० रोजी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल् रिलेशन्सच्या उद्घाटन-प्रसंगी केलेलं भाषण.)

याच भाषणात संस्कृतीसंबंधी आणखीही विचार प्रकट केले आहेत. मूलभूत स्वरूपात एखादी संस्कृती तशीच विशुद्ध किंवा दुसऱ्या एखाद्या संस्कृतीचा आघात न झालेली अशी कधीच राहत नाही. विशिष्ट राजकीय राष्ट्रीय संस्कृतीची मूलभूत तत्त्वं प्रामुख्यानं तशीच प्रभावित राहात असली तरी, दुसऱ्या

एखाद्या संस्कृतीशी ती मिसळून जाणं साहजिकच असतं. शांततापूर्वक हा प्रकार होत राहिला. तर त्यापासून धोका नसतो. परंतु, दोन संस्कृतींमध्ये संघर्ष होत असतो. आपल्या संस्कृतीवर परकी किंवा विरुद्ध समजल्या गेलेल्या विचारांचा प्रभाव पडत जात आहे अशी एखाद्या समाजाला भीती वाटू लागते. त्या भीतीने प्रेरित होऊन मग तो समाज स्वतःतच स्वतःला गुरफटून घेऊन अलिप्त राहतो. याचा परिणाम असा होतो की, त्यांचे विचार आणि मते, दुसऱ्यापर्यंत जाऊन पोहोचत नाहीत. ही परिस्थिती रोगट असते; कारण असं की, कोणत्याही गोष्टीत आणि विशेषतः ज्याला सांस्कृतिक गोष्टी म्हणतात त्यांच्या बाबतीत गतिहीनता ही महाभयानक गोष्ट आहे.

संस्कृतिसंपन्नतेवर नेहरूंचा कितीही विश्वास असला व प्रत्येक व्यक्ती खऱ्या अर्थानं संस्कृतिसंपन्न असली पाहिजे असा त्यांचा आग्रह असला तरी संस्कृती-संबंधी निरर्थक अगर पोकळ अभिमान त्यांनी कधीच बाळगला नाही. किंवा मानवी जीवनात संस्कृतीला पहिलं मानाचं स्थान देण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. कारण त्यांना माहीत होतं की, "मानवी प्राणी उपाशी राहून मरत असताना संस्कृती किंवा परमेश्वर यांच्या गप्पा मारणं अत्यंत मूर्खपणाचं आहे. दुसऱ्या कोणत्याही गोष्टींची भाषा करण्यापूर्वी मानवजातीला प्रथम जीवनावश्यक दैनंदिन महत्त्वाच्या वस्तू उपलब्ध करून देणं आवश्यक असतं. संस्कृती, परमेश्वर वगैरे गोष्टी भरल्या पोटावर आणि स्वास्थ्यानंतर करणं सोयीचं असतं. उपाशी पोटी, बेघर किंवा उघड्यानागड्या मानवासमोर संस्कृती किंवा धर्म किंवा ईश्वर यासंबंधी कितीही गप्पा मारल्या तरी त्या निरर्थक व पोकळ ठरत असतात."

–आणि म्हणूनच 'संस्कृती' या शब्दाचा वारेमाप उधळपट्टी केलेली त्यांना आवडत नसे. संस्कृती या शब्दाचा जिथं गाजावाजा केला जातो तिथं संस्कृतीचाच अभाव असतो असं त्यांचं मत असे. संस्कृती ही गाजावाजा करण्याची बाब नसते. संस्कृती फार बोलकी किंवा गाजावाजा करीत नाही.....आपल्या मनाची कवाडे बंद करून आणि दुसऱ्यांनाही तसंच करण्याचं आवाहान करून, नवीन गोष्टींना थारा न देता भारतीय संस्कृतीचा उदोउदो करीत राहण्याच्या संकुचित मनोवृत्तीनं काही लोक जगतात तरी कसे याचं नेहरूंना आश्चर्य वाटत असे. आपल्या मनाची कवाडे बंद करून घेणाऱ्या व तशी शिकवण देणाऱ्या व्यक्तींना संस्कृती म्हणजे काय याचं ज्ञानच नसतं. बहिष्कृत बनण्याची प्रवृत्ती

म्हणजे संस्कृतीचा अभाव. आत्मसात करीत राहण्या प्रवृत्ती म्हणजेच विकास... गतिमानता आणि क्रियाशीलता हेच खरं व्यवहार्य धोरण किंवा संस्कृतीचं उच्च मूल्य होय. (३०–१०–१९५२ रोजी सागर विश्वविद्यालयात केलेलं भाषण.)

संस्कृती म्हणजे काय? सुसंस्कृत व्यक्तीच्या ठिकाणी कोणते गुण अभिप्रेत धरावयास पाहिजेत? ती स्थिर असते की ती गतिमान असून तिच्या मूलतत्त्वांत किंवा उपचारांत व विचारांत बदल घडून येत असतात यासंबंधीची खुद्द नेहरूंच्या मतांचा आणि विचारांचा स्थूलमानाने, त्यांच्या साहित्यातून व व्याख्यानांतून प्रगट झालेला आढावा आपण लक्षात घेतला; परंतु, तरीही एक प्रश्न अजून अनुत्तरित ठेवलेला आहे आणि तो म्हणजे नेहरूंनी हे विचार व मते प्रकट करण्याचा फक्त बोलघेवडेपणा केला की, मते व विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले?

नेहरूंच्या जीवनचरित्राचा आपण अभ्यास केला त्यातील एक गोष्ट आपल्या सहज लक्षात येते की, संस्कारक्षम वयात त्यांच्या मनावर सुसंस्कार झाले होते (प्रकरण २ रें). परंतु त्यानंतरही अफाट वाचनामुळे त्यांनी अनेक विचार आणि मते यांच्याशी स्वतःचा परिचय करून घेतलेला होता; त्यासंबंधी त्यांचं सतत मनन चालत असे. त्या विचारांतून आणि मननांतून त्यांनी स्वीकारलेली मते आणि विचार ते प्रकट करीत होते. तरीही "मी स्वतः प्रकाशाच्या स्वकर्तव्याविषयी ज्ञानाच्या, सत्याच्या दर्शनाच्या आणि सत्याकडे जाणाऱ्या मार्गाच्या शोधात सदैव धडपडत असतो" असे नेहरू म्हणतातच. (२४-३-१९५१ रोजी यूनेस्कोच्या इंडियन नॅशनल कमिशनसमोर केलेले भाषण.) आणि ही त्यांची धडपड सबंध जीवनात सतत सुरू असल्याचं आपल्या प्रत्ययास येतं.

जगात आजवर होऊन गेलेल्या महापुरुषांच्या जीवनाकडे आपण लक्ष दिलं तर त्यांच्या कर्तृत्वाचं यश आणि त्यांना मिळालेली महात्मता यांची कारणं भिन्न भिन्न आहेत. कोणी सर्वसत्ताधीश बनून सत्तेच्या जोरावर यशस्वी होतो. कोणी निश्चय आणि चिकाटी यांच्या प्रभावाने यश प्राप्त करून घेतो. एखादा अंगचे गुण किंवा कर्तृत्व यांच्यापेक्षा पाताळयंत्रीपणा, कारस्थाने करून पुढारी बनतो; काही अनुयायांच्या आणि मित्रांच्या सहाय्याने यशश्री संपादन करून जातात. अशी विविध आणि भिन्नभिन्न कारणे त्यांच्या महात्मतेच्या मुळाशी

असलेली दिसून येतील. हिटलर, चर्चिल, स्टॅलिन वगैरे अगदी अलीकडील महापुरुषांच्या चरित्राचा शोध घेतला तर ही गोष्ट सहज लक्षात येईल. केवळ स्वतःच्या कर्तृत्वशक्तीवर आणि सतत कार्य करीत राहण्यानेही महान पदाला पोहोचलेले आढळतात, परंतु कर्तृत्व आणि कार्य करूनही केवळ स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाने आणि संस्कृति–निष्ठतेनं महापुरुषत्व प्राप्त झालेले असे नेहरू एकटेच आहेत असं म्हटलं तर ते अतिशयोक्तीचे किंवा भरमसाट ठरणार नाही.

नेहरूंचे व्यक्तिगत सद्‌गुण गांधींनी पूर्णपणे ओळखले होते आणि आपल्यानंतर स्वराज्यप्राप्तीनंतर राष्ट्राचे धुरीणत्व अशा सद्‌गुणी व संस्कृतिसंपन्न व्यक्तीच्या हातात असणं राष्ट्राच्या स्थैर्याच्या दृष्टीने, व त्याबरोबरच आवश्यक असणाऱ्या जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी नेहरूंची आपल्या वारसपदी निवडणूक करून ठेवली होती. राजकीय दृष्टीने निश्चय, कर्तृत्व, कणखरपणा, राजकारणातील कौशल्य वगैरे बाबतीत नेहरूंपेक्षा काकणभर सरस ठरतील असे सहकारी गांधीजींजवळ नव्हते असे नाही; परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला सर्वच दृष्टीनं उपकारक होण्यासाठी राष्ट्राच्या नेतेपदी चारित्र्य, सस्कृती, मानवता आणि निःस्वार्थ वृत्ती याच सद्‌गुणांनी संपन्न असलेली व्यक्ती असणं आवश्यक आहे हे म. गांधी जाणून होते. आणि म्हणून १९२९ सालीच नेतेपदाची सूत्रे त्यांनी नेहरूंच्या हवाली करून टाकली होती. "शौर्यात त्याला कुणीच मागे टाकू शकणार नाही. राष्ट्रप्रेमात त्याला कोण वरचढ ठरेल ? स्फटिकाप्रमाणे तो निर्मळ आहे. त्याचं सत्यवादित्व संशयातीत आहे. उच्च प्रतिष्ठेचा अत्यंत सुसंस्कृत असा तो आहे. त्याच्या हातात राष्ट्र सुरक्षित आहे." असे उद्‌गार गांधींनी नेहरूंविषयी काढले होते.

आणि हे उद्‌गार किती यथार्थ आहेत याची प्रचीतीही भारतीय जनतेला आलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सतत सतरा वर्षे राष्ट्राचं धुरीणत्व त्यांनी केलं. सतरा सतरा वर्षे, एका ऐतिहासिक व नुकत्याच स्वातंत्र्य संपादन केलेल्या प्रचंड राष्ट्राच्या पंतप्रधानपदी, एकाच व्यक्तीची निवड झालेलं जगाच्या इतिहासात एकमेवच उदाहरण असू शकेल. जनतेचा इतका विश्वास नेहरूंनी संपादन केला होता की, नेहरू आणखी काही वर्षे जगले असते तर पंतप्रधानपदी त्यांचीच निवड होत गेली असती. जनतेचा हा

विश्वास नेहरूंनी संपादन केला होता तो, सर्वसत्ताधीश बनून शस्त्राच्या बळावर खासच नव्हे. तसं असतं तर ब्रिटिश राज्यसत्ता उलथून पाडण्याचं महान कार्य करणाऱ्या भारतीय जनतेनं केव्हाच त्यांची राजवट उलथून पाडली असती. परंतु, नेहरूंच्या हातात राष्ट्राचं एकमेव धुरीणत्व आलं तरी नेहरू त्याचा वापर सर्वसत्ताधीश होण्यात कारणार नाहीत याविषयी भारतीय जनतेची खात्री होती. नेहरूंचं लोकशाही प्रेम, लोकराज्याच्या कल्पना आणि मानवतावादी धोरण जनतेच्या परिचयाचं होतं. आणि म्हणूनच जवळजवळ सर्वसत्ताधीशपद त्यांना जनतेनं बहाल केलं. आणि नेहरूंनीही जनतेच्या विश्वासाला साजेसंच वर्तन केलं. निःस्वार्थबुद्धीनं जनतेनं त्यांच्या हातीं सोपविलेलं सर्वसत्ताधीशपद पुनश्च जनतेलाच प्रतिदान करून टाकलं. लोकराज्याचं प्रतीक असलेली लोकशाही त्यांनी भारतात प्रस्थापित केली. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रावर महान आपत्ती कोसळल्या. अशा स्थितीत हा लोकशाहीचा प्रयोग कितपत यशस्वी होतो याकडे जगाचे डोळे लागले होते; परंतु अशाही परिस्थितीत नेहरूंनी हा प्रयोग यशस्वी करून दाखवला. सत्तेसाठी आज जगातील नवोदित राष्ट्रांत सतत क्रांत्या, कारस्थाने, कत्तली व खून, आपसातील दुही, परकीयांच्या अंतर्गत राजकारणात होणारे हस्तक्षेप किंवा वर्चस्व, इत्यादी विविध प्रकार घडत आहेत आणि त्याचे परिणाम त्या राष्ट्रांना भोगावे लागत आहेत. अशा स्थितीत, अनेक भाषा, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक संस्कृती असलेल्या या खंडात्मक राष्ट्राला नेहरूंनी या सर्व राष्ट्रविघातक प्रकारांपासून अलिप्त ठेवलं.

नेहरूंच्या या असामान्य कर्तृत्वाच्या मागे सुसंस्कृत व्यक्तीच्या अंगी आवश्यक असणाऱ्या मानवतेचं अधिष्ठान होतं. आपल्याप्रमाणेच इतरांनाही हक्क आहेत, अखेर राष्ट्र म्हणजे भारतीय जनता आणि त्यांचंच राज्य म्हणजे जनतेचं राज्य, लोकशाहीच भारतात प्रस्थापित झाली पाहिजे, जनतेला आपलं भवितव्य कोणाच्या हाती सोपवायचं हे ठरविण्याचा हक्क आहे व तो त्यांनी बजावला पाहिजे, या नेहरूंच्या संस्कृतिनिष्ठ धोरणातूनच भारतीय लोकशाहीचा जन्म झाला आहे. विशेषतः सर्वसत्ताधीश होण्याची अमर्याद सत्ता व कर्तृत्व असतानाही, व त्यांची तशी प्रवृत्ती व स्वार्थी दृष्टी असती तर सर्वसत्ताधीश होणं त्यांना कठिण नसतानाही त्यांनी लोकराज्य प्रस्थापित केलं ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

आपण कोणती राज्यपद्धती स्वीकारावयाची हे ठरविण्याचा व ती राज्यपद्धती प्रत्यक्षात आणण्याचा भारतीय जनतेचा अधिकार आहे हे ठरविल्यानंतर, तो हक्क भारतीय जनता बजावीत असताना त्या राज्यपद्धतीवर आक्रमण करण्याचा, हस्तक्षेप करण्याचा किंवा स्वतःचं वर्चस्व प्रस्थापित करण्याचा, थोडक्यात भारताच्या कोणत्याही अंतर्गत व्यवहारात कसलीही ढवळाढवळ करण्याचा भारताबाहेरील कोणत्याही राष्ट्राला वा व्यक्तीला अधिकार नाही हेही तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी नेहरू मृत्यूपर्यंत झगडले; आणि तसा कुणी प्रयत्न केला तर तो अन्याय होईल आणि तो अन्याय भारत सहन करणार नाही असाही घोष त्यांनी केला. आमच्या संस्कृतीला, विचाराला आणि प्रकृतिधर्माला रुचेल व पचेल त्याप्रमाणे आम्ही राज्यव्यवस्था स्वीकारून, ती यशस्वी करण्याचा प्रयत्न करू आणि ते करताना आम्ही इतरांना त्यांच्या मार्गाने जाऊ देऊ, त्यात हस्तक्षेप करणार नाही; त्याचप्रमाणे आमच्या अंतर्गत प्रश्नांत व राज्यव्यवस्थेत ढवळाढवळ किंवा हस्तक्षेप करू देणार नाही किंवा कोणत्याही प्रकारचं वर्चस्व मानणार नाही. थोडक्यात "जगा आणि जगू द्या" या उच्चतम संस्कृतिमूल्यानुसार व तत्त्वानुसार वागण्याचं नेहरूंनी ठरवलं.

आपल्या व्यक्तित्वाचा, राष्ट्रीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टीनं राष्ट्राचा विकास करण्याचा व त्याबरोबरच आमच्या राष्ट्रातील व्यक्तीचा विकास आणि सर्वांगीण प्रागती करण्याचा आम्ही सतत प्रयत्न करीत राहू. कारण, इतर राष्ट्रांप्रमाणेच आमच्याही राष्ट्रातील व्यक्तीचा सर्वांगीण विकास करून घेण्याचा हक्क आहे; आणि तो साधण्यासाठी आमची सदैव धडपड चालू राहील. हरप्रयत्नांनी आणि हाती असतील त्या सत्साधनांनी तो विकास साधावयाचा आहे. हे ध्येय साध्य होण्यासाठी आम्हांला साहाय्याची जरूर आहे व ती आही घेऊही. पण ती मदत घेताना आम्ही कोणत्याही प्रकारचे वर्चस्व लादून घेणार नाही. विचार व आचार यांचं स्वातंत्र्य आम्ही गमावणार नाही. अनेक वर्षांच्या कालावधीनंतर, परकीय राज्यसत्तेविरुद्ध सतत झगडत राहून, प्रसंगी सर्वस्वाचे आणि प्राणांचेही बलिदान करून मिळविलेले स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी आम्ही सतत डोळ्यांत तेल घालून जागत राहू. आणि हे सर्व करीत असताना परकीय राष्ट्रांच्या अंतर्गत राज्यव्यवस्थेत आम्हीही ढवळाढवळ वा हस्तक्षेप करणार नाही; आक्रमण करणार नाही. आम्हांला दुसऱ्या राष्ट्राच्या तसूभरही भूमीचा लोभ नाही.

आणि आमच्यावरील्च नव्हे, जगातील कोणत्याही राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण केले तर त्याला आमचा सक्त विरोध राहील; व आक्रमित राष्ट्राला आमची सहानुभूती व मदतही आमच्याकडून मिळेल. एवढंच नव्हे तर, अद्यापीही पारतंत्र्यात खितपत पडलेल्या लहानमोठ्या राष्ट्रांना, पारतंत्र्याच्या शृंखलांतून मुक्त होण्याला आम्ही पाठिंबा व मदत करू. आम्ही स्वतंत्र झालो म्हणून इतरांच्या पारतंत्र्याकडे आम्ही डोळेझाक करू शकत नाही; आमच्यावर अन्याय झाला तर न्याय मागण्याचा व तो मिळवून घेण्याचा आमचा हक्क आम्ही चोख रीतीने मिळवूच; पण तेवढ्यानंच आम्ही स्तब्ध राहणार नाही की समाधान मानणार नाही. जगातील इतर राष्ट्रांवरही अन्याय झाला, मग तो कुठल्याही राष्ट्राने करो, तर आम्ही त्यालाही अन्यायाचं परिमार्जन करून घेण्यासाठी, हाती असलेल्या योग्य साधनानिशी मदत करण्यास चुकणार नाही. संस्कृतिमूल्याचा व तत्त्वाचा हा दुसरा धडाही भारताला नेहरूंनीच घालून दिला आहे.

लोकशाही राज्यपद्धतीचा भारतानं अंगीकार केल्यानंतर साहजिकच, आचार, विचार, उक्ती आणि विरोध आणि विरोधक यांनाही स्वातंत्र्य ओघानंच प्राप्त होतं. "सहिष्णुता आपल्याशी सहमत असतील त्यांच्या बाबतीतच, फक्त नव्हे तर, आपल्याशी सहमत नसतील त्यांच्याही बाबतीत, बाळगणे हाच लोकशाहीचा अर्थ आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर, ह्या स्वातंत्र्याला अनुरूप अशाच रीतीनं आपल्या वागण्याच्या पद्धतीही बदलावयास हव्यात." ("स्वातंत्र्य व नंतर" ८-३-१९४८ रोजी घटना-परिषदेपुढे केलेले भाषण.). प्रत्येक व्यक्तीला, लोकशाहीत, विचारांचं आणि उक्तीचं स्वातंत्र्य असलं पाहिजे आणि कोणतीही व्यक्ती हे स्वातंत्र्य उपयोगात आणताना, त्याचे विचार व उक्ती आपल्याला पटत असल्या आणि आपल्या विचारांना आणि मतांना विरोधक असल्या तरी त्याबद्दल आपण सहिष्णुता बाळगली पाहिजे. आपल्या हक्काप्रमाणे दुसऱ्यालाही ते हक्क आहेत आणि त्या हक्कांविषयी आपण सतत जागृत राहिलं पाहिजे. परंतु, त्याबरोबरच आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. कारण "मोठ्यानं आरडाओरड करणे व ती सतत करीत राहणे म्हणजे लोकशाही नव्हे... कारणपरत्वे एखादे वेळी त्यालाही काही मूल्य येऊ शकेल. पण स्वातंत्र्य आणि लोकशाहीमध्ये जबाबदारीची जाणीव आणि वर्तनाबाबतची काही मूल्ये आणि आत्मशिस्तीची जरूर असते." (भारताची एकात्मता.)

लोकशाहीमध्ये विरोधाकरता विरोध नसून तो क्रियाशील असावा. पोकळ आणि उथळ बडबड, बेजबाबदारपणे वागणे आणि वेशिस्ती यांना स्थान नसतं. म्हणून सहिष्णुता हा जरी लोकशाहीचा सद्गुण असला तरी विरोधकही जबाबदारीनं, अभ्यासानं आणि क्रियाशील विवेकानं केलेला असला पाहिजे असा नेहरूंचा सतत आग्रह असे. भारतीय लोकशाहीतील सर्वश्रेष्ठ नेता म्हणून नेहरू सतत १७ वर्षे पदारूढ होते. आणि या कालात विरोध आणि विरोधक यांच्याबद्दल त्यांनी सदैव सहिष्णुता दाखविली होती. त्यांना जो विरोध झाला तो नेहमीच जबाबदार, अभ्यासपूर्ण किंवा क्रियाशील विवेकानं केलेला नव्हता, ही गोष्ट अनेक वेळा उघड झाली आहे. काही वेळेला तर, नेहरूंच्या विचारांना, मतांना किंवा प्रश्न सोडविण्याच्या पद्धतीला आणि प्रश्नांच्या सोडवणुकीलाच विरोध झाला नाही, पण त्यांच्या व्यक्तिगत चारित्र्यावर चिखलफेक करण्यात आली. त्यांच्या निःस्वार्थपणाला, नीतिगत वर्तनाला व प्रामाणिकपणाला बाध येण्याासारखी विधाने सहसा कोणीही करण्यास धजत नसताना, एखादे वेळेस तशी विधाने वा आरोप केले गेले तरीही त्या व्यक्तीविषयी कटुता अगर राग मनात न बाळगता, त्या व्यक्तीला, मग ती कितीही बेजाबदार, अविवेकी असली तरी, भेटी पाठविण्यास नेहरू विसरत नसत. डॉ. लोहिया यांच्या बाबतीतील नेहरूंचं सुसंस्कृत वर्तन सुविख्यात आहे. नेहरूंचं हे सुसंस्कृत वर्तन भारतातील त्यांच्या विरोधकांच्या बाबतीतच फक्त प्रगट झालं असंच नव्हे, ब्रिटिश सत्तेच्या परकीय, अन्यायी, जुलमी राजवटीची कटू फळे नेहरूंनी आपल्या आयुष्यात दोन तपांहूनही अधिक वर्षे चाखली होती; आणि ती चाखताना नेहरूंच्या मनात क्रोधादि विकारांनी खळबळ उडवून दिलेली होती. सायमन कमिशनला विरोध करताना काढलेल्या मोर्च्याच्या वेळी, ब्रिटिश घोडदळाने जनतेवर केलेले अत्याचार, नेहरूंच्या प्रिय मातेवर झालेला लाठीमार वगैरे प्रसंगी हे विकार बळावून नेहरूंच्या विवेकी मनावर मात करीत व अशा वेळी आत्मसंयमन करताना त्यांना फार मानसिक परिश्रम पडत असत, असं आपल्या आत्मचरित्रात त्यांनी कबूल केलं. ब्रिटिश राज्यसत्तेनेच त्यांना दीर्घकालीन बंदीवासात ठेवलं होतं. असं असतानाही स्वातंत्र्योत्तर काळात ब्रिटिशांविषयी त्यांनी रागद्वेषादि भावना बाळगल्या नाहीत. आणि म्हणूनच उद्दाम, दीर्घद्वेषी, कोपिष्ट चर्चिलने उद्गार काढले की, "मानवी स्वभावधर्मातील दोन सर्वांत मोठ्या

दोषांवर विजय मिळवला आहे– या पुरुषाला भीती आणि द्वेष कसे ते माहीत नाहीत."

परमतसहिष्णुता आणि परमताबद्दल आदर हे नेहरूंच्या संस्कृतिसंपन्न विशाल मनाचा एक प्रमुख सद्गुण होता; आणि त्यामुळेच मानवी मनोविकारांवर त्यांना विजय मिळवता आला. अर्थातच त्यासाठी त्यांना परिश्रमही करावे लागले, आणि आंतरिक सामर्थ्य प्राप्त करून घ्यावं लागलं. हे परिश्रम घेत असताना जीवनात त्यांच्या अनेक प्रवृत्तींच्या व्यक्तींशी संबंध येत गेला आणि त्याचा त्यांनी हेतुपुरस्सर फायदा करून घेतला. "आत्मशिक्षण आणि आत्मप्रगती करून घेण्याच्याच हेतूने मी बाह्य संबंध असावेत अशी माझी इच्छा आहे. आपला दृष्टिकोन अत्यंत संकुचित आहे आणि हा संकुचितपणा जितक्या लवकर दूर होईल तितकं ते योग्य ठरेल. आंतरिक सामर्थ्यातूनच आपला उद्धार होणार आहे; परंतु, हे सामर्थ्य संपादन करण्याच्या पद्धतींतील, इतर व्यक्ती आणि त्यांच्या विचारांचा अभ्यास करीत राहणे, ही एक पद्धत आहे." आपल्या मनाची विशालता आणि आंतरिक सामर्थ्य संपादन करण्याचा हा एक मार्ग, नेहरूंनी ता. २३–४–१९२७ रोजी लिहिलेल्या पत्रात नमूद करून ठेवला आहे.

—आणि १९२७ साली पत्करलेला हा मार्ग नेहरूंनी जन्मभर चोखाळला होता आणि मनाची विशालता आणि आंतरिक सामर्थ्य प्राप्त करून घेतलं होतं. या सामर्थ्याच्या आधारावरच आपल्या स्वतःवरोबरच आपल्या राष्ट्राचा विश्वासघात करणाऱ्या चाऊ-एन्-लायची त्यांनी दिल्लीत भेट घेतली होती. प्रत्यक्ष शत्रूशी त्यांचं हे वर्तन होतं. मग मित्रांशी त्यांचं वर्तन सहिष्णू, दिलखुलास व आदराचं असल्यास नवल नाही. बांडुंग येथे भरलेल्या आफ्रो–एशियन् परिषदेच्या राजकीय समितीत नेहरूंच्या संस्कृतिसंपन्न व्यक्तिमत्त्वाचं जे दर्शन झालं त्याविषयी संयुक्त-अरब प्रजासत्ताकाचे अध्यक्ष नासर लिहितात : "आपल्या कोटाच्या काजात सदैव विराजणाऱ्या गुलाबपुष्पाच्या सौंदर्याचा स्पर्श आपल्या वर्तनाला द्यायला नेहरू कधीच विसरत नाहीत. त्याचप्रमाणे (त्या राजकीय समितीलाही) नेहरूंनी विचार, आणि ध्येय, समज आणि अनुभव, कला आणि संस्कृती एवढंच नव्हे तर, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांचा मुलामा चढविला होता."

" संस्कृती ही व्यक्तीच्या फक्त बोलण्यातच नव्हे तर तिच्या वर्तनातही दिसून येते, " असं नेहरूंचं फक्त मतच नव्हतं तर त्यांच्या वर्तनातही सदैव दिसून येत असे, म्हणूनच " कृतिशील व्यक्ती " अशी त्यांची जगभर ख्याती झाली होती. नेहरूंच्या सुसंस्कृत मनाचं आणि प्रवृत्तीच दर्शनही त्यांच्या प्रत्यक्ष वर्तनात दिसून येत असे. नेहरूंच्या संस्कृतिसंपन्न वर्तनाचं मार्मिक वर्णन घानाचे भूतपूर्व अध्यक्ष क्वामे नक्रुमा यांनी केलेलं आहे. " (राष्ट्रकुल संघाच्या) प्रत्येक बैठकीच्या वेळी नेहरूंच्याबद्दल मला वाटत असलेला आदर वाढतच गेला. काही दिवस नेहरू एखाददुसराच शब्द उच्चारीत असत. पण फक्त अंगविक्षेप, मानेची हालचाल अगर अशाच एखाद्या लक्षणाने विवादविषयक प्रश्नाची आपल्याला जाणीव असल्याचं किंवा संमती असल्याचं दर्शवीत. परंतु नंतर, जेव्हा जेव्हा ते (नेहरू) आपले विचार मांडीत, तेव्हा तेव्हा ते लक्षपूर्वक ऐकण्यासारखे असत. मग त्या विचारांशी तुमचं सहमत असो अगर नसो. नेहरूंना जे विचार मांडावयाचे असत ते नेहरू कमीत कमी शब्दांत, आणि वेळात मांडीत असत आणि आपला दृष्टिकोन निःसंदिग्ध आणि ठामपणे मांडीत. सुसंस्कृत व्यक्तीची ही लक्षणे आहेत असंच मला वाटतं. "

सुसंस्कृत व्यक्तीला आवश्यक असणारं मनाचं आंतरिक सामर्थ्य प्राप्त करून घेतल्यामुळंच सहिष्णुता, इतर व्यक्तींची जाणीव, आत्मवत इतर व्यक्तींनाही विचार आणि उक्ती यांचं स्वातंत्र्य असण्याबाबतचा त्यांचा कटाक्ष, विरोधकांशीही सभ्यतेची वागणूक, मानवी मनोविकारांवर संपादन केलेला विजय, या साऱ्या गोष्टी नेहरू आचरणात आणू शकले. आंतरिक सामर्थ्यामुळं देवाधर्मादि बाह्यावडंबर बाळगण्याची किंवा त्यांचा आधार प्रत्यक्षात घेण्याची त्यांना जरूरी वाटली नाही. मानवता हा धर्म मानून त्यांनी धर्माचं मूलतत्त्वच स्वीकारलं असल्यामुळं धर्मांतर्गत बाह्योपचारांची कास धरण्याची त्यांना आवश्यकता भासली नाही. डॉ. काटजू नेहरूंच्याविषयी या संदर्भात लिहितात : " धर्म या शब्दाच्या उच्चतम अर्थानं, (नेहरू) खात्रीनं धर्मशील होते. भगवद्गीतेतील व्याख्येप्रमाणं इतरांच्या कल्याणाकरिता सतत कार्य करण्याबद्दलची निष्ठा, व्यक्तिगत स्वास्थ्य, सुख आणि महत्त्वाकांक्षा याबद्दलची उदासीनता, फलाची आशा न करता अलिप्तपणे कार्य करीत राहण्याची प्रवृत्ती, ही उच्चतम धर्माची सारभूत तत्त्वे आहेत आणि याच अर्थानं जवाहरलाल धर्मशील आहेत..."

ज्या अर्थानं नेहरूंना धर्मशील म्हणण्यात येतं, त्याच देवांविषयीच्या उच्चतर कल्पनेनं नेहरूंनाही देवभक्त म्हणता येईल. प्रत्येक व्यक्तीला आत्म्याचा विकास साध्य करून घेण्यासाठी आवश्यक असणारं एक श्रद्धास्थान, या अर्थानं नेहरूंना देवाची कल्पना मान्य होती. परंतु, देवाचा सदैव आधार घेत आणि त्यावर विसंबून राहून मानवानं निष्क्रिय जीवन जगावं असं नेहरूंचं मुळीच मत नव्हतं. देव हा व्यक्तीच्या अंतःकरणाच्या गाभाऱ्यात असला पाहिजे. हृदयात देवाचं अधिष्ठान नसेल तर कोणत्याही व्यक्तीला सप्तलोकांतही देवाचा साक्षात्कार होणार नाही, अशीच नेहरूंची भावना होती. या संदर्भात फ्रँक् मोरिआस यांनी आपल्या " जवाहरलाल नेहरू " या चरित्रात्मक ग्रंथात एक आठवण उद्धृत केली आहे, ती उद्बोधक ठरेल.

१९४० साली गांधींनी सुरू केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या मोहिमेत, नेहरू स्वतः वैयक्तिक सत्याग्रह करण्यापूर्वी सेवाग्राम येथे गांधींना भेटावयास गेले होते, ती निरोपाची भेट होती आणि त्यामुळे वातावरणात दुःखाची छाया पसरली होती. निरोप घेऊन नेहरू जाण्यासाठी निघाले, त्या वेळी त्यांना आशीर्वाद देताना कै. कस्तुरबा म्हणाल्या, " आता देवच तुझा पाठीराखा आहे."

जवाहरलालनी आपलं नित्याचं स्मितहास्य करीत कस्तुरबांकडे बघितलं. आणि त्यांना खिजविण्यासाठी विचारलं : " देव कुठं आहे, बा ? जर देव अस्तित्वात असेल तर तो झोपलेला असला पाहिजे. "

नेहरूंच्या या उद्गारांनी कस्तुरबा थोड्याशा चकित झाल्या; पण नेहरूंना पूर्णपणे ओळखणारे गांधी, अंतःकरणपूर्वक हसले व जवळच उभ्या असलेल्या श्रीमती अमृत कौर यांना म्हणाले, " देवाची पूजाअर्चा करणाऱ्या व्यक्तीपेक्षा तो देवाच्या अधिक सान्निध्यात आहे. "

हृदयात अधिष्ठित झालेल्या देवाच्या मूर्तीमुळेच विश्वातील मानवजात ही एकच आहे व त्या दृष्टीनं " एकच विश्व " (One World) या कल्पनेला त्यांनी उचलून धरले होते. विश्वातील यच्चयावत् मानवजातीबद्दल त्यांना प्रेम वाटत होतं; मानवजातीला राष्ट्रीय, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होऊन,

जीवनाला आवश्यक असणाऱ्या अन्न–वस्त्र–आसरा–शिक्षण इत्यादी गोष्टी त्याला प्राप्त झाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. वर्ण, जातिभेद, लिंगभेद वगैरे अस्तित्वात असलेल्या बंधनांतून मानवजात मुक्त व्हावी हा नेहरूंचा विशाल, प्रगल्भ दृष्टिकोनच त्यांच्या सुसंस्कृत मनाची व प्रवृत्तींची सहज साक्ष देऊ शकेल. याच दृष्टिकोनातून परस्परविरुद्ध असलेल्या व्यक्ती, ध्येयं, दृष्टिकोन आणि राष्ट्रे यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.

नेहरूंच्या संस्कृतिसंपन्नतेची कारणे अनेक आहेत. संस्कारक्षम बालवयात त्यांना योग्य गृहशिक्षण मिळालं. महाभारत, रामायण यांच्या वाचनाने त्यांच्या मनावर योग्य ते संस्कार घडून आले. त्यांना लाभलेल्या शिक्षकांच्या शिकवणुकीचेही त्यांच्या मनावर योग्य ते परिणाम घडून आले. मातेच्या आणि घरातील इतर स्त्रियांच्या प्रेमळ परंतु, सुशिक्षणाचा लाभ नेहरूंना मिळाला. वडील कै. मोतीलाल यांच्या प्रेमळ परंतु शिस्तशीर, सामर्थ्यशाली, धैर्ययुक्त आणि बुद्धिमान व्यक्तित्वाचा नेहरूंवर प्रभाव पडला होता. तशातच कै. मोतीलालजींनी नेहरूंच्या शिक्षणाच्या बाबतीत घेतलेले परिश्रम व काळजी; गांधींची भेट व सहवास, कविवर्य टागोर यांची मैत्री, त्यामुळेही नेहरूंचं सांस्कृतिक जीवन घडण्यास खूपच मदत झाली. इंग्लंडमधील शिक्षणामुळेही पाश्चात्यांचे पुष्कळच गुण त्यांनी आत्मसात केले; आणि बालपणापासून लागलेली वाचनाची गोडी त्यांनी सतत शेवटपर्यंत जोपासली आणि वाढीस लावली. वाचनामुळेही त्यांच्या सांस्कृतिक जीवनाला महत्त्वाचा हातभार लावला आहे.

हे सारं ऋण नेहरूंनी योग्य शब्दांत अनेक ठिकाणी कृतज्ञतापूर्वक मान्य केलं आहे. आई व इतर घरातील वडील स्त्रिया, वडील कै. मोतीलाल, शिक्षक, गांधी, टागोर यांच्या सहवासाचा आणि शिक्षणाचा आपल्या जीवनावर परिणाम झाला असल्याचं नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात आणि साहित्यात व वक्तव्यात उत्कटतेनं प्रगट केलेलं आहे. भारतीय व पौर्वात्य संस्कृतीचा त्यांना सार्थ अभिमान वाटत होता, व त्या संस्कृतीतील अनेक तेजस्वी व जीवनास हितकारक ठरणाऱ्या तत्त्वांचा अंगीकार केला होता. पण पाश्चिमात्य संस्कृती व विचार यांमधीलही योग्य व विशेषतः वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार

केला होता. त्यामुळंच " पूर्व आणि पश्चिम यांचं विलक्षण मिश्रण माझ्यात झालेलं आहे. " असं त्यांनी मान्य केलं आहे.

नेहरूंचं वाचन अगाध होतं. त्यांच्या नावडीचा विषय असा एखादाच असेल ! या अगाध वाचनानंही त्यांच्या मनाला आणि विचारांना समृद्धता आणि विशालता प्राप्त झाली. ९ मार्च १९५० रोजी ' इंडियन् कौन्सिल फॉर कल्चरल् रिलेशन्स् ' या संस्थेच्या उद्घाटन-प्रसंगी केलेल्य भाषणात ज्ञान-संपन्नतेच्या संदर्भात हा विचार मांडताना नेहरूंनी उद्गार काढले होते : " संस्कृती आणि ज्ञान म्हणजे खरोखर काय, हे ठरविण्याचं कार्य मी तुमच्या-वरच सोपवितो. आपण विद्वत्ता, ज्ञान आणि अनुभव समृद्ध करीत असतो. मग अशी वेळ येते की, या सर्वांचा इतका साठा आपल्याजवळ होऊन जातो की, आपण नक्की कुठं आहोत हे समजणं अशक्य होऊन जातं. या सर्वांच्या समृद्धतेनं आपण इतके भारावून जातो की, त्याबरोबरच, या सर्व गोष्टी एकत्र झाल्या तरीही त्यामुळे मानवजातीच्या ज्ञानाच्या विकासाचं दर्शन त्यामधे घडत नसल्याची जाणीव, कुठून तरी, आपल्या मनात निर्माण होऊ लागते. आधुनिक जीवनाचे आणि आधुनिक विज्ञानाचे फायदे न मिळालेले काही लोक हे खात्रीनं आपल्यापैकी बऱ्याच लोकांपेक्षा कदाचित शाहणे होते असा एक विचार माझ्या मनात येतो. पुढे कधी काळी हे सर्व ज्ञान, वैज्ञानिक विकास आणि मानवजातीचं कल्याण, योग्य चातुर्यानं एकत्र आणू शकू की नाही, हे मला माहीत नाही. सुप्रसिद्ध ग्रीक कवी असलेल्या एका ज्ञानी पुरुषाच्या सुभाषिताची मला स्मृती होते :

ज्ञान म्हणजे दुसरं काय ? मानवी प्रयत्न किंवा
आकर्षक आणि महान परमेश्वरी श्रेष्ठ कृपा कोणती ?
भयमुक्त अवस्था, श्वसन आणि आशा
द्वेषावरही मिळविलेला विजय
आणि सौंदर्यावरील शाश्वत प्रीती नव्हे ? "

नेहरूंच्या बाबतीत एवढं खास म्हणता येईल की विद्वत्ता, ज्ञान आणि अनुभव या त्रयीनं जीवन समृद्ध असतानाही नेहरूंना आपण कुठं आहो याची संपूर्ण

जाणीव होती. त्यांच्या जीवनात मानवी ज्ञानाच्या विकासाचं दर्शन निश्चित घडत होतं. ज्ञान, वैज्ञानिक आणि मानवजातीचं कल्याण यात एकात्मता साधण्याचे प्रयत्न, मोठ्या चातुर्यानं, नेहरू करीत होते आणि ग्रीक ज्ञानी पुरुषानं लिहून ठेवलेल्या सुभाषितात वर्णन केल्याप्रमाणे नेहरूंचं जीवन संस्कृति-संपन्न व ज्ञानी पुरुषाचं होतं.

卐 卐 卐

१०

बालकप्रेम

" बाळपणीचा काळ सुखाचा आठवतो घडिघडि "—

कवितेचा हा चरण गुणगुणण्याची वेळ प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात प्रौढपणी केव्हा ना केव्हा तरी येतच असतो. जीवन कंठीत असताना येणारे बरेवाईट अनुभव, समोर उभ्या राहणाऱ्या व त्या सोडविण्यास भाग पाडणाऱ्या विचित्र समस्या, अनुभवावयास लागणारे सुखदुःखाचे प्रसंग इत्यादी गोष्टींनी भरलेल्या जीवनामुळे त्रासून, गांजून व क्वचित जीवनाला विटून जाऊन, बाळपणी घालविलेल्या निरागस व सुखी काळाची आठवण होते. प्रौढत्वाच्या जीवनापेक्षा किती तरी पटीने सुखावह आणि मातापित्याच्या छत्राखाली घालविलेलं बाळपण मनाला पुन्हा मोहिनी घालीत राहते. " लहानपण

दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा." असं तुकारामांनी म्हटलं आहे ते प्रौढत्वाच्या गांजलेल्या दुःखी जीवनामुळंच.

प्रौढपणी मानवानं बाळपणीच्या सुखाच्या काळाची आठवण काढली किंवा तुकारामाप्रमाणे "लहानपण देगा देवा" म्हणून परमेश्वराजवळ आळवणी केली तरी, 'ते रम्य बाळपण' काही पुन्हा प्राप्त होणं अशक्य कोटीतील गोष्ट आहे हे कळत असतं; पण वळत नसतं. आणि मग बाळपणींचा सुखाचा काळ स्मृतिरूपानं मनात घोळत ठेवून, तो स्वतःशीच कुढत राहतो; परंतु, काही व्यक्ती अशा असतात की, बाळपण पुन्हा प्राप्त होणार नाही हे त्यांना कळतही असतं, पण केवळ बाळपणीच्या सुखद जीवनाच्या स्मृती चघळीत राहून त्या कुढत बसत नाहीत किंवा रम्य ते बाळपण मिळावं म्हणून आळवणीही करीत नाहीत. प्रौढपणी आपल्याला न मिळणारं बालपण, अशा व्यक्ती काही काल आपलं प्रौढत्व विसरून जाऊन, बालकांत मिसळून, बालकांशी समरस होऊन पुनश्च अनुभवितात. परंतु ही गोष्ट सर्वांनाच शक्य होत नाही. आपल्या प्रौढत्वाचा, तथाकथित ज्ञानाचा, शहाणपणाचा आणि त्याबद्दल मनात असलेला अहंकार विसरणं साधी गोष्ट नाही. ते विसरण्यासाठी काही गोष्टींची व मनोरचनेची आवश्यकता असते. "प्रौढत्वी निज शैशवास" जपण्याचा मनाचा बाणा अंगी असावा लागतो. तो बाणा अंगी बाणला असला तर प्रौढ वयातही आपल्या मनात जपून ठेवणारं शैशव बालकांच्या मेळाव्यात किंवा सहवासात, उफाळून वर येतं. प्रौढत्वाचा, ज्ञानाचा, शहाणपणाचा अहंकार अशा वेळीं गळून पडतो. मनात जपून ठेवलेल्या शैशवामुळं, प्रौढपणातील विकार काही काळ विसरले जातात. मन त्या बालकांप्रमाणंच निरागस व कोमल बनतं आणि मगच ते बालकांशी समरस होऊन जातं. बालकांच्या मनाशी एकात्म होऊन बाळपणीचा सुखाचा काळ पुन्हा अनुभवू शकतं.

"बालकात मिसळणं, त्यांच्याशी बोलणं, एवढंच नव्हे तर, त्यांच्याबरोबर खेळणंही मला आवडतं. मी फारच प्रौढ झालो आहे व माझं बालपण संपून फार काळ लोटलेला आहे, ही गोष्टच मी क्षणभर विसरून जातो." बालकांत मिसळताना, त्यांच्याशी समरस होताना स्वतःचं प्रौढत्व विसरून जाणं ही कठीण गोष्ट नेहरूंना उत्तम तऱ्हेनं साधून गेली होती. ही गोष्ट कठीण आहे; परंतु

ती फक्त प्रौढत्वाबरोबरच ज्यांचं मन घटलेलं आहे, कठोर झालं आहे किंवा ज्यांच्या मनाची संवेदनक्षमता कमी किंवा नष्ट झालेली आहे अशाच व्यक्तींना. परंतु, प्रौढत्वानंही किंवा जगाच्या व्यवहारातील कटू अनुभवानं ज्यांच्या मनाची स्निग्धता, कोमलता, निरागसता आणि संवेदनक्षमता व भावविवशता अबाधित राहिलेली आहे, अशा व्यक्तींना उलट बालकांच्या सान्निध्यात आनंद वाटतो. नेहरूंच्या बाबतीत त्यांच्या मनाचे हे सर्व गुण अबाधित राहिल्यामुळे 'बालकांत मिसळणं, त्यांच्याशी बोलणं किंवा खेळणंही' त्यांना आवडत असे.

जीवनाच्या प्रत्येक वातावरणात वावरताना त्या वातावरणाशी तादात्म्य होऊन त्या वातावरणातील आनंद अनुभवविण्याची नेहरूंची स्वाभाविक मनः-प्रवृत्ती होती आणि त्यामुळेही बालकांच्या सान्निध्यात, काही काळ आपलं प्रौढत्व विसरून त्यांच्या सहवासानं मिळणारा निरागस आणि निर्मळ आनंद लुटणं नेहरूंना सहज शक्य होई. एवढंच नव्हे तर असंही म्हणता येईल की, बालकांच्या सान्निध्यात, चित्तवृत्ती उल्हसित होऊन, निरागस आनंदाचा उपभोग नेहरू जेवढा घेत, तेवढ्या प्रमाणात ते इतर कुठल्याही वातावरणात अगर मेळाव्यात घेत नसत. आणि त्यामुळेच बालकांच्या मेळाव्यात अगर सहवासात येण्याची कुठलीही संधी ते वाया दवडत नसत. "बालकांसाठी माझ्याजवळ वाटेल तेव्हा वेळ आहे, प्रौढांसाठी नाही." असे नेहरूंनी एकदा उद्गार काढले होते, ते बालकांचा सहवास मिळण्यासाठीच. प्रौढत्वीही जपून ठेवलेलं शैशव बालकांच्या सहवासात उफाळून वर येई. बालकांबरोबर त्यांचे विविध खेळ खेळण्यात मोठ्या उत्साहाने आणि निर्भेळ आनंदानं भाग घेत. अशा वेळी त्यांच्या प्रौढ मनाला संत्रस्त करून टाकणारे अनेक प्रश्न, समस्या आणि विचार, त्या काळापुरते, त्यांच्या मनातून हद्दपार होत.

बालकांच्या मेळाव्यात नेहरूंना ज्यांनी पाहिलं असेल त्यांना नेहरूंच्या प्रौढत्वातील शैशव मनाचं सहज दर्शन घडलं असेल. बालकांच्या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी मोटारीतून जात असता, त्यापूर्वी नुकत्याच झालेल्या चर्चा, वादविवाद, भाषणे, प्रश्नांची उकल करण्यासाठी डोक्यात गर्दी करून राहिलेले विचार यामुळं त्यांची मुद्रा, ते ती आपल्या मोहक हास्याखाली दडविण्याचा कितीही प्रयत्न करीत असले तरी संत्रस्त दिसत असे. परंतु,

बालकांच्या मेळाव्याचं ठिकाण जवळ आलं आणि बालकांची चिवचिव आणि गलब्लाट कानी येऊ लागला की, मुद्रेवरील संत्रस्तपणा क्षणात अंतर्धान पावून, त्यांचा चेहरा एकदम उल्हसित होई. त्यांचे कान बालकांचा गलब्लाट पिऊन घेत असतानाच मुद्रेवर निरागस व आतुर हास्य प्रकट होई. मेळाव्याच्या प्रवेशद्वाराशी पोहोचताच बालकाच्या चपळाईनं ते वाहनातून बाहेर उडी टाकीत आणि झपझप पावले टाकीत. दुतर्फा उभ्या असलेल्या बालकांच्या रांगेतून, चालत जात. त्यांच्या गळ्यांत हार घालणाऱ्या बालकाला उचलून घेत. गालावर हळुवार चापट मारीत, चटकन खाली ठेवीत आणि त्या बालकाने त्यांच्या गळ्यात घातलेला हार परत त्या बालकाच्या गळ्यात वात्सल्याने व कौतुकानं घालून त्या बालकाची पाठ थोपटीत. व्यासपीठाकडे जाताना वाटेतील बालकांपुढे वाकून हास्य करीत. कुणाच्या खांद्यावर थोपटीत तर कुणाला एखाद्या बाहुलीसारखं उचलून पुन्हा खाली ठेवीत ते पुढे जात. या मेळाव्याला येण्यापूर्वी मिळालेले हार मुद्दाम मागवून, एकेक हार, बालकांमध्ये फेकीत आणि ते हार हस्तगत करताना, बालकांत उडालेली धावपळ पाहून मुक्त हास्य करीत. अशा वेळी बालकांशी ते इतके तादात्म्य होत की, त्यांची ती खेळकर, मुक्त हास्य करणारी अवखळ आणि चपल, बालसदृश लीला करणारी मूर्ती पाहून इतर प्रौढ व्यक्तीही कौतुकानं त्यांच्याकडे पाहात राहत.

बालकांच्या सान्निध्यात असताना नेहरू त्यांच्याशी इतके समरस होऊन जात असत की, बालकांचं मनोगत ते पुरेपूर जाणीत असत आणि मग बालकांच्या दृष्टिकोनातून ते प्रौढांकडे पाहू लागत. ३ डिसेंबर १९४९ रोजी "शंकर्स विकली"च्या बालक-अंकात लिहिताना नेहरू लिहितात : "(बालकांच्या सान्निध्यात) मी म्हातारा झालो आहे आणि मी स्वतः बालक होतो तो काळ उलटून गेल्याला बरीच वर्षे होऊन गेली आहेत हे मी काही क्षण विसरून जातो; परंतु जेव्हा मी तुमच्यासाठी काही लिहिण्यासाठी बसतो तेव्हा माझं वय आणि तुमच्या-माझ्यातील अंतर मी विसरू शकत नाही. वयानं लहान असलेल्यांपुढे नीतिपाठ करण्याची आणि सदुपदेश देण्याची प्रौढांना सवयच पडून गेलेली असते. मी लहान मुलगा असताना फार वर्षांपूर्वी मला या गोष्टींची नावड होती असं मला आठवतं. तेव्हा तुम्हांलाही मी तीच गोष्ट केलेली आवडणार नाही असं मला वाटतं..." त्याचप्रमाणे, प्रौढांमध्ये खरो-

खरीची शाहणी व ज्ञानी माणसं अगदी थोडी असून सुद्धा, प्रत्येक प्रौढ आपल्या शहाणपणाची व ज्ञानाची घमेंड बालकांपुढे मारीत असतात. खरी शहाणी व ज्ञानी माणसे आपल्या शहाणपणाचे व ज्ञानाचे प्रदर्शन करीत नसतात. या कारणामुळे मुलांना उपदेशामृत पाजण्याचे किंवा आपल्या शहाणपणाचे व ज्ञानाचे प्रदर्शन त्यांच्यापुढं करण्याचं टाळतात. मग नेहरू मुलांशी बोलणार तरी काय ? या प्रश्नाचे नेहरूच उत्तर देतात : " मी तुमच्यात असेन तेव्हा, या आपल्या सुंदर जगाविषयी, फुले, झाडे, पक्षी, प्राणी, तारका, पर्वत आणि हिमप्रवाह आणि अशाच दुसऱ्या या जगात पसरलेल्या अनेक वस्तूंविषयी तुमच्याशी बोलणे मला फार आवडेल. आपल्याभोवती इतकं अमाप सौंदर्य पसरलं असताना, आम्ही प्रौढ माणसे त्याला विसरून जातो, आणि काही तरी अंतिम महत्त्वाचं कार्य करीत आहो अशा कल्पनेनं कचेऱ्यातून स्वतःला हरवून बसतो. "

—आणि म्हणूनच नेहरू कित्येक वेळा प्रौढांपेक्षा बालकांचा सहवास पसंत करीत असत. नेहरूंच्या या स्वभाव व प्रकृतिवैशिष्ट्याबद्दल श्रीमती एलिनॉर रूझवेल्ट यांनी आपल्या " On My Own " या पुस्तकात एक आठवण निवेदन केली आहे ती या संदर्भात मनोरंजक ठरणारी आहे. " हाइड् पार्क " येथे नेहरू मेजवानीसाठी गेले असताना. " माझी नातवंडे व त्यांची बरीचशी मित्रमंडळी जमा झालेली होती. आपल्या काळ्या लांब कोटीत आणि गुडघ्याखाली तंग बसणारी पाटलोण या वेषातील नजरेत भरणारे भारताचे पंतप्रधान तरुण मुलामुलींच्या सहवासात आनंदित झालेले दिसत होते. आणि भोजनानंतर दिवाणखान्याच्या मध्यभागी मांडी घालून मुलांमुलींशी बोलत बसले होते. त्यांना प्रश्न विचारण्यात व त्याचप्रमाणे त्यांची मते ऐकण्यात नेहरू रंगून गेले होते. हे दृश्य मी कधीच विसरणार नाही. "

विविध वयांच्या बालकांत नेहरू मिसळतात तेव्हा नेहरूंचं खरं प्रेमळ आणि निरागस मन आणि स्वरूपही प्रगट होतं. नेहरूंना बालकांबद्दल अत्यंत प्रेम होतं, आणि बालकांनाही नेहरूंबद्दल जिव्हाळा वाटे. वाढत्या वयाबरोबर परस्परांबद्दल वाटणारा हा जिव्हाळा कमी न होता वाढतच गेला. " बालकांविषयी मला अपार प्रेम वाटतं आणि वयाच्या वाढीबरोबरच ते प्रेम वाढत आहे. " असं

नेहरूंनी स्वतःच म्हटलं होतं. नेहरू कितीही कामात असले किंवा अतिपरिश्रमानं थकून गेलेले असले तरी एखादं बालक त्यांच्याजवळ गेलं आणि बडबड करू लागलं किंवा प्रश्न विचारू लागलं तरी न त्रासता अगर न रागावता त्या बालकाला दूर न ढकलता उलट जवळ घेऊन त्या बालकाचं संपूर्ण समाधान करीत असत. बालकाच्या सहवासात आपल्या सर्व काळज्या आणि कामे नेहरू विसरून जात आणि स्वतःच बालक बनून त्यांच्यात बसून खेळत, गोष्टी सांगत, बालकांप्रमाणेच स्वतःलाही आनंद प्राप्त करून घेत असत. बालकांशी समरस होऊन त्यांच्याबरोबर नेहरू रमत असत याचं कारण म्हणजे, " जवाहर स्वतः साध्या सरळ वृत्तीचा आणि मानवी अंतःकरणाचा होता. आणि म्हणूनच बालकांना जवाहर त्यांना हवाहवासा वाटणारा खेळगडी वाटे. इतर प्रौढ माणसांप्रमाणे त्याला स्वतःच्या वयाची जाणीव होत नसे. " असं नेहरूंच्या बालक प्रेमाविषयीचं कारण नेहरूंच्या भगिनी श्री. कृष्णा हाथीसिंग यांनी आपल्या " ना खत ना खेद " (With No Regrets) या पुस्तकात नमूद करून ठेवलेलं आहे.

बालकांच्या संगतीचा आनंद नेहरू लुटीत असत. परंतु, बालकांच्या समवेत बसणं, बोलणं किंवा खेळणं एवढ्यावरच नेहरूंच्या मनाचं समाधान होत नसे. बालकांच्या बरोबर प्रवास करणं, त्यांच्यासमवेत निसर्गरम्य स्थळं पाहात फिरणं व अशा रीतीनं पाहात-फिरत असताना बालकांच्या विकसित होणाऱ्या मनांवर त्या स्थळांचे काय परिणाम होतात, त्यांच्या दृष्टीनं त्या स्थळांचं महत्त्व कोणतं, आणि बालकांच्या दृष्टीला त्या स्थळात कोणतं नावीन्य आढळतं व त्या नावीन्यामुळे त्यांच्या मनावर कोणत्या प्रतिक्रिया होतात हे पाहण्याचा त्यांच्या मनाचा कल होता. २६–१२–१९६० या दिनांकाच्या " शंकर्स वीकली "च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या नेहरूंच्या संदेशात नेहरूंनी भारताविषयी आपल्याला वाटणारा अभिमान व आदर प्रकट करताना व भारताच्या सर्वांगीण समृद्धतेबद्दल लिहिताना, आपल्या मनातील इच्छा उघड करून दाखविली आहे. " मला जास्त वेळ मिळावा अशी माझी इच्छा आहे; म्हणजे मग भारताच्या प्रत्येक कोनाकोपऱ्याला मला भेट देता येणं शक्य होईल. नवनवीन वस्तूंचा शोध घेत असताना, आश्चर्य आणि कुतूहल वाटून ज्यांच्या मनाचा विकास होत आहे अशा बुद्धिमान तरुण बालकांच्या सहवासात तिथं जाणं मला आवडेल. भारतातील मोठ्या शहरांपेक्षा,

भारताच्या इतिहासाचं दर्शन घडविणारी स्मारके, नद्या, पर्वत, अरण्ये इत्यादी स्थळी त्यांच्याबरोबर जाण्याची मला आवड आहे. भारताच्या काही भागात बर्फावर खेळणं आणि क्रांतिवृत्ताच्या आसपास मुक्तपणाने वाढणारी अरण्ये यांचे शोध त्यांचे त्यांनीच घ्यावे हीच माझ्या आवडीची गोष्ट आहे. निसर्ग-रम्य वृक्ष आणि अरण्ये, आणि कडेकपारी आणि बदलत्या ऋतुमानाला भूष-विणारी व आपल्या जीवनात चैतन्य आणि वैचित्र्य निर्माण करणारी फुले यांचा शोध घेणारा, बालकांच्या संगतीतील तो प्रवास ठरेल. आम्ही पक्ष्यांना पाहू, त्यांची ओळख पटवून त्यांची मैत्री संपादन करू; परंतु सर्वांत चित्तथरारक साहस म्हणजे लहान आणि मोठीही रानटी श्वापदे पाहाणे हेच होय."

बालमनाची अचूक जाणीव नेहरूंना किती उत्कट प्रमाणात होती याचं प्रत्यंतर आणि दर्शन वरील उताऱ्यात घडतं. ही जाणीव व्हावयास बालमनाचा पुस्तकी किंवा निरीक्षणपूर्वक केलेल्या अभ्यासापेक्षा बालकाचं मन असण्याची आवश्यकता आहे. नेहरूंनी प्रौढपणीही आपल्या शैशवास जपून ठेवल्यामुळेच बालमनाची जाणीव त्यांना शक्य झाली. वरील उताऱ्यात दिलेल्या प्रत्येक वस्तूत व स्थळात बालकांना आकर्षण असतं हे जाणूनच बालकांच्या सहवासात त्या वस्तूंना आणि स्थळांना भेटी देऊन बालमनाला लागणारे त्या वस्तूंचे व स्थळांचे शोध लागल्यानंतर बालकांच्या मनात निर्माण होणारं कुतूहल, आश्चर्य आणि वाटणारा निरागस आनंद अनुभविण्याची बालसदृश इच्छा नेहरूंना झाली.

बालकांच्या मनात वास करीत असणारं कुतूहल, प्रेम आणि ओढ यांना राष्ट्राची, धर्माची, जातीची मर्यादा नसते. कोणत्याही राष्ट्रातील, धर्मातील, जातीतील किंवा पातळीवरील बालकांविषयी त्यांना कुतूहल व प्रेम वाटतं व ती इतर बालकांशीही तात्काळ समरस होतात. नेहरूंच्या शैशव-मनालाही या मर्यादा पडत नसत. फक्त भारतातीलंच नव्हे तर, ते कोठल्याही राष्ट्रात गेले तरी तेथील भिन्नजातीय भिन्नधर्मीय आणि भिन्न पातळीतील व परिस्थितीतील बालकांच्या मेळाव्यांना आवर्जून उपस्थित राहात; बालकांच्या विकासासाठी किंवा करमणुकीसाठी अस्तित्वात असलेल्या संस्थांना भेटी देत; तेथीलबालकांना गोष्टी सांगत; त्यांच्या खेळांत व नृत्यादी कार्यक्रमात भाग घेत असत.

बालकांच्या सहवासात रमून जाऊन, आनंदाचा उपभोग नेहरू कितीही घेत असले तरी, ते एक थोर नेते व राष्ट्राच्या महत्पदावर आरूढ झालेले व सर्वांची सर्वांगीण विकासाची जबाबदारी घेतलेले धुरीण होते. आणि त्याची जाणीवही त्यांच्या मनात सदैव जागृत असल्यामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासाचे व ती बालके ज्या परिस्थितीत आपलं जीवन कंठीत असतात त्या-संबंधीचे विचार त्यांच्या मनात सदैव घोळत असत. ह्या परिस्थितीचे चित्रण करून, बालकांना अशा परिस्थितींतून मुक्त करून, त्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना राष्ट्राचे जबाबदार नागरिक बनविण्यासंबंधीचे विचार ते संधी मिळेल तेव्हा प्रकट करीत. २३–१–१९५५ रोजी आवडी येथे भरलेल्या 'इंडियन नॅशनल काँग्रेस'च्या अधिवेशन प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणतात : "शिक्षणाला, कधी कधी अन्नवस्त्रालाही पारखी झालेली मुले दृष्टीस पडली की, इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा मला जास्त दुःख होतं. आज आपली मुले शिक्षणाला पारखी झाली तर, उद्यांच्या आपल्या भारताचं भवितव्य काय आहे ? राष्ट्रातील प्रत्येक बालकाला सुशिक्षण देणं हे राज्याचं कर्तव्य आहे. मी पुढं असंही म्हणेन की, देशातील प्रत्येक बालकाला मोफत शिक्षण हेही राज्याचं कर्तव्य ठरेल.... "

राज्याच्या बालकांविषयींची ही जाणीव स्पष्ट शब्दात त्या इतिहासप्रसिद्ध भाषणात नेहरूंनी करून दिली. बालकांना शिक्षण आणि तेही विनामूल्य दिलं गेलं पाहिजे हे बजावताना, नेहरूंच्या मनात शिक्षण म्हणजे शाळेतील लिहिण्यावाचण्याचे शिक्षण एवढाच अर्थ अभिप्रेत नव्हता. भारताचं भवितव्य उज्ज्वल व समृद्ध घडवायचं असेल तर बालकांना फक्त शाळेतील लिहिण्या-वाचण्याचं शिक्षण देऊन भागणार नाही; याची स्पष्ट जाणीव नेहरूंना असल्यामुळे हे शिक्षण कोणत्या प्रकाराचं व पद्धतीचं असावं याचं स्पष्टीकरण करताना ते पुढे म्हणतात : "कोणत्याही प्रकारची समाजरचना अस्तित्वात आणण्याचं उद्दिष्ट आपल्यासमोर असलं तरीही त्या समाजरचनेत निष्णात माणसांची आवश्यकता आहे. फक्त लिहायला आणि वाचायला शिकलेली माणसे नको आहेत; तर ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झालेला आहे, ज्यांच्या मनात ध्येयं आहेत. आणि त्यासंबंधी सुसंस्कृतपणाचे घटक गुण आहेत आणि आपल्या हातांनी काही तरी निर्माण करू शकतील अशांची आवश्यकता आहे. "

न राष्ट्राचं भवितव्य ज्यांच्या सुसंस्कृतपणावर, सुशिक्षणावर आणि कर्तृत्वावर अवलंबून आहे, अशा आजच्या बालकांच्या मनावर कोणत्या शिक्षणाचे परिणाम होणं आवश्यक आहे याचं स्पष्ट दिग्दर्शन नेहरूंनी वरील भाषणात केलं आहे. भावी राष्ट्रीय उन्नतीसाठी ब्रिटिशांच्या परकीय अमदानीत दिलं गेलेलं व अजूनही फक्त लिहिण्यावाचण्याचं शिक्षण देऊन कारकून निर्माण करण्याची परंपरा चालू आहे ती घातक आहे. आजच्या बालकांतूनच उद्याचे नागरिक व राष्ट्रीय भवितव्याचे शिल्पकार निर्माण व्हावयास पाहिजेत. आणि त्यासाठी आजच्या बालकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणारे सुसंस्कार व सुशिक्षण दिले पाहिजे; त्यांच्या दृष्टीसमोर त्या दृष्टीने काही ध्येयं ठेवली गेली पाहिजेत; सुसंस्कृतपणाचे घटक गुण त्यांच्या अंगी निर्माण होऊन ते जोपासले गेले पाहिजेत, आणि शेवटी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीवनोपयोगी वस्तूंची समृद्धी करण्यासाठी हस्तव्यवसाय करणारे तंत्रज्ञ निर्माण होण्यासाठी आजच्या बालकांना तांत्रिक शिक्षण दिलं पाहिजे यावर नेहरूंचा कटाक्ष दिसून येतो, बालकांच्या सहवासात रमणारे व त्या सहवासाचा आनंद उत्कटतेनं घेणारे नेहरू त्या बालकांच्या आणि त्यांच्या द्वारे राष्ट्राच्या विकासाचे विचार करीत असत.

बालकांना देण्यात यावयाच्या आवश्यक शिक्षणाचं ध्येय व फल काय असावं यासंबंधी विचार प्रदर्शित करूनच नेहरू थांबले नाहीत, तर ते शिक्षण कसं असावयास पाहिजे, त्याची पद्धत कोणती असावी याविषयीचे विचारही आपल्या भगिनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी मांडले आहेत. या पत्राच्या सुरुवातीलाच बालशिक्षण या विषयावर सल्ला देणं आपल्याला कठीण वाटत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. कारण असं की, ज्या बालकाला शिक्षण द्यावयाचं आहे त्या बालकावर, आणि त्या बालकाच्या मातापित्यांच्या दृष्टीसमोर असलेल्या उद्दिष्टांवर त्या शिक्षणाचं स्वरूप अवलंबून असतं. व्यवसाय अगर हुद्दा या दृष्टीनं ते त्या उद्दिष्टांकडे पाहात नसून, मातापित्यांचा सर्वसाधारण जीवनविषयक दृष्टिकोन किंवा जीवनविषयक तत्त्वज्ञान या दृष्टीने पाहतात. सर्वसाधारणपणे प्रत्येक व्यक्तीला जीवनविषयक दृष्टिकोन असतो, पण तो त्याला शब्दात वर्णन करून सांगण्यात येणार नाही. परंतु जीवनाची एक चौकट स्वीकारून त्या चौकटीत जीवनाला बसविण्याची,

जाणीवपूर्वक किंवा अभावितपणाने, धडपड प्रत्येकाची चाललेली असते. स[illegible] साधारण ही चौकट, व्यक्ती ज्या सामाजिक समूहात वावरत असते, किंवा आतस्वकीयांशी तिचा संबंध असतो तसलंच जीवन ती व्यक्ती स्वीकारते. थोड्याफार फरकानं तेच त्याच्या जीवनाचं उद्दिष्ट ठरून जातं. आणि मग त्या उद्दिष्टांवर कितीही बाह्य विचारांचे आघात झाले तरी ती उद्दिष्टे झटकून टाकण्यास त्या व्यक्तीचं मन सहसा तयार होत नाही. नवीन आचारविचार स्वीकारून जीवनाच्या ठराविक चौकटीतून मुक्त होण्यास ती व्यक्ती तयार होत नाही. आणि अगदी अगतिक होऊन जर नवीन जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा किंवा उद्दिष्टांचा तिला अंगीकार करणं भाग पडलं तर कुरकुरत, संतापतच आणि नाइलाजाने तो करण्यात येतो. बालकाची मातापितरे या सर्वसामान्य नियमाला अपवाद असत नाहीत. आपलं बालक सर्वसद्गुणी आणि संपन्न व्हावं अशीच इच्छा मातापित्यांची असते. परंतु, ही गोष्ट दुर्लभ असून क्वचितच एखाद्या बालकाच्या वाट्याला येते. म्हणून त्यातून काही गोष्टी निवडून घेऊन त्यावरच बालकाच्या मातापित्याने भर देऊन त्या दृष्टीनं बालकाच्या भावी जीवनविषयक अपेक्षा ठेवून त्या दृष्टीनं प्रयत्न केले पाहिजेत.

ज्या वातावरणात बालक वाढत असेल त्या वातावरणाचाही विचार व्हावयास पाहिजे. कारण त्या वातावरणाचाही बालकाच्या भावी जीवनावर परिणाम होत असतो. वातावरण सुस्थिर असेल तर काही सद्गुण आणि कार्ये ही उपयुक्त ठरतात. परंतु, शीघ्र गतीने बदलत जाणाऱ्या काळात, या गोष्टींना महत्त्व प्राप्त न होता दुसऱ्याच सद्गुणांना आणि कार्यांना ते महत्त्व येतं. परंतु काळ कोणताही असला तरी स्वावलंबन, शरीरसंपन्नता, आणि मनाचा चलाखपणा आणि शरीर आणि मन यांमधील सुसंगतपणा, व जीवनविषयक मूल्यांची मूलतः जाणीव यांची आवश्यकता नेहमीच असते. वाढ होत असलेल्या बालकांच्या जीवनाचा भरभक्कम पाया या आवश्यक गुणांवर घातला गेला तरी पुष्कळ असं नेहरूंनी आपलं मत शेवटी व्यक्त केलं आहे.

बालकांच्या पुढील जीवनाच्या दृष्टीने, मूलतः त्यांच्या मनावर कोणत्या आवश्यक गुणांचे संस्कार करून त्यांचं पुढील जीवन समृद्ध व विकासपूर्ण व्हावं यासाठी ते गुण त्यांच्या अंगी बाणावे म्हणून मातापित्यांनी सदैव

जागृत राहिलं पाहिजे याचे महत्त्वपूर्ण विचार नेहरूंनी त्या पत्रात व्यक्त केले आहेत. आणि त्या आवश्यक गुणांबद्दल कोणत्याही जाणत्या व विचारी मातापित्याचं दुमत होईल असं वाटत नाही. या गुणांचे संस्कार व वाढ ज्या बालकाच्या मनावर झाले आहेत अशाच बालकाचं जीवन यशस्वी, कीर्तिवंत आणि सर्वसमृद्ध होत असतं. परंतु ज्या बालकाच्या मनावर हे संस्कार व या गुणाची वाढ करण्यात त्याची मातापिता चुकलेली असतात, त्या बालकाचं जीवन पुढे फुकट गेलेलं, व्यसनाधीन झालेलं व नासलेलं दृष्टीस पडतं. सर्वसाधारण बालकांच्या जीवनाची सुखांतिका वा शोकांतिका करण्याचं त्याच्या मातापित्याच्या हातात असतं. विशेषतः संपन्न मातापित्यांच्या बाबतीत ही गोष्ट प्रकर्षानं प्रगट होते.

नेहरूंच्या जीवनाचा विचार करावयाचा झाला तर, त्यांचं सांस्कृतिक जीवन सुसंपन्न होतं. याचं कारण, दुसऱ्या प्रकरणात लिहिल्याप्रमाणे, त्यांच्या मातापित्यांनी नेहरूंच्या मनावर जे सुसंस्कार घडविले हेच होय. आणि म्हणूनच, आपल्या आत्मचरित्राच्या प्रारंभीच्या वाक्यात केलेल्या "संपन्न मातापित्याचा एकुलता एक पुत्र बिघडण्याचा संभव, विशेषतः भारतात, असतो," या विधानाला अपवादात्मक अशा समृद्ध जीवनाचा लाभ नेहरूंना झाला.

卐 卐 卐

कौटुंबिक जीवन

राजकीय अगर सामाजिक कार्य निष्ठेनं सतत करीत राहणाऱ्या पुढाऱ्यांना किंवा इतर कार्यकर्त्यांना कौटुंबिक जीवन नसतं; त्यांचं सारं जीवन अंगीकृत कार्याला त्यांनी वाहून घेतलं असल्यामुळं कुटुंबातील व्यक्ती, घर, संसार यांकडे लक्ष द्यायला, कुटुंबातील व्यक्तींसमवेत कौटुंबिक आयुष्य घालवायला किंवा कौटुंबिक सुख अनुभवायला फुरसत नसते आणि त्यामुळं अशा व्यक्तींना कौटुंबिक सुख किंवा जीवनच नसतं असा सर्व-साधारण समज प्रचलित आहे. आणि काही पुढाऱ्यांच्या किंवा कार्यकर्त्या व्यक्तींच्या जीवनाकडे लक्षपूर्वक पाहिलं तर, तशी वस्तुस्थिती असल्याचा प्रत्ययही येतो. घरदार, संसार, कुटुंब यांकडे पाठ फिरवून, कौटुंबिक जीवनावर व सुखावर

तिलांजली ठेवून आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण, अंगीकृत ध्येयासाठी झगडण्यात खर्ची घालणारे संत, पुढारी, क्रांतिकारक असे महाभाग आढळतात हे खरं आहे. परंतु, त्याबरोबरच हाती घेतलेल्या कार्यासाठी, ध्येयासाठी झगडतानाही व त्यासाठी जीवन अर्पण केलं असताही कौटुंबिक जीवन जगणारे व कौटुंबिक सुख अनुभविणारे महापुरुषही आढळण्यात येतात. किंबहुना, असे महापुरुषच संख्येनं जास्त आढळतील.

कै. पंडित नेहरूंच्या जीवनाची खरी सुरुवात साधारणपणे १९२० सालापासून, म्हणजे त्यांच्या वयाच्या एकतिसाव्या वर्षी झाली असं समजावयास हरकत नाही. याच साली गांधीजींच्या प्रभावानं नेहरू राजकारणाकडे आकर्षित झाले आणि मग आपलं सारं जीवन त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी वाहून टाकलं. १९२० ते २७ मे १९६४ पर्यंत त्यांचं सारं जीवन राजकीय आणि त्या अनुरोधाने आनुषंगिक सामाजिक व आर्थिक कार्यमग्न बनलं होतं. एखाद्या निष्ठावंत कर्मयोग्याचं जीवन ते जगत होते. दौरे, सभा, भेटीगाठी, प्रवास, काँग्रेस कचेरीतील कामं, चर्चा इत्यादी गोष्टींनी जवळजवळ संपूर्णपणे त्यांचं जीवन व्याप्त करून टाकलं होतं. या अवाढव्य कार्याच्या डोंगरातून नेहरूंना कौटुंबिक सुख किंवा जीवन यांचा लाभ घेता येणं शक्य नाही असाच समज कुणाचाही होईल.

परंतु, ही गोष्ट खरी नव्हती. जीवनाचे अनेकविध अनुभव घेण्याची त्यांच्या विशाल मनाची सदैव तयारी होती. आणि जीवनही अनेकविध कार्यांनी व्याप्त झालं असलं तरीही अनेकविध अनुभव ते आपल्या जीवनात घेत राहिले होते. आणि या अनेकविध अनुभवांत कौटुंबिक जीवनाचा आणि आप्तपरिवारांच्या सान्निध्यातील प्रेमाचा आणि सुखी आयुष्याचा अनुभवही ते शेवटपर्यंत घेत होते.

व्यक्तीचं जीवन कितीही कार्यव्याप्त असलं तरी तिच्या जीवनात कुटुंबाचं, निकटच्या नात्यातील व्यक्तीचं आणि त्यांच्या प्रेमाचं केवढं मोठं स्थान असतं याची नेहरूंना पूर्ण जाणीव होती. नेहरूंच्या वैवाहिक जीवनाला, राजकीय जीवनाबरोबरच सुरुवात झाली होती. आणि त्यामुळे आपल्या पतिविषयक कर्तव्याला मुकल्याची जाणीव, कै. कमला नेहरू आजारी असताना ११ ऑगस्ट

१९३५ रोजी नेहरूंची तात्पुरती सुटका झाली. नेहरू आपल्या पत्नीच्या रुग्णशय्येजवळ बसले असताना त्यांच्या मनात त्यासंबंधीचेच विचार येत होते. आपल्या आत्मचरित्रात हे विचार मांडताना ते लिहितात : " या सर्व कार्यात माझं सारं लक्ष इतकं केंद्रित झालं होतं की, संपूर्ण अजाणीवपणे, माझ्या संपूर्ण सहकार्याची तिला जरूरी असतानाही, त्या वेळी मी तिच्याकडे जवळजवळ दुर्लक्ष केलं आणि तिचा सारा भार तिच्यावर टाकला होता. तिच्याबद्दलची प्रीती माझ्या मनात मात्र सतत होती. एवढंच नव्हे तर, वाढतच होती, आणि आपल्या सांत्वनयुक्त प्रभावानिशी ती आपल्या मदतीसाठी सदैव सज्ज आहे याची जाणीव माझ्या मनाला सुखवीत होती. तिनं मला सामर्थ्य दिलं; परंतु त्यासाठी तिला खूपच सहन करावं लागलं असणार आणि शिवाय आपली थोडीफार उपेक्षा होत असल्याची भावनाही तिला जाणवत असेल. "

नेहरूंच्या जीवनात त्यांच्या पत्नीचं स्थान किती सामर्थ्यशाली व सांत्वनयुक्त होतं याची जाणीव वरील उताऱ्यावरून सहज होऊ शकेल. त्यामुळं ते जरी तुरुंगात असले तरीही पत्नीच्या भेटीची ओढ त्यांच्या मनाला लागून राही. अशा स्थितीत कमला नेहरूंनी तुरुंगवास पत्करला तेव्हा तर " आम्ही कधी नव्हतो इतके परस्परांपासून निकट " आल्याची जाणीव नेहरूंना झाली. त्यांच्या " क्वचित होणाऱ्या भेटी बहुमूल्य वाटू लागल्या आणि होणाऱ्या भेटीसाठी दिवस मोजीत. " ते त्या भेटीकडे डोळे लावून बसत. " आम्हांला परस्परांचा कंटाळा येत नसे किंवा शिळेपणाही वाटत नसे. आणि परस्परांच्या संगतीत अल्पकाळही त्या भेटीत आम्हांला नावीन्य आणि ताजेपणाचा प्रत्यय येई. " सदासर्वकाळ परस्परांच्या निकटच्या सान्निध्यात व सहवासात राहिल्यामुळे येणारा वीट, शिळेपणा किंवा तोच तोचपणा यांचा अभाव नेहरूंच्या कार्यमग्न अवस्थेमुळे न येता, उलट परस्परांच्या अल्पकालीन संगतीचा लाभ नेहरू पति-पत्नींना होई. त्यामुळे त्या भेटीत परस्परांबद्दल विशेष आत्मीयता, ओढ, उत्कट प्रेमभावना आणि ताजेपणा वाटे. हा एक नवीन अनुभव त्या पति-पत्नींना अनुभवयास मिळाला. आणि म्हणूनच त्यांच्या मनात विचार आले : " जेव्हा तिची मला खूपच जरूर होती अशा वेळी आत्ता ती मला खात्रीनं सोडून जाणार नाही. आम्ही परस्परांना जाणून आणि समजून घेण्यास नुकतीच कोठे सुरुवात केली आहे. आमचं एकत्रित जीवन योग्य प्रकारे नुकतंच कोठे सुरू होत

आहे. आम्ही परस्परांवर किती विसंबून होतो, आणि आम्हांला एकत्रपणाने अजून किती तरी गोष्टी करावयाच्या आहेत."

कमला नेहरूंच्या रुग्णशय्येजवळ बसले असताना नेहरूंच्या मनात हेच विचार घोळत असत. आणि अशाच चिंतामग्न अवस्थेत अकरा दिवस संपून गेले आणि २३ ऑगस्ट रोजी नेहरूंना पुन्हा तुरुंगात नेण्यात आलं कै. कमला नेहरूंना जर्मनीमधील बाडेनवाइलर् येथील सॅनिटोरियममध्ये ठेवण्यात आलं. आणि मग अचानक ४ सप्टेंबर १९३५ रोजी नेहरूंची सुटका करण्यात आली. कमला नेहरू अत्यवस्थ होत्या म्हणून नेहरू ताबडतोब तिकडे रवाना झाले. आणि ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी तिथे जाऊन पोहोचले. नेहरूंच्या आगमनानं कमलाची मुद्रा प्रफुल्लित झाली. परंतु खूप अशक्तपणा आणि शरीरिक दुःख यांमुळे तिला फारसं बोलता येत नव्हतं. थोड्याशाच बोलण्यानं ती थकून जाई. कधी कधी, नेहरू आपल्या पत्नीला वाचून दाखवीत. रोज अशा तऱ्हेने नेहरू काही तास आपल्या पत्नीच्या रुग्णशय्येजवळ बसून राहात असत. अशा वेळी "तिला सांगण्यासाठी अनेक गोष्टींचा साठा" नेहरूंजवळ होता तरीही त्यांना "संयम बाळगावा लागे." "कधी कधी आम्ही जुन्या कळासंबंधी जुन्या आठवणी, समान मित्रांसंबंधी, कधी कधी, थोड्याशा उत्सुकतेनं, भविष्यकाळासंबंधी व तेव्हा आपण काय काय करायचं यासंबंधी बोलत असू."

कमला नेहरूंना ज्या सॅनिटोरियममध्ये ठेवलं होतं तेथून नेहरूंचं राहण्याचं ठिकाण दूर होतं. काही तास पत्नीच्या सहवासात घालविल्यानंतर ते परत आपल्या वास्तव्यस्थानी येत. अशा वेळी आपल्या खोलीत एकटेच बसलेले असताना नेहरूंना आपल्या वैवाहिक जीवनाच्या काळाची स्मृती होई. सतत कार्यमग्न अवस्थेत राहिल्यामुळे वैवाहिक जीवनाचा प्रारंभीचा काळही आपण आपल्या वैवाहिक जीवनाचा अनुभव फारसा घेतला नाही हाच विचार त्यांच्या मनात त्या वेळी येई. असं असूनही "मी तिला कधीच विसरलो नव्हतो. आणि मी पुनः पुन्हा तिच्याकडे खात्रीचं विश्रामस्थान म्हणून परत येत होतो. मी जरी बरेच दिवस दूर असलो तरी तिच्या फक्त स्मृतीनं माझं मन शांत होत असे, आणि घरी परत जाण्यासाठी मी उत्कंठेनं वाट पाहात असे. माझ्या मनाचं सांत्वन करून, मला सामर्थ्य देऊन, आणि माझ्या मनाची आणि

शरीराची संपूर्ण खर्च झालेली चित्‌शक्ती पुन्हा निर्माण करण्यासाठी अशा रीतीनं तिची मदत मला झाली नसती तर माझी काय अवस्था झाली असती ?"

अशा प्रकारचे अनेक विचार नेहरूंच्या मनात बाडेनवाइलर् येथील वास्तव्यात सतत येत असतात. कमला नेहरूंची प्रकृती थोडी फार सुधारलेली दिसत होती. मध्यंतरी नेहरू काही दिवस लंडन व पॅरिसला जाऊन आले होते. आणि याच काळात इंडियन नॅशनल काँग्रेसच्या अध्यक्षपदी नेहरूंची निवड झाली होती. त्यामुळे नेहरू चांगलेच पेचात सापडले होते. कमलाला सोडून भारतात परत येणं किंवा अध्यक्षपदाचा राजीनामा देणं यांपैकी एक पर्याय त्यांना स्वीकारणं भाग होतं. राजीनामा देणं कमलाला पसंत पडलं नसतं. आणि म्हणून तिच्या संमतीनं १९३६ च्या जानेवारी महिन्याच्या उत्तरार्धात कमला नेहरूंना स्विट्झर्लंडमध्ये लॉसेन येथील सॅनिटोरियममध्ये ठेवण्यात आलं. कमलाच्या बाह्य स्थितीत सुधारणा दिसून आली. कमला नेहरूंचा विचार घेऊन आणि डॉक्टरांचा सल्ला घेऊन २८-२-१९३६ रोजी नेहरूंनी विमानात स्वतः-साठी भारत प्रवासाकरिता जागाही राखून ठेवली होती; परंतु, प्रयाणापूर्वी ४–५ दिवस अगोदर डॉक्टरांनी नेहरूंना आपलं प्रयाण पुढं ढकलण्यासाठी आवाहन केलं. नेहरूंनी ते ताल्काळ मान्य केलं आणि दुर्दैवानं ज्या दिनांकी आपल्या प्रयाणासाठी जागा राखून ठेवली होती त्याच दिवशी सकाळी कमला नेहरूंचं देहावसान झालं. आपल्या प्रिय पत्नीच्या पार्थिव देहाचं दहन करून व रक्षाकरंडक घेऊन नेहरू परतले. कायरोनंतरच्या प्रवासात "तासामागून तास, उजाड वाळवंटावरून, हवाई प्रवास करीत असताना भयानक एकाकीपणानं माझ्या मनावर मगरमिठी घातली आणि स्वतःचं जीवन निरर्थक आणि हेतु-शून्य भासू लागलं. मी स्वतः एकटाच घरी परत जात आहे; यापुढं ते माझं घर मला वाटणार नाही... आता यापुढं कमला नाही, यापुढं कमला नाही, यापुढं कमला नाही हाच विचार माझ्या मनात घोळत राहिला. माझं आत्म-चरित्र, माझा जीवनवृत्तांत, या ग्रंथासंबंधीचे विचार माझ्या मनात आले. त्यातील काही प्रकरणे मी तिला वाचून दाखविली होती. बाकीचा भाग ती पाहू शकणार नव्हती; किंवा आमच्या एकत्रित जीवनग्रंथातील पुढील प्रकरणेही यापुढं आम्ही लिहू शकणार नव्हतो." आणि मग अशा उदास मनःस्थितीत बगदाद येथे आल्यावर नेहरूंनी आपल्या आत्मचरित्राच्या लंडन येथील

प्रकाशकाला तार करून त्या ग्रंथाची अर्पणपत्रिका कळविली– "कमलास, जी यापुढं अस्तित्वात नाही." (भारत–शोध).

आपल्या जीवनातील आपल्या पत्नीचं अत्यंत महत्त्वाचं स्थान नेहरूंनी अनुभविलं होतं, जाणलं होतं; त्याप्रमाणेच त्यांचे वडील कै. मोतीलाल नेहरू यांच्याही महत्मतेबद्दल नेहरूंना पराकोटीचा आदर व आत्मीयता वाटत होती. नेहरूंच्या जीवनावर तीन थोरांचा परिणाम झाल्याचं त्यांनी स्वतःच लिहून ठेवलं आहे. पिताजी मोतीलाल नेहरू, गांधी व रवींद्रनाथ टागोर या त्या तीन थोर विभूती होत्या. नेहरूंच्या महान जीवनाचा सांस्कृतिक पाया घालण्यामध्ये मोतीलालजींचा फार मोठा त्याग आणि कर्तृत्व होतं याचा परिचय या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात आपण करून घेतलाच आहे. अर्थातच नेहरूंच्या कौटुंबिक जीवनात मोतीलालजींना फार महत्त्वाचं स्थान असणं साहजिक होतं आणि त्यामुळंच नेहरूंना आपल्या पित्याचा सदैव फार मोठा आधार वाटत असे. आपल्या आत्मचरित्रात मोतीलालजींच्या भव्य व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडविताना नेहरूंनी अनेक ठिकाणी, आपल्या अमोघ लेखनशैलीत यथार्थ उद्गार काढले आहेत. ते कितीही यथार्थ असले तरी नेहरूंनी आपल्या पित्याबद्दल गौरवाचे व आत्मीयतेचे जे उद्गार काढले त्याबद्दल नेहरूंना आपण पक्षपात करीत आहो की काय असं वाटायला लागलं.

"मी त्यांच्या बाबतीत पक्षपात करीत आहे असं मला वाटतं" असे उद्गार काढून नेहरू आपल्या पित्याच्या निधनानं निर्माण झालेली पोकळी वर्णन करताना थोडक्यात लिहितात : "क्षुद्रता आणि दुबळेपणा यांनी भरलेल्या या जगात त्यांच्या प्रतिष्ठित अस्तित्वाला मी मुकलो आहे. त्यांचं भव्योदात्त आचरण आणि त्यांचं अगाध सामर्थ्य लाभावं म्हणून मी नेहमी शोध घेत असतो, पण त्याचा लाभ मला इतरत्र कधीच होत नाही."

आपल्या पित्याबद्दल नेहरूंच्या मनातील उत्कट आणि अत्यादराची भावना त्यांनी ऑगस्ट १९२३ मध्ये कै. महादेवभाई देसाई यांना लिहिलेल्या एका पत्रातही प्रगट केली आहे. पित्याच्या प्रेमाचा उत्कट आणि परिपूर्ण अनुभव घेण्याचं सद्भाग्य मला लाभलेलं आहे. आणि अनेक वेळा, माझ्या जन्मापासून प्रेमाचा आणि संरक्षणाचा माझ्यावर त्यांनी जो वर्षाव केला त्याची परतफेड

कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने मी करीत आहे किंवा नाही, याविषयी माझ्या मनांत संभ्रम निर्माण होतो. अनेक वेळा या प्रश्नाला मला तोंड द्यावं लागतं आणि माझ्या स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल मला, त्या प्रत्येक वेळी लाज वाटू लागते."

मोतीलाल नेहरू आणि जवाहरलाल नेहरू या पितापुत्रांमधील उत्कट प्रेमाचे आणि आत्मीयतेचे संबंध क्वचितच कुठे पाहण्यास मिळतील. मोतीलालजींच्या अनेक थोर व्यक्तिविशेषांचं वर्णन करताना गांधींनी लिहिलं होतं : "मोतीलालजींचा सर्वोच्च व्यक्तिविशेष म्हणजे त्यांचं पुत्राबद्दलचं प्रेम." यावर त्यांना विचारलं गेलं की, "भारताबद्दलचं प्रेम हा मोतीलालजींचा सर्वोच्च व्यक्तिविशेष नव्हे का?" "नाही." गांधींनी उत्तर दिलं : "मोतीलालजींचं भारताविषयीचं प्रेम, जवाहरबद्दलच्या त्यांच्या प्रेमातून निर्माण झालं होतं."

नेहरूंबद्दलच्या मोतीलालजींच्या उत्कट प्रेमाची साक्ष नेहरूंच्या व गांधींच्या वरील उद्गारांवरून कोणालाही सहज पटेल. त्याबरोबरच आपल्याविषयी आपल्या सुपुत्राच्या – जवाहरलालच्या मनात परमोच्च प्रेमाची व आदराची भावना होती याची जाणीव खुद्द मोतीलालजींनाही होती. मोतीलालजी आजारी असताना, त्यांच्या सेवाशुश्रूषेचं कार्य नेहरूंनी स्वतःवर घेतलं आणि ते कार्य असीम प्रेमानं व उत्कट आत्मीयतेनं, भक्तिपूर्वक नेहरू करीत असलेलं पाहून मोतीलाल गहिवरून आले. त्यासंबंधी मोतीलालजींनी लिहिलं होतं : "माझी सेवाचाकरी करण्याचा धडा हरीनं (त्यांच्या सेवकानं) गिरवला तर किती चांगलं होईल? पहाटेच्या चहापासून तो रात्री मला झोप लागेतोपर्यंत, मला लागणारी प्रत्येक गोष्ट जागच्या जागी ठेवलेली असे. अगदी तपशीलवार पद्धतीनं प्रत्येक गोष्ट तो स्वतः करी आणि त्यामुळं कोणताही जिन्नस मला मागण्याची पाळी येत नसे. प्रत्येक गोष्टीचा जवाहरला अंदाज असे, आणि म्हणून कोणतीही गोष्ट करण्याची वेळच माझ्यावर येत नसे. अशा पुत्राबद्दल अभिमानपूर्वक बोलण्याचं भाग्य लाभणारे पिते कितीसे असतील!"

मातेच्या, पित्याच्या आणि पत्नीच्या अमाप प्रेमाचा लाभ नेहरूंना झाला आणि म्हणूनच कौटुंबिक जीवनाची ओढ त्यांना सतत लागलेली असे. कुटुंबसंस्थेचे गुणदोष त्यांना पूर्णपणे माहीत होते. कौटुंबिक जीवनापासून मिळणारे फायदे व

होणारे तोटे यांचीही त्यांना जाणीव होती. "ना खंत ना खेद" या पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांनी उद्धृत केलेल्या नेहरूंच्या एका पत्रात नेहरूंचे कुटुंबविषयक विचार व्यक्त केलेले आढळतात. नेहरू लिहितात :

"१९२८ आणि त्या वेळी अस्तित्वात असलेल्या आपल्या एकसंध जीवनाविषयी तू लिहितेस; आता पुष्कळ प्रिय व्यक्ती मृत झाल्या आहेत, आणि इतर विखुरल्या गेल्या असून, परस्परांना भेटू शकणार नाहीत अशा रीतीनं अलग झाल्या आहेत. प्रत्येक पिढीत पुनरावृत्त होत असलेला हा धडा, प्रत्येक पिढीनं, व्यक्तिगत अनुभवावरून शिकला पाहिजे. एकसंधतेमागून विभागणी निर्माण होते; परंतु, प्रत्येक एकसंधता ही पूर्वीपेक्षा जास्त वरच्या दर्जाची कदाचित असू शकते; कारण, अजाणतेने ती पूर्वकालीन यश आणि अपयश यांच्या स्मृती घेऊन येत असते. भूतकालाचं ओझं आपल्या डोक्यावर पडतं; अणि ते ओझंही असतं तसंच प्रेरकही असतं. कारण त्यामुळं आपण खचूनही जातो, आणि त्याबरोबरच पुढंही ढकलीत असतं. कधी कधी आपल्यामध्ये चैतन्याची, यौवनाची अणि जोमाची भावना निर्माण होते; तर दुसऱ्या एखाद्या प्रसंगी हजारो वर्षांच्या भाराखाली आपण दबून जातो आणि मग आपल्याला वृद्धत्वाची जाणीव होऊन दीर्घकालीन आणि अक्षयकालीन मार्गक्रमणात थकून जातो. दोन्हीही गोष्टी आपल्या जीवनाचे भाग आहेत आणि त्यामुळेच आपण जे आहोत त्याची घडण होते. आणि याच निरंतरच्या द्वंद्वयुक्त झगड्यातूनच नवीनतेचा जन्म होतो..... मी जेव्हा बालक होतो, तेव्हा, मला आठवतं, आपलं कुटुंब वीस किंवा त्याहूनही जास्त व्यक्तींचं होतं, आणि एकत्रित कुटुंबासारख्या या सर्व व्यक्ती एकत्र राहत होत्या. या मोठ्या कुटुंबाचे विभाग झालेले मी पाहिले आहेत. आणि त्याच विभागाचे, स्वतंत्र भाग निर्माण होऊन त्यांचे जाळे पसरले. आणि तरीही प्रेमाच्या रेशमी धाग्याने आणि समान हितसंबंधांमुळे या स्वतंत्र विभागात संबंध घट्ट आला आणि अशा रीतीनं पुन्हा सबंध कुटुंबामध्ये नेहमीच एकता निर्माण होऊ लागली....."

अनेक व्यक्तींपासून बनलेल्या मोठ्या कुटुंबामध्ये विभाग निर्माण झाले तरी त्या विभागांमध्येही प्रेमाचा नाजुक रेशमी पाश तोडता येत नाही, असंच नेहरूंचं मत होतं. आणि या विधानाला अनुसरूनच, एकत्र कुटुंबातून विभाग-

लेल्या आपल्या आतस्वकीयांशी, नेहरूंनी अत्यंत प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध ठेवले होते.

मोतीलालजींच्या मृत्यूनंतर कुटुंबप्रमुखाची जबाबदारी नेहरूंच्या अंगावर पडली होती आणि या वेळी मोतीलालजींची आठवण होऊन त्यांनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या एका पत्रात, कुटुंबप्रमुख म्हणून मोतीलालजींच्या कर्तृत्वासंबंधी लिहिलं होतं : "आतापर्यंत जबाबदारीचं सारं ओझं पिताजींच्या खांद्यावर पडलं होतं आणि त्यांच्या प्रेमळ संरक्षणाखाली आणि आगामी अडचणींची त्यांना होणारी आगाऊ जाणीव यामुळे आपण सुरक्षित होतो. आपल्या मुलांविषयी त्यांच्या अगाध प्रेमाचं आवरण आपल्याभोवती होतं आणि त्यामुळं आपलं संरक्षण होत होतं आणि अनेक व्यक्तींना तोंड द्यायला लागणाऱ्या चिंता आणि काळज्या यांपासून मुक्त असं आपलं जीवन आपण जगत होतो. जीवनातील कठोर वास्तवता आपल्यासमोर उभी ठाकली असताना, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव आपल्याला दिलासा देणारी होती. आता आपल्याला त्यांच्याशिवाय जगायचं आहे, आणि प्रत्येक दिवस जात असताना, त्यांची अनुपस्थिती मला जास्तच जाणवते आणि भयानक एकलेपणा मला ग्रासून टाकतो..."

पण तरीही त्या मनःस्थितीमुळे भारावून जाऊन नेहरू कर्तव्यपराङ्मुख किंवा निष्क्रीय झाले नाहीत. आपल्या पिताजींनी कुटुंबविषयक जबाबदारी ज्या प्रेमानं, आत्मीयतेनं आणि निष्ठापूर्वक स्वीकारून पार पाडली, त्याचप्रमाणे आपणही त्या जबाबदारीचा स्वीकार करून बजावली पाहिजे, याचीही जाणीव नेहरूंना होती. कारण तात्काळ ते पुढे लिहितात : "पण त्याच वडिलांची आपण अपत्ये आहोत आणि त्यांच्या असामान्य सामर्थ्यांचा आणि धैर्याचा काही तरी भाग आपल्याला त्यांच्यापासून लाभलेला आहे; आणि कोणत्याही परीक्षेचे प्रसंग किंवा अडचणी आपल्या मार्गात येवोत, त्यांना, निश्चयपूर्वक आणि ठामपणे तोंड देऊन, त्यांचं निराकरण केलं पाहिजे."

आणि याच निश्चयानं व ठामपणे नेहरूंनी आपल्यावर पडलेली कुटुंबप्रमुखाची जबाबदारी पार पाडली. त्यांची माता व भगिनी, लहानमोठ्या सर्व

बाबतीत त्यांच्यावर विसंबून राहू लागल्या. एवढंच नव्हे तर, विवाहानंतर त्यांच्या भगिनी जरी आपल्या घरी गेल्या तरीही नेहरूंचा सल्ला घेण्यास किंवा इतर कोणत्याही बाबतीत त्यांची मदत घेण्यास मागंपुढं पाहत नसत. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी अनेक ठिकाणी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दिल्लीत अनेकविध कामांत नेहरू गढून गेले असले तरी, आपण एका कुटुंबाचे प्रमुख आहोत हे ते कधीच विसरले नाहीत. प्रत्यक्ष भेट घेऊन कौटुंबिक प्रश्न व कामकाज करता आलं नाही तरी पत्ररूपानं ते आपलं कर्तव्य बजावल्याशिवाय राहत नसत. व नंतर कामकाजाच्या गर्दीतून चारआठ दिवस फुरसत काढून ते, ते प्रश्न सोडवीत व कामकाजाच्या व्यवस्था लावीत असत. आपल्या भगिनींपेक्षा ते वयानं मोठे असले तरी नेहरूंनी आचरणाचे मार्ग किंवा पद्धत त्यांना कधीच आखून दिली नव्हती. जर कधी काळी कौटुंबिक मतभेदाचे प्रसंग आलेच आणि कुणाचं वर्तन नेहरूंना रुचलं नाही तर मृदू भाषेत आणि कौशल्यपूर्ण रीतीनं नेहरू त्याच्याशी त्या बाबतीत चर्चा करीत, स्वतःचा दृष्टिकोन त्याला नीट रीतीनं पटवून देण्याचा प्रयत्न करीत आणि शेवटी आपलं वर्तन चुकीचं होतं की बरोबर होतं हे ठरविण्याचं कार्य ते त्याच्यावरच सोपवीत. तरीही मतभेद मिटले नाहीत तरी आपल्याला आलेला राग किंवा वाटणारा खेद ते कधी प्रकट करीत नसत किंवा आपली मते व दृष्टिकोन दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करीत नसत. त्यामुळे कुटुंबप्रमुख म्हणूनच फक्त नव्हे तर, कुटुंबियांविषयी त्यांच्या मनातील प्रेमामुळे व आत्मीयतेमुळे, ते मित्र व सहकारी म्हणून कुटुंबातील व्यक्तींना सदैव हवेहवेसे वाटत. मोतीलालजींप्रमाणेच जवाहरही आपल्या पाठीशी सुखदुःखात, अडीअडचणीत आणि संकटकाली सदैव उभा आहे अशीच प्रत्येक कुटुंबियाची धारणा होती. पुत्र, बंधू, पिता असल्या निकटच्या नात्याच्या बंधनानं प्राप्त कर्तव्य करण्याच्या बुद्धीनंच केवळ नव्हे तर, मित्र आणि हितकर्ता हीच दृष्टी नेहरूंची आपल्या कुटुंबियांबद्दल होती. त्यामुळे नेहरूंजवळ आपले कौटुंबिक प्रश्न अगर अडचणी सोडविण्यासाठी नेताना कोणत्याही कुटुंबातील व्यक्तीला भय किंवा संकोच वाटत नसे. उलट, नेहरू हे स्वभावतःच विचारी व मानवी मनाचे व प्रवृत्तीचे असल्यामुळेच दुसऱ्याचे गुणदोष जाणून घेण्याची, स्वभावधर्म, विचार आणि अडचणी ओळखण्याची शक्ती त्यांच्यात होती. त्यामुळे आपले प्रश्न व अडचणी आपल्या दृष्टिकोनातून समजून घेऊन त्यानुसार उपाय सुचविण्याची

लेल्या आपल्या आतस्वकीयांशी, नेहरूंनी अत्यंत प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध ठेवले होते.

मोतीलालजींच्या मृत्यूनंतर कुटुंबप्रमुखाची जबाबदारी नेहरूंच्या अंगावर पडली होती आणि या वेळी मोतीलालजींची आठवण होऊन त्यांनी श्रीमती कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या एका पत्रात, कुटुंबप्रमुख म्हणून मोतीलालजींच्या कर्तृत्वासंबंधी लिहिलं होतं : "आतापर्यंत जबाबदारीचं सारं ओझं पिताजींच्या खांद्यावर पडलं होतं आणि त्यांच्या प्रेमळ संरक्षणाखाली आणि आगामी अडचणींची त्यांना होणारी आगाऊ जाणीव यामुळे आपण सुरक्षित होतो. आपल्या मुलांविषयी त्यांच्या अगाध प्रेमाचं आवरण आपल्याभोवती होतं आणि त्यामुळं आपलं संरक्षण होत होतं आणि अनेक व्यक्तींना तोंड द्यायला लागणाऱ्या चिंता आणि काळज्या यांपासून मुक्त असं आपलं जीवन आपण जगत होतो. जीवनातील कठोर वास्तवता आपल्यासमोर उभी ठाकली असताना, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव आपल्याला दिलासा देणारी होती. आता आपल्याला त्यांच्याशिवाय जगायचं आहे, आणि प्रत्येक दिवस जात असताना, त्यांची अनुपस्थिती मला जास्तच जाणवते आणि भयानक एकलेपणा मला ग्रासून टाकतो..."

पण तरीही त्या मनःस्थितीमुळे भारावून जाऊन नेहरू कर्तव्यपराङ्मुख किंवा निष्क्रीय झाले नाहीत. आपल्या पिताजींनी कुटुंबविषयक जबाबदारी ज्या प्रेमानं, आत्मीयतेनं आणि निष्ठापूर्वक स्वीकारून पार पाडली, त्याचप्रमाणे आपणही त्या जबाबदारीचा स्वीकार करून बजावली पाहिजे, याचीही जाणीव नेहरूंना होती. कारण तात्काळ ते पुढे लिहितात : "पण त्याच वडिलांची आपण अपत्ये आहोत आणि त्यांच्या असामान्य सामर्थ्याचा आणि धैर्याचा काही तरी भाग आपल्याला त्यांच्यापासून लाभलेला आहे; आणि कोणत्याही परीक्षेचे प्रसंग किंवा अडचणी आपल्या मार्गात येवोत, त्यांना, निश्चयपूर्वक आणि ठामपणे तोंड देऊन, त्यांचं निराकरण केलं पाहिजे."

आणि याच निश्चयानं व ठामपणे नेहरूंनी आपल्यावर पडलेली कुटुंबप्रमुखाची जबाबदारी पार पाडली. त्यांची माता व भगिनी, लहानमोठ्या सर्व

बाबतीत त्यांच्यावर विसंबून राहू लागल्या. एवढंच नव्हे तर, विवाहानंतर त्यांच्या भगिनी जरी आपल्या घरी गेल्या तरीही नेहरूंचा सल्ला घेण्यास किंवा इतर कोणत्याही बाबतीत त्यांची मदत घेण्यास मागंपुढं पाहत नसत. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी अनेक ठिकाणी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दिल्लीत अनेकविध कामांत नेहरू गढून गेले असले तरी, आपण एका कुटुंबाचे प्रमुख आहोत हे ते कधीच विसरले नाहीत. प्रत्यक्ष भेट घेऊन कौटुंबिक प्रश्न व कामकाज करता आलं नाही तरी पत्ररूपानं ते आपलं कर्तव्य बजावल्याशिवाय राहत नसत. व नंतर कामकाजाच्या गर्दीतून चारआठ दिवस फुरसत काढून ते, ते प्रश्न सोडवीत व कामकाजाच्या व्यवस्था लावीत असत. आपल्या भगिनींपेक्षा ते वयानं मोठे असले तरी नेहरूंनी आचरणाचे मार्ग किंवा पद्धत त्यांना कधीच आखून दिली नव्हती. जर कधी काळी कौटुंबिक मतभेदाचे प्रसंग आलेच आणि कुणाचं वर्तन नेहरूंना रुचलं नाही तर मृदू भाषेत आणि कौशल्यपूर्ण रीतीनं नेहरू त्याच्याशी त्या बाबतीत चर्चा करीत, स्वतःचा दृष्टिकोन त्याला नीट रीतीनं पटवून देण्याचा प्रयत्न करीत आणि शेवटी आपलं वर्तन चुकीचं होतं की बरोबर होतं हे ठरविण्याचं कार्य ते त्याच्यावरच सोपवीत. तरीही मतभेद मिटले नाहीत तरी आपल्याला आलेला राग किंवा वाटणारा खेद ते कधी प्रकट करीत नसत किंवा आपली मते व दृष्टिकोन दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करीत नसत. त्यामुळे कुटुंबप्रमुख म्हणूनच फक्त नव्हे तर, कुटुंबियांविषयी त्यांच्या मनातील प्रेमामुळे व आत्मीयतेमुळे, ते मित्र व सहकारी म्हणून कुटुंबातील व्यक्तींना सदैव हवेहवेसे वाटत. मोतीलालजींप्रमाणेच जवाहरही आपल्या पाठीशी सुखदुःखात, अडीअडचणीत आणि संकटकाली सदैव उभा आहे अशीच प्रत्येक कुटुंबियाची धारणा होती. पुत्र, बंधू, पिता असल्या निकटच्या नात्याच्या बंधनानं प्राप्त कर्तव्य करण्याच्या बुद्धीनंच केवळ नव्हे तर, मित्र आणि हितकर्ता हीच दृष्टी नेहरूंची आपल्या कुटुंबियांबद्दल होती. त्यामुळे नेहरूंजवळ आपले कौटुंबिक प्रश्न अगर अडचणी सोडविण्यासाठी नेताना कोणत्याही कुटुंबातील व्यक्तीला भय किंवा संकोच वाटत नसे. उलट, नेहरू हे स्वभावतःच विचारी व मानवी मनाचे व प्रवृत्तीचे असल्यामुळेच दुसऱ्याचे गुणदोष जाणून घेण्याची, स्वभावधर्म, विचार आणि अडचणी ओळखण्याची शक्ती त्यांच्यात होती. त्यामुळे आपले प्रश्न व अडचणी आपल्या दृष्टिकोनातून समजून घेऊन त्यानुसार उपाय सुचविण्याची

त्यांची समर्थता नेहरूंच्या कुटुंबियांना ज्ञात होती. त्याचाही अनुकूल परिणाम नेहरूंमध्ये दिसून येई.

नेहरूंच्या या स्वभावप्रवृत्तींमुळे, मोतीलालजींच्या मृत्यूनंतर, कुटुंबप्रमुख म्हणून जरी अधिकार नेहरूंना प्राप्त झाला तरी त्या दृष्टीनं त्या अधिकाराचा वापर करण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. मोतीलालजींनी मृत्युपत्र केलेले नव्हते आणि त्यामुळे नेहरू वंशतः त्यांचे वारस बनले होते. चरितार्थाची सारी साधनं नेहरूंच्या हातात गेल्यामुळे नेहरूंच्या मातेला व बहिणीला मोतीलालजींच्या हयातीत जो मनाचा मोकळेपणा वाटत होता तसा कदाचित यापुढं वाटणार नाही अशी नेहरूंना काळजी वाटत होती. त्यामुळे त्यांनी आपल्या आईला व अविवाहित बहिणीला, आपल्या वडिलांच्या इस्टेटीचा वारस समजण्याची सूचना दिली होती व त्यानुसार नेहरूंना त्यांना आपल्यावर त्या दोघी अवलंबून असल्याची जाणीव कधीही यांकिंचितसुद्धा होणार नाही अशी खबरदारी घेतली होती.

—आणि अशा रीतीने कुटुंबप्रमुख म्हणून त्यांनी आपली सर्व जबाबदारी अंतरीच्या प्रेमानं व जिव्हाळ्यानं पार पाडली. त्यांचा स्वतःचा संसार मोठा नव्हता. पत्नी आधीच मृत झाली होती, आणि इंदिरा—प्रियदर्शिनी—ह्या एकच आपत्याची सारी जबाबदारी पिता आणि माता या दोन्ही दृष्टीनं त्यांच्यावरच पडली होती. आपल्या कन्येला शिक्षणासाठी त्यांनी जरी दूर ठेवलं होतं, तरी सर्वच दृष्टींनी व तिच्या पुढील उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टीनं तिच्या मनावर, आपल्या पित्याप्रमाणेच, नेहरूंनीही, योग्य ते संस्कार व्हावे व सुयोग्य शिक्षण मिळावं अशी खबरदारी घेतली होती. कार्याच्या अत्यंत गर्दीतही पित्याची आपली जबाबदारी त्यांनी आंतरिक प्रेमानं पार पाडली. खुद्द नेहरूंना जे शिक्षण दिलं गेलं व जे संस्कार त्यांच्या पित्याकडून केले गेले व ज्यामुळे नेहरू महापुरुष झाले, तसेच संस्कार व शिक्षण आपल्या कन्येलाही मिळावं यासाठी नेहरूंनी सतत जागरूकतेनं प्रयत्न केले. आपल्या कन्येच्या मनाची तयारी तिच्या भावी आयुष्याच्या दृष्टीनं करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आपल्या मुलीला लिहिलेली नेहरूंची असंख्य पत्रे नेहरूंच्या या प्रयत्नाची साक्ष सहज देतील. आणि त्या प्रयत्नांचं दृश्य फळ आज श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधानपदी आरूढ होण्यामुळे प्रत्यक्ष दिसत आहे.

कुटुंबप्रमुख म्हणून आपली कर्तव्ये प्रेमानं आणि जिव्हाळ्यानं पार पाडताना आपल्या अधिकाराचा उपयोग नेहरूंनी कधीच केला नाही. आपल्यावर अवलंबून असलेल्या आपल्या भगिनीला व कन्येला त्यांनी छाया दिली. पण, त्यांचं जीवन त्यामुळं खुरटून जाईल; त्या छायेमुळे त्यांची मनं गुदमरून जातील; त्या निष्क्रीय होतील, सतत दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण न होईल अशी नेहरूंनी जाणीवपूर्वक खबरदारी घेतली होती. आपल्या प्रकाशात त्या न वावरता स्वयंप्रकाशानं त्यांचं पुढील जीवन उजळून निघावं; आपल्या आधाराच्या जोरावर त्यांनी पुढील जीवन जगावं; व जीवनाशी झगडताना स्वसामर्थ्याच्या जोरावर त्यांनी त्या झगड्यातून यशस्वीपणे बाहेर पडावं याकरिता पूर्वीपासूनच त्यांना स्वतंत्रपणे वावरण्याची सुसंधी दिली होती. आणि पुढेही पंतप्रधानपदी विराजमान झाल्यावर हीच वृत्ती त्यांनी कायम ठेवली होती. आपल्या कन्येला मंत्रिमंडळात त्यांनी कधीही घेतलं नाही. ती त्या पदाला लायक असूनही किंवा तिला मंत्रिमंडात घेण्याचा आग्रह होत असताही त्यांनी आपल्या कन्येचा अंतर्भाव आपल्या मंत्रिमंडळात केला नाही. एवढंच नव्हे तर, आपल्या निधनानंतर मंत्रिमंडळात तिला घेतलं जावं किंवा पंतप्रधानपदी तिची निवड व्हावी अशी इच्छाही त्यांनी प्रकट केली नाही. आपल्या पित्याच्या आधारानं आपल्या कन्येनं महत्पदावर चढावं ही कल्पनाच त्यांच्या मनाला पटणारी नव्हती. कदाचित आपल्या अंगच्या गुणांवर व कर्तृत्वावरच तिनं त्या महत्पदावर यावं अशीच त्यांची इच्छा असावी.

कुटुंबात नव्या अपत्याचा जन्म म्हणजे नेहरूंच्या बालकप्रेमी व भावविवश मानाला, स्वतःच्या बालपणीच्या आठवणी करून देत असे. त्या मुलांची होणारी वाढ, त्यांचं बालपण, पुरुष किंवा स्त्रीत्वात त्यांचं होणारं पदार्पण हा सारा निसर्गक्रम त्यांचं मन भारावून टाकीत असे. निसर्गात वसंत ऋतूचं आगमन त्याचप्रमाणं कुटुंबात अपत्यजन्म त्या कुटुंबाचं निसर्गक्रमानुसार होणारं पुनरुस्थानच त्यांना वाटे. प्रत्येक अपत्याचा जन्म म्हणजे नव्या जीवनाची सुरुवात असून अपत्यजन्माबरोबरच कुटुंबात नव्या आशा अंकुरित होत अशी त्यांची भावना होती.

—आणि या भावनेमुळेच ते भारतात अगर परदेशी, आपल्या घरी किंवा दौऱ्यावर मोकळे किंवा कार्यमग्न, तुरुंगात कुठेही असले तरी आपल्या कुटुंबियां-

तील कुणाचाही जन्मदिवस न विसरता आंतरिक व काव्यमय शब्दात शुभेच्छा व भेटी पाठविण्यास चुकत नसत. एखाद्या वेळेस जन्मदिवसासाठी शुभेच्छा व भेट पाठविण्यास ते विसरले तर ती गोष्ट त्यांच्या मनास लागून राही व त्याबद्दल ते मनःपूर्वक दिलगिरी प्रदर्शित करीत असत. अशा या शुभेच्छा व्यक्त करताना नेहरूंच्या मनातील आपल्या आप्तस्वकीयांविषयीची असीम प्रीती व आत्मीयता प्रगट होत असे व त्याबरोबरच त्यांच्या शिक्षणासंबंधी व पुढील आयुष्यासंबंधी उपयुक्त विचारही मांडलेले असत.

नेहरू दौऱ्यावर किंवा तुरुंगात नसत तेव्हा दिवसाचा थोडा तरी वेळ कुटुंबियांसमवेत घालविल्याशिवाय राहत नसत. असा वेळ त्यांना अत्यंत अल्प प्रमाणात मिळे. परंतु, असा वेळ काढल्याशिवाय मात्र ते राहत नसत. विशेषतः जेवणाच्या वेळी तर ते इतर सारे प्रश्न, विवंचना अल्पकाल विसरून जात. अशा वेळी कुटुंबियांशी ते समरस होऊन जात व त्यामुळे स्वतःबरोबर आपल्या कुटुंबियांनाही सुख आणि आनंद यांचा लाभ करून देत असत. स्वतःच्या व इतरांच्या जीवनातील मनोरंजक आठवणी सांगत, अनेक विषय व व्यक्ती यांवर आधारित हलक्याफुलक्या गप्पा मारीत, विनोदी किस्से सुनवीत हास्यविनोदाचीही मेजवानी जेवणाऱ्यांना देत व कौटुंबिक वातावरण उल्हसित, आनंदित आणि सुखी करून सोडीत. त्याचप्रमाणे एखाद्या वेळी गप्पांबरोबरच नेहरू अनेक कवितांचं वाचन करीत व काव्यानंदात स्वतःबरोबरच इतरांनाही स्वैर विहार घडवून आणीत.

आपल्या कुटुंबियांच्या मुलांसमवेत व पुढे आपल्या राजीव व संजीव या नातवांसमवेत खेळताना व त्यांच्यांत रमताना नेहरूंना स्वर्गसुखाचा लाभ होत असे. स्वतःचं प्रौढपण विसरून ते त्यांच्या खेळात सामील होत. या खेळात, कोणत्याही खेळाला मनाई नव्हती. दोरीवरून उड्या मारणे, धावणे, मुलांची आगगाडी करून घरामोवती फिरणे वगैरे खेळ नेहरू मुलांसमवेत खेळत. कधी त्यांच्यामध्ये बसून त्यांना चित्रे दाखविणे व प्रत्येक चित्रातील अर्थ व मर्म मुलांना नेहरू समजावून सांगत. नेहरूंना सर्वच विषयांत थोडेफार गम्य असल्यामुळे तसे करणे त्यांना कठीण जात नसे. पशुपक्ष्यांपासून तो आधुनिक यंत्रे व धरणे, प्रवासवर्णने वगैरे विषयांवरील चित्रांचा त्यांत समावेश असे व बालकांच्या

शंकांनाही न त्रासता किंवा न रागावता ते उत्तरे देत. विविध देशांतील बालकथांचे व पुस्तकांचे वाचनही ते मुलांसमवेत करीत. हे क्षण खुद्द नेहरूंना व त्या मुलांनाही अमोल वाटत असणे स्वाभाविकच होतं.

कुटुंबात नव्या अपत्याचा जन्म म्हणजे त्या कुटुंबाचं पुनरुत्थान होणं, त्या कुटुंबात नवीन जीवनाचा व आशांचा जन्म होणं असं वाटत असे व त्यामुळे त्यांच्याही जीवनात नवीनतेचा जन्म होई. पुनर्जन्मावर नेहरूंचा विश्वास नव्हता, किंवा निधनानंतरही आत्म्याच्या अस्तित्वाविषयी ते साशंक होते म्हणून कुटुंबियांतील किंवा परममित्रांपैकी एखाद्याचं निधन ही गोष्ट त्या जीवनाचा अक्षय्य अंत वाटे व त्यांच्या भावविवश मनाला विशेषत्वानं असीम दुःख होई. जोपर्यंत ती व्यक्ती काळाशी झगडत बिछान्यावर पडलेली असे तोपर्यंत त्या व्यक्तीची नेहरू आत्मीयतेनं व प्रेमानं शुश्रूषा जातीनं करीत. अशा वेळी त्यांची शुश्रूषा आदर्शवत असे. आजारी व्यक्तीविषयक त्यांचा समजुतदारपणा व मृदुता पराकोटीला पोहोचलेली असे. अत्यंत त्रासदायक परिस्थितीतही त्यांची सहनशीलता अमाप असे. परंतु, त्या व्यक्तीच्या निधनानंतर मात्र त्यांच्या भावविवश मनावरचे सोशिकतेचे, संयमाचे सारे बंध गळून पडत व त्यांना पराकाष्ठेचे दुःख होई. या दुःखाच्या पाठीमागे आपल्या प्रिय व्यक्तीच्या चिरंतन विरहाची भावना असे. परंतु, तरीही त्यामुळे त्यांच्या मनावरचा त्यांचा ताबा किंवा कर्तव्याची जाणीव अबाधित राही. नेहरूंचा अभिमान तीव्र होता. कोणत्याच प्रसंगी आपल्या मनाचा कमकुवतपणा दिसू नये याविषयी नेहरू दक्ष असत. आपल्या शारीरिक अगर मानसिक दुःखाचं प्रदर्शन करून दुसऱ्याची सहानुभूती मिळवणे त्यांच्या अभिमानाला रुचत नसे व याच त्यांच्या स्वभाव-प्रवृत्तीमुळे जीवनाच्या अखेरच्या क्षणीसुद्धा त्यांनी आपल्या प्राणांतिक आजाराचा गवगवा केला नाही; एवढंच नव्हे तर कुणकुणही कुणाला लागू दिली नाही. शारीरिक दृष्ट्या ते अगतिक झाले तेव्हाच त्या प्राणघातक आजाराची कल्पना इतरांना झाली.

हीच त्यांची स्वभाववृत्ती, एखाद्या प्रिय व्यक्तीच्या निधनसमयी, त्यांच्या मनातील दुःखावेग आवरून धरायला, निदान त्याचं बाह्य प्रदर्शन होऊ नये म्हणून नेहरूंना सहाय्य करीत असे. त्याबरोबरच आपणच असा शोक करू

लागलो तर इतर व्यक्तींच्या मनाचं सांत्वन करण्याची जबाबदारी आपल्याला पार पाडतां येणार नाही व त्यांचा शोकावेग तीव्रतर होईल ही पर-दुःखाची जाणीवही त्यांच्या मनात वास करीत असे. त्यामुळे मनात उफाळून येणाऱ्या तीव्र शोकावेगाला संयमाने जाणीवपूर्वक बांध घालून ते इतरांचं सांत्वन करीत असत. मोतीलालजींविषयी नेहरूंच्या मनात असीम प्रेम व आदर वास करीत होता. त्यांचा मृत्यूनं नेहरूंवर दुःखाचा डोंगरच कोसळला होता. परंतु नेहरूंच्या आईलाही तो धक्का सहन होणारा नव्हता. ती तर शोकावेगाने बेभान होऊन गेली होती. प्रदीर्घ काल्पर्यंत ती आलेल्या परिस्थितीला तोंड देण्यास समर्थ नव्हती. या वेळच्या नेहरूंच्या वर्तनाचं वर्णन त्यांच्या भगिनी श्री. कृष्णा हाथीसिंग यांनी आपल्या "With No Regrets" या पुस्तकात केलं आहे. त्या लिहितात : "त्या दिवसांत नेहरू म्हणजे एक आदर्श पुत्र म्हणून वागले. स्वतःच्या जीवनाचा कणाच नष्ट करणाऱ्या दुःखानं विव्हल झालेला असताही, आपल्या आईच्या मनावर झालेला तो आघात कमी करण्यासाठी त्यानं आपल्या जिवाचं रान केलं होतं. त्याची त्या काळातील मृदुता आणि मातृभक्ती ही शब्दानं व्यक्त करण्यापलीकडील गोष्ट आहे. कारण तिच्याबद्दल काही बोलण्यापलीकडे असलेली, इतकी ती परम पवित्र आहे."

नेहरूंची कुटुंबाची कल्पना फक्त आपल्या निकटच्या आप्तरक्तांपुरतीच मर्यादित नव्हती. स्वतःच्या कुटुंबात असतानाच फक्त ते कौटुंबिक जीवन जगत असत अशी परिस्थिती नेहरूंच्या उदार आणि विशाल मनाला रुचणारी नव्हती. नेहरूंच्या राजकीय व सामाजिक कार्यांमध्ये अनेक सन्मित्रांचा व सुहृदांचा लाभ त्यांना झाला होता. या सुहृदांना आणि मित्रांनाही ते आपल्या कुटुंबियांपैकीच मानीत असत. विशेषतः कारावासात असताना काही राजकीय कैदी त्यांच्या आसपास वावरत असत, त्यांनाही नेहरू तुरुंगातील आपलं कुटुंब मानून, आपल्या कुटुंबातीलच मानून त्यांच्याशी आपलं वर्तन प्रेमाचं व आत्मीयतेचं ठेवीत असत. किंबहुना, तुरुंगालाच ते आपलं दुसरं घर मानीत असल्यामुळे तेथील इतर कैदी त्यांना त्या दुसऱ्या घरातील कुटुंबातील व्यक्ती वाटत असत. नेहरूंना अहमदनगर येथील दीर्घकालीन कारावासात असताना त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसमवेत ठेवलं होतं. आपल्या घरीं ज्या हार्दिक प्रेमानं व आंतरिक आत्मीयतेनं नेहरू वागत असत त्याप्रमाणेच ते आपल्या सहकाऱ्यांशी

वर्तन ठेवीत. अशा वेळी नेहरूंच्या मनातील व वर्तनातील आत्मीयतेच्या व आपुलकीच्या वर्तनाबद्दल मा. आझाद वगैरे त्यांच्या अगदी निकटच्या सहृदांनी गौरवास्पद उद्गार काढले आहेत.

नेहरूंच्या या भावना कुटुंबातील व्यक्तींपुरत्या आगर सहकाऱ्यांपुरत्या मर्यादित होत्या अशातला भाग अत्यशःही नव्हता. आपल्या पक्षातीलच नव्हे तर विराधी पक्षातील काही व्यक्तींचा नेहरूंवर विश्वास होता; ते त्यांना आपल्या निकटच्या आताप्रमाणे मानीत असत. सुभाषचंद्र बोस हे ऑस्ट्रियामध्ये असताना भारतात परतण्यासंबधी एक पेचप्रसंग निर्माण झाला होता. आणि त्या पेचप्रसंगातून सुटण्यासाठी योग्य मार्ग सुचविण्याचा नेहरूंना त्यांनी पत्र लिहून आग्रह केला होता. त्या पत्रात सुभाषचंद्रांनी लिहिलं होतं..... "अशा गोष्टीत तुम्हांला मी त्रास देत आहे याबद्दल मी एकच कारण सांगू शकेन आणि ते म्हणजे, तुमच्यावर माझा जितका मोठा विश्वास आहे तितक्या विश्वासाची व्यक्ती माझ्या डोळ्यासमोर नाही."

सुभाषचंद्र बोसप्रमाणेच अनेक मोठ्या व्यक्तींच्या मित्रविषयक प्रेमाला व विश्वासाला नेहरू आपल्या वर्तनानं पात्र ठरले होते. "आपली कर्तव्ये, मग ती सामाजिक असोत किंवा खासगी असोत, धैर्यानं तुम्ही पार पाडली नाहीत तर तुम्ही नेहरू नव्हेत असंच म्हटले पाहिजे." असे उद्गार एम्. ए. अन्सारी यांनी नेहरूंना लिहिलेल्या एका पत्रात काढले होते. एके काळचे नेहरूंचे एकनिष्ठ सहकारी, पण पुढे विरोधक बनलेले आचार्य कृपालानी यांनी नेहरूंना लिहिलेल्या एका पत्रातील मजकूर या संदर्भात विशेष उल्लेखनीय आहे. आचार्य आपल्या पत्रात लिहितात : "तुमची मैत्री मला नेहमीच मोलाची वाटते. तीचं उगमस्थान अर्थातच राजकीय आहे. परंतु, अनेक वर्षांचा तुमचा माझा निकटचा संबंध आल्यामुळे त्याचं रूपांतर मैत्रीत झालेलं आहे. तिची उत्कटता शब्दांत कधीच न झाल्यामुळे तुम्हांला ती ज्ञात असणार नाही. आज तुम्हांला त्या गोष्टीचं आश्चर्य वाटेल; परंतु, तुम्ही स्वतंत्र नसल्यामुळे मी माझा विवाह दीड वर्ष पुढं ढकलला होता. या प्रसंगी इतर कुणीही उपस्थित राहू नये अशी माझी इच्छा होती. मात्र तुम्ही उपस्थित असावयास मला हवंच होतं."

आचार्य कृपलानींच्या मनात उत्कटतेनं वास करीत असलेली ही भावना इतरांच्याही – संबंधित व्यक्तींच्या मनाला तीव्रतेनं वाटत असे. "मृदू महापुरुष"

या नेहरूंविषयक ग्रंथाच्या सुरुवातीलाच श्री. हिरेन मुकर्जी यांनी अशीच भावना प्रगट केलेली आहे. हीच कृतज्ञतेची भावना परकीय व्यक्तींनी व्यक्त केलेली आहे. मा. अबुल कलम आझाद यांनी नेहरूंना लिहिलेल्या एका पत्रात हीच भावना विशेष उत्कटतेने वर्णन केलेली आढळते. मौलाना लिहितात : "अलाहाबाद येथे मला झालेल्या अपघातासंबंधी माझ्या मनात विचार येतो, तेव्हा मला आढळून येतं की, माझ्या शुश्रूषेत आणि स्वास्थ्यासाठी, तुम्ही जे काही केलंत, ते मला इथं कलकत्त्यात अपघात होऊन माझ्या कुटुंबियांत मी असतो तरी, कुणीही केलं नसतं. तेथे असताना तुम्ही माझ्याबाबत जसे वागलात तसे माझे अगदी निकटचे व प्रेमळ नातेवाईकही वागले नसते. माझी कृतज्ञता मी कोणत्या शब्दात व्यक्त करावी हेच मला समजत नाही. तुम्ही व्यक्त केलेलं प्रेम आणि सहृदयता याबद्दल माझ्या हृदयात तीव्र कृतज्ञता वाटत आहे. अशा कित्येक साध्या गोष्टी असतात की त्यामुळे हृदयात खोल भावना निर्माण होऊ शकतात. अलाहाबादहून निघताना एकच रात्र प्रवासाची मर्यादा असतानाही माझ्या स्वास्थ्यासाठी तुम्ही अगदी बारीकसारीक गोष्टींकडेही लक्ष दिलंत. माझ्याबरोबर किती वस्तू तुम्ही दिल्यात याची मला कल्पनाही नव्हती. इथं आल्यावर करंडीत तुम्ही कोलनवॉटरची बाटलीही ठेवलेली मला आढळली."

मित्रत्वाच्या भावनेनं नेहरूंच्या हातून बारीकसारीक गोष्टी घडून येऊन त्यामुळे स्वकीयांप्रमाणेच परकीयांच्या मनातही नेहरूंची मैत्री संपादन करण्याचा अभिमान निर्माण होत असे. एडवर्ड थॉम्पसन यांनाही अशाच नेहरूंच्या वर्तनानं मैत्रीचा हा अभिमान निर्माण केला होता व त्यांनी नेहरूंना पत्र लिहून व्यक्तही केला होता : "माझे मित्र एडवर्ड थॉम्पसन यांस—" या शब्दांकित वाक्यानं तुम्ही मला आपल्या ग्रंथाची प्रत पाठविलीत; त्यामुळे मला वाटणारा अभिमान इतर कुठल्याही कृतीत वाटला नसता. आपल्या भावना अव्यक्त ठेवण्याचा तुमचा अतिमानवी गुण माझ्या परिचयाचा आहे. आणि जेव्हा तुम्ही मोजकेच शब्द उच्चारता तेव्हा त्या शब्दामागे केवढा अर्थ भरलेला आहे याची प्रचीती मनाला जाणवते."

"जुन्या पत्रांचा गुच्छ" या पत्रसंग्रहात नेहरूंना आलेल्या विविध व्यक्तींच्या, विविध प्रकारच्या उलट-सुलट, अनुकूल व प्रतिकूल भावना व्यक्त

करण्यात आलेल्या काही पत्रांतील नेहरूंच्या मैत्रीबद्दल व्यक्त केलेल्या काही व्यक्तींच्या भावना वर उद्धृत केल्या आहेत. त्यावरून आपल्या कुटुंबीय व्यक्तींप्रमाणेच आपल्या मित्रांनाही आपल्या मनातील प्रेमाचा आणि आत्मीयतेचा लाभ करून देण्याची नेहरूंच्या स्वभावप्रवृत्तीची कल्पना येण्यासारखी आहे. कुटुंबीय व्यक्ती आप्तस्वकीय व मित्र यांच्यामध्ये भेदाभेद न करता, त्या सर्वांना समान मानून, त्यांच्यावर आपल्या प्रेमाचा व आत्मीयतेचा वर्षाव करून, विशाल कौटुंबिक जीवन जगण्याची नेहरूंची दृष्टी व वृत्ती होती, याचा परिचय कोणालाही सहज होण्यासारखा आहे. पण त्याबरोबरच ही दृष्टी व वृत्ती नेहरूंना कशी प्राप्त झाली व त्याप्रमाणे आचरण करण्याची प्रवृत्ती कशी सहज साध्य होऊन, त्यात ते कसे यशस्वी झाले याचाही परिचय आपण करून घ्यावयास हवा. हा परिचय डॉ. रफिक झकेरिया यांनी संपादित केलेल्या "नेहरूंचा परिचय" (A Study of Nehru) या लेखसंग्रहातील, नेहरूंच्या भगिनी श्री. विजयालक्ष्मी पंडित यांच्या "कौटुंबिक बंधन" (A Family Bond) या लेखात त्यांनी करून दिलेला आहे. त्या लेखात श्रीमती पंडित लिहितात ; "भाईनं मला अनेक प्रकारे प्रेरणा दिली आहे आणि त्याच्यापासून मी खूपच शिकले आहे. या सर्वांत मला अमोल वाटणारा धडा मी शिकले आहे आणि तो हाच की, जीवन हे छोट्या छोट्या अलग विभागांत जगता कामा नये— व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन यांची प्रेरणा समान तत्त्वांवरच असावयास पाहिजे आणि एकाचं चित्र दुसऱ्या जीवनातही प्रगट व्हावयास हवं."

नेहरूंच्या जीवनावरून शिकलेला हा धडा श्रीमती पंडित यांना अमोल वाटला व त्यांनी तो शिकून आत्मसात केला, तसाच तो इतरांनाही अमोल वाटणारा व शिकण्यासारखा आहे यात संशय नाही.

卐 卐 卐

१२

रसिकराज

मुंबईच्या "ब्राह्मण-सभे"तर्फे महाकवी कालिदासाच्या 'शाकुंतल' या संस्कृत नाटकाचा प्रयोग दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रयोगाला उपस्थित राहण्याचं निमंत्रण पंडित नेहरूंना करण्यात आलं होतं. नेहरूंच्यापुढे कामाचे डोंगर नेहमीपेक्षा जास्तच प्रमाणात उभे होते. परंतु, त्या कामाच्या गर्दीतही वेळ काढून नेहरूंनी थोडा वेळ–फार तर एक अंकपर्यंत नाट्यप्रयोगाला उपस्थित राहण्यास मान्यता दिली. नित्याप्रमाणे नेहरू वेळेवर उपस्थित झाले. प्रयोगास सुरुवात झाली. नाट्यप्रयोग रंगू लागला आणि त्याबरोबरच नेहरूही प्रयोगाशी समरस झाले. पहिला अंक संपला. प्रयोग पाहताना रंगून गेलेले नेहरू, रंगमंचापुढील मखमली पडदा

पडताच ताडकन उठले आणि त्यांनी रंगभूमीवर उडी मारली, मखमली पडदा बाजूला सारून त्यांनी आत प्रवेश केला. शरीरसंरक्षकांत, प्रेक्षकांत आणि रंगमंच व रंगपट यांमधील सर्व कलाकारांत एकच गडबड उडाली. नेहरू आत गेले. उत्कृष्ट कलाकृतीच्या तितक्याच उत्कट अभिव्यक्तीमुळं भारावलेल्या अंतःकरणानं त्यांनी सर्व कलाकारांची ओळख करून घेतली व त्यांच्या कलागुणांबद्दल मुक्तकंठानं प्रशंसा केली.

—आणि मग कामाच्या गर्दीमुळे फक्त थोडा वेळच नाटकाला उपस्थित राहण्याच्या हेतूनं उपस्थित राहिलेले नेहरू, संपूर्ण नाटक पाहण्यासाठी प्रेक्षागृहात बसून राहिले. धुंद मनानं नाट्यकृतीशी समरस होऊन त्यांनी नाटक पहिलं. नाटक संपताच, आपल्या बंगल्याभोवतीच्या बागेतून गुलाबपुष्पे आणवून, त्यांनी नाटकात भूमिका करणाऱ्या कलाकारांना स्वहस्ते गुलाबपुष्पे अर्पण केली व त्यांचा गौरव केला. त्या कलाकारांशी उल्हसित मनानं हास्यविनोद केला. आणि नंतर एखाद्या सामान्य प्रेक्षकाप्रमाणे नेहरूंनी नाट्यगृहातील उपाहारगृहात चहा घेतला. भारताचे पंतप्रधान सामान्य व्यक्तीप्रमाणे आपल्या सामान्य उपाहारगृहात उभ्या उभ्याच आपला सामान्य चहा घेण्यासाठी आलेले पाहून त्या उपाहारगृहाच्या मालकाला धन्यता तर वाटलीच. पण त्याबरोबरच तो आश्चर्यानं भारावून जाऊन गोंधळून गेला—भांबावून गेला. असामान्य कलाकृती, माणसातील उच्चनीच भेदाभेद नष्ट करून समान पातळीवर आणून सोडते, हे महान सत्य, नाट्यगृहाशेजारी उपाहारगृह थाटून बसलेल्या त्या मालकाला कुठून ठाऊक असणार? आपल्या उपाहारगृहात चहा घेण्यासाठी आलेला हा रसिकराज एक प्रेक्षक म्हणून आला होता; भारताचा महान नेता व पंतप्रधान या नात्यानं तो तेथे आलेला नव्हता याची जाणीव त्या मालकाच्या धंदेवाईक मनाला कुठून असणार? तशातच हा प्रेक्षक त्या क्षणी इतका सामान्य होता की, चहाचे पैसे सुद्धा त्याच्या खिशात नव्हते. त्यांच्याबरोबरच्या माणसांजवळून उसने पैसे मागण्याची पाळी त्याच्यावर आली होती.

संगीत नाटक अकादमीने पारितोषिक देऊन गौरविलेले व संस्कृत व मराठी रंगभूमीवरील श्रेष्ठ नट श्री. दाजी भाटवडेकर यांनी निवेदन केलेला हा प्रसंग कलाप्रिय आणि रसिकराज नेहरू यांच्या अभिजात कलासक्तीचं एक उदाहरण

म्हणून मुद्दाम इथं वर्णन केलेला आहे. राजकारणाव्यतिरिक्त, नेहरूंच्या उच्च सांस्कृतिक जीवनात कलांना महत्त्वाचं स्थान होतं. बालपणापासून उच्च राहणी, अभिजात व सुरुचीपूर्ण जीवनाचे, अभिजात ग्रंथांच्या वाचनाचे व सुशिक्षणाचे जे संस्कार झाले होते व स्वभावतःच भावनाशील, हळुवार व सौंदर्यपूजक असल्यामुळे नेहरूंचं जीवन "साहित्य, संगीत कलाविहीन" अशा मनुष्याचं असणं सर्वस्वी अशक्य होतं. शिवाय निसर्गसौंदर्याचे महान भोक्ते व मानवी मनाच्या सर्वसंपन्नतेवर त्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांच्या जीवनात कलेलाही महत्त्व प्राप्त होणं स्वाभाविकच होतं. त्याबरोबरच भारतप्रेमानं "भारताचा शोध" घेताना, भारताच्या इतिहासाचा त्यांनी सखोल आणि डोळस अभ्यास केला. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती, कला इत्यादी भारतीय गोष्टींविषयी त्यांच्या मनात प्रेम आणि आदर वास करीत होता. त्यामुळेही नेहरूंच्या मनात कलासक्ती आणि रसिकता निर्माण झाली होती. एवढंच नव्हे तर, तिचं स्वरूपही उथळ, रुचिहीन, केवळ करमणूकप्रधान, खालच्या पातळीवरील न राहता, ते अभिजात, उच्च आणि संस्कृतिसंपन्न बनलं होतं. "कलासक्तीचे आणि सौंदर्य-पूजक वृत्तीचे व शिवाय नैतिकतेचे, घटक ज्यात नाहीत असं एखादं सुसंस्कृत जीवन कल्पनेतही असू शकेल का?" असे उद्गार ३ मार्च १९४९ रोजी स्व. सरोजिनी नायडू यांच्या स्मृतिदिनप्रसंगी भाषण करताना नेहरूंनी काढले होते. एखाद्या रानटी, असंस्कृत जीवनात कला, सौंदर्यपूजकता किंवा नैतिकता नसणं साहजिकच असतं. परंतु, नेहरूंसारख्या रसिकराज व्यक्तीच्या सुसंस्कृत जीवनात कलेला, सौंदर्यपूजेला आणि त्याबरोबरच नैतिकतेला महत्त्व असणं आवश्यकच व साहजिकच असतं. आणि या साऱ्या सुसंस्कृत जीवनाच्या घटकांना नेहरूंच्या जीवनात महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं असल्यास नवल नाही.

"पौर्वात्य किंवा पाश्चात्य कलांविषयी मला ज्ञान नाही, आणि त्याबद्दल काही विचार प्रगट करण्याइतका मी तज्ज्ञ नाही. एखाद्या अशिक्षित, अनभिज्ञ माणसाप्रमाणेच माझ्याही मनावर कलेची प्रतिक्रिया होत असते. एखादं रंगचित्र किंवा इमारत किंवा शिल्पकला माझ्या अंतरंगात अत्यानंद निर्माण करते; त्याला हेलावते, किंवा चमत्कारिक भावना संचार करते; किंवा फक्त थोडंसं समाधान निर्माण करते; किंवा अजिबात काहीच परिणाम करू शकत नाही आणि मग तिच्याकडे दुर्लक्ष करून मी तिच्यापासून दूर होतो; किंवा ती

मला परावृत्त करते. या प्रतिक्रियांचं विवरण मी करू शकत नाही किंवा कलाकृतीच्या गुणावगुणांविषयी मी अधिकारवाणीनं काही बोलू शकत नाही." नेहरूंनी "भारताचा शोध" या ग्रंथात आपल्या कलाभिज्ञतेविषयी लिहून ठेवलं आहे. याचाच अर्थ असा की, कलाकृतीच्या दर्शनानं त्यांच्या मनात त्या कलाकृतीविषयी तीव्र अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम निश्चित होत असत. त्यांच्या कलासक्त मनावर त्याचा चांगला-वाईट परिणाम होत असे; परंतु, त्या परिणामांची अगर त्या कलाकृतीचं कलात्मक परीक्षण करण्याचं मात्र त्यांना साधत नसे. अर्थातच तसं जरी असलं तरी कलाकृतीच्या दर्शनानं मिळणारा आनंद उपभोगण्यास असमर्थता निर्माण करण्याचं कारण नव्हतं. जिज्ञेची रुची तीव्र असलेल्या व्यक्तीला एखाद्या पदार्थाच्या रुचीची कारणे न सांगता आली तरीही त्या पदार्थाचा भरपूर रसास्वाद त्याला घेता येणं सहज शक्य होतं. नेहरूंची कलाविषयक मनःस्थिती व रसिकता थोडीफार अशाच प्रकारची होती. कारण, कलाविषयक विवरण किंवा चर्चा करण्याची असमर्थता त्यांनी प्रगट केली तरी, ते लगेच पुढे लिहितात : "सीलोनमधील अनुराधपूर येथील बुद्धाच्या प्रतिमेनं मी अतिशय हेलावून गेलो होतो आणि त्याचं चित्र आज अनेक वर्षे माझं सहचर होऊन राहिलं आहे. याउलट, दक्षिण भारतातील काही देवालयांतील शिल्प आणि तपशील, मला व्यथित करतात आणि माझ्या मनाला अस्वस्थ करतात."

भारताची सजीव चैतन्यशक्ती आज हजारो वर्षे अबाधितपणे टिकून आहे, ती भारताच्या भव्योदात्त वाङ्मयातून आणि कलेतून एखाद्या प्रवाहाप्रमाणे सतत वाहत आली आहे, इतकं महत्त्वाचं स्थान भारतीय वाङ्मयाला आणि कलेला भारतीय इतिहासात नेहरू देतात. "एलिफंटा" कोरीव लेणीतील "त्रिमूर्ती" सामर्थ्यशाली भारताची स्वतःचीच बहुरूपी प्रतिमा असून, आपल्या चैतन्यदायी सखोल ज्ञानसंपन्न आणि जाणीव असलेल्या नेत्रांनी आपल्यावर जागता पहारा ठेवीत आहे. अजंठा येथील लेण्यातील रंगीत कलाकृती, सौंदर्य आणि जीवन यामधील मृदुता आणि प्रीती यांनी परिपूर्ण अशाच आहेत.... अजंठा, एखाद्या अतिदूरच्या स्वप्नसदृश आणि तरीही अत्यंत वास्तव अशा जगात आपल्याला मागे घेऊन जातात. ...या चित्रात असंख्य स्त्रियांची चित्रे रंगविली आहेत– सौंदर्यवती स्त्रिया, राजस्त्रिया, गायिका, नर्तिका, आसनस्थ किंवा उभ्या,

स्वतःचं सौंदर्य प्रस्थापित करीत किंवा मिरवणुकीतील अशा विविध स्त्रिया तेथे रंगविल्या आहेत. अजंठामधील स्त्रिया सुप्रसिद्धच आहेत. जगाचं आणि गतियुक्त जीवननाटकाचं केवढं ज्ञान त्या चित्रकार-भिक्षूंना ज्ञात असेल, किती नाजूक भावनेनं त्यानं त्या चित्रित केल्या आहेत; ज्या भावनेनं त्यांनी त्या स्त्रिया चित्रित केल्या त्याच भावनेनं त्यांनी प्रशांत आणि पारलौकिक भव्योदात्त अशा बोधिसत्त्वाचीही चित्रे त्यांनी काढली आहेत."

"त्रिमूर्ती" व अजंठा येथील रंगचित्रे (Frescoes) यांच्या दर्शनानं नेहरूंच्या मनात प्रकट झालेल्या या प्रतिक्रिया इतर शिल्पकृतींच्या दर्शनानंही शब्दांकित होतात. वेरूळ येथील कैलास देवालय पाहून ते रितमित होतात व "मानवी मनात यासंबंधी प्रेरणा निर्माण होऊन त्या प्रेरणांना त्यांनी प्रत्यक्षात आकार आणि रूप कसं दिलं असेल याची कल्पना करता मती कुंठीत होते" असे उद्गार नेहरू काढतात. (भारताचा शोध) डेहराडून येथील तुरुंगात असताना सीलोनमधील एका मित्राने नेहरूंना अनुराधपूर येथील बुद्धाचं चित्र भेट म्हणून पाठविलं होतं. आणि ते नेहरूंनी आपल्या छोट्या टेबलावर ठेवलं होतं. "हे चित्र माझा अमोल सहकारी बनलं होतं आणि बुद्धप्रतिमेच्या समर्थ, तृप्त बाह्यरूपानं मला मनाचं समाधान आणि सामर्थ्य प्राप्त करून दिलं आणि औदासीन्याच्या काळात त्यावर विजय मिळविण्यास मदत केली आहे." (आत्मचरित्र.) "अजंठा येथील रंगचित्रे किती आश्चर्यजनक आहेत याचा साक्षात्कार तू पहाशील तर तुलाही होईल," असं आपल्या कन्येला लिहिलेल्या पत्रांत त्यांनी लिहून नंतर "दुर्दैवाने ती रंगचित्रे हळूहळू, फार काळ उघड्यावर टिकून राहणं शक्य नसल्यामुळे, पुसट होत चालली असल्याबद्दल" नेहरूंनी हळहळ व्यक्त केली आहे. (जगाच्या इतिहासावर दृष्टिक्षेप).

लिओनार्डो द् व्हिन्सी हा नेहरूंचा सर्वांत आवडता चित्रकार होता. ज्या काळात लिओनार्डो हा फ्लॉरेन्स प्रजासत्ताकात वास्तव्य करीत होता, तो काळ नेहरूंच्या दृष्टीने सुखाचा किंवा सामाजिक नीतिमत्तेचाही नव्हता. कपट-कारस्थानं, एकतंत्री राज्यकर्ते, सावकारी यांनी या काळात थैमान घातलं होतं. परंतु तरीही त्यातील बराचसा अनिष्ट व अनाचारी कारभार विसरण्यास नेहरू तयार झाले होते. कारण अनेक थोर व्यक्तीही त्याच काळात प्रसिद्धीस

आल्या होत्या. डांटे आणि पेट्रार्च हे महान कवी आणि लिओनार्डो द व्हिन्सी, मायकेल एंजेलो आणि राफेल हे महान कलावंत याच काळामध्ये उदयाला येऊन आपल्या काव्याने आणि कलाकृतीने आज अमर होऊन बसले आहेत. हे तिघेही अत्यंत थोर असे कलावंत झाले असं नेहरूंचं मत होतं. "मायकेल एंजेलो हा महान शिल्पकार होता; कठीण संगमरवरी दगडातून त्यानं भव्य शिल्पकृती साकार केल्या आहेतच; पण शिवाय तो थोर इमारत-शास्त्रज्ञ कलाकारही होता. रोममधील सेंट पिटर्सच्या प्रार्थनामंदिराचा प्रामुख्याने तोच निर्माता होता. तो दुःखी होता; पण वस्तूंच्या आवरणाखालील अंतराचा शोध घेणारा, विचारवंत आणि नेहमीच भव्य कार्ये आंगावर घेणारा होता." "कलावंत हाताने नव्हे, तर मेंदूने चित्रे काढतो" असं एकदा तो म्हणाला होता. आपल्या कन्येला लिहिलेल्या एका पत्रांत नेहरूंनी त्या थोर कलावंता-बद्दल लिहिलं होतं.

लिओनार्डो हा नेहरूंचा अत्यंत आवडता कलावंत असल्यामुळे नेहरूंनी त्याच पत्रात त्याच्यासंबंधी विशेष गौरवपूर्वक उल्लेख करणं साहजिकच आहे. "या तीन कलावंतांपैकी लिओनार्डो हा विशेष प्रभावी कलाकार होता. अत्यंत थोर चित्रकार व शिल्पकार तर तो होताच; पण शिवाय तो थोर विचारवंत आणि विज्ञानशास्त्रज्ञ होता. सतत प्रयोग करीत, करीत, शोध घेत आणि कारणपरंपरा शोधीत, अर्वाचीन विज्ञानशास्त्राचा मूलभूत पाया त्याने घातल्या-मुळे तो सर्व विज्ञानशास्त्रज्ञांमध्ये पहिला शास्त्रज्ञ समजण्यात येतो." विश्वाच्या पसाऱ्यात कुठेही नित्य नवीन शिकण्यासारखे आहे याची काळजी तो दयाळू निसर्ग घेत असतो असं लिआनार्डो म्हणतो. मानवी शरीराच्या घडणीने तो भारावून गेला होता.

"वाईट सवयीचे आणि उथळ विचारांचे रासवट लोक असल्या सुंदर मानवी देहाला पात्र नाहीत." लिओनार्डो म्हणतो, "··· कारण ही माणसे म्हणजे अन्नाचा साठा करण्याच्या आणि रिकाम्या करण्याच्या पिशव्या आहेत," असे तळमळीचे उद्गार लिओनार्डोने काढल्याचं नेहरूंनी या पत्रात नमूद करून ठेवलं आहे. (जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप).

ताजमहालचा उल्लेख नेहरू "आग्रा येथील यमुना नदीनजिक उभारलेले सौंदर्याचें स्वप्नमंदिर" असा करतात. शहाजहान हा धार्मिक बाबतीत असहिष्णु

होता आणि दख्खन व गुजरात येथे भयंकर दुष्काळ पडून हजारो माणसे मृत्युमुखी पडली तरी त्याने काही केले नाही. आणि यातना आणि दारिद्र्य यांनी प्रजा गांजलेली असताना, शहाजहानची संपत्ती आणि रुबाब नेहरूंच्या मनात त्याच्याविषयी तिटकाराचा निर्माण करतात. पण तरीही, संगमरवर आणि पाषाण यामध्ये निर्माण केलेल्या मोहक कलाकृती मागे ठेवून गेल्यावर, नेहरू त्याला थोडीफार क्षमा करावयास तयार होतात. ताजखेरीज, मोतीमहाल, दिल्लीची जुम्मा मशीद, व दिवाण-ई- खास व दिवाण-ई-आम याही इमारती शहाजहाननेच बांधून घेतल्या होत्या. "या इमारतीत राजेशाही साधेपणा दिसून येतो; यातील काही इमारती प्रचंड आहेत आणि तरीही त्या आकर्षक व शोभिवंत असून, सौंदर्याच्या बाबतीत कल्पनारम्य आहेत." ("जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप.")

नाट्य, चित्रकला, शिल्पकृती, सुंदर इमारती यांच्याप्रमाणे नेहरूंना संगीताचीही आवड होती. नेहरू रसिकराज होते; अनेक कलांत ते रस घेत, याची माहिती अनेक कलावंतांना होती व त्यामुळे दिल्ली येथे त्यांच्या कचेरीत, त्यांना निमंत्रण करण्यासाठी कलावंतांची गर्दी असे. पंतप्रधानपदाची जबाबदारी व अनेकविध कार्ये यातून वेळ काढून ते मधूमधून काही नाटकांना, नृत्यांना, जलशांना उपस्थित राहत असत. अशा वेळी आपली सर्व कार्ये, प्रश्न व समस्या काही काल विसरून जाऊन कलादर्शनाचा आनंद उपभोगीत असत. काही वेळेस सबंध दिवसभर केलेल्या श्रमानं ते थकून गेलेले असत. अशा वेळी, निमंत्रकानं त्यांना काही काळाच्या उपस्थितीनंतर विश्रांतीची सूचना मान्य केली तर, नेहरू ती सूचना मान्य करीत नसत. उलट, असं नाटक, अगर जलसा आपण बरेच दिवसांत पहायलं- ऐकल्याचं नाही असं सांगून ते विश्रांतीसाठी न जाता, नाटक अगर जलसा संपेतोपर्यंत बसून राहत.

परंतु, असे क्षण त्यांच्या आयुष्यात थोडेच येत. नेहरूंच्या राजकीय जीवनाशीच फक्त परिचय आहे त्यांना नेहरूंना राजकारणापलीकडे इतर काही जीवन आहे, आवडीनिवडी आहेत, छंद आहेत याची कल्पना येत नाही. परंतु, प्रत्यक्ष नेहरूंच्या जीवनात राजकारणाइतकं नसलं तरी पण, थोडंसंच का होईना, पण इतरही अनेक गोष्टींना अत्यंत महत्त्वाचं स्थान होतं. व त्या गोष्टींची

हौसही राजकारणाच्या धकाधकीच्या जीवनात संधी मिळेल तेव्हा भागवून घेत असत. व्हॉइसराय लॉर्ड वेव्हेल यांच्याबरोबर भारतीय भवितव्यासंबंधीच्या महत्त्वाच्या वाटाघाटी सिमला येथे चालू असताना, नेहरू वाटाघाटीच्या स्थळी घोड्यावरून जात असत व घोड्यावरून रपेट करण्याची आपली हौस भागवून घेत. राजकीय कामाकरिता मुंबई अगर अन्य ठिकाणी नेहरू गेले तरी थोडासा वेळ काढून ते पोहोण्याचीही आपली मनीषा तृप्त करून घेत.

तीच गोष्ट खेळांचीही होती. संधी मिळाली तर ती घेऊन, कामातून थोडासा वेळ काढून ते बॅडमिंटन खेळत. दिल्लीत अगर मुंबईत खेळांचे सामने असले तर नेहरू अशा सामन्यांना अवश्य उपस्थित राहात असत. विशेषतः परदेशी क्रीकेटपटुंबरोबर चाललेल्या कसोटी सामन्यांना नेहरू, मग ते कुठेही असले व त्या वेळी त्या शहरात असले तर हटकून हजर राहात. खेळाडूंशी परिचय करून घेत. त्यांच्याबरोबर भोजन करीत.

—नेहरू अशा खेळांना, नाट्यप्रयोगांना, समारंभांना उपस्थित असले की, त्या त्या प्रसंगांना एक आगळी झिलई चढे; आगळी रंगत दिसून येई. अशा वेळी नेहरू व इतर पाहुणे यांच्यातील फरक दिसून येई. इतर मंत्री, सरकारी पाहुणे किंवा बडे लोक उपस्थित असले की, ते आपल्याच रुबाबात, अधिकाराच्या जाणिवेत हजर राहतात. त्रयस्थपणानं व मोठेपणाच्या जाणिवेनं वागत असल्यामुळे प्रसंगांशी एकरूप न होता वेगळे राहतात. परंतु, नेहरूंच्या बाबतीत असं कधीच म्हणता येणार नाही. नेहरू म्हणजे चैतन्य आणि उत्साह ते उपस्थित असले की, खेळ असो, नाट्य असो, नृत्य असो, ते चटकन त्याच्याशी समरस होत असत. प्रेक्षक या एकाच नात्यानं ते त्यातील रस घेत असत व त्यामुळे जमलेल्या असंख्य प्रेक्षकांना ते आपलेसे वाटत; आपल्यातीलच एक वाटत. मोठेपणाच्या जाणिवेचा, रुबाबाचा अधिकाराचा अगर बडेजावीचा त्यांच्या वर्तनात मागमूसही नसे. इतर बडे लोक बडेजावात येतात, थोडा वेळ बसतात व त्याच रुबाबात निघून जातात. त्यांच्याकडे इतर प्रेक्षकांचं लक्ष जाई पण ते व्यक्तीच्या बडेपणाच्या किंवा अधिकाराच्या जाणिवेनं. परंतु, नेहरू आले की, आपल्याप्रमाणेच एक रसिक व खेळाडू असलेला महान पुरुष आपल्यामध्ये आहे याची जाणीव प्रेक्षकांना होत असे.

मुंबईच्या ब्रॅबोर्न स्टॅडियमवर अखिल भारतीय संघ व कॉमनवेल्थ संघ यांच्यामध्ये अनधिकृत क्रिकेट कसोटी सामना सुरू होता. त्या सामन्याला एके दिवशी नेहरू उपस्थित राहिले होते. दुपारच्या भोजनाच्या सुटीच्या वेळा-अगोदर पंधरा-वीस मिनिटे नेहरूंचं आगमन झालं. हिरवळीच्या बाजूला मुख्य इमारतीसमोर नेहरूंची मोटार येऊन उभी राहिली. पुढे फटफटी सायकली होत्या. नेहरूंची मोटार उभी राहताच साऱ्या प्रेक्षकांचं लक्ष तिकडे गेलं. नेहरू आज तिथं येणार आहेत हे बहुसंख्य प्रेक्षकांना माहीतही नव्हतं. मोटार येताच कोण बडी असामी आली आहे हे पाहण्यासाठी असंख्य प्रेक्षकांच्या माना तिकडे वळल्या. क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी उत्साहानं आणि लगबगीने स्टेडियममध्ये प्रवेश करणाऱ्या क्रिकेटशौकिनाप्रमाणे नेहरूंनी उत्साहाने आणि अवखळपणाने मोटारीतून, इमारतीसमोरच्या हिरवळीवर उडी मारली. 'नेहरू!' असा एकच उद्गार असंख्य प्रेक्षकांच्या मुखांतून बाहेर पडला व त्यांच्या मुद्रा एका निराळ्याच उत्साहानं आणि आनंदानं मोहरून गेल्या. क्रीडांगणावरील खेळ काही क्षण थांबला होता. ही गोष्ट लक्षात येताच नेहरू मग मात्र एक क्षण न दवडता इमारतीत शिरले. लगेच त्यांची मूर्ती गव्हर्नरच्या इमारतीच्या सज्जात दिसली. पण लगेच ती एका खुर्चीवर विराजमानही झाली. जगाच्या क्रीडांगणावर राजकीय खेळ खेळणारा तो महान खेळाडू येताच क्रीडांगणावर काही क्षण थांबलेला क्रिकेटचा खेळ नेहरू प्रेक्षक म्हणून स्थानापन्न होताच, पुन्हा सुरू झाला. त्या खेळात आता एक नवा जोम, नवा उत्साह, नवचैतन्य आल्याचा साक्षात्कार असंख्य प्रेक्षकांना होत होता.

दहापंधरा मिनिटांनी भोजनाची सुटी झाली. खेळाडू इमारतीत गेले. परंतु, प्रेक्षक मात्र जागचे हलले नाहीत. त्यांचं सारं लक्ष गव्हर्नरच्या इमारतीतील सज्जाकडे लागलं होतं. खेळ चालू असताना खुर्चीत, जुळलेल्या दोन्ही हातांच्या तळव्यावर हनुवटी ठेवून एकाग्रतेन समोर चाललेला खेळ पाहणारे नेहरू, खेळ संपताच उठून उभे राहिले. सर्वसामान्य प्रेक्षक खेळ संपताच उभे राहतात त्याप्रमाणे— पुढे सज्जाच्या कठड्यावर रेलून ते उभे राहिले, त्याबरोबर सभोवार बसलेले सारे प्रेक्षक मोहिनीविद्येनं भारावून गेल्याप्रमाणे, जागच्या जागी उभे राहिले. त्यांची दृष्टी नेहरूंवर खिळलेली होती. नेहरूंनी सज्जाच्या कठड्यावर रेलून उभे राहून चौफेर दृष्टी फिरविली, आणि मग उजवा हात वर करून

सहास्य वदनाने, त्यांनी तो हलविला. प्रेक्षकांचेही हात वर झाले व मुद्रा सहास्य झाल्या. एक-दोन क्षणाचाच हा खेळ, पण असंख्य प्रेक्षकांना नवचैतन्य प्राप्त झाल्यासारखं वाटलं.

मुख्य इमारतीसमोर खेळाडू दोन रांगांत समोरासमोर उभे होते. खाली उतरून नेहरू आपल्या नित्याच्या उत्साहाने व थोड्याशा अवखळपणाने तेथे गेले. खेळाडूंशी त्यांचा परिचय करून देण्यात येत होता. नेहरू हस्तांदोलन करीत, एखादं वाक्य बोलत, खुले हास्य करीत पुढे सरकत होते. परिचयविधी संपला. खेळाडूंसमवेत नेहरू इमारतीत भोजनासाठी गेले. आणि नेहरू इमारतीत शिरून दिसेनासे होईतोपर्यंत उभे राहिलेले प्रेक्षक भानावर आले व मगच त्यांनी आपल्या मधल्या सुटीतील कार्यक्रमांना सुरुवात केली.

भोजनाची सुटी संपली. प्रेक्षक जाग्यावर येऊन बसले. खेळ सुरू झाला. प्रेक्षकांच्या नजरा सज्जाकडे गेल्या. परंतु, तेथे नेहरू नव्हते. आणि नेहरू गेल्याचं समजताच काही तरी हरवल्याची, खेळातील प्राणच निघून गेल्याची व सारं वातावरण निरुत्साही व मरगळलं असल्याची भावना असंख्य प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाली.

अशा तऱ्हेची भावना फक्त त्या वेळीच तेथे जमलेल्या असंख्य प्रेक्षकांना अनुभविण्यास लागली नव्हे तर, ज्या ज्या ठिकाणी, मग तो एखादा समारंभ असो, खेळाचा सामना असो, जलसा असो, नाट्यप्रयोग असो,–नेहरू उपस्थित असेतोपर्यंत त्या त्या कार्यक्रमात निराळीच गंमत, आगळाच उत्साह व रंगत निर्माण झालेली आढळून येई. आणि मग नेहरू तेथून निघून गेले की, ती सारी गंमत, उत्साह आणि रंगत त्यांच्याबरोबरच निघून जाई.

दिल्ली येथे भरलेल्या मराठी साहित्य-संमेलनाच्या वेळीही हाच अनुभव तेथे जमलेल्या असंख्य साहित्यप्रेमिकांना आला. नेहरू उद्घाटनासाठी येणार म्हणून सभागृह भरून गेलं होतं. आणि नेहरूंच्या आगमनाची सारे वाट पाहात होते. नेहरू आले आणि सारं वातावरण उत्साहानं आणि चैतन्यानं भरून गेलं. त्या उत्साहाच्या आणि चैतन्याच्या वातावरणात कार्यक्रमास सुरुवात झाली. मान्यवर साहित्यिकांची ओळख, पुष्पहारसमर्पण, स्वागताध्यक्ष श्री. काकासाहेब

गाडगीळ यांचं प्रास्ताविक भाषण झाल्यानंतर नेहरू भाषण करावयास उभे राहिले. साहित्यसंमेलनाच्या उद्घाटनाला साजेसं असं भाषण त्यांनी केलं. आपल्याला जास्त वेळ बसण्यास सवड नसल्याचं सांगून त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आणि मग ते तेथून निघून गेले. नेहरू निघून गेले. नेहरू निघून जाताच इतका वेळ सुव्यवस्थित व शांतपणे बसलेले प्रेक्षक उठून उभे राहिले. सबंध सभागृह विस्कळित आणि अव्यवस्थित दिसू लागलं. एकच गोंधळ निर्माण झाला. कार्यक्रमातील सुसूत्रताच नष्ट झाली. विस्कळित झालेला तो कार्यक्रम पुन्हा सुव्यवस्थित पुढे चालू करण्यासाठी, त्या वेळी श्री. काकासाहेब गाडगीळांसारख्या खंद्या व अनुभवी वक्त्यालादेखील प्रथम जड गेलं.

कोणत्याही समारंभाच्या वेळी नेहरूंच्या आगमनानंतर आणि त्यांच्या गमनानंतर हा जो अनुभव येत असे त्याचं कारण काय ? असा प्रश्न नेहमी उभा राहतो. नेहरू महान नेते होते व भारताचं पंतप्रधानपद भूषवीत होते म्हणून ? भारतासाठी त्यांनी अपार कष्ट भोगले होते, दीर्घकाल तुरुंगवास भोगला होता, अपूर्व त्याग केला होता त्यामुळे ?—की त्यांचं मोहक व्यक्तिमत्त्व त्याचं कारण होतं ? ही किंवा यांपैकी एखादं कारण असेल तर मग तो अनुभव इतरही व्यक्तींच्या उपस्थितीच्या वेळी यावयास पाहिजे. नेहरूंप्रमाणे राष्ट्रासाठी अपूर्व त्याग करणारे, अपार कष्ट करणारे आणि तुरुंगवास भोगणारे नेते भारतात तरी संख्येनं कमी नव्हते. त्याचप्रमाणे नेते व महान अधिकारपदावर असणारे पुरुषही भारतात नव्हते असेही नाही. मोहक व्यक्तिमत्त्वाने जर तसा अनुभव येत असला तर कोणत्याही मोहक व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीच्या उपस्थितीनं तो यावयास पाहिजे. परंतु, तसा तो आला नाही—येत नव्हता हीही गोष्ट तितकीच सत्य आहे. तेव्हा, त्या अनुभवाचे कारण काही तरी वेगळंच असलं पाहिजे हे उघड आहे. आणि ते कारण म्हणजे नेहरूंच्या वृत्तीत असलेलं व अभ्यासानं जोपासना केलेलं सर्वस्पर्शित्व आणि त्यामुळे प्रेक्षकांच्या मनात निर्माण झालेला आपलेपणा व स्नेहभाव हेच होतं.

"जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" या आपल्या पत्रमय ग्रंथातील "शेवटच्या पत्रा"त इतिहासाच्या शिकवणुकीचं सार काढताना नेहरूंनी लिहिलं आहे : "जगातील अन्याय, दुःख आणि पाशवी प्रकार पाहून आपण

जर त्याकडे निराशात्मक दृष्टीनं पाहिलं तर जीवनाचा किंवा इतिहासाचा योग्य तो धडा आपण घेतला असं होणार नाही. कारण इतिहास आपल्याला विकास आणि प्रगती आणि मानवी वाटचालीची शाश्वत शक्यता शिकवीत असतो. आणि जीवन हे समृद्ध आणि विविध आहे, आणि त्यात जरी खूप दलदल आणि पाणथळ जागा आणि चिखल असला तरी त्यात महासागर, आणि पर्वत आणि बर्फ आणि हिमप्रवाह आणि तारांकित आकाश, (विशेषेकरून जेलमध्ये!) आणि कौटुंबिक प्रेम आणि मित्र, आणि समान कार्यात सहकाऱ्यांचं सहकार्य, आणि संगीत, आणि ग्रंथ आणि कल्पनांचं साम्राज्य आहे."—

इतिहासाच्या डोळस अभ्यासानं नेहरूंनी जीवनाचा हा महान धडा उचलला आणि त्यानुसार जीवनाच्या अनेक "समृद्ध आणि विविध" अंगांतील रस घेण्यास सुरुवात केली. राजकीय जीवनातील "दलदल, पाणथळ जागा आणि चिखल" तुडवीत जात असतानाही त्यांनी इतर सौंदर्य प्रतीत होणाऱ्या आणि आनंददायी गोष्टींशी परिचय ठेवला; निसर्ग आणि विविध कला यांतील रसग्रहण ते आजन्म करीत राहिले. आणि म्हणूनच ते ज्या ज्या समारंभांना, सभा-संमेलनांना, जलशांना किंवा कलांच्या प्रदर्शनांना हजर राहिले त्या वेळी ते त्या त्या विषयांशी व कलाप्रकाराशी तादात्म्य पावत. त्यामुळे त्या त्या प्रसंगी जमलेल्या असंख्य श्रोत्यांना त्या रसिकराजाचं आगमन व उपस्थिती आनंददायी व उत्साहवर्धक वाटे. आपल्यापैकीच एक रसिकराज आपल्याबरोबर रसग्रहण करीत आहे हे पाहून त्यांचा आनंद व उत्साह द्विगुणित होऊन, त्यांच्यात नवचैतन्य खेळू लागे.—

—आणि मग तेथून नेहरू निघून जाताच द्विगुणित झालेला आनंद व उत्साह वाटू लागलेलं नवचैतन्य नष्ट होऊन जाई.

"जीवनाला किंवा रोजच्या व्यवहाराला कलात्मक स्पर्श देण्यासाठी पैसा खर्च करावा लागत नाही, किंवा लागलाच तर अत्यल्प असतो," असं नेहरूंचं मत होतं. त्यासाठी फक्त माणसाजवळ थोडीफार कल्पकता आणि सौंदर्यप्रेम याची जरूर आहे. कल्पकता आणि सौंदर्यप्रेम असेल तर एखादी व्यक्ती लहानशी झोपडीही आकर्षक आणि कलापूर्ण बांधू शकेल, आणि या दोन गोष्टी नसतील तर केवढीही मोठी इमारत नजरेला भयानक वाटल्यावाचून

राहणार नाही....पैशाच्या थैलीपेक्षा कलात्मक दृष्टी असली पाहिजे...आणि म्हणून सार्वजनिक किंवा सरकारी इमारती बांधताना, तरुण चित्रकार, शिल्पकार आणि कलावंत, यांना आपण उत्तेजन दिलं पाहिजे अशी सूचना नेहरूंनी बंगलोर येथे नगरपालिकेच्या इमारतीच्या उद्घाटन-प्रसंगी केली होती.

कल्पकता आणि सौंदर्यदृष्टी यांच्याबरोबरच कलेची निष्ठाही अंगीकृत कार्यात आवश्यक आहे याचीही जाणीव नेहरूंनी करून दिलेली आहे. ही निष्ठा मध्ययुगीन कालातील लोकांत होती, म्हणून त्या काळी त्यांच्या हातून आपण आज पाहत असलेल्या सुंदर इमारती, देवाल्ये, प्रार्थनामंदिरे, कोरीव-लेणी बांधली गेली. ती कुणी बांधली हे पाहणाऱ्याला माहीत नसतं; परंतु ती पाहतांना त्यातील सौष्ठव व सौंदर्य यांच्याबरोबरच कलाकारांच्या निष्ठेचाही आपल्याला साक्षात्कार होतो. कोणतीही सौंदर्यकृती तशी निष्ठा असल्या-शिवाय त्या इमारती किंवा कलाकृती निर्माणच करू शकणार नाही.....आणि म्हणून नेहरू इशारा देतात की, "आज आपण नवभारत निर्माण करीत आहोत; अशा वेळी ती निष्ठा मनात सतत बाळगून आपण नवभारताची उभारणी केली तर, सौष्ठव आणि सौंदर्ययुक्त उभारणी केल्याचा, एक नवीनच आनंद प्राप्त होईल." (सेंट्रल बोर्ड ऑफ् इरिगेशनच्या एकोणिसाव्या वार्षिक सभेपुढे ता. ५।११।१९४८ रोजी केलेले भाषण.)

नवभारताच्या निर्मितीच्या प्रारंभीच्या कालातच नेहरूंनी हा इशारा दिला आहे ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. कारण, त्यांना इतिहासाच्या अभ्यासानं "एखाद्या कालखंडातील जीवन आणि संस्कृती यांचा त्या काळातील कला ही अत्यंत विश्वासू आरसा असतो" ही गोष्ट ज्ञात झाली होती. "जेव्हा भारतीय संस्कृती चैतन्यमय होती, तेव्हा तिनं सौंदर्यपूर्ण वस्तू निर्माण केल्या आणि कलांना बहर आला होता, व त्यांचे पडसाद दूरदूरच्या देशांतही उमटले होते. परंतु, अगतिकता आणि ऱ्हास निर्माण झाला आणि राष्ट्राबरोबर कलाही रसातळाला गेली." भारतीय इतिहासातील ही शोककारक घटना नेहरूंनी "जागतिक इतिहासावरील दृष्टिक्षेप" या पत्रसंग्रहातील "गतावलोकन" या पत्रात नमूद केली आहे. आपल्याला नवभारताची उभारणी करताना कला आणि वाङ्मय यांच्या अंतर्बाह्य स्वरूपाकडे लक्ष दिलं पाहिजे ते "बाह्यात्कारी

अनेकविध कार्यापेक्षा कला आणि वाङ्मय यांच्यामुळेच राष्ट्राच्या आत्म्याच्या अंतरंगांची सखोल जाणीव होत असते." (जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप : काही सुप्रसिद्ध लेखक). या कारणामुळेच, अशी नेहरूंची विशाल दृष्टी होती.

कलाविषयक नेहरूंच्या या दृष्टिकोनामुळे "कलेकरिता कला" हे कला-विषयक तत्त्व त्यांना मान्य नव्हतं. आणि त्यामुळेच भारतातील अनेक कला-विषयक घटनांना, कामाचा भयंकर बोजा असूनही ते हजर राहात. एवढंच नव्हे तर, परदेशी दौऱ्यावर असताही ते वेळात वेळ काढून सांस्कृतिक व नाट्यादि कलाविषयक दर्शनांना ते उपस्थित राहत. भारतात 'संगीत नाटक अकादमी", "साहित्य अकादमी" या संस्थांची प्रस्थापना करून, त्यात प्रत्यक्ष भाग घेऊन वाङ्मय, नृत्य, संगीत, नाट्य, चित्रपट, चित्र, शिल्प या कलांना सतत उत्तेजन देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

नेहरू रसिक होते, परंतु ते कोणत्याही कलेच्या बाबतीत जाणकार किंवा तज्ज्ञ होते असा खुद्द त्यांचा स्वतःचा दावा नव्हता. "अनेक गोष्टींत मी लुडबूड केली आहे." असं त्यांनी स्वतःच कबूल केलं आहे. (जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप : शेवटलं पत्र) त्याचप्रमाणे, आपल्या आत्मचरित्रात ते लिहितात : "कोणत्याही गोष्टीत खोलवर न जाता उथळपणाने पाहत होतो तरी पण, जीवनाच्या सौंदर्यात्मक अंगाकडे मी आकर्षिला गेलो होतो; आणि बीभत्स मार्गाचा स्वीकारही न करता, प्रतिष्ठापूर्ण जीवन जगण्याची, आणि तरीही जीव जास्तीत जास्त कारणी लावण्याची व त्याबरोबर समृद्ध आणि बहुविध करण्याच्या इच्छेनं मला आकर्षित केलं होतं."

नेहरूंच्या या स्वभाववैशिष्ट्यांमुळं आणि प्रवृत्तीमुळं कोणत्याही एका कलाप्रकारात त्यांनी प्रावीण्य मिळविलं नव्हतं किंवा ते निष्णात अगर तज्ज्ञ नव्हते. फक्त विविध गोष्टींतील रस घेण्याची त्यांच्या मनाची प्रवृत्ती होती व सर्व प्रकारांची माहिती करून घेण्यासाठी त्यांनी आपल्या मनाच्या "सर्व खिडक्या सदैव उघड्या" ठेवल्या होत्या. व जेवढं ज्ञान व रस संपादन करता येईल तेवढा ते ग्रहण करीत असत. अर्थातच, सर्व गोष्टींचा तज्ज्ञ होणं त्यांना अशक्यच होतं. उलट, तज्ज्ञ अगर निष्णात होणं म्हणजे सर्वसामान्य पातळी सोडून वर जाणं होय असं त्यांचं मत होतं. २७-११-१९५१ रोजी मद्रास

येथे, मद्रास सरकारच्या कलावस्तुसंग्रहाच्या शतसांवत्सरिक समारंभाच्या वेळी भाषण करताना नेहरू म्हणाले होते की; " मी माझ्या नवशिक्या पद्धतीनं वस्तुसंग्रहांचा चाहता आहे. मी कोणत्याही बाबतीत तज्ज्ञ नाही. परंतु, अनेकविध कार्यात मी लुडबूड केलेली आहे. पुष्कळच गोष्टींची मला आवड आहे, आणि तज्ज्ञांचाही दुरून का होईना, पण, मी चाहता आहे. तज्ज्ञांचाही उपयोग आहे ही गोष्ट स्पष्ट आहे; परंतु, तज्ज्ञांच्याच जगात आपलं कार्य आहे असं ते नेहमी समजतात, आणि त्याचा परिणाम असा होतो की, सर्वसामान्य माणसांशी किंवा तज्ज्ञ नसलेल्या नवशिक्या माणसांशी त्यांचा संपर्क राहात नाही. मला असं वाटतं की, सर्वसामान्य मानवजातीशी संबंध नसलेल्या कोणत्या तरी वरच्या जगांत तज्ज्ञ वावरत असतात, आणि तज्ज्ञांशिवाय अगदी थोडीच माणसे तेथपर्यंत पोहोचू शकतात. "

नेहरूंच्या भाषणातील या उताऱ्यावरून, मानवी जीवनाशी संलग्न असलेल्या अनेकविध गोष्टी आणि कलाप्रकार आणि प्रत्यक्ष मानवी जीवन यांमधील नेहरूंना अभिप्रेत असलेले संबंध स्पष्ट होतात. कोणत्याही गोष्टीत तज्ज्ञांची व निष्णातांची जरूरी असते हे खरं, पण कोणत्याही गोष्टीचा विचार ते तज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून, म्हणजेच उच्च पातळीवरून करतात; आणि म्हणून सर्वसामान्य मानवाच्यापासून त्यांच्या विचारांचा संचार उच्च दर्जाचा असतो. त्यामुळे सर्वसामान्य मानवांशी त्यांचे संबंध तुटतात. मानवजातीवर उदंड प्रेम करणाऱ्या नेहरूंना ही स्थिती मानवणं शक्य नव्हतं. आणि म्हणूनच काही बाबतीत ते तज्ज्ञ असूनही ते स्वतःला तज्ज्ञ म्हणवून घेण्यास कधीच तयार नसत. या संदर्भात प्रा. हिरेन् मुकर्जी यांनी आपल्या " मृदू महापुरुष " या पुस्तकात व्यक्त केलेला विचार उद्धृत करण्यासारखा आहे. प्रा. मुकर्जी लिहितात: " आपल्याजवळ सौंदर्यरसग्रहणात्मक विशेष आकलनशक्ती असल्याचं नेहरू अमान्य करीत आणि चित्रकृती व शिल्पकृती यांच्याबद्दलची आपली मते ते नेमस्तपणानं प्रकट करीत. असं असूनही, एखाद्या राष्ट्रीय नेत्याच्या प्रतिमेचं (त्या प्रतिमेत त्या नेत्याचं व्यक्तिमत्त्व साकार झालेलं नाही अशा मताचे श्रोते आपल्याशीच हात चोळीत बसले असताही) उद्घाटन करताना, संपूर्णपणे भरलेल्या सभागृहात, लोकसभेच्या सदस्यापुढे त्या प्रतिमेचं कलादृष्ट्या विवेचन

करताना नेहरूंचं भाषण ऐकून ती प्रतिमा खरोखरच एक कलाकृती आहे असं सदस्यांना वाटे."

नेहरू तज्ज्ञाची व टीकाकाराची भूमिका घेत असत व नेहमी ज्ञानविषयक नेमस्तपणाची भूमिका घेत असत याचं कारण सामान्य मानवाची पातळी त्यांना सोडावयाची नव्हती. सर्वसामान्य मानवाच्या दृष्टीनं त्यांना कलाकृतींकडे पाहावयाचे होते हेच होतं. आणि सर्वसाधारण मानवाची भूमिका त्यांनी कधीच सोडली नव्हती. परंतु, त्याचा अर्थ सर्वसामान्य मानवी पातळी गाठताना किंवा तिचा अंगीकार त्यांनी केला असला तरी अश्लील, बीभत्स किंवा ग्राम्य पातळीवर ते कधीच उतरले नव्हते. कोणत्याही गोष्टीचा रसास्वाद घेताना बीभत्स मार्गाचा अवलंब न करता " त्यांना तो रसास्वाद घ्यावयाचा होता. आणि म्हणून जे जे सौंदर्यपूर्ण, कलायुक्त किंवा नयनमनोहर असेल त्याचाच ते रसास्वाद घेत असत. सर्वच बाबतींत त्यांची ही पातळी, तज्ज्ञाची नसली तर उच्च दर्जाची, संस्कृतीची व अभिरुचीची होती आणि या पातळीवरून ते कधीही खाली उतरले नव्हते. लोकसभेत, अनेक समांतून, किंवा अन्यत्र भाषणे करताना आपल्या टीकाकारांचा व विरोधकांचा समाचार घेणे त्यांना भाग पडत असे; कित्येक वेळा तर त्यांच्यावर झालेल्या व्यक्तिगत टीकेलाही उत्तर देणे भाग पडत असे. अशा वेळी क्वचित ते क्रोधाविष्ट होत असले किंवा चिडून गेले असले तरीही आपल्या वक्तृत्वाचा, भाषेचा किंवा टीकेचा डौल अगर तोल ढळू न देता आपल्या वक्तृत्वाची उच्च पातळी त्यांनी कायम राखली होती. पाकिस्तानी नेत्यांची टीकापद्धती सर्वांच्याच परिचयाची आहे. त्यांच्या निरर्गल, बीभत्स टीकेलाही उत्तर देताना नेहरूंनी ग्राम्य भाषेचा अगर पद्धतीचा अवलंब केला नाही. आणि क्वचित एखादे वेळेस " पाकिस्तानचा जन्मच कपट आणि द्वेष यातून झालेला आहे " असं सत्यपरिस्थितिदर्शक पण कठोर वाक्य नेहरूंच्या मुखातून बाहेर पडलेलं ऐकलं तर Walter Croscher सारख्या नेहरूंच्या राजकीय टीकाकारांना देखील आश्चर्य वाटल्यावाचून राहत नसे. –(NEHRU : A Contemporary Study). या एकाच उदाहरणावरून, नेहरूंची सुसंस्कृततेच्या उच्च पातळीची कुणालाही कल्पना करता येईल. प्रा. हिरेन् मुकर्जी या त्यांच्या कट्टया विरोधकानेही " कुठेही एखादी बीभत्स किंवा रानटी-

पणाची घटना घडून आली आणि त्याबद्दल कुणालाही मनस्ताप झाला तर त्या व्यक्तीनं खुशाल नेहरूंकडे दाद मागावी." असं लिहून ठेवलं आहे ते नेहरूंच्या सभ्य आणि सुसंस्कृतपणाबद्दलच्या खात्रीमुळेच!

नेहरूंची ही अभिजात रसिकता त्यांच्या वागण्यात–बोलण्यात सदैव दिसून येत असे. मग ते एखाद्या प्रौढ पुरुषाशी, स्त्रीशी किंवा बालकांच्या सान्निध्यात असोत. नेहरूंच्या मुखावर सदैव विलसत असणारं हास्य, त्यांचे साधेच परंतु नीटस व त्यांच्या शरीराला घट्ट बसणारे व शोभणारे कपडे, त्यांच्या छातीवर विराजमान झालेलं गुलाबपुष्प, त्यांच्या सौंदर्यात्मक मनाच्या ठेवणीची साक्ष देत असत. त्यांच्या सबंध सुसंस्कृत, उच्च दर्जाच्या अभिजात जीवनात, त्यांना मनस्ताप देणाऱ्या अनेक घटना घडून आल्या; जगातल्या व त्याचबरोबर त्यांच्या सहकाऱ्यांच्या क्षुद्र, स्वार्थी आणि आपमतलबी वर्तणुकीमुळे त्यांच्या कोमल व अभिजात अभिरुचीच्या मनाला सतत चटके बसत गेले; अन्याय, दुःख आणि पाशवी मनोवृत्ती यांनी साऱ्या विश्वात अनिरुद्ध संचार मांडल्यामुळे अधून-मधून ते कुंठित झाले असले, अनेक कठीण व न उलगडणाऱ्या समस्यांनी व घटनांनी त्यांना दिङ्मूढ करून टाकलेलं असलं व त्यामुळं मानवी कर्तृत्वावर असलेला त्यांचा विश्वास गळून पडण्याची पाळी त्यांच्यावर आली असली तरीही नेहरूंना हे सारे प्रकार पराभूत करू शकले नाहीत, त्यांचा स्वभाव व विचार आणि आचार यांना धक्का लावण्यास समर्थ ठरले नाही व त्या साऱ्या प्रकारांवर मनोविजय मिळवून नेहरू धैर्यानं, सामर्थ्यानं आणि विश्वासानं सतत अविचलित राहिले याचं कारण म्हणजे मुख्यतः जीवनाच्या दुसऱ्या सुसंस्कृत, रसिक, सौंदर्यशोधक अंगाची त्यांना जाणीव होती; त्यात त्यांना रस होता, त्याचा आस्वाद घेण्याची वृत्ती होती हेच होय असं म्हटलं तर मुळीच अतिशयोक्तीचं होणार नाही. सौंदर्यसमृद्ध निसर्गाचं सान्निध्य, प्रेमळ मित्रांचा व कुटुंबियांचा परिवार, संगीत, चित्र, नाट्य आदि कला, अमाप अमोल ग्रंथसंपत्ती इत्यादी गोष्टींनी त्यांच्या जीवनाला सतत साथ केलेली आहे आणि या सर्व गोष्टींचा रसिकतेनं उपभोग घेत राहिल्यामुळे नेहरू आपलं अभिजात व्यक्तिमत्त्व शेवटपर्यंत टिकवू शकले.

卐 卐

१३

अभ्यासू वाचक

" नेहरू राजकरणात पडले नसते तर ? "

नेहरूंचं समग्र जीवन आणि कार्य यांचा अभ्यास करताना एकच गोष्ट अभ्यासकाच्या मनात ठसते आणि ती हीच की, त्यांचं जीवन आणि कार्य – दोन्हीही राजकारणप्रधान होतं. शिक्षण संपवून नेहरू भारतात आले आणि वडिलांच्या इच्छेनुसार त्यांनी वकिलीचा व्यवसाय करण्यास सुरुवात केली. परंतु; त्या व्यवसायात त्यांचं मन रमलं नाही याची कबुली खुद्द नेहरूंनीच दिलेली आहे. आपल्या आत्मचरित्रात ते लिहितात : " मी वकिली पत्करून हायकोर्टमध्ये प्रवेश केला. काही प्रमाणात त्या कामात माझं मन रमलं परंतु, हळूहळू माझ्याप्रमाणेच इतरही अनेक लोक जे जीवन जगत होते त्या

जीवनातील ताजेपणा मावळत गेला आणि ध्येयशून्य आणि निरर्थक अशा कंटाळवाण्या दिनक्रमात मी गुरफटून जात आहे असं मला वाटू लागलं.... इंग्लंडहून परत आल्यावर मी घालवीत असलेल्या जीवनाबद्दल म्हणून मला असमाधान वाटू लागलं." म. गांधींचा उदय याच वेळी भारताच्या राजकारणात होत होता. आणि त्यांच्या प्रभावानं नेहरू राजकारणाकडे आकृष्ट होऊन राजकारणात पडले. भारताला निर्भय आणि निर्धारी सैनिक, पुढारी आणि महान नेता मिळाला. जागतिक शांततेसाठी झगडणारा शांतीचा उपासक जगाला लाभला आणि भारतीय आणि जागतिक राजकारणाच्या इतिहासात नेहरूंचं नाव अजरामर झालं. पण—

"नेहरू राजकारणात पडले नसते तर?"

असा प्रश्न अनेकांच्या मनात उभा राहतो आणि त्या प्रश्नाला एकच उत्तर मिळतं. आणि ते हे की नेहरू महान साहित्यिक झाले असते व जागतिक कीर्तीचे साहित्यसम्राट म्हणूनही त्यांचं नाव अजरामर झालं असतं."

'नेहरू राजकारणात पडले नसते तर?' या प्रश्नाचं, 'ते जागतिक कीर्तीचे साहित्यिक झाले असते' असं एकमुखी उत्तर मिळतं ते काही अंदाजानं किंवा इच्छांतून निर्माण होणाऱ्या विचारानं नव्हे. नेहरूंची स्वभावप्रवृत्ती शिक्षण, आवडीनिवडी, वाचन आणि साहित्यिक कर्तृत्व हे लक्षात घेऊनच ते उत्तर निश्चितपणे व खात्रीपूर्वक देण्यात येतं.

नेहरूंच्या मनावर बालपणी जे संस्कार घडून आले किंवा आणण्यात आले याचा आढावा दुसऱ्या प्रकारात घेतलाच आहे. मुनशी मुबारकअलीने सांगितलेल्या १८५७ सालच्या स्वातंत्र्य-युद्धातील हकीगती, अरेबियन नाइटस्मधल्या रोमांचकारी कथा आणि त्याचप्रमाणे इतर अनेक ग्रंथांतून व माहितीच्या आधारे सांगितलेल्या गोष्टी यांनी नेहरूंच्या बालमनावर चांगलाच परिणाम झाला होता. नेहरूंची आई व आत्या यांनीही नेहरूंच्या बालवयातच रामायण, महाभारत वगैरे पौराणिक ग्रंथांतील कथा सांगून नेहरूंच्या बालमनावर चांगले संस्कार घडून आणले होते. नेहरूंचा शिक्षक फर्डिनांड् ब्रुक्स याने तर नेहरूंना उत्तमोत्तम ग्रंथांच्या वाचनाचे एक व्यसनच लावलेले होते असं म्हणावयास हरकत नाही.

बालवाङ्मय, कथावाङ्मय, रोमांचकारी वाङ्मय, काव्य, अद्‌भुत कथा, इत्यादी वाङ्मयप्रकारांचं, ब्रूक्सने आपल्या मार्गदर्शनाखाली नेहरूंना ज्ञान करून दिलं होतं; गोडी लावली होती.

बालपणी वाचनाचे झालेले हे संस्कार व लागलेली गोडी नेहरूंच्या मनावरून कधीच पुसली गेली नव्हती. इंग्लंडला गेल्यावर तर ती अधिकच वाढत गेली. नेहरूंच्या जीवनात त्यांच्या वाट्याला एकांडेपणा अगदी लहानपणापासून आला होता व शेवटपर्यंत त्यानं नेहरूंची पाठ सोडली नव्हती; किंवा नेहरूंच्या मनावरील पकड ढिली केली नव्हती. एकलकोंड्या व्यक्तीला वाचनाचा फार मोठा आधार वाटत असतो. इंग्लंडमध्ये असतानाही, तेथील वातावरण व परिस्थिती यांच्याशी नेहरू सर्वसाधारणपणे सर्वस्वी समरस झाले नव्हते; आणि त्यामुळं वाचनाची प्रवृत्ती व गोडी वाढतच गेली. आपल्या वडिलांशी झालेल्या पत्रव्यवहारात, वाचनात आलेल्या ग्रंथांचा उल्लेख नेहरू सतत करीत असत; आपल्याला बाजारात नवीनच आलेल्या पुस्तकांपैकी कोणती पुस्तके विकत घ्यावयाची आहेत व त्यांचं स्वरूप काय आहे याचीही चर्चा केलेली असे. त्याचबरोबर पुस्तकांवर होणाऱ्या खर्चाबद्दलही निर्देश असे. ९-३-१९११ रोजी मोतीलालजींना लिहिलेल्या एका पत्रात तर नेहरूंनी लिहिलं होतं : "तुम्ही इथं असताना मेरिडिथच्या पुस्तकांची आवृत्ती बाजारात येत होती, ती आता पुरी झाली आहे. ती पुस्तके व आणखीही इतर पुस्तके मला तुमच्याकडे पाठवावीशी वाटतात, आणि माझी खात्री आहे की, त्यामुळे तुम्हांला समाधानच वाटेल. काही जुन्या ग्रंथकारांच्या पुस्तकांच्या नवीन आवृत्ती नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आहेत, आणि त्या उत्तम आहेत व कोणत्याही ग्रंथवेड्या व्यक्तीच्या हृदयाला त्यामुळे आनंदच वाटल्यावाचून राहणार नाही. थॅकरेच्या लिखाणाची वीस ग्रंथी आवृत्ती तर माझ्या मनाला अत्यंत आकर्षक वाटली व त्यांची मागणी नोंदविण्याचा मोह मला आवरता आला नाही...डिकन्सची पण अशीच मोहक आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. ती चाळीस ग्रंथांची आहे...ज्या लेखकाची पुस्तके वाचण्याची उत्सुकता लागून राहिलेली आहे तो लेखक म्हणजे ऑस्कर वाइल्ड!" यानंतर नेहरू पुढे सूचना करतात; "येथील एखाद्या पुस्तकविक्रेत्याकडे तुम्ही जर खाते उघडलेत तर ती फार उपयुक्त गोष्ट ठरेल. टाइम्स बुक क्लब यांच्या नावाला अग्रहक्क देण्यात यावा...माझ्या मते एखादी लायब्ररी

हळूहळू परंतु काळजीपूर्वक उभारण्यात यावी, आणि याच हेतूनं बुक क्लबमध्ये खाते उघडण्यात यावे अशी मी तुम्हांला विनंती करीत आहे. "

वाचनांत येणाऱ्या किंवा वाचण्याची आवड असलेल्या पुस्तकांसंबंधीचे उल्लेख नेहरूंनी मोतीलालजींना लिहिलेल्या पत्रातच नव्हे तर आपल्या भगिनींना लिहिलेल्या पत्रांतही आढळतात. मात्र ही पत्रे त्यांनी तुरुंगात असताना लिहिलेली आहेत एवढाच काय तो फरक. तुरुंगात असताना नेहरूंना वाचन व लेखन करण्यास खूपच वेळ मिळे. यासंबंधीच्या एका पत्रात त्यांनी लिहिलं आहे : मी खूपच वाचन करणार आहे, कारण दुसरं करण्यासारखं असं दुसरं थोडंच आहे ? फक्त वाचन आणि विचारमंथन करीत दैनंदिन कार्यक्रम पार पाडावयाचे. म्हणजे मग मी जेव्हा तुरुंगाबाहेर येईन, आणि तो क्षण फार दूर आहे, तेव्हा कदाचित मी थोडाफार शहाणा होऊन बाहेर पडेन किंवा कदाचित नसेनही."

—आणि नेहरूंनी त्याप्रमाणे आपले बोल खरे करूनही दाखवले. तुरुंगात त्यांचं सदैव लेखनाशिवाय वाचनही चालू असे. आपल्याला हवी असतील ती व इतरही उल्लेख आढळतील ती त्यांच्या अभिरुचीला व प्रवृत्तीला वाचावीशी वाटणारी पुस्तके मागवून व मिळवून त्या ग्रंथांचं त्यांचं वाचन करण्यात तुरुंगातील सारा वेळ ते व्यतीत करीत असत. १-६-१९३४ रोजी श्री. कृष्णा हाथीसिंग यांना लिहिलेल्या पत्रात नेहरू लिहितात : " टोलरच्या पुस्तकाच्या बाबतीत तुझी गति मंद दिसते. पुस्तकांच्या बाबतीत तुरुंगात असताना मी किती अद्यावत् असतो हे तू विसरलीस का ? कलकत्त्यांत एखाद्या पुस्तकाविषयी ऐकतो तेव्हा ते मिळविण्याचा प्रयत्न करतो. इथे मिळत नसेल तर इंग्लंडहून मागवतो.....हे पुस्तक उत्कट व भावना हेलावणारं आहे आणि टोलर किती प्रेमळ प्राणी आहे...."

असे ग्रंथांचे उल्लेख इतर पत्रांतही आढळतात : " 'सायकी'ने पाठविलेला ग्रीक नाटकांचा संग्रह ही महत्त्वाची गोष्ट आहे आणि तो वाचताना मी मोहून गेलो. " (ता. २४-११-१९४२). " तुझ्या लक्षात येईल की, मला मूळ संस्कृत दोन पुस्तके हवी आहेत —एक कालिदासाचं शाकुंतल आणि दुसरं बाणभट्टाची कादंबरी." (ता. ९-१-१९४३). " पंधरा दिवसांपूर्वी अर्धा डझन पुस्तके मला मिळाली. (आंद्रे मार्वा, थिओडोर ब्रुक, खलील गिब्रान, जॉन केंडेल, यूस्टॉस्

स्लॉपर् इ.) नंतर आणखी पर्ल बक्‌ची दोन पुस्तके आणि टिम् फेलन्‌चे " जेल यात्रा " मिळाली. पर्ल बक्‌ची पुस्तके नेहमीच स्वागतार्ह असतात. " जेल-यात्रा " माझ्या पूर्वपरिचयाचे आहे व ते मी वाचले होते व मला आवडलेही होते. खरोखरच मला ते इतकं आवडलं होतं की, मी ते आता दुसऱ्यांदा वाचून काढले. कोणालाही ते वाचावेसे वाटेल– विशेषतः हिंदुस्तानातील तुरुंगांचा अनुभव असणाऱ्यांना तर ते विशेष चित्तवेधक आणि साक्षात्कारी वाटेल." (ता. २३–११–१९४३).

आपल्या निकटच्या आप्तांना व मित्रांना लिहिलेल्या पत्रांतून आपल्या वाचनात आलेल्या ग्रंथांचा उल्लेख नेहरूंनी केलेला आढळतो. त्याचप्रमाणे खुद्द त्यांनी स्वतः लिहिलेल्या ग्रंथांतूनही आधारभूत ग्रंथांचे अनेक उल्लेख आढळतात. त्याप्रमाणे वाचलेल्या किंवा वाचण्यासाठी बरोबर घेतलेल्या ग्रंथांचेही नामनिर्देश आढळतात. " भारताची एकात्मता " (The Unity of India) या आपल्या ग्रंथात, १९४० साली फेब्रुवारी महिन्यात मुंबई ते लखनौ या संदगती गाडीने केलेल्या प्रवासाचा वृत्तांत " रेल्गाडीतील सुटी " या लेखात वर्णन केला आहे. रात्री १०–३० वाजता गाडीनं मुंबई सोडली आणि आपल्या बर्थवर पडल्यावर त्यांनी " झोपेची आवश्यकता असताही, जुन्या संवयीने पुस्तक वाचण्यासाठी पुस्तक हातात घेतले. " हे पुस्तक स्टीफन् झ्वाइग्‌चे " अज्ञात स्त्रीचे पत्र " (Letter from an unknown Woman) होते. " ही कोमल आणि भावनापूर्ण अशा व सुंदर गद्यात लिहिलेल्या कथा " नेहरू मध्यरात्रीपर्यंत वाचीत होते. दुसऱ्या दिवशी दुपारी हाताशी असलेल्या ग्रंथसमूहांतून डब्ल्यू. बी. करी (W. B. Curry)–चे " The Case for Federal Union " हातात घेतले. त्यातील एक दोन प्रकरणे वाचून झाल्यावर हलकेफुलके वाङ्मय वाचण्याची आवश्यकता भासू लागल्यामुळे मग नेहरूंनी डी. एन्. प्रिट्‌चं " मॉस्कोवर प्रकाश " (Light on Moscow) हे पुस्तक वाचावयास सुरुवात केली. ते पुस्तक वाचून होताच नंतर एच्. जी. वेल्स्‌चे " Travels of a Republican Radical in search of Hot Water " हे पुस्तक वाचून संपविलं. त्यानंतर George Buchner च्या " Danton's Death " या इंग्लिश भाषेत रूपांतरीत नाटकाचा क्रम लागला. आणि शेवटी Pierre van

Passeus याच्या " Days of Our Years " या आत्मचरित्राचं वाचन पूर्ण करून नेहरूंनी आपला झांशीपर्यंतचा प्रवास पूर्ण केला.

एका प्रवासात नेहरूंनी वाचलेल्या या ग्रंथातील विविध वाङ्मयप्रकारांविषयी कोणालाही सहज कल्पना येईल. फक्त वाचूनच नेहरू थांबले नाहीत, तर त्या लेखांत त्यांनी या ग्रंथावर भाष्य व विचारही प्रकट केले आहेत हे विशेष आहे. नेहरूंच्या वाचनात आलेल्या ग्रंथांची विविधता व त्यांवर केलेली भाष्ये व प्रकट केलेले विचार, फक्त या एकाच लेखात आढळून येत नसून, त्यांचं विशाल आणि भव्य स्वरूप त्यांनी लिहिलेल्या त्यांच्या इतर ग्रंथांतही आढळून येतं.

रामायण व विशेषतः महाभारत, गीता, उपनिषदे, वेद, भागवत वगैरे धार्मिक ग्रंथांबरोबरच कालिदास, भास वगैरे महान् संस्कृत लेखकांची नाटके व मेघदूत यांसारखी काव्ये यांचेही उल्लेख आढळतात. संस्कृत सुभाषितांची पखरण केलेलीही नेहरूंच्या ग्रंथांतून मधून मधून आढळते. शंकराचार्यांच्या " नीतिसार " या ग्रंथावरही नेहरूंनी केलेलं भाष्य विस्तृत आहे. चाणक्याचं " अर्थशास्त्र " या ग्रंथाबद्दल तर नेहरूंचं अनुकूल मत होतं व या ग्रंथाचा आधारही नेहरूंनी अनेक वेळा घेतलेला आहे. कबीर, रामदास, तुकाराम, तुलशीदास यांचाही नामनिर्देश व एखादी टिप्पणी त्यांच्या ग्रंथात आढळते. मुद्राराक्षस, मृच्छकटिक इत्यादी संस्कृत नाटकांचाही अंतर्भाव झालेला आहे. संस्कृत नाटकांवर " भारताचा शोध " या ग्रंथात तर एक स्वतंत्र प्रकरण आहे; आणि त्यांत कालिदासाचं शाकुंतल व मेघदूत हे काव्य, शूद्रकाचे " मृच्छकटिक " यांचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. त्याबरोबरच " नाट्यशास्त्र " या ग्रंथाचाही परिचय आहे. स्वामी विवेकानंद यांचे उल्लेख तर अनेक ठिकाणी येऊन गेले आहेत.

हिंदुधर्माबरोबरच इतर धर्मांचाही नेहरूंनी थोड्या फार प्रमाणात अभ्यास केलेला असल्यामुळे झोरास्ट्रिॲनिझम्, ख्रिश्चन धर्म आणि मुख्यतः बौद्ध धर्म यांच्याही धर्मग्रंथांचे उल्लेख नेहरूंच्या ग्रंथांत ठिकठिकाणी येऊन गेले आहेत. मुसलमानांचं कुराण, शीखांचा ग्रंथसाहेब, ख्रिश्चनांचे बायबल, जुना करार यांच्यासंबंधीची माहिती आढळते. बौद्ध धर्माचा उगम व विकास यावरील अनेक ग्रंथांचा नामनिर्देश करून साधार माहिती व विवेचन नेहरूंच्या ग्रंथांत हिंदुधर्माच्या बरोबरीनं केलेलं असल्यास नवल नाही.

अनुक्रम ०५६६८ दिः ... वर्ग ... २२२० ... दिः ...

नेहरूंचं शिक्षण इंग्लंडमध्ये झालं असल्यामुळे इंग्रजी भाषेतील जुन्या-नव्या साहित्यिकांच्या साहित्याच्या वाचनाची त्यांना विशेष गोडी असली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नाही. शेक्स्पिअरपासून बर्नाड शॉपर्यंतच्या सर्व सुप्रसिद्ध नाटककारांची नाटके त्यांनी वाचून काढली होती. शॉंच्या नाटकांना लिहिलेल्या विस्तृत प्रस्तावना नेहरूंना आकर्षक विशेषतः विचारप्रवर्तक व प्रक्षोभकही वाटत असत. डिकन्स, थॅकरे वगैरे जुन्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांप्रमाणेच पर्ल बक्, अँन्ड्रे मार्वा वगैरे अत्याधुनिक लेखकांच्या कादंबऱ्याही त्यांनी वाचलेल्या होत्या. युरोपीय वाङ्मयाच्या रूपांतरात वाङ्मयानं तर इंग्रजी भाषेतील साहित्याला संपन्नता आलेली आहे. ग्रीक नाटके व काव्ये नेहरूंनी इंग्रजीतूनच वाचली होती. व्हॉल्टेअर, रूसो वगैरे युरोपीय निबंधकारांच्या ग्रंथांचे वाचन नेहरूंनी इंग्रजीतूनच केलेलं होतं. अरेबिअन् नाइट्स, रॉबिनसन् क्रूसो, डॉन् विझोट् वगैरे कल्पित व रोमांचकारी व अधूनमधून साहस व रहस्यकथाही नेहरू वाचीत असत.

काव्य हा भावनाप्रधान काव्यप्रकार तर नेहरूंच्या विशेष आवडीचा होता. उर्दू काव्याप्रमाणे, युरोपीय काव्याचं व विशेषतः इंग्रजी भाषेतील काव्याचं वाचन हा तर नेहरूंचा विरंगुळा होता. आणि उर्दू, ग्रीक, संस्कृत व इंग्रजी काव्यातील उतारे व संदर्भ हे नेहरूंच्या वाङ्मयांत विपुल प्रमाणात केलेले आढळतात.

भारताचा व जगाचा इतिहास हा नेहरूंच्या विशेष अभ्यासाचा विषय होता. फ्रेंच राज्यक्रांती रोमन साम्राज्याचा विकास व अस्त, चीनमधील राजेशाह्या, इंग्रजांचं साम्राज्य, अरब व इतर मध्यपूर्वेतील राष्ट्रे, रशियातील झारशाही, क्रांती व कम्युनिझमची प्रस्थापना, अमेरिकेचा शोध, स्वातंत्र्यप्राप्ती व आजपर्यंत होत आलेली सर्वांगीण भरभराट इत्यादी जागतिक घडामोडींच्या इतिहासाबरोबरच भारताचा प्राचीन कालापासून तो अद्यावत् कालापर्यंतचा इतिहास यासंबंधीचा नेहरूंचा अभ्यास केवळ दांडगा होता.

प्रवास-वर्णनं, चरित्रं, राजकारण, अर्थशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, विविध कला यांतही नेहरूंच्या वाचनाच्या आवडीने व बुद्धीने अप्रतिहत संचार केलेला आहे आणि याची साक्ष नेहरूंच्या साहित्यात आलेल्या उताऱ्यांवरून व संदर्भावरून सहज पटून येईल. या प्रकरणात काही ग्रंथांचे उल्लेख केलेले

आहेत ते नाममात्र आहेत. नेहरूंच्या समग्र वाङ्मयातून त्यांनी उल्लेखिलेल्या, आधारित व संदर्भ घेतलेल्या ग्रंथांची यादी काढू म्हटले तर तीच किती तरी मोठी होईल. परंतु, तरीही ती अपुरीच राहील. कारण, अशा रीतीनं उल्लेख न केलेल्या परंतु, नेहरूंच्या वाचनात आलेल्या ग्रंथांची संख्या त्या यादीतील ग्रंथांपेक्षाही मोठी असण्याचा संभव आहे. म्हणून नेहरूंच्या वाचनात आलेल्या ग्रंथांच्या विषयांची विविधता व स्वरूप यांच्याशी परिचय व्हावा याच नतूहे प्रत्यक्ष ग्रंथांची नामावली न देता फक्त त्या ग्रंथांतील विषयांचा उल्लेख या लेखात केलेला आहे, ही गोष्ट लक्षात ठेवणं अगत्याचं आहे. फ्रेंच क्रांतीविषयी विवेचनं करताना नेहरूंनी आपल्या "जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" या ग्रंथातील एका पत्रात (पत्रक्रमांक १०१, दिनांक १०–१०–१९३२) लिहून ठेवलं आहे : "फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल लिहिणं मला थोडसं कठीणच वाटत आहे. संदर्भग्रंथांच्या उणीवेमुळे नव्हे, तर त्यांच्या समृद्धतेमुळे." नेहरूंच्या वाचनाचा परिचय करून देताना हीच अडचण आपल्यापुढे उभी राहते. त्यांचं वाचन इतकं समृद्ध होतं की, त्याविषयी लिहिणं कठीण जातं ते त्यांच्या समृद्धतेमुळे व विविधतेमुळेच.

卐 卐 卐

१४

साहित्यिक

अभ्यासू वाचक म्हणून नेहरूंचा परिचय आपण करून घेतल्यावर व त्या वाचनाचा भरीव व उद्‌बोधक उपयोग त्यांनी वाङ्मय-निर्मितीकडे केला आहे ही गोष्ट लक्षात घेतल्यावर "नेहरू राजकारणात पडले नसते तर ?" या प्रश्नाचं "नेहरू महान् व जागतिक कीर्तीचे साहित्यिक झाले असते." असं जे निश्चित व निःसंदिग्ध उत्तर गेल्या प्रकरणात दिलं आहे ते किती योग्य व सार्थ आहे याचं प्रत्यंतर आल्यावाचून राहणार नाही. याचा अर्थ साहित्यिक म्हणून नेहरू भारतात व जगात मान्यता पावलेले नाहीत असा नव्हे. एक थोर लेखक म्हणून आजही त्यांना जगभर कीर्ती मिळाली आहे.

इथं असा एक विचार मनात येतो की, लेखक म्हणून नेहरूंना जी मान्यता मिळाली आहे ती, त्यांच्या राजकीय कर्तृत्वामुळे की त्यांच्या साहित्यातील वाङ्मयीन मुल्यामूळे ? कित्येकदां आपल्याला असं आढळून येतं की, एखाद्या क्षेत्रांत– उदाहरणार्थ नट, नटी, क्रीडापटू–एखादी व्यक्ती मान्यवर झालेली असली आणि त्या व्यक्तीने स्वतः किंवा दुसऱ्याला कथन करून एखादं किंवा अनेक पुस्तकं लिहिली की, त्या साहित्याला खूप प्रसिद्धी मिळते व ते साहित्य लोकप्रिय झालेलं असतं. श्रेष्ठ राजकीय नेता या नात्यानं नेहरूंना जी त्रिखंड कीर्ती लाभली त्यामुळे त्यांच्या साहित्याला लोकप्रियता लाभण्याची शक्यता आहे. तसा प्रकार तर नेहरूंच्या साहित्याच्या बाबतीत झाला असेल का ?

परंतु हा विचार मनात येतो न येतो तोच, नेहरूंच्या जीवनाचा अभ्यास करणाऱ्यांना या विचाराला पुष्टी देण्यासारखा किंवा आधार देण्यासारखा पुरावा आढळत नाही. नेहरूंचं जीवन हे एकसंधी, एकजिनसी किंवा एकमार्गी नव्हतं. त्यांच्या जीवनाला अनेक सुंदर कप्पे होते, पैलू होते. आणि हे सर्व पैलू व कप्पे सांभाळून ठेवण्याची कर्तबगारी व सामर्थ्य त्यांच्यात होतं. जीवनातील ही समृद्धता सांभाळतांना, बहुरंगी जीवन जगताना, एका कप्प्याचा परिणाम किंवा संसर्ग दुसऱ्याला न होऊ देता, त्यांनी ते जीवन यशस्वीपणे व्यतीत केलं होतं. इंद्रधनुष्याला सप्तरंग असलेले दिसत असले तरी त्यांचा उगम एकाच पांढऱ्या रंगातून उत्पन्न झालेला असतो. नेहरूंच्या जीवनालाही ही उपमा यथार्थतेनं लागू पडते. त्यांच्या सर्वस्पर्शी बुद्धिमत्तेतून निर्माण झालेले बहुविध रंग ते इंद्रधनुष्याप्रमाणेच एकमेकांत मिसळू न देता, अलग परंतु जीवनात परस्परांशी संलग्न राहतील अशी दक्षता ते घेत असत आणि म्हणूनच त्यांच्या बहुरंगी जीवनातील बहुविध रंगाचं अलग दर्शन, एकमेकांचा एकमेकांवर परिणाम न होता, होत राहतं. त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा परिणाम त्यांच्या सांस्कृतिक जीवनावर, आणि साहित्यावरही झालेला दिसत नाही तो त्यामुळेच होय. राजकीय जीवनाचा परिणाम त्यांनी आपल्या इतर कर्तृत्वावर कधीही होऊ दिला नाही. John Haynes Holmes यांनी लिहिलेल्या My Gandhi या पुस्तकाता नेहरूंच्या जीवनातील या वैशिष्ट्यासंबंधी एक घटना नमूद केलेली आहे ती या संदर्भात इथं उद्धृत करण्यासारखी आहे. " राष्ट्रीय कार्याकरिता नेहरूंना मिळविताना भारताने जन्म दिलेल्या आजपर्यंतच्या सर्व विद्वान्

सुपुत्रांमध्ये अग्रगण्य ठरू शकेल अशा एका विद्वानाला आपण मुकलो " हे एका श्रेष्ठ भारतीयाचे उद्गार उद्धृत करून त्यासंबंधीचे विवेचन करताना Holmes नी तो प्रसंग वर्णन केलेला आहे. आणि त्यांनाही तो प्रसंग श्रेष्ठ भारतीयानं केलेल्या विधानाला पुष्टी देणारा असल्याची खात्री पटली.

नेहरूंचे मित्र आणि सहकारी अशा प्रतिष्ठित मंडळींसमवेत भोजनाचा कार्यक्रम होता. नेहरू सन्मानयीय प्रमुख पाहुणे असल्यामुळे त्यांचं आसन मध्यभागी होतं. त्यांच्या डाव्या बाजूला होम्स् व उजव्या बाजूस होम्सचे चिरंजीव रॉजर बसले होते. ही संधी साधून होम्सनी, नेहरूंना भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे निर्माण झाल्यामुळे जे हत्याकांड निर्माण झाले व त्याचे पर्यवसान लाखो निर्वासितांचे लोंढे दिल्लीत येण्यात झाले, यांसंबंधी प्रश्न विचारले. परंतु नेहरूंची उत्तरे थोडक्यात व दुर्लक्षपूर्ण अशीच होती. त्या वेळी नेहरूंची मनःस्थिती अशा प्रश्नांना प्रतिकूल होती. नेहरूंची मुद्रा इतकी ओढगस्त व संत्रस्त होती की, ती सहज होम्सच्या लक्षात आली. त्या काळात नेहरू फक्त तीनचार तास झोप घेऊन बाकी वीस तास सतत कार्यमग्न असत. अशा श्रमित व्यक्तीनं होम्सच्या प्रश्नांना सरळ उत्तरं न देणं अगदी साहजिकच होतं. भारताच्या इतिहासातील अत्यंत आणीबाणीच्या आणि कठोर काळी, भारताच्या पंतप्रधानपदाच्या अत्यंत जबाबदारीच्या जागी असलेल्या नेहरूंनी होम्सच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणं क्षम्य होतं व हीच परिस्थिती ओळखून होम्सनी आपले प्रश्न व बडबड थांबविली व ते मुकाट्यानं जेवण घेऊ लागले.

परंतु, नंतर लगेच रॉजरचा नेहरूंशी संभाषण करीत असलेला आवाज होम्सच्या कानी आला. राजरच्या शेजारी बसलेल्या एका प्राध्यापकानी, भारत आणि अमेरिका यामधील तत्त्वप्रणालींच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख Pragmatism व idealism अशा शब्दांत केला होता, व या दोहोंमध्ये समझोता घडून येणं कठीण आहे, असं मत प्रतिपादलं होतं. त्यास अनुसरून रॉजरनं नेहरूंना प्रश्न केला होता : " हे विधान तुम्हांला मान्य आहे ? इथं मध्यबिंदू साधणं अशक्य आहे ? "

हा रॉजरचा प्रश्न ऐकताच तात्काळ नेहरू भानावर आले. रॉजरच्या प्रश्नांना नेहरू उत्तरे देऊ लागले, आणि त्या वादविवादानं उत्तेजित होऊन,

नेहरूंच्या कल्पना शब्दावाटे साकार होऊ लागल्या. भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांच्यापुढे उभे ठाकलेले कठीण प्रश्न, जबाबदाऱ्या आणि चिंता यांमधून मुक्त होण्याची ही संधी नेहरूंनी दवडली नाही, ही गोष्ट उघड होती. बौद्धिक संभाषणासाठी हपापलेल्या आणि अशा संभाषणाची आवड असलेल्या नेहरूंना ही सुवर्णसंधीच वाटली असल्यास आणि मग तत्त्वज्ञानाबद्दल ते बोलत राहिले असल्यास नवल नव्हते. हा प्रसंग वर्णन करून होम्स् एकच निष्कर्ष काढतात : " तो काळ वेगळाच असता तर नेहरू एक श्रेष्ठ विद्वान आणि तत्त्वज्ञानी झाले असते या गोष्टीचा मला क्षणार्धात साक्षात्कार झाला. "

होम्स्ना झालेला हा साक्षात्कार नेहरूचरित्राचा सूक्ष्म आणि सर्वांगीण अभ्यास करणाऱ्यांना झाल्याशिवाय राहणार नाही. वरील प्रसंगामुळे क्वचित् मिळणारी बौद्धिक संभाषणाची संधी नेहरूंना मिळाली व त्यांनी तिचा फायदाही घेतला. नेहरूंचं सारं जीवन राजकारणानं व्यापून टाकलं असल्यामुळं त्यांचं वाचन जरी अखंड परंतु, थोडासा वेळ मिळत असेल तेव्हा किंवा वेळ काढून चालू असलं तरी लेखनाला तसा वेळ मिळणं किंवा मुद्दाम वेळ काढणं अशक्य होतं. दैनंदिन राजकीय जीवनात लेखन करण्याची कधीच न मिळणारी संधी राजकीय झगड्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून त्यांना कारावास घडे त्या वेळीं मिळे व नेहरू त्या संधीचा भरपूर फायदा उठवीत असत. कारावासात अल्पकाळ घेणारा दैनंदिन दिनक्रम वगळल्यास बाकीचा भरपूर वेळ नेहरूंना मिळत असे. आणि वाचन आणि लेखन यात हा सारा वेळ नेहरू बव्हंशी व्यतीत करीत असत. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, क्वचित् प्रसंगी भारतीय व परदेशीय नियतकालिकांसाठी लिहिलेले काही लेख सोडल्यास बाकी सर्व साहित्य नेहरूंनी कारावासात निर्माण केलं आहे.

अर्थातच हे सारं साहित्य नेहरूंनी इंग्रजी भाषेत लिहिलेलं आहे. नेहरूंचं सारंच शिक्षण प्रामुख्यानं इंग्रजी भाषेतच झालेलं होतं. वाचनही इंग्रजी भाषेतच. आणि त्यामुळं त्यांचं साहित्य इंग्रजी भाषेच्या माध्यमातून होणं साहजिकच होतं. फ्रेंच व लॅटिन भाषांशी त्यांचा चांगलाच परिचय होता. संस्कृत, हिंदी व उर्दू या भाषांचाही त्यांचा अभ्यास होता. या सर्व भाषांतील काव्यांनी व इतर गद्य उताऱ्यांनी त्यांचं साहित्य नटलेलं आहे. तरी पण इंग्रजी

भाषेवरील त्यांच्या असामान्य प्रभुत्वामुळं त्यांचं सारं साहित्य इंग्रजी भाषेतच लिहिलं जाणं साहजिकच होतं.

नेहरूंनी लेखनाला सुरुवात केली ती चाळिशी उलटल्यावर ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी व अनुकरणीय आहे. ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या वाङ्मयातील पहिल्या ग्रंथातील (जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप–Glimpses of World History) पहिलं पत्र २६ ऑक्टोबर १९३० साली लिहिलं गेलं आहे. या वेळीं नेहरू ४१ वर्षांचे होते. यापूर्वीच्या चाळीस वर्षांच्या काळांत शालेय व विद्यालयीन अभ्यासविषयक ग्रंथांव्यतिरिक्त इतिहास, राजकारण, चरित्र, विदग्ध वाङ्मय, काव्य विज्ञान इत्यादी अनेक ग्रंथांचं अव्याहत वाचन व अभ्यास करून त्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन केलं होतं. अभ्यासानं भाषेबरोबरच अनेक विषयांचं ज्ञान आत्मसात केलं होतं. मते व विचार परिपक्व बनविले होते. आणि नंतरच त्यांनी प्रत्यक्ष लेखनाला सुरुवात केली होती.

त्यापूर्वी लेखनाचा सराव करण्यासाठी नेहरू क्वचित नियतकालिकांना काँग्रेसचं राजकारण समजावून सांगण्यासाठी मधून मधून पत्रके व लेख लिहीत असत. त्याचप्रमाणे १९२० साली INDEPENDENT या दैनिकात ते अग्रलेख लिहीत असत. या दैनिकाच्या संपादकत्वाची जबाबदारी नेहरूंनी त्या वेळी पत्करली होती. हे अग्रलेख लिहिताना राजकीय आणि वाङ्मयीन विचारांना आणि लेखनशक्तीला खूपच वाव मिळाला. नेहरूंचं हे लेखन मोतीलालजींना खूपच आवडून त्यांना त्यामुळं हार्दिक आनंद झाला. २६ फेब्रुवारी १९२० रोजी लिहिलेल्या एका पत्रात मोतीलालजींनी लिहिलं होतं : " इंडिपेन्डंट्-मधील अग्रलेख अत्युत्कृष्ट होता. त्यातील प्रत्येक शब्दात व वाक्यांत जवाहर प्रतीत होत होता. "

नेहरूंच्या सबंध जीवनाचा व कर्तृत्वाचा अत्यंत मोठा भाग राजकारणानं व्यात झाल्यामुळे त्यांचं बरचंसं साहित्य व भाषणे, राजकारणाच्या अनेकविध अंगांवर विचार व मते प्रकट करण्यासाठी लिहिली व बोललेली असणं साहजिकच होतं. ग्रंथरूपानं प्रसिद्ध झालेल्या " अलीकडील निबंध आणि लेख (Recent Essays and Writings), " भारत कुठं आहे ? "

(WHITHER INDIA,) " भारत आणि जग " (INDIA AND THE WORLD) इत्यादी त्यांच्या ग्रंथांत प्रामुख्यानं राजकारण व नेहरूंचे राजकीय विचार आलेले आहेत. एवढंच नव्हे तर इथं त्यांच्या ज्या ग्रंथांचा विचार व्हावयाचा आहे. त्यांतही राजकारण व राकीय परिस्थिती व विचार ठिकठिकाणी प्रकट झालेले दिसून येतात. याही ग्रंथांना स्फूर्ति व बैठक राजकारणाचीच आहे. आणि म्हणून त्यांतील राजकारण व राजकीय विचार वगळून, केवळ साहित्यिक दृष्टीनं त्यांचं मूल्यमापन करणं ही गोष्ट अत्यंत कठीण आहे. परंतु, नेहरूंचा अनेकविध विषयांचा अभ्यास, समृद्ध जीवन व विशाल आणि बहुरंगी अनुभवविश्व यांचं प्रत्यंतर त्यांच्या ग्रंथात पानापानावर येत असल्यामुळं हे काम थोड्याफार प्रमाणात सुलभ होणारं आहे. अर्थातच, हे काम त्यांच्या ग्रंथांचा सर्वसाधारण परिचय आणि सर्वसामान्य साहित्यिक गुण इतक्यांपुरतंच मर्यादित राहणार आहे.

" जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " (Glimpses of World History) हा पत्रात्मक ग्रंथ जानेवारी १९३४ मध्ये प्रकाशित झाला. या मूळ ग्रंथात ऑक्टोबर १९३० ते ऑगस्ट १९३३ पर्यंत, आपली कन्या इंदिरा—प्रियदर्शिनी—(आता भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी) यांना लिहिलेली मुख्यतः इतिहासविषयक पत्रे संग्रहीत केलेली आहेत. त्या वेळी श्री. इंदिरा गांधी १० वर्षांच्या होत्या. प्रथमतः नेहरूंनी जगाच्या प्रारंभीच्या इतिहासाचा त्रोटक आणि सुलभ भाग वर्णन केलेला होता. त्याचं छोटंसं पुस्तक प्रसिद्ध केलं होतं. ते लोकप्रिय ठरल्यामुळं नेहरूंनी मग अधिक पत्रं लिहिण्यास, कारावासात असल्यामुळं मिळालेल्या फावल्या वेळात, सुरुवात केली. याच सर्व पत्रांचा संग्रह १९३४ मध्ये प्रकाशित झाला. त्यात पुन्हा अधिक व १९३३ नंतर १९३८ पर्यंतच्या काळापर्यंत लिहिलेल्या पुढील पत्रांची भर घालून आज सुविख्यात असलेला ग्रंथ मे १९३९ मध्ये प्रकाशित करण्यात आला.

" जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " हे या ग्रंथाचं नावच इतकं यथार्थ आहे की, त्यातील विषयाचा व विस्ताराचा कुणालाही सहज बोध व्हावा. ही पत्रे लिहिताना नेहरू स्वातंत्र्य-युद्धाचे एक आघाडीचे निष्ठावंत सैनिक होते आणि कारावास हा त्या युद्धाचा एक भाग होता ही गोष्ट लक्षात ठेवली

पाहिजे. कारावासात असतांना इतर अनेक विषयांबरोबरच इतिहासाचा अभ्यास करताना त्यांचं मन ऐतिहासिक भूतकाळात रमत असे. प्रत्यक्ष कार्यविरहित जीवन कारावासात कंठीत असताना इतिहासाच्या वाचनानं त्यांचं मन, इतिहासातील राष्ट्रातील घडामोडी, थोर पुढारी व त्या नेत्यांच्या राष्ट्रपुरुषांच्या आणि सर्वसाधारण जनतेच्या पराक्रमाची, त्यागाची आणि कर्तृत्वाची चित्रे रंगवीत असे व त्या पार्श्वभूमीवर स्व-राष्ट्राच्या ऐतिहासिक कालाबरोबरच त्या काळात घडत असलेल्या नव्या इतिहासाची स्वप्ने पाहात असे. " राष्ट्रांच्या जीवनातील महान कालखंड, महान पुरुष आणि स्त्रिया आणि त्यांनी केलेली महान कृत्ये यांच्या हकीकती इतिहासात वाचतो, आणि कधी कधी आपल्या स्वप्नसृष्टीत आणि दिवास्वप्नांत आपण त्या काळात वावरत आहोत आणि भूतकालातील वीरपुरुष आणि वीरस्त्रिया यांच्याप्रमाणेच वीरश्रीची कृत्ये करीत आहोत अशी कल्पना करतो. " (पत्र : २६–१०–१९३० : वाढदिवसाचे पत्र) कारावासात असताना नेहरूंची मनःस्थिती अशीच झाली होती. ते ऐतिहासिक कालात वावरत होते. आणि साहजिकच त्यामुळं त्यांना " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकण्याची प्रबळ इच्छा झाली. ही पत्रे लिहीत असताना मधूनच नेहरूंचं मन डळमळीत होई. कारण त्यांना जाणीव होती की, " जगाची भूतकालीन कहाणी आणि तीत महान स्त्री-पुरुषांनी केलेली महान कृत्ये ही चित्तवेधक असतात. इतिहासाचा अभ्यास हा योग्य आहे, पण इतिहास घडविण्यास मदत करणं ही त्याहून अत्यंत चित्तवेधक आणि चित्तथरारक गोष्ट आहे. " इतिहास घडविण्याच्या या महान कार्यात कारावासात असताना नेहरूंना प्रत्यक्ष भाग घेता येत नव्हता. परंतु " माझं मन (भारतात) भ्रमण करीत आहे आणि बाहेर चाललेल्या महान झगड्याचे विचार सारखे माझ्या मनात येत असतात. वर्तमान आणि भविष्यकाळ यांनीच माझे सर्वस्व व्यापलं असताना भूतकाळाचे विचार मनात येत नाहीत. पण तरीही असं मला वाटतं. " आणि याच विचारानं प्रेरित होऊन नेहरू इतिहासकालात रममाण झाले. आणि पत्रे लिहीत राहण्याचा उपक्रम चालूच ठेवला. " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकताना इतिहासज्ञाची भूमिका नेहरूंनी घेतली नव्हती. ही पत्रे लिहिताना आपली भूमिका स्पष्ट करताना नेहरू लिहितात : " इतिहास

ही एक मालिका आहे, आणि जगाच्या इतर भागातील घडामोडींची माहिती जर नसेल तर कोणत्याही एका राष्ट्राचा इतिहास समजल्याचा दावा कुणालाच करता येणार नाही." या हेतूनं जगाचा इतिहास समजावून देताना "माझ्या निवडीचा इतिहास मी लिहिणार नाही...परंतु, वेळोवेळी गतकालाचा, त्या कालातील, जगाच्या रंगभूमीवर महान भाग घेणाऱ्या व्यक्तींचा परिचय मी तुला करून देणार आहे."

–आणि याच हेतूनं व पत्करलेल्या भूमिकेवरून "जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" टाकणारी ही पत्रे लिहिली आहेत. जगाच्या प्रारंभीच्या "अस्पष्ट आणि अनिश्चित" कालापासून नेहरूंनी सुरुवात केली. ("वडिलांची कन्येस पत्रे") आणि मग त्या अति प्राचीन काळातून पुढे आल्यावर "इतिहास हळूहळू सुरू झाला आणि जगाच्या अनेक मार्गांत मानवानं आपली आश्चर्यकारक कारकीर्द सुरू केली." अर्थातच "मानवाच्या या, कधी शहाणपणाच्या व बहुतेक वेळी वेडेपणाच्या व मूर्खपणाच्या कारकीर्दींचा मागोवा घेण्याची" कठीण कामगिरी नेहरूंनी या "दृष्टिक्षेपात" पार पाडली.

ही कामगिरी करीत असताना नेहरूंची एक विशिष्ट दृष्टी होती. "गतकालीन घडामोडींशीच, वर्तमानकालात घडत असलेल्या घटनांशी, मी तुलना करतो आणि माझ्या मार्गदर्शनासाठी मी काही तरी धडा शिकण्याचा प्रयत्न करीत असतो." हीच दृष्टी सतत इतिहासावर रोखून नेहरूंनी "जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" टाकलेला आहे. आणि त्यामुळेच इतिहासाच्या अभ्यासानं मानवानं आपल्या बुद्धीच्या जोरावर स्वतःची निश्चित प्रगती करून घेतली असली तरी, आणि रानटीपणाच्या अवस्थेतून प्रगत अवस्थेत मानवाची झालेली प्रगती हे जरी इतिहासाचं मुख्य सूत्र असलं तरी या प्रगत अवस्थेतही, व हजारो वर्षे प्रगतिपथावर असूनही अप्रगत आणि अपूर्ण आहे, ही गोष्ट त्यांनी दृष्टीआड केलेली नाही. मानवजातीतील परस्पर सहकार्याचा अभाव, एकाने दुसऱ्यापासून, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राकडून जबरीनं स्वार्थ साधून घेणं, इत्यादी मानवांतील पाशवी प्रवृत्ती अजूनही टिकून आहेत व या वृत्ती अजूनही थैमान घालीत आहेत, ही परिस्थिती पाहून नेहरूंचं मन संभ्रमित होत असे. इतिहास हा मानवी प्रगतीचा आढावा असला तरी तो अजून पुरा

झालेला नाही; आणि म्हणूनच त्या वेळी जरी भारत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडा करीत असला तरी, व भारत स्वतंत्र झाल्यावर ती गोष्ट आनंददायी असली तरी व्यथा आणि विपत्ती यासाठी पुढे झगडा देणं क्रमप्राप्त ठरणार आहे आणि तेच मानवजातीपुढं ध्येय आहे, हीच नेहरूंची भावना झाली होती.

" जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकताना नेहरूंनी मानवाच्या प्रगतीच्या वैभवाच्या व वीरकृत्यांचा, गौरवशाली कालखंडाच्या इतिहासाबरोबरच हिंस्रतेच्या, अधोगतीच्या आणि काळ्याकुट्ट कालखंडावरही, सारख्याच प्रवृत्तीनं प्रकाश टाकलेला आहे. आणि तो टाकताना आपल्या स्वतःच्या वाटचालीत मार्गदर्शक धडे शिकण्याचा हेतू कधीही दृष्टीआड होऊ दिला नाही. आणि त्यासाठी इतिहासावर दृष्टिक्षेप टाकण्यापूर्वी भूतकालाला प्रारंभ न करता प्रथम वर्तमानकालाचा आढावा घेतलेला आहे. आपण आज कोणत्या परिस्थितीत आहो याची संपूर्ण कल्पना असल्याशिवाय, इतिहासातून मार्गदर्शक धडे घेण्याचा आपला हेतू साध्य होणार नाही याची जाणीव नेहरूंना होती. आणि म्हणून पहिल्या काही पत्रांत त्यांनी जगाच्या वर्तमानकालात भारत कुठं आहे व यापुढं आशिया खंडाला कसं महत्त्व प्राप्त होणार आहे याचं दिग्दर्शन केलेलं आहे. आणि मगच वर्तमानकालाच्या मागे तीन हजार वर्षे जाऊन, जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप टाकण्यास सुरुवात केली. आणि १९३३ सालच्या मध्यावर येऊन आपला दृष्टिक्षेप थांबविला.

वर निर्दिष्ट केलेल्या विशिष्ट हेतूनं नेहरूंनी जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असल्यामुळे इतिहासाच्या इतर ग्रंथांहून या इतिहासविषयक ग्रंथाचं स्वरूप साहजिकच भिन्न आहे. सर्वसाधारण इतिहासात व्यक्तींच्या जीवनातील व घटनांच्या तारखांची जंत्री ऐतिहासिक व्यक्तींची सत्कृत्ये व दुष्कृत्ये, नामावळ्या व वंशावळ्या, वगैरे गोष्टींची नोंद असते. कधी ती इतर ग्रंथांवरून तर कधी संशोधनपूर्वक केलेली नवीन भर असते. इतिहास कसा कसा घडत गेला याचं दिग्दर्शन या सर्वसाधारण इतिहास-ग्रंथात असतं. परंतु, हा इतिहास का घडून आला, इतिहासातील घटना का घडून आल्या, त्यांची कारणे काय होती; इतिहासातील व्यक्ती कशा निर्माण झाल्या, त्या विशिष्ट प्रसंगी तशा का वागल्या, त्यांची भूमिका काय होती, स्वभावधर्म काय होते इत्यादींची

सर्वांगीण व भूलभूत चर्चा नसते; किंवा असली तरी त्रोटक, उथळ व वरवरची असते.

परंतु, " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकताना नेहरूंच्यापुढे विशिष्ट दृष्टिकोन असल्यामुळे इतर इतिहासग्रंथात आढळून येणाऱ्या सर्वसामान्य गोष्टी आलेल्या असल्या तरी त्यांना महत्त्व प्राप्त झालेलं नाही. एवढंच काय पण तारखांचा व सनांचा सुळसुळाट, जागतिक इतिहासाचा, मानवाच्या अगदी प्राथमिक अवस्थेपासून १९३३ पर्यंतचा इतका विशाल कालखंड, असूनही, कोठेही झालेला आढळून येत नाही. किंबहुना या गोष्टीकडे जवळ जवळ संपूर्ण दुर्लक्ष झालेलं आढळून येतं. कालगणनेच्या सर्वसाधारण शतकांचा उल्लेख करून काम भागविलेलं आहे.

" जागतिक इतिहासावरील दृष्टिक्षेप " टाकताना नेहरूंनी फक्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी व व्यक्ती यांच्याच इतिहासावर दृष्टिक्षेप टाकलेला नाही. इतिहास म्हणजे फक्त राजकीय दृष्टिकोन स्वीकारून लिहिलेल्या घडामोडींचा व व्यक्तींचा परिचय किंवा अभ्यास नव्हे, ही गोष्ट नेहरूंना पटली होती; किंबहुना नेहरूंमधील रसिक आणि साहित्यिक प्रवृत्तींना इतिहासाचा हा संकुचित दृष्टिकोन मान्य नव्हता. कोणत्याही राष्ट्राचा किंवा आंतरराष्ट्रीय इतिहास म्हटला म्हणजे राजकारणाबरोबरच संस्कृतीने कला, विज्ञान यांच्याही इतिहासाबरोबरच सर्वच क्षेत्रातील घटना व व्यक्ती यांचाही समावेश त्या इतिहासात व्हावयास पाहिजे हाच विशाल दृष्टिकोन. " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकताना स्वीकारलेला होता. आणि याच दृष्टिकोनातून राजकीय घटना व व्यक्ती याबरोबरच त्यांनी तितक्याच उत्कटतेनं व आत्मीयतेनं मानव-जातीच्या उगमापासून तो अद्यावत कालात जन्मास आलेल्या विविध संस्कृती इतर मानवजातीवर व अस्तित्वात असलेल्या इतर संस्कृतींवर नव्यानं उदयास आलेल्या संस्कृतींचे अनुकूल वा प्रतिकूल परिणाम, व नंतर त्या संस्कृतींचा झालेला विनाश व त्या संस्कृतींच्या उगमांची व विनाशांची कारणे या सर्वांवर प्रकाश टाकलेला आहे. त्यामुळे इतिहासाबरोबरच या विविध व भिन्नभिन्न संस्कृतींशी वाचकांचा चांगलाच परिचय होतो.

संस्कृतींबरोबरच मानवजातीनं विज्ञानाच्या मार्गावर केलेल्या प्रगतीचा सम्यक आढावाही नेहरूंनी घेतलेला आहे आणि तो घेत असताना विज्ञानाच्या प्रगतीनं

मानवजातीवर केलेल्या उपकारांची व त्याबरोबरच या विज्ञानाच्या प्रगतीनं मानवाच्या आत्मिक व सांस्कृतिक जीवनावर झालेल्या प्रतिकूल परिणामांचीही चर्चा केलेली आहे. विज्ञानाच्या व इतर अनेक आनुषंगिक गोष्टींच्या प्रगतीनं मानवी जीवन समृद्ध होत आहे ही गोष्ट मान्य करीत असतानाही, मानवाचं मूळचं रानटी स्वरूप व प्रवृत्ती, स्वार्थ, दारिद्र्य, वसाहतवाद, मानवाकडून मानवाची होणारी पिळणूक, वंश व वर्णभेद अजूनही मूळ धरून आहे व त्याचे भयानक परिणाम हिंसा व युद्ध यांच्या रूपानं अजूनही प्रत्ययास येत आहे या गोष्टीकडे लक्ष वेधण्यास नेहरू विसरत नाहीत.

" जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकताना विविध कला आणि कलाकार यांचाही परामर्श नेहरूंनी सतत घेतला आहे. भारतातील व जगातील, विविध काळात प्रगतिपथावर असलेल्या संगीत, नृत्य, चित्र, नाट्य व काव्य आदि विविध कलोपांगे कोणत्या कालांत विशेषत्वानं उदयास आल्या; त्यांचे ठसे इतरत्र कसे उमटले, त्या त्या विशिष्ट कालखंडातच त्या कला प्रगत का झाल्या यांचीही कारणमीमांसा व विवेचन नेहरूंनी या ग्रंथात केलेलं आहे.

इतिहासलेखनाच्या बाबतीत नेहरूंनी स्वीकारलेल्या या विशाल दृष्टिकोनामुळं " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " हा ग्रंथही तसाच विशाल व सर्वंकष झालेला आहे. सर्वसाधारण इतिहासग्रंथांप्रमाणे हा ग्रंथ रुक्ष, पठिक आणि गतानुगतिक न होता, त्यातील सर्वंकषतेमुळं तो सर्व प्रवृत्तींच्या वाचकांना रुचणारा व मनोरंजकही झालेला आहे. हा ग्रंथ पत्ररूपात असल्यामुळं त्याला एक प्रकारचं कौटुंबिक स्वरूपही आलेलं आहे. ही पत्रे वाचीत असताना या स्वरूपाचं वाचकाला सहज दर्शन होतं. नेहरूंनी ही पत्रं जरी आपल्या कन्येला लिहिलेली असली तरी कित्येकदा या कौटुंबिक स्पर्शामुळं वाचकाला ही पत्रे आपल्यालाच उद्देशून आहेत की काय असा भास होतो. आपल्या भगिनीला लिहिलेल्या एका पत्रात पत्रे कशी असावीत यासंबंधी आपलं मत प्रगट करीत असताना नेहरूंनी लिहिलं होतं : " पत्रलेखनाला एखाद्या कामाचं स्वरूप येता उपयोगी नाही; नाही तर त्यातील माधुर्यच नष्ट होऊन जाईल. " नेहरूंनीही ही पत्रं लिहिताना एक प्राप्त कर्तव्य किंवा कामगिरी हा दृष्टिकोन स्वीकारला नव्हता. कारावासात असताना त्यांचं अखंड वाचन चालत असे व त्या वाचनामुळे

त्यांच्या ज्ञानात सदैव पडत राहिलेली भर, मनात निर्माण होणारे विचार, व प्रतिक्रिया, त्यापासून घ्यावयाचा बोध व धडे, याचा फायदा आपल्या कन्येला मिळावा हा शिक्षणाचा हेतू या पत्रलेखनापाठीमागे खात्रीनं होता. परंतु, ही पत्रे लिहिताना इतिहासज्ञानाची, ज्ञानी माणसाची किंवा शिक्षकाची भूमिका त्यांनी स्वीकारलेली नव्हती. उलट, "तुला शिकविण्याइतकं ज्ञान मला आहे की नाही याविषयी माझी मलाच शंका वाटू लागली आहे." असं त्यांनी प्रारंभीच (नवीन वर्षाचा पहिला दिवस, १९३१) लिहून ठेवलं आहे. परंतु तरीही ही पत्रे लिहिण्याचा त्यांनी निश्चय व क्रम ठेवला होता. आणि त्याचं कारणही त्याच पत्रात ते सांगतात : "ही पत्रे तुला आवडतील की नाही हे मला सांगता येणार नाही. परंतु माझ्या स्वतःच्या समाधानासाठी मी ती लिहिण्याचा निर्णय घेतला आहे. ही पत्रे तुला माझ्या नजीक आणतात आणि त्यामुळे मी जवळजवळ तुझ्याशी बोलत आहे असं मला वाटतं." आणि नेमकी हीच भावना, ही पत्रे वाचीत असताना वाचकाच्या मनाची होते. नेहरू जागतिक इतिहासावर आपल्याशी प्रत्यक्ष बोलत आहेत असाच भास वाचकालाही होतो. या समग्र ग्रंथातील पत्रातून हा कौटुंबिकतेचा स्पर्श वाचकाला जाणवतो. अगदी जवळच्या नात्यातील पत्रलेखक आपल्याशी कौटुंबिक हितगूज करीत आहे, हसतखेळत आहे, क्वचित् अवखळपणानं बोलत आहे आणि हे करीत असताना जागतिक इतिहासाची शिकवण व त्यापासून घ्यावयाचा बोध व धडे, आपल्याला आपल्या पुढील जीवनाला योग्य वळण लागावं म्हणून, देत आहे याचा प्रत्यय हा इतिहासावरील ग्रंथ वाचीत असताना होत राहतो हे या ग्रंथाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य व प्रबळ आकर्षण आहे.

"जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" या ग्रंथाची काही वैशिष्ट्यं वर्णन केल्यानंतर या ग्रंथात असं आहे तरी काय? असा प्रश्न साहजिकच आपल्यापुढं उभा राहतो. परंतु, ते पाहण्यासाठी हा ग्रंथ वाचण्याचीच आवश्यकता आहे व त्याच्या वाचनानंच या प्रश्नाचं उत्तर मिळण्यासारखं आहे. फक्त त्यातील विषयांच्या व निवेदनाच्या दिग्दर्शनानं या प्रश्नाचं उत्तर सापडण्यासारखं नाही. आणि ते सहजासहजी व थोडक्या शब्दात सांगणही अशक्य आहे. इतकी विशाल अशी व्याप्ती या ग्रंथातील माहितीची आहे. यासंबंधी रॉजर बाल्डविन् यांनी नेहरूंना लिहिलेल्या पत्रात (जुन्या पत्रांचा संग्रह) या

ग्रंथाच्या विशालत्वाबद्दल व व्याप्तीबद्दल काढलेले उद्गार सार्थ आहेत. रॉजर बाल्डविन लिहितात : " कारावासातील एकांतात तुम्ही एवढी विशाल व प्रचंड साधनसामुग्री जमविलीत आणि इतक्या यशस्वी रीतीनं त्याचं मंथन कसं केलंत याविषयी मला खरोखरच अचंबा वाटतो. हे कार्य अंगावर घेण्याच्या कल्पनेनंच माझ्या अंगाचा थरकाप होतो— व्यक्तीचं जीवनच व्यापून टाकणारं हे कार्य आहे. " रॉजर बाल्डविनने लिहिलेलं आपलं स्वतःचं हे मत या ग्रंथाला तंतोतंत लागू पडणारं आहे व यावरून या ग्रंथाचं विशालत्व व व्याप्ती याची कोणालाही कल्पना करता येईल.

या ग्रंथात नेहरूंनी जागतिक इतिहासावर फक्त दृष्टिक्षेप टाकला आहे असंच नव्हे तर या जागतिक इतिहासाच्या विशाल पार्श्वभूमीवर आजचा (आजचा म्हणजे स्वातंत्र्यसंग्राम चालू असताना) भारत कुठे आहे याचाही परामर्श घेतला आहे आणि तो घेताना त्या काळच्या व भावी पिढ्यांना कोणत्या मार्गावरून, कोणत्या उद्दिष्टांसाठी प्रयत्न करावयाचा आहे याचंही दिग्दर्शन केलेलं आहे. " शेवटच्या पत्रात " आजच्या काळाचं वर्णन, इतिहासाच्या पार्श्वभूमीवर करताना नेहरू लिहितात : " आजचा काळ निराळा आहे. तो भ्रमनिरास, कुशंका अनिश्चितता आणि प्रश्नांचा आहे. पुष्कळशा प्राचीन श्रद्धा आणि रूढी यांचा स्वीकार आपण करू शकत नाही. आपला त्यांच्यावर विश्वास नाही. म्हणून आजच्या परिस्थितीशी सुसंगत असे नवे मार्ग, सत्याचे नवीन दृष्टिकोन आपण शोधीत आहोत. " अशा स्थितीत : (८-८-१९३३) " आपण सारेच, किंवा निदान विचारवंत तरी आपल्यासमोर उलगडत जाणाऱ्या व वर्तमानकाळात येणाऱ्या व भावी कालाकडे अशा अपेक्षेनं पाहात आहोत. काही आशेनं तर काही भीतीनं त्याची वाट पाहत आहेत. जीवनातील चांगल्या गोष्टी काही मूठभर लोकांसाठी राखीव न राहता, सर्व जनता त्याचा उपभोग घेत आहे असं समृद्ध आणि सौख्यपूर्ण जग आपल्याला दिसणार आहे. की, वर्तमानकालीन प्रगत जीवनातील अनेक साधने भयंकर आणि विनाशक युद्धात लोप पावून, आजच्यापेक्षाही खडतर असं जग आपल्या वाट्याला येणार आहे ? ही दोन टोके आहेत. यांपैकी काहीहि घडो मधला मार्ग टिकून राहण्याची शक्यता नाही असं दिसतं. " तत्कालीन जगाच्या पार्श्वभूमीवरील भारताची ही स्थिती वर्णन करून नेहरू पुढं म्हणतात : " प्रतीक्षा करीत

आणि अवलोकन करीत असतानाच आपल्या आवडीचं जग निर्माण करण्यासाठी आपण कार्य करीत राहिलं पाहिजे..." आज " असा आहे. " उद्या " निर्माण करणं हे तुझं आणि तुझ्या पिढीतील वाढत असणाऱ्या आणि " उद्या "-साठी शिक्षण घेत असणाऱ्या जगातील लाखो तरुण-तरुणींच्यावर अवलंबून आहे. "

जगातील थोर विचारवंतांत– विशेषतः राजकीय विचारवंतांत नेहरूंची गणना होते ही त्यांच्या या विशाल व विस्तृत क्षितिजं असलेल्या व भावी जगाची घडण कशी असावी यासंबंधी त्यांनी प्रकट केलेल्या विचारसरणीमुळेच आणि म्हणूनच " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " या ग्रंथावर आपलं मत प्रकट करताना (जुन्या पत्रांचा संग्रह) कै. डॉ. शामाप्रसाद मुकर्जींनी लिहून ठेवलं आहे : " जागतिक इतिहासाचं तुमचं सूक्ष्मतर विश्लेषण आणि भारतीय स्वातंत्र्य-युद्धाची तुम्ही चितारलेली पार्श्वभूमी यामुळे जगातील प्रथम श्रेणीच्या राजकीय विचारवंतांत तुम्हांला स्थान प्राप्त झालेलं आहे. "

बाल्यदशा आणि शिक्षणाचा काळ संपून नेहरूंच्या प्रत्यक्ष जीवनाला सुरुवात झाली. त्यानंतरच्या त्यांच्या जीवनाची आणि भारतीय स्वातंत्र्य-युद्धाची व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पुनरुत्थानाची परस्परांत इतकी अभेद्य एकात्मता निर्माण झाली की, या दोहोंतून दुसऱ्याची सुटका होणं अशक्य होऊन बसलं होतं. थोडक्यांत नेहरूंच्या जीवनाचा इतिहास म्हणजेच स्वातंत्र्य-युद्धाचा व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळाचा इतिहास होय असं समीकरण होऊन बसलं. आणि या समीकरणाचं प्रत्यक्ष दर्शन नेहरूंच्या " आत्मचरित्रात " दिसून येतं. १९३६ साली नेहरूंचं हे " आत्मचरित्र " प्रसिद्ध झालं. (अमेरिकेत ते नंतर " स्वातंत्र्याकडे " (Towards Freedom या नावानं प्रसिद्ध करण्यात आलं.) जून १९३४ ते फेब्रुवारी १९३५ या आठ महिन्यांच्या कालावधीत नेहरूंनी कारावासात असताना ते लिहिलं. हा ग्रंथ प्रसिद्ध होताच अल्पावधीतच तो जगभर लोकप्रिय झाला आणि आजवर या " आत्मचरित्राच्या " हजारो प्रती विकल्या गेल्या आहेत व अजूनही त्यांना मागणी आहे.

" आत्मचरित्र " लिहिण्यात नेहरूंचा कोणता हेतू होता ? आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत हा हेतू नेहरूंनी स्पष्ट केला आहे :

"तुरुंगातील जीवनाच्या लांबलचक एकांतवासात अत्यंत आवश्यक असणाऱ्या एखाद्या निश्चित कार्याची जरूर असल्यामुळे, मी ही पाने लिहिण्याच्या पाठीमागे, स्वतःला उद्योगात निमग्न ठेवण्याचा मुख्य हेतू होता; त्याबरोबरच भारतातील माझा ज्यांच्याशी संबंध आलेला आहे अशा गतकालीन घटनांचा आढावा घेणे, आणि त्यासंबंधी सुस्पष्ट विचार करणे हाही उद्देश होता. हे कार्य आत्मपरीक्षणाच्या मनःस्थितीत करण्यास मी सुरुवात केली व प्रामुख्यानं, ती शेवटपर्यंत कायम होती."

नेहरूंचं आत्मचरित्र वाचीत असताना नेहरूंनी ते लिहिताना नजरेसमोर ठेवलेला हेतू व त्यांची आत्मपरीक्षणात्मक मनःस्थिती याचा प्रत्यय सतत येत राहतो. आत्मचरित्रात्मक ग्रंथातून सर्वसाधारणपणे लेखकाच्या पूर्वजांची व त्यांच्या वास्तव्याची व जीवनाची हकीकत, लेखकाचा जन्म, बाल्यदशेतील विविध आठवणी, सगेसोयरे, लेखकाच्या मनावर झालेले संस्कार, शिक्षण वगैरेंची तपशीलवार माहिती दिलेली आढळून येते. परंतु, नेहरूंचा हेतू इतर आत्मचरित्र-लेखकांहून भिन्न असल्यामुळं नेहरूंनी जरी ही माहिती दिली असली तरी ती आवश्यक तेवढीच थोडक्यात दिलेली आहे. नेहरूंनी ही सर्व माहिती व तपशील आत्मचरित्राच्या पहिल्या चार प्रकरणांतच आटोपती घेतली आहे. आणि भारतातील त्यांच्याशी संबंध आलेल्या घटनांचा आढावा घेण्याचा जो हेतू नेहरूंनी आत्मचरित्र लिहिताना नजरेसमोर ठेवला होता, त्या हेतूस अनुसरून, भारतातील त्या काळची परकीय राज्यसत्तेखालील परिस्थिती वर्णन करून लगेच सातव्या प्रकरणापासून भारतात घडणाऱ्या घटनांचा आढावा घेण्यास सुरुवात केली. व एखाददुसऱ्या प्रकरणाचा अपवाद सोडल्यास, पुढील सर्व प्रकरणांत त्या घटनांची तपशीलवार वर्णनं, भारतीय इतिहासात त्यामुळे पडलेली भर, त्यांचे खुद्द त्यांच्या स्वतःच्या मनावर व जीवनावर झालेले परिणाम, आणि त्यामुळे त्यांच्या मनात निर्माण झालेले विचारप्रवाह यांचं दिग्दर्शन करण्याचा क्रम शेवटपर्यंत अंगीकारलेला आहे. आणि आत्मचरित्र लिहिण्यामागचा आपला हेतू कधीही दृष्टीआड होऊ दिलेला नाही.

स्वतःचं जीवन आणि भारतीय स्वातंत्र्ययुद्ध या दोहोंमध्ये नेहरूंनी निर्माण केलेल्या एकात्मतेमुळे, त्यांचं जीवन आणि स्वातंत्र्ययुद्ध यामध्ये एक मनोहर

व अभेद्य अद्वैत प्रकट झाल्याची जाणीव हे आत्मचरित्र वाचताना होते. भारतीय स्वातंत्र्ययुद्धात आपल्या जीवनाचा हविर्भाग अर्पण करण्याच्या हेतूनं त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली; त्या जीवनात त्यांना आलेले विविध अनुभव, घडत गेलेल्या घटना, संबंधित व्यक्ती, व त्यांचे स्वभावविशेष, त्या व्यक्ती, घडलेल्या घटना, आलेले अनुभव व या सर्वांमुळे त्यांच्या मनावर व विचारांवर झालेल्या प्रतिक्रिया या सर्व अंतर्बाह्य गोष्टींचं दर्शन या आत्मचरित्राच्या पानोपानी सतत होत राहतं. आणि म्हणूनच नेहरूंच्या जीवनचरित्रावरोबरच भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा रोमांचकारी इतिहास वाचताना वाचक भारावून जातो.

जीवनात घडून आलेले अनुभव व घटना यामुळे "व्यक्तीच्या अंतर्मनात जो झगडा सतत चाललेला असतो तो कोणत्याही चरित्राचा आणि आत्मचरित्राचा महत्त्वाचा घटक असला पाहिजे." असं आपलं चरित्र-ग्रंथविषयक मत नेहरूंनी आपल्या भगिनीला लिहिलेल्या एका पत्रात नमूद केलेलं आहे. कोणत्याही चरित्राचा किंवा आत्मचरित्राचा हा निकष नेहरूंच्या आत्मचरित्राला लावून पाहणं अर्थातच क्रमप्राप्त ठरतं. आणि तो लावून पाहात असताना नेहरूंच्या मनात सतत चाललेला झगडा नेहरूंच्या आत्मचरित्राचा महत्त्वाचा घटक असल्याचं प्रत्यंतरही वाचकाला पदोपदी येत राहातं. बाल्यदशा व प्राथमिक शिक्षण संपून नेहरू इंग्लंडला गेले तेव्हापासून त्यांच्या मनात अनेक विचारांचे संघर्ष सतत चालू होते. इंग्लंडहून परत आल्यावर पत्करलेल्या व पित्यानं ठरवून दिलेल्या व्यवसायात त्यांचं मन रमेना आणि त्यामुळं त्यांच्या मनात निर्माण झालेली वैचारिक वादळं; नंतर राजकारणात उडी घेताना मनात सुरू झालेली विचारांची द्वंद्वे आणि नंतर स्वातंत्र्यसंग्रामात गांधीजींच्या प्रभावाने व मार्गदर्शनाखाली अनेक महत्त्वाची कार्ये करताना त्यांना सतत येत असलेले अनुभव, विविध प्रवृत्तींच्या संबंधित व्यक्ती, स्वतःच्या स्वभावप्रवृत्तींना व विचारांना न पटणाऱ्या घटना व पत्करावयास लागलेले मार्ग, खुद्द गांधीजींच्या विचारप्रणालींशी न जुळणारी नेहरूंची मते व कधी कधी त्या मतांशी पटत नसताही, करावा लागलेला समझोता, इत्यादी अनेक गोष्टींमुळे नेहरूंच्या मनात सदैव वैचारिक झगडे निर्माण होत असत. आपल्या आत्मचरित्रात या सर्व वैचारिक आणि मानसिक संघर्षाचे फक्त दिग्दर्शनच नव्हे तर कारणमीमांसाही नेहरूंनी अत्यंत प्रामाणिकपणानं केलेली आढळते.—

— विचारांचा आणि मतांचा व स्वतःविषयीचाही प्रामाणिकपणा आणि प्रांजळपणा हा नेहरूंच्या आत्मचरित्राचा विशेष आहे. आत्मचारित्र लिहिताना त्यांच्या मनात जे विचार आले, ते त्यांनी अत्यंत प्रांजळपणाने प्रकट केले आहेत. ब्रिटिशांशी भारतीय स्वतंत्र्याकरिता ते लढा देत असले तरीही शिक्षणासाठी ते इंग्लंडमध्ये राहात असताना त्यांच्या मनावर उपकारक असे जे पाश्चिमात्य संस्कार घडून आले त्यांचं ऋण कबूल करावयास ते विसरत नाहीत. भारतीय संस्कृती व भारत राष्ट्र यांच्यावर त्यांचं आत्यंतिक प्रेम व निष्ठा असली तरीही धर्मभोळेपणा, देवाधर्माच्या आवरणाखाली अस्तित्वात असलेल्या व बोकाळलेल्या अंधश्रद्धा व रूढी आणि चालीरीती इत्यादी अनिष्ट प्रवृत्तींबद्दल सडेतोड शब्दांत त्यांनी निर्भर्त्सना केलेली आहे. म. गांधींवर नेहरूंचं अपरंपार प्रेम, अभेद्य भक्ती व आदर असला आणि भारतीय स्वातंत्र्ययुद्धातील सर्वश्रेष्ठ नेता म्हणून त्यांना नेहरूंनी मान्य केलं असलं तरीही त्यांच्या सर्वच मतांशी व मार्गांशी नेहरूंना सहमत होता आलं नाही, ही गोष्टही त्यांनी स्पष्ट शब्दात आपल्या आत्मचरित्रात नमूद करून ठेवलेली आहे. त्याबरोबरच आपल्या संबंध आयुष्याला प्राप्त झालेलं वळण लावण्यात आपले पिताजी, गांधीजी व गु. रवींद्रनाथ टागोर यांचंही ऋण अत्यंत गौरवपूर्ण शब्दांत त्यांनी मान्य केलं आहे. हाच प्रांजळपणा आणि प्रामाणिकपणा स्वतःविषयी लिहितानाही त्यांनी दाखविला आहे. आणि जेव्हा जेव्हा स्वतःविषयी लिहिण्याचा प्रसंग आला तेव्हा तेव्हा त्यांनी आपले गुणदोष प्रांजलपणे प्रकट करून दाखविले आहेत. त्यांच्याविषयीच्या अनेक दंतकथांना त्यांनी स्वतःच सुरुंग लावून उडवून लावल्या आहेत. त्याचप्रमाणे जीवनात ज्या ज्या घटना घडून आल्या त्यामागील हेतूंचं विश्लेषणही त्यांनी केलेलं आहे आणि ते करताना अगदी त्रयस्थ वृत्तीनं व बुद्धिवादी दृष्टिकोनातून केलेलं आहे. स्वतःचं ज्ञान, विद्वत्ता, बौद्धिकता इत्यादीविषयीही त्यांनी ते सखोल नसल्याची कबुली दिलेली आहे. त्यात अनावश्यक नम्रता अगर विनयाचं आवरण त्यांनी घेतलेलं नाही. आपल्याला भारतात जी प्रतिष्ठा व अमाप लोकप्रियता लाभली त्याचं श्रेयही ते स्वतःकडे किंवा स्वतःचे गुण अगर कर्तृत्व याकडे घेत नाहीत. त्यांच्या मतानं त्यांच्या जीवनात तो एक आपघात होता. कधी कधी त्यांना मिळालेली अफाट लोकप्रियता

आपल्या डोक्यात चढल्याचीही आणि केवळ आत्मपरीक्षणामुळेच आपण आपला संयम व तोल राखू शकलो याचीही कबुली त्यांनी दिलेली आहे.

"जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" लिहिताना, त्यातील कौटुंबिक व आत्मीयतेचा भाग वजा केला तर, इतिहासाचं आलोडन करताना त्रयस्थाची आणि अभ्यासकाची भूमिका स्वीकारून अपूर्वग्रह दृष्टीनं विचार करणं, इतिहासातील घटनांकडे व व्यक्तींकडे पाहणं आणि मतप्रदर्शन करणं नेहरूंना भाग पडलं होतं व त्रयस्थाच्या व निरीक्षकाच्या दृष्टीनं त्यांनी तो ग्रंथ लिहिला. परंतु, आत्मचरित्र लिहिताना हे बंधन नेहरूंवर नसल्यामुळे आपल्या बुद्धिमत्तेला, विचारांना व मतांना आपल्या व्यक्तिगत मनःप्रवृत्तींनुसार, अनिर्बंध संचार करण्यास मोकळीक मिळाली होती, आणि त्याचा त्यांनी भरपूर फायदाही घेतला आहे. यामुळे या आत्मचरित्रात एक प्रकारचा मनाचा व विचारांचा मोकळेपणा आढळतो. कोणत्याही, मग त्या स्वचरित्रात किंवा जीवनात व त्याचप्रमाणं भारतात व जगात घडलेल्या घटना, संबंधित व्यक्ती यांच्यावर त्यांनी प्रांजलपणे आणि मनाच्या मोकळेपणाने लिहिलं आहे. "जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" या ग्रंथातील घडलेल्या घटना इतिहासास अनुसरून त्यांनी वर्णन केल्या आहेत. त्याचप्रमाणं घडलेल्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवरच, परंतु, स्वतःच्या त्रयस्थाच्या दृष्टिकोनातून त्यांनी अशोक, चंद्रगुप्त, चाणक्य, पोरस, सिकंदर, चंगीझखान, तैमुरलंग, अकबर, प्लेटो, सॉक्रेटिस, आरिस्टॉटल, हिटलर, गांधी, टिळक, लेनिन, नेपोलियन, वगैरे अनेक राजकारणी पुरुष, तत्त्ववेत्ते, कवी, वगैरेंची शब्दचित्रे रेखाटलेली आहेत. परंतु, ती ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर त्रयस्थाच्या व निरीक्षकाच्या भूमिकेतून. आणि त्यामुळे त्या व्यक्तीचं व्यक्तिदर्शन नीटसपणे झालेलं असलं, तरीही आत्मचरित्रात ज्या घटना त्यांनी वर्णिलेल्या आहेत व विशेषतः जी व्यक्तिदर्शनं घडविली आहेत त्यांत आढळणारी आत्मीयता व जिव्हाळा त्या व्यक्तिचित्रणात दिसून येत नाही. विशेषतः गांधीजी, मोतीलाल नेहरू, कमला नेहरू, वगैरेंच्या व्यक्तिरेखा सजीवपणे उभ्या करण्यात नेहरू अत्यंत यशस्वी झाले आहेत ते त्या आत्मीयतेमुळे जिव्हाळ्यामुळेच. किंबहुना, आत्मचरित्रातील प्रत्येक पानन पान त्या आत्मीयतेनं व जिव्हाळ्यानं ओथंबलेलं आहे.

आत्मचरित्रात प्रांजळपणाला, मनाच्या मोकळेपणाला भरपूर वाव मिळाल्यामुळे आणि आत्मीयता आणि जिव्हाळ्यानं ते लिहिलं गेल्यामुळे विषयांचंही बंधन या आत्मचरित्रात पाळलेलं आढळत नाही. त्यामुळं या आत्मचरित्रात अनेक विषय आलेले आहेत. लिहिण्याच्या ओघात, स्वतःच्या चरित्राचा धागा कायम ठेवून, जेथे जेथे संधी मिळाली तेथे तेथे नेहरूंनी अनेक विषयांवर आपली लेखणी चालविली आहे. स्वतःचं चरित्र, जीवनात आलेले अनेक अनुभव, जीवनात व भारतात आणि त्याचबरोबर जगातही ज्या घटना घडून आल्या, त्यांविषयी त्यांच्या मनात निर्माण झालेल्या प्रतिक्रिया, आप्तस्वकीय, सहकारी व प्रेमाच्या आणि जिव्हाळ्याच्या व्यक्ती, प्रिय आणि अप्रिय असलेल्या व समाजात रूढ झालेल्या गोष्टी, धर्म, संस्कृती, वाङ्मय, पशुपक्षी, कारावासातील जीवन, प्रवास, निसर्गदृश्ये, नाना प्रकारचे व संस्कृतींचे, नागरी तसेच, नागरी संस्कृतीपासून अगदी दूर असलेले लोक, त्या भिन्न संस्कृतींच्या, धर्मांच्या व रूढ चालीरीतींच्या व्यक्तींचं जीवन, विज्ञानातील शोध, त्या शोधांमुळं जीवनावर घडणाऱ्या प्रतिक्रिया, इत्यादी अनेक विषयांवर नेहरूंनी सहज परामर्श घेऊन विवेचन केलेले आढळते.

विविध विषयांप्रमाणेच नेहरूंच्या मानसिक प्रवृत्तीचं आणि भावनांचंही विविध परंतु मनोहर दर्शन त्यांच्या आत्मचरित्रात ठायी ठायी घडून येतं. नेहरूंचं जीवन हे ठराविक चाकोरीत, ठराविक व्यवसायात, ठराविक परिस्थितीत, ठरीव साच्यात बसविलेलं आणि ठराविक परिसरात गेलेलं नव्हतं. जीवनाची सर्वांगीण बहुविधता त्यांच्या जीवनाला लाभलेली होती. ठराविकतेच्या पलीकडील जीवन त्यांनी स्वेच्छेनं पत्करलं होतं. जीवनाची दोन परस्परविरुद्ध टोकं त्यांच्या जीवनात त्यांना अनुभवायला लागली होती. श्रीमंती ऐषआरामाच्या जीवनाला सुरुवात करून, त्याचा, जीवनाच्या पहिल्या कालखंडात त्यांनी अनुभव घेतला होता. त्याबरोबरच श्रीमंती व ऐषआराम यांचा त्याग करून, कष्टाच्या, धावपळीच्या आणि कारावासातील खडतर जीवनाचा स्वीकार करून त्याही जीवनातील अनेक अनुभव त्यांनी घेतले होते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच जीवनातील प्रत्यक्ष अनुभवजन्य बहुविध ज्ञान त्यांनी संपादन केले होते. प्रेम, आत्मीयता, सहकार यांबरोबरच जगाच्या कठोर व्यवहारातील कटू अनुभव त्यांनी घेतले होते. त्यांच्या संस्कारित मनाला रुचणाऱ्या, आवडणाऱ्या घटना

आणि व्यक्ती यांच्याबरोबरच अप्रिय घटना आणि व्यक्ती यांच्याशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध आलेला होता. या विशाल जीवनातील असे बहुविध अनुभव घेत असताना त्यांच्या भावनाक्षम मनात होणाऱ्या प्रतिक्रिया व विविध भावनांचे कल्लोळ त्यांच्या आत्मचरित्रात ठिकठिकाणी वाचायला मिळतात. प्रिय व्यक्तींच्या आठवणीनं त्या भावना प्रेमानं उचंबळून येतात, वियोगानं हेलावतात, कंपित होतात; आदरणीय व्यक्तींचं दर्शन घडविताना त्या भावना नम्र होतात; श्रद्धा-स्थानांपुढं नतमस्तक होतात; निसर्गाच्या मनोहर सान्निध्यात भारावतात, कधी अवखळ बनतात, कधी स्तिमित होतात तर कधी अल्लड बनतात; बहुरंगी व बहुस्वरूपी पशुपक्ष्यांच्या दर्शनानं बहुरंगी होतात; मानवजातीला कलंक ठरणाऱ्या घटनांची स्मृती होताच उफाळून वर येतात, कठोर रौद्र रूप धारण करतात; अन्याय, दास्यत्व, भेदाभेद, स्वार्थ, वगैरे मानवजातीनं धारण केलेल्या स्वरूपा-मुळे चिडून जातात; बंधनातून आणि दबलेल्या अवस्थेतून त्या भावना निसटू पाहतात; आणि पत्करलेल्या मार्गाची जाणीव होताच शांतही होतात. या सर्व परस्परविरुद्ध परंतु, सुसंस्कारित मानवी भावनांचं दर्शन नेहरूंच्या या आत्मचरित्रात सतत घडत राहतं.

स्वतःचं जीवन आणि स्वातंत्र्ययुद्धकाळातील भारत यांमध्ये साधलेली एकात्मता, भारतीय स्वातंत्र्याबरोबरच मानवजातीच्या कल्याणाची ठेवलेली दृष्टी, नेहरूंच्या मनात आलेल्या अनुभवांमुळे निर्माण झालेले मानसिक आणि वैचारिक संघर्ष, प्रामाणिकपणा आणि प्रांजळपणा यांची लाभलेली बैठक, मनाचा मोकळेपणा, विविध विषयांचा त्यांत झालेला अंतर्भाव, भावनांच्या विविधतेचं त्यांत घडणारं दर्शन या प्रमुख कारणांमुळं प्रसिद्ध होताच नेहरूंचं 'आत्मचरित्र' अफाट लोकप्रिय झालं. सर्वसाधारण वाचकांच्या मनांची त्यानं पकड तर घेतलीच; पण साऱ्या जगातील विचारवंत, नेते, राजकारणी पुरुष, साहित्यिक इत्यादी श्रेष्ठ व्यक्तींच्या मनांवरही त्यानं अनुकूल परिणाम केला. मॅडम् चिआंग-कै-शेक हे आत्मचरित्र वाचल्यानंतर नेहरूंना लिहिलेल्या पत्रात लिहितात: "तुमच्या पुस्तकाची तशीच योग्यता असल्यामुळे शांतपणे आणि सावकाश ते पुस्तक मला वाचावयाचे होते....तुमच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या महान युद्धात तुमच्या अंतःकरणांच्या प्रेरणा शांतपणे आणि विचारपूर्वक मनःस्थितीत समजून घेण्याची संधी मला मिळाली आणि आता मी तुम्हांला पूर्णपणे समजू शकले

अशी माझी भावना झाली आहे. तुमचा ग्रंथ– एक महान दस्तऐवज आहे. कारण दैनंदिन संघर्षातील गोंधळामधून, भावविवशतेचा स्पर्श न झालेल्या आणि तरीही हृदयस्पर्शी असणाऱ्या, बौद्धिक आणि भावनिक विश्वात उत्थान पावलेल्या मानवी आत्म्याच्या यात्रेचा हा इतिहास आहे आणि चिरकालीन अशा महान ग्रंथात त्याची गणना होण्याची त्याची योग्यता आहे." (जुन्या पत्रांचा संग्रह.)

" कारावासात लिहिलेल्या इतर पुस्तकांप्रमाणेच आत्यंतिक सखोलता आणि मृदुत्व या दोन, कारावासीय पुस्तकाच्या असलेल्या वैशिष्ट्यांनी ' आत्मचरित्र ' भारलेलं आहे. त्यांतील काही पानं तर डोस्टोव्हस्कीच्या ' मृतांचे घर ' (House of the Dead) या पुस्तकाची आठवण करून देतात. बन्यन्च्या Pilgrims Progress मधील पावित्र्याचा भागही त्यात आहे. या पुस्तकातील मानवतेची भावना...मानवी जीवनातील काव्यमयतेची जाणीव यांमुळे, भावना आणि कल्पना यांची आंतरिक सखोलता यापासून मिळणारी प्रेरणा, राजकीय संधिसाधूपणाची नसून, प्रत्यक्ष कार्याची जननी आहे असं मानण्याऱ्या भावी द्रष्ट्याची माहिती होते. नेहरूंनी जर आत्मचरित्र लिहिलं नसतं तर, भारताचे पंतप्रधान होण्यापूर्वी किती तरी आगोदर जागतिक कीर्तीचे राजकारणी पुरुष म्हणून त्यांना जी प्रतिष्ठा आणि स्थान प्राप्त झालं ते झालं नसतं असं कुणालाही निश्चितपणे म्हणता येईल असं मला वाटतं." मुल्कराज आनंद यांनी " आत्मचरित्रा " संबंधी आपला अभिप्राय लिहून ठेवला आहे. (नेहरूंचा अभ्यास.)

" तत्कालीन भारताशी परिचित होऊ इच्छिणाऱ्यांना अत्यंत आवश्यक ग्रंथ " या शब्दांत नेहरूंच्या " आत्मचरित्रा " ची योग्यता अल्ड्स हक्स्ले यांनी वर्णन केलेली आहे. त्याचप्रमाणे अप्टन् सिंक्लेअर् हे जागतिक कीर्तीचे लेखक लिहितात : " नेहरूंचं आत्मचरित्र मी मोठ्या कौतुकानं आणि सहानुभूतीनं वाचलं. तीव्र कल्पनाशक्ती असलेल्या व्यक्तीला आपल्या कल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी दीर्घायुष्य मिळाल्याचं क्वचितच् आढळतं." (नेहरू अभिनंदन ग्रंथ.)

गु. रवींद्रनाथ टागोर " आत्मचरित्रा "बद्दल आपलं मत व्यक्त करतात : " तुमच्या महान् ग्रंथाचं वाचन नुकतंच संपविलं, आणि त्यानं मी भारावून गेलो आहे आणि तुमच्या यशाचा मला अभिमान वाटतो. त्यातील सर्व

तपशिलांतून, घटनांच्या गुंतावळ्यातून निसटून गेलेल्या मानवतेचा सखोल प्रवाह वाहताना दिसतो; आणि तो, आपल्या कृतींपेक्षा महान असलेल्या आणि तिच्या भोवतालच्या वातावरणापेक्षाही प्रामाणिक असलेल्या व्यक्तीकडे वाचकाला घेऊन जातो." (जुन्या पत्रांचा संग्रह.)

एडवर्ड थॉम्सन् "आत्मचरित्रा" बद्दल लिहिताना आपले विचार प्रकट करतात : "विनय आणि सामर्थ्य यांचं दर्शन या ग्रंथात घडतं, आणि श्रेष्ठ अभिजात स्वभावाचं चित्रण यात आढळतं. "स्वतःचा आत्मा अबाधित राखण्याचा आणि आपल्या सहकाऱ्यांना उद्दिष्ट ठिकाणी जाणाऱ्या मार्गावर ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत राहणाऱ्या सर्व गोष्टींकडे निःपक्षपातीपणाने पाहण्याचा प्रयत्न करीत असणाऱ्या पुरुषाचं दर्शन घडविणारा हा एक आरसा आहे....." हे विचार प्रकट करून, "भयंकर व्यथा भोगल्यानंतरही तो मनुष्य असा उत्कृष्ट दिलदार ग्रंथ लिहू शकतो" याबद्दल ते आश्चर्य व्यक्त करतात.

जिआँ फ्रॉस्ट (JEAN FROST) यांच्यावर "आत्मचरित्र" वाचून झालेली प्रतिक्रिया उल्लेख करण्यासारखी आहे. नेहरूंना लिहिलेल्या अनाहूत विस्तृत पत्रात या प्रतिक्रिया वर्णन करण्यास प्रथमतः त्यांना योग्य शब्दच सुचत नाहीत. परंतु, पत्र लिहिण्याची प्रेरणा त्यांना स्वस्थ राहू देत नाही. विचारार्ह अशा अनेक गोष्टी आत्मचरित्राद्वारे उपलब्ध करून दिल्याबद्दल ते नेहरूंजवळ कृतज्ञता व्यक्त करतात. "आत्मचरित्र" हे पुस्तक त्यांचा अत्यंत आवडीचा ग्रंथ झाला होता. तो वाचून त्यांना स्वतःबद्दल लाज वाटू लागली. कारण, स्वतःच्या जीवनात पदरी पडलेली निराशा आणि भ्रमनिरास यामध्येच ते जीवनात गुरफटून गेले होते. ध्येयहीन जीवनात ते सबंध आयुष्यभर संबंध आलेल्या सर्व वास्तव गोष्टींबद्दल कटू शब्द उच्चारण्यापलीकडे काही करीत नव्हते. सर्व मानवजातीशी त्यांनी आपले संबंध तोडून टाकले होते. त्यांच्या कुटुंबियांना त्यांचं पालनपोषण करावं लागत होतं. परंतु, नेहरूंच्या "आत्मचरित्रा"च्या वाचनानं ही सारी परिस्थिती पालटून टाकली. "आपल्या कल्पना सतत उराशी बाळगून, जीवितमार्गात न घोटाळता त्या प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करीत राहण्याची दृष्टी" त्यांना लाभली. त्यांच्या जीवनात घडून आलेल्या या बदलाबद्दल नेहरूंचे आभार मानताना जिआँ फ्रॉस्ट लिहितात : "जीवन जगण्यासाठी योग्य जगाची

निर्मिती करण्यातील माझा भाग मला उचलावयाचा आहे. दूरवरून अंधारातून, निश्चल, अतिशय निश्चल वारा, पाऊस आणि मानवी दंभांना न जुमानणारी अशी एक दीपज्योत ज्याला दिसली आहे असा एक भयाण प्रदेशातील प्राणी ओरडत आहे, 'आभारी आहे आपला.' हे आभार कदाचित अलंकारिक किंवा योग्य शब्दांत मानले गेले नसतील, पण ते खोल अंतःकरणातून, आलेले असल्यामुळे सार्थ आहेत."

नेहरूंच्या "आत्मचरित्रा"बद्दल यथायोग्य कल्पना यावी म्हणून भारतातील व जगातील थोर विचारवंत, साहित्यिक आणि सामान्य व्यक्ती यांनी व्यक्त केलेल्या अभिप्रायातील काही निवडक अभिप्राय येथे मुद्दाम दिलेले आहेत. राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचे अभिप्राय हेतुपूर्वक देण्यात आलेले नाहीत. कारण, त्यांचे अभिप्राय विविध राजकीय दृष्टिकोनातून दिले गेले असण्याचा वास त्या अभिप्रायांना येण्याचा संभव हेच होय. परंतु, विचारवंत, साहित्यिक आणि सामान्य व्यक्ती यांचे अभिप्राय उत्स्फूर्त व प्रामाणिक असण्यास हरकत नसते म्हणूनच ते येथे दिलेले आहेत.

नेहरूंच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात्मक साहित्यातील "भारताची एकात्मता" (The Unity of India) हा ग्रंथ १९४१ साली प्रसिद्ध झाला. १९३७ ते १९४० या चार वर्षांच्या काळात नेहरूंनी भारतातील व परदेशीय नियतकालिकांतून जे लेख लिहिले त्यांचा संग्रह या ग्रंथात केलेला असून श्री. व्ही. के. कृष्ण मेनन यांनी तो संपादित केलेला आहे. अर्थातच या ग्रंथात विषयाची एकात्मता नसणं साहजिकच आहे. १९३७ साली कारावासातून मुक्तता होऊन पुन्हा १९४० साली कारावासात जाण्यापर्यंतच्या काळातील अनेक तत्कालीन त्याचप्रमाणे सर्वकालीन विषयांचा परामर्श नेहरूंनी लेखाद्वारे आणि वृत्तपत्रीय जाहीर पत्रकाद्वारे घेतल्याचे या ग्रंथात आढळून येतं. त्या काळातील कारावासाबाहेरच्या जगात आपल्या अंगीकृत कार्यात निमग्न असताना प्रवासात, किंवा सभा, चर्चा वगैरे संपवून परत मुक्कामाला आल्यानंतर रात्रीच्या वेळी या लेखांचे लेखन नेहरूंनी केलेलं आहे. तर, काही लेख व पत्रके त्यांनी परदेशातील दौऱ्यावर असताना लिहिलेली आहेत. अर्थातच, या लेखांच्या विषयामध्ये

विविधता आढळून येते. विषयांची ही बहुविधता हे या ग्रंथाचं मुख्य वैशिष्ट्य आहे. भारताच्या तत्कालीन परिस्थितीचं चित्रण व त्यावरील नेहरूंचे विचार या ग्रंथात आढळतात. भारताची एकात्मता, संस्थाने व त्यातील चळवळी, ख्रिश्चन मिशनरींचे भारतातील धार्मिक अस्तित्व व हालचाली, प्रांतिक स्वायत्तता, काँग्रेसच्या चळवळीचा आढावा, या विषयांच्याबरोबर राजकारणाशी संलग्न नसलेल्या विज्ञान, नियोजन, विज्ञानाची प्रगती, या विषयांवरीलही नेहरूंचे विचार या ग्रंथात ग्रथित केलेले आहेत. त्याचबरोबरच भारताचं परराष्ट्रीय धोरण व घटनामंडळ इत्यादी भावी कालातील अंगीकाराव्या लागणाऱ्या, गोष्टींची चर्चाही या ग्रंथात केलेली आहे. शिवाय, नेहरूंनी स्वतः भारतात केलेल्या प्रवासांची वर्णनेही या ग्रंथात आढळतात. स्पेन, झेकोस्लोव्हाकिया वगैरे देशांत घडलेल्या क्रांतिकारक घटनांवरही नेहरूंची सडेतोडपणे व्यक्त केलेली मते, नेहरूंच्या राजकारणात्मक प्रवृत्तींचं व विचारांचं दर्शन सहजपणे करून देतात. भारतातील व परदेशातील राजकारण व त्या राजकारणातील प्रवृत्ती, प्रवास व संस्कृती, विज्ञान, नियोजन इत्यादी विषयांवरील हे लेख अर्थातच नेहरूंना आपल्या मनातील प्रतिक्रिया आणि त्यावरील विचार करण्याची जरूर भासली आणि संधी मिळाली तेव्हाच लिहिले गेले आहेत ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

या सर्व विषयांशी नेहरूंचा प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळे या लेखात एक प्रकारची वास्तवता व आत्मीयता निर्माण झाली आहे. विशेषतः भारतीय राजकारणात नेहरू तनमनाने प्रत्यक्ष भाग घेत असल्यामुळे हे विषय व त्यावरील त्यांनी केलेली चर्चा, व्यक्त केलेली मते व विचार यांमध्ये एकात्मता असलेली दिसून येते. त्रयस्थपणाने आणि प्रेक्षकाच्या भूमिकेवरून लिहिलेल्या लेखात जो अलिप्तपणा किंवा दूरत्व जाणवते, त्याचा अंशही या लेखांतून आढळत नाही. भारतीय राजकारणात नेहरू प्रत्यक्ष भाग घेत असल्यामुळेच भारतात व परदेशात घडणाऱ्या घटना व नवा इतिहास, यांच्यासंबंधीच्या प्रतिक्रिया त्यांच्या मनावर तात्काळ होत असत; त्यांचा अन्वयार्थ, इतिहासाच्या व भवितव्याच्या दृष्टीनं ते लावीत, आणि मगच ते आपले विचार प्रकट करीत. म्हणून या सर्व लेखांत सर्वत्र वास्तवतेचा प्रत्यय येतो. हे विचार प्रकट करीत असताना त्यांना येणारे प्रत्यय, शंका, वाटणारी भीती, त्यांनी दिलेले इशारे, स्वीकारण्यात आलेले मार्ग, उदयास आलेल्या भारतीय व जागतिक अनिष्ट प्रवृत्ती यासंबंधीचे

त्यांचे विचार व मार्गदर्शन, नंतरच्या इतिहासामुळे किती योग्य व वास्तववादी होते याचे प्रत्यंतर, स्वतंत्रपणे कुणी तो काळ व त्यानंतर घडलेला इतिहास यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास सहज येऊ शकेल.

विषयांची व त्यावरील नेहरूंनी व्यक्त केलेल्या मतांची व विचारांची विविधता या ग्रंथात आढळून येत असली तरीही या सर्व विषयांना व त्यांच्या मतांना व विचारांना सतत जोडीत राहणारे सूत्र मात्र एकच आहे. आणि हे सूत्र म्हणजे भारताची स्वातंत्र्याची चळवळ आणि त्या चळवळीपुढील उद्दिष्टं यांचं दर्शन जगाला घडवून आणणं, हेच होय. तत्कालीन भारतीय पार्श्वभूमी चितारताना व ती चितारतांना पत्करावयाचे मार्ग व साधावयाची उद्दिष्टं याविषयी विचार प्रकट करताना आणि मार्गदर्शन करताना हे सूत्र नेहरूंनी सतत संभाळणं साहजिकच होतं. पण त्याबरोबरच, ब्रिटिश साम्राज्यवादाचे, नाझिझम्चे आणि फॅसिझम्चे विवेचन करतानाही व त्यांच्या तत्कालीन व भविष्यकालीन परिणामांविषयी विचार प्रगट करतानाही, हे सूत्र नेहरूंनी दृष्टीआड होऊ दिलं नाही. ब्रिटिश साम्राज्यवादाचे दुष्परिणाम भारत भोगीत होता. त्या भोगांचे दर्शन तर त्यांनी करून दिलंच. त्याबरोबरच नाझिझम् आणि फॅसिझम् यांचेही अनिष्ट परिणाम साऱ्या जगावर होणार आहेत हे दाखवितानाही भारतावरही त्यांची भयंकर छाया पडणार आहे या गोष्टीकडे जगाचं लक्ष वेधलं आहे. म्हणूनच स्पेनमधील यादवी युद्धाचा आणि म्युनिक-कराराचा व त्यात सहभागी होणाऱ्यांचा धिक्कार प्रथम नेहरूंनी केलेला आहे.

"भारताची एकात्मता" हा ग्रंथ मुख्यतः तत्कालीन राजकारणाची चर्चा करणारा असल्यामुळे, त्यातील विषयांचा व आशयाचा थोडा फार परिचय करून देणं येथे क्रमप्राप्त झालं आहे. परंतु, नेहरूंच्या सांस्कृतिक दर्शनाच्या कक्षेत येणारा असाही काही भाग या ग्रंथात आहे. सुरमा खोरे, ब्रह्मपुत्रेच्या प्रवाहानजीकचे खोरे, "सुटका", गरवालला भेट इत्यादी "प्रवास" या नामाभिधानाखालील भागांतील लेखात नेहरूंनी केलेल्या प्रवासांची वर्णने हा या ग्रंथातील भाग त्या दृष्टीनं अत्यंत आकर्षक, वाचनीय व मनोवेधक ठरणारा आहे. हे प्रवास नेहरूंनी विमानातून, आगगाडीतूनच फक्त केलेले नाहीत. विमान, आगगाडी किंवा मोटर जाणं अशक्य आहे अशा उत्तर भारताच्या

अगदी अंतर्भागात पायी केलेला आहे. या प्रवासात नेहरूंना आलेले चित्त-थरारक व मनोवेधक अनुभव, पत्करावे लागणारे धोके, आढळण्यात आलेले लोक व जमाती, त्यांचे संस्कार व चालीरीती, इत्यादींची मनोहर, थरारक व मनोरंजक चित्रे या भागात रेखाटलेली आहेत. या प्रवासात नेहरूंना दिसलेली व अनुभवलेली निसर्गाची रमणीय, उत्तुंग, वेधक आणि मनोहर दृश्येही नेहरूंनी आपल्या समर्थ लेखणीने शब्दस्वरूपात साकार केलेली आहेत, त्याचा परिचय "ऋतुराज" या प्रकरणात करून घेतलेलाच आहे.

नेहरूंचा शेवटला "भारताचा शोध" हा महत्त्वाचा ग्रंथ त्यांनी आपल्या अहमदनगर किल्ल्यातील शेवटल्या दीर्घकालीन कारावासात असताना, एप्रिल ते सप्टेंबर १९४४ या पाच महिन्यांच्या कालावधीत लिहिला. प्रत्यक्ष लेखनकाल जरी पाच महिन्यांचा असला तरी त्याची साधनं व माहिती जमविण्याची क्रिया त्यापूर्वी किती तरी वर्षे चालली असली पाहिजे याचं प्रत्यंतर ग्रंथ वाचताना जागोजागी येतं. वेदकालापासून तो १९४४ सालापर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडातील अनेक विषयांचा परामर्श व परिचय या ग्रंथात करून देत असताना नेहरूंनी वाचलेले ग्रंथ व ती माहिती मिळविताना घेतलेले परिश्रम याचीही साक्ष पानो-पानी येते. "भारताचा शोध" हा एका विशिष्ट कालखंडापुरता मर्यादित नाही. त्याचप्रमाणे त्यातील विषयही ठराविक नाहीत. भारतात वेदकालापासून तो १९४४ पर्यंत ज्या ज्या भिन्नभिन्न संस्कृती उदयास आल्या; नवीन संस्कृतींचे तत्कालीन संस्कृतीवर झालेले आघात; त्या आघातातून विनिमयाच्या पद्धतीतून निर्माण झालेली नवी संस्कृती आणि अशा रीतीने सतत प्रवाहित आणि संघटित होत जाणाऱ्या भारतीय संस्कृतीचा परामर्श नेहरूंनी या ग्रंथात घेतला आहे. वेदकालापासून तो १९४४ सालापर्यंतच्या प्रचंड कालखंडात घडलेल्या इतिहासाचं दर्शनही नेहरूंनी लिहिलेल्या या ग्रंथात दिसून येतं. सतत बदलत जाणारी संस्कृती आणि पालटत जाणारा इतिहास यामुळे निरनिराळ्या काल-खंडांत अस्तित्वात असलेल्या व्यक्तींचा आणि त्याचबरोबर सामाजिक जीवना-चाही परिचय या ग्रंथावरून वाचकाला होतो. वेदकाली अस्तित्वात असलेला धर्म, त्यानंतर भारतात येणाऱ्या जमाती व आक्रमणं यामुळे मूळच्या धर्मात आणि धर्मांतर्गत चालिरीती व रूढी यात सतत पडत गेलेले फरक आणि भारतात आज अस्तित्वात आलेले विविध धर्मपंथ व त्यामुळे भारताचं आज बनलेलं

सर्वधर्मीय स्वरूप याचाही आढावा नेहरूंनी या ग्रंथात घेतलेला आढळतो. संस्कृती, धर्म, इतिहास यांच्या सततच्या संघर्षातून भारतीय जनतेनं काढलेले व पत्करलेले मार्ग, व्यक्तीच्या व समाजजीवनाला मिळालेली व शोधून काढलेली ध्येये, तत्त्वे व ती साध्य करण्यासाठी त्यांनी घेतलेले श्रम, भोगलेले सुख-दुःखांचे भोग, पराक्रमाची व त्याबरोबरच अंतर्गत दुहीची राष्ट्र, समाज आणि व्यक्ती यांचं अनहित करणारी दुष्कृत्ये व या सर्वांमधून भारतीय व्यक्तीची व समाजजीवनाची झालेली हानी, अपयश, अनहित आणि लाभलेलं यश, कीर्ती, सर्वश्रेष्ठ जीवन आणि त्या मधून उगम पावलेली तत्त्वज्ञाने यांचीही माहिती या ग्रंथात मिळते. त्या प्रचंड कालखंडातील विविध लहान व वैशिष्ट्यपूर्ण कालखंडात निर्माण झालेले कवी, नाटककार, तत्त्वज्ञानी, संगीतज्ज्ञ, शिल्पकार इत्यादी कलावंत आणि त्यांनी वेळोवेळी तत्त्वज्ञानात, साहित्यात आणि विविध कलांत घातलेली मोलाची भर यांचाही समावेश नेहरूंनी केला आहे. विविध काल-खंडात अस्तित्वात असलेल्या अर्थव्यवस्था, राजकीय प्रवृत्ती राज्यकर्त्यांनी घालून दिलेल्या कार्यपद्धती आणि त्यांचे व्यक्तीवर आणि समाजजीवनावर झालेले सुपरिणाम किंवा दुष्परिणाम यांचीही चर्चा या ग्रंथात केलेली आहे. तात्पर्य, " भारताचा शोध " घेताना नेहरूंनी हा शोध, विषयांना मर्यादा न घालता तो, सर्वांगपरिपूर्ण व्हावा यासाठी परिश्रम घेतलेले आहेत.

" वर्तमानकालाच्या संदर्भात भूतकाळाचा शोध घेण्यासाठी " नेहरूंनी " जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप " टाकला होता. (भारताचा शोध; I–v.). " भारताचा शोध " घेण्याची स्फूर्ती नेहरूंना कशी झाली याची पार्श्वभूमी सांगताना नेहरू लिहितात : " मला मिळालेला वारसा कोणता ? मी कोणत्या गोष्टींचा वारस आहे ? हजारो वर्षांच्या कालावधीत मानवानं संपादन केलेलं सारं काही, तिनं विचार केलेल्या, अनुभविलेल्या, उपभोगिलेल्या आणि सुख पावलेल्या, तिचे जयघोष आणि अपयशातून निर्माण झालेले कटू मनःस्ताप, अतिपूर्वकालापासून आजपर्यंत सतत घडत येत असलेली व आपल्याला स्फूर्ती देणारी मानवाची आश्चर्यकारक धडाडी. इतर सर्व सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणे, या आणि इतरही खूप गोष्टींचा वारसा मला मिळालेला आहे. परंतु, भारतवासीयांना मिळालेला वारसा विशेष आहे.... आपल्या रक्तामांसात आणि हाडात भिनलेला, ज्यानं आपल्याला आजपर्यंत आपण आहोत तसं घडवलं आणि पुढेही घडणार

आहे असा एक विशिष्ट वारसा आपल्याला लाभला आहे. हा विशिष्ट वारसा आणि आजच्या काळात त्याची करावयाची योजना याचा विचार बराच काल माझ्या मनात घोळत आहे, आणि त्यासंबंधीच लिहिण्याची, माझी इच्छा आहे; त्या विषयांतील अडचणींची व गुंतागुंतीची मला जाणीव असल्यामुळे मी त्याच्या पृष्ठभागालाच फक्त स्पर्श करणार आहे." (I–vi)

जागतिक इतिहास आणि भारताचा इतिहास यांचा अभ्यास करताना, भारतीय परंपरेच्या इतिहासातील या वैशिष्ट्यांची जाणीव नेहरूंना झाली असली पाहिजे ही गोष्ट वरील अवतरणावरून सहज लक्षात येते. आणि ही जाणीव झाल्यावर ते वैशिष्ट्य नक्की कोणतं आहे यासंबंधीचे विचार दीर्घकाल त्यांच्या मनात घोळत राहिले होते. परंतु, हे विचार घोळत असले तरी ते वैशिष्ट्य हुडकून काढून लेखनातून प्रकट करावयास लागणारं स्वास्थ्य, सतत कराव्या लागणाऱ्या राजकीय कार्यामुळं, त्यांना मिळत नव्हतं. ते स्वास्थ्य त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यातील शेवटच्या दीर्घकालीन कारावासात मिळालं. काही तरी उपयुक्त असं कार्य करीत राहण्याची नेहरूंची प्रवृत्ती होती. " कार्याची स्फूर्ती माझ्यात दीर्घकाल वास करीत आलेली आहे; विचारांशी फारकत झालेलं कार्य नव्हे तर विचारांमधून उगम पावलेले एकसंध क्रम असलेले कार्य." (I-iv.) कारावासातील नेहरूंच्या सततच्या क्रियाशील जीवनाचा परिचय आपण मागे करून घेतला असल्यामुळे अहमदनगर येथील दीर्घकालीन कारावासाचा उपयोग, त्यांच्या मनात सतत घोळणाऱ्या विचाराचा प्रत्यक्ष लेखनात उपयोग करण्यासाठी त्यांनी " भारताचा शोध " हा ग्रंथ लिहिण्याचं कार्य पत्करलं यात आश्चर्य वाटणार नाही.

" भारताचा शोध " घेण्याचं प्रचंड काम पत्करून नेहरूंनी पाच महिन्यांच्या कालावधीत हा ग्रंथ पुरा केला. वेदकालापासून तो १९४४ पर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडातील धडामोडींचा व इतिहासाचा, वर दिलेल्या विषयांच्या अनुरोधानं, आढावा घेतला. आणि हा सांगोपांग — दीर्घ आढावा घेतल्यानंतर त्यांनी स्वतःलाच प्रश्न विचारला : " भारताचा शोध—मी काय शोध लावले ? " आणि प्रश्न उपस्थित केल्यानंतर एवढा ग्रंथ लिहूनही त्यांना त्याच्या अपुरेपणाची जाणीव होऊनच की काय, ते नम्रपणानं व विनयानं म्हणतात : " भारतावरील

आवरण दूर करून आज तो कसा आहे व दीर्घ भूतकालात तो कसा होता, हे मी शोधू शकलो अशी कल्पना करून घेणं धाडसाचं आहे." आणि मग त्यांनी निष्कर्ष काढला की चाळीस कोटी लोकसंख्या असलेला भारत, त्यात जरी अनेक भेद, जाती, विचार व पंथ असले आणि एकीपासून दुसरी व्यक्ती भिन्न असली तरीही, त्यांना पूर्वी आणि आताही एकत्र सांधणारं असं काही तरी आहे, भारत हा भौगोलिक आणि आर्थिक दृष्टीने एक आहे, विविधतेत सांस्कृतिक एकात्मता आहे. अनेक विसंगतींचा गट्ठा सामर्थ्यवान् परंतु अदृश्य अशा धाग्यांनी एकत्र बांधून ठेवलेला आहे. पुनः पुन्हा दडपून टाकला गेला असला तरी त्याची चित्‌शक्ती कुणीच जिंकू शकलं नाही, आणि आज गर्विष्ठ विजेत्याचं तो जरी खेळणं होऊन बसला असला तरीही तो अ-वश आणि अजिंक्य आहे." "भारताचा शोध" घेतल्यानंतर भारतासंबंधीचा एक महान शोध नेहरूंनी घेतला तो हाच की, भारत हा अजिंक्य आहे आणि परकीयांनी आक्रमाणे करून काही काल त्यावर अधिसत्ता गाजविली असली तरी स्वतंत्र होण्याची व राहण्याची त्याची चित्‌शक्ती अजिंक्य आहे, अमर आहे.

आणि याच महान शोधामुळेच १९४५ साली भारत स्वतंत्र झाला ही गोष्ट नाकारता येणार नाही.

परंतु, हा दुर्दम्य आशावाद भारतनिष्ठेमुळे व भारतप्रेमामुळे नेहरूंनी भारताबद्दल व्यक्त केला ही गोष्ट निःसंशय खरी असली तरी हाच दुर्दम्य आशावाद त्यांनी सबंध मानवजातीबद्दल बाळगला होता. आणि तो त्यांच्या साहित्याचा आशय व त्या आशयातील मध्यबिंदू होता, याची साक्ष त्यांच्या साहित्यात पानोपानी येते. आणि या दृष्टीनं त्यांची साहित्यसंपदा, या चार ग्रंथांपुरती मर्यादित असली तरीही, अपूर्व आणि बहुमोल आहे. जी गोष्ट भारताची आहे— अनेक आक्रमणे राजकीय, सामाजिक, आर्थिक– झाली तरीही भारताची चित्‌शक्ती–अस्मिता अजिंक्य राहिली आहे, तीच गोष्ट साऱ्या मानवजातीची आहे असं त्यांचं स्पष्ट मत होतं. मानवजातीतही आजपर्यंत सैतानी मानवानं अनेक भेद पाडले, स्वामित्व गाजवलं, जुलूम केले तरीही मानवाची चित्‌शक्ती आणि अस्मिता युगानुयुगे टिकून आहे, जिवंत आहे व त्याच चित्‌शक्तीवर आणि अस्मितेवर जगाचं भवितव्य घडणार आहे यावर

त्यांचा विश्वास होता. "भारताचा शोध" या ग्रंथात मानवाच्या अस्मितेवरचा हा विश्वास विशेष प्रकर्षानं व उत्कटतेनं प्रकट करताना नेहरू लिहितात: "मानवाची ही चित्शक्ती किती आश्चर्यकारी आहे! असंख्य दोषांनी युक्त असूनही, मानव, युगानुयुगे, ध्येयासाठी, सत्यासाठी, श्रद्धेसाठी, राष्ट्र आणि प्रतिष्ठेसाठी प्रिय असलेल्या सर्वस्वाचा आणि स्वतःच्या प्राणांचाही त्याग करीत आला आहे. ते ध्येय बदलले असेल, पण आत्मयज्ञाचं सामर्थ्य टिकून आहे, आणि त्यामुळेच, त्यांच्याकडून घडलेल्या अनेक प्रमादांबद्दल त्याला क्षमा करावयास पाहिजे, आणि त्याच्याबद्दल निराश होणं अशक्य होऊन जातं. सर्वनाशामध्येही, त्यानं आपल्या प्रतिष्ठेचा किंवा मनात बाळगून असलेल्या श्रद्धामूल्यांचा त्याग केलेला नाही. निसर्गाच्या सामर्थ्यशाली शक्तींचं खेळणं असलेल्या, अगाध विश्वात धूलीकणापेक्षाही कमी महत्त्व असलेल्या, मानवानं पंचमहाभूतांनाही आव्हान दिलं, आणि क्रांतीचं जन्मस्थान असलेल्या त्याच्या मनानं त्यांना आपल्या स्वामित्वाखाली आणण्याचा प्रयत्न केला. देवांचं अस्तित्व कशाही स्वरूपात असो, परंतु, मानवात देवत्वासारखं काही तरी खास आहे, तसंच त्याच्यात सैतानाचेही काही तरी दुर्गुण आहेत." (I–vi)

मानवजातीवरचा हा विश्वास आणि म्हणूनच मानवजातीबद्दलच्या भवितव्याबद्दलचा दुर्दम्य आशावाद त्यांच्या साहित्यात व त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या भाषणसंग्रहांत सतत आढळत असतो. कधी तो "आत्मचरित्रा"तील स्व-गुंजन करताना आढळतो, कधी तो "जागतिक इतिहासावर दृष्टिक्षेप" टाकताना इतिहासाची साक्ष देतांना प्रकट होतो तर "भारताचा शोध" मधे प्रत्यक्ष शब्दरूपानं साकार होतो आणि भाषणात गंभीर, स्थिर, भावनापूर्ण स्वरात शब्दोच्चारित होतो. मानवात सैतानाचे दुर्गुण असले तरी त्या दुर्गुणांवरही मानवातील देवत्व विजय मिळवील, भावी कालांत मानव जास्त जास्त सुखी व समृद्ध होईल अशी नेहरूंना आशा वाटते ती मानवजातीवरील त्यांच्या विश्वासामुळेच – मानवातही देवत्व आहे व शेवटी या देवत्वाचाच विजय होणार या खात्रीमुळेच! कारण जगाच्या इतिहासाची ती साक्ष आहे, शिकवण आहे.

—आणि म्हणूनच विज्ञानाची प्रगती आश्चर्यजनक प्रकारे झालेली असली तरी त्यांना त्याची भयंकर भीती वाटत नाही. त्यांच्या साहित्यात व वक्तव्यात

विज्ञानानं केलेल्या आश्चर्यकारक प्रगतीबद्दल समाधानाचे उद्गार निघतात. पंच-महाभूतांवर विजय मिळवून त्यांना आपल्या मनाप्रमाणे राबवून घेण्याचं सामर्थ्य मानवाला प्राप्त झालेलं आहे याबद्दल ते गौरव करतात. " साबणाच्या फुग्या-सारख्या विश्वावरील आपण धूलीकण असूं दे, पण त्या धूलिकणात मानवाचं मन आणि चित्शक्ती आहे. युगानुयुगे ती वाढत आहे आणि स्वतःला तिनं या पृथ्वीचं अधिपती बनविलं आहे आणि तिच्या अंतर्गाभ्यातून आणि त्याबरोबरच आकाशातील विद्युल्लतेमधून शक्ती संपादन केली आहे. तिनं या विश्वाच्या अंतरंगातील गुपिते शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे आणि निसर्गाच्या लहरींना आपल्या कामास जुंपलं आहे. पृथ्वीपेक्षा आणि स्वर्गापेक्षाही माणसाचं मन आणि चित्शक्ती आश्चर्यजनक आहे आणि ती जास्त सामर्थ्यवान होत असून, पादाक्रांत करण्यासाठी नवी विश्वे शोधीत आहे. " (भारताची एकात्मता, पा. १८०) मानवानं विज्ञानात केलेल्या आश्चर्यकारक प्रगतीबद्दल नेहरूंचे हे उद्गार सार्थ व योग्य खासच आहेत.

परंतु, मानवजातीमध्ये देवत्व आणि सैतानी प्रवृत्ती असतात याची त्यांना जाणीव आहे त्याप्रमाणे, विज्ञानाच्या प्रगतीतील उपकारक व विध्वंसक उपयोगांची शक्तीही ते विचारात घेतात. कोणत्याही राष्ट्राची प्रगती त्या राष्ट्रातील वैज्ञानिक प्रगतीवर अवलंबून आहे, यावर नेहरूंचा कटाक्ष होता. एवढंच नव्हे तर, जगातील यच्चयावत् जीवन शास्त्रे आणि विज्ञान यानं इतकं व्यापून गेलं आहे की, त्यांच्याशिवाय आधुनिक जग टिकून राहणार नाही. (भारताची एकात्मता : पान १७६) शास्त्रांची आणि विज्ञानाची प्रगती याची मानवी जीवितात केवढी आवश्यकता आहे हे नेहरू प्रतिपादन करतानाही शास्त्रे आणि विज्ञान यामुळे मानवाच्या हातात प्रचंड शक्ती प्राप्त झालेली आहे, तिचा सुदुपयोग व्हावा यासाठी मानवाच्या नैतिक शक्तीचीही प्रगती व्हावयास पाहिजे हे बजावण्यास ते विसरत नाहीत. " मानसिक अधोगती किंवा मानसिक ऱ्हास यांनी जगाला ग्रासून टाकलं तर प्रगती आणि संस्कृती यांच्या मुळांतच काही तरी चुकत आहे. " (भाषणे, १९४९–५३. पा. ३४३–४४). असा इषारा त्यांनी युनेस्कोच्या २०-१२-१९५१ च्या परिसंवादाच्या वेळी केलेल्या भाषणात देऊन ठेवलेला आहे. आजचं जग शास्त्रे आणि विज्ञान यांमध्ये कितीही प्रगत झालं असलं तरी " आधुनिक जग, ज्याला मानसिक जीवन म्हणता येईल त्याच्याशी

सुसंगत नाही" असं त्यांचं स्पष्ट मत होतं. "प्रगती ही मानवी मनाचं फळ आहे आणि तरी, आश्चर्याची गोष्ट अशी की, आधुनिक जगात मानवी मनाची महत्तता कमी कमी होत चाललेली आहे... आणि हे जर खरं असेल तर, खात्रीनं जगाचं भवितव्य नीट दिसत नाही, कारण जी प्रगतावस्था आज दिसत आहे, पदापदानं मानव आज उभ्या असलेल्या उच्च स्थानावर मानव चढला आहे, आणि आज उभा आहे त्याचा पायाच ढासळत चालला आहे." असेही उद्गार त्यांनी काढले होते.

आणि त्यावर उपाय म्हणून मानवजातीला त्यांनी मार्गही सुचविला आहे. "जीवनात, निसर्गात आणि विश्वात काही तरी एकात्मता शोधण्याची मानवी मनाची धडपड चाललेली दिसून येते. तीच त्याची इच्छा, साधार असो की नसो, मानवी मनाची महत्त्वाची गरज भागविण्यास समर्थ असली पाहिजे. पूर्वकालीन तत्त्वज्ञानी याचाच शोध घेत होते आणि आजचे शास्त्रज्ञही त्याच इच्छेनं भारावून गेलेले आहेत. आपल्या सर्व योजना आणि योजनाबद्धता, आपल्या शैक्षणिक आणि सामाजिक आणि राजकीय संघटनेच्या पाठीमागे एकात्मता आणि सुसंगती यांचा शोध घेण्याचा उद्देश असला पाहिजे... हीच श्रद्धा आणि एकात्मतेचा शोध यामुळेच जीवनात सुसंगती, समतोलपणा आणि समृद्धी पूर्वी भारत, ग्रीस आणि इतरत्र निर्माण झाली आहे.

नेहरूंचं समग्र साहित्य आणि भाषणं यांच्यातील हाच एक आशय आहे. मानवावरील व त्याच्यातील देवत्वावरील विश्वास, त्याच्या भवितव्याबद्दल दुर्दम्य आशावाद, आणि आजच्या विज्ञानयुगातही मानवाला आवश्यक असणारं सुसंस्कृत मन, याच विचारसूत्रांत नेहरूंचं सारं साहित्य व भाषणे गोवलेली आढळतात. हे सूत्र सर्व मानवजातीला उद्देशून व म्हणून सर्वंकष आणि विशाल आणि वैश्विक कल्याणाचे आहे याची साक्ष त्यांचं साहित्य सतत देत राहील.

या विशाल आशयाला जगभर म्हणजेच सर्व मानवजातीपर्यंत प्रसार व प्रसिद्धी मिळावी म्हणून नेहरूंचे ग्रंथ व भाषणं यासाठी नेहरूंनी इंग्रजी भाषेचं माध्यम स्वीकारलेलं असावं. त्यांच्या ग्रंथांची व भाषणांची सर्व जगभर अनेक भाषांतरं झालेली आहेत ती त्यांनी स्वीकारलेल्या इंग्रजी भाषेच्या माध्यमामुळेच असं म्हणावयास हरकत नाही. शिवाय, इंग्रजी भाषेवर त्यांचं असाधारण प्रभुत्व होतं.

जगातील हाताच्या बोटावर मोजता येतील अशा इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तींमध्ये नेहरूंची गणना करण्यात येते. इंग्रजी मातृभाषा व तिचा अभ्यास असणारे साहित्यिक किंवा इतर व्यक्ती नेहरूंइतकी सौंदर्यपूर्ण व शैलीदार इंग्रजी भाषा लिहू शकणार नाहीत अशा अर्थाचे गौरवपूर्ण उद्गार काढले गेले आहेत, ते नेहरूंच्या सफाईदार, सौंदर्ययुक्त व शैलीदार इंग्रजी भाषेमुळेच होय. आणि हे गौरवपूर्ण उद्गार किती सार्थ आहेत याचं प्रत्यंतर त्यांच्या साहित्यात पानोपानी येतं.

आपल्या साहित्यात व भाषणांतून नेहरूंनी इंग्रजी भाषेला जो साज चढविला आहे त्याला सर्कशीतील आपल्या शरीरावर प्रभुत्व असलेल्या एखाद्या स्त्री-कसरतपटूचीच उपमा देता येईल. ही स्त्री आपल्या शरीराला वाटेल तशी वाकवते, विविध आकार देते त्याप्रमाणे नेहरूंनी इंग्रजी भाषेला आशयाच्या भावनेनुसार वाकविली आहे व आकार दिला आहे की, कसरतपटू स्त्रीचे प्रयोग पाहून प्रेक्षकाच्या मुखातून 'वा!' असा उद्गार निघावा त्याप्रमाणेच नेहरूंचा भाषाविलास आणि वाग्विलास वाचून–ऐकून कोणाच्याही मुखातून निघतील. नेहरूंच्या भावनाशील मनावर परिणाम करणाऱ्या घटना वर्णन करीत असताना ती भाषा भावानुकूल बनते; मनातील प्रक्षोभ प्रकट करीत असताना प्रक्षोभकारक होते; नर्म विनोद करताना अवखळ बनते. उपहासाच्या वेळी टोकदार होते; त्रयस्थाचा दृष्टिकोन स्वीकारताना तटस्थवृत्ती धारण करते; निसर्गलहरीबरोबर खेळकर, व मनोहर वृत्ती धारण करते; शोककारक प्रसंगी हृदयस्पर्शी होते; गंभीर प्रसंगी गांभीर्य धारण करते; आदर आणि प्रेम व्यक्त करताना नम्र व प्रेमळ बनते.

नेहरूंचं हे फक्त सांस्कृतिक दर्शनच असल्यामुळे त्यांच्या साहित्यातील व भाषणातील त्यांच्या भाषेचं हे विविध दर्शन करून देताना काही उतारे देण्याचा होणारा मोह आवरता घेतलाच पाहिजे. कारण असे उतारे देण्याचा मुळातच संकल्प नाही, आणि थोडक्यात समाधान वाचकांनी मानावं असा उद्देशही नाही. नेहरूंच्या साहित्यांतून आणि भाषणातून त्यांचं मनमुराद प्रत्यंतर कोणालाही सहज मिळू शकेल.

लालित्य आणि काव्यात्मकता हे नेहरूंच्या साहित्यातील आणखी उल्लेखनीय गुणविशेष आहेत. एखाद्या नर्तकीने अगदी सहजतेनं आणि लीलया

पदन्यास करावा त्याप्रमाणे आशयाला साजेसा वेष ते भाषेला देतात. आणि त्यामुळे आशय आणि अभिव्यक्ती यामध्ये एकात्मता व सुसंगती सहजतेने निर्माण होते. नेहरूंच्या लालित्यपूर्ण भाषाविलासात सहजता व लालित्य निर्माण होतं ते या एकात्मता आणि सुसंगती यामुळेच. आणि या लालित्याचं काव्यात्मकतेत रूपांतर सहजतेनं होत जातं तेव्हा तर वाचक सुखावून जातो. उपमा, उत्प्रेक्षादि अलंकार ओघात सहज येऊन जातात. ते देताना नेहरूंच्या आशयाला, विचारांना आणि भाषेला श्रम पडत नाहीत. जर्मन कवी डांटे व बेट्रिस यांच्या उच्चतर प्रेमाचा उल्लेख करताना " डांटे कालवश होतो आणि बेट्रिस, त्याची प्रेयसी, हीही निघून जाते; पण जाताना ती पाठीमागे मंद सुगंधाची दरवळ मागे ठेवून जाते " असं काव्यमय वाक्य व शब्दरचना सहजतेने ते लिहून जातात. आणि इतिहास या गंभीर आणि रूक्ष विषयावर लिहिताना किंवा विज्ञानासंबंधी चर्चा करताना, ते अशा प्रकारची काव्यात्मता प्रकट करतात, ही गोष्ट विशेष लक्षात घेण्यासारखी आहे.

" मी शब्दांचा आणि वाक्प्रचारांचा चाहता आहे आणि त्यांचा सुयोग्य उपयोग करण्याचा मी प्रयत्न करीत असतो. माझी मते कशीही असोत, पण मी जे शब्दप्रयोग उपयोगात आणतो ते मात्र ती मते, सुस्पष्ट आणि संगतीयुक्त क्रमानुसार व्यक्त करण्यासाठीच असतात " असे उद्गार गोरखपूर तुरुंगात, नेहरूंवरील खटल्याची सुनावणी चालू असताना, ३-११-१९४० रोजी नेहरूंनी आपल्या वक्तव्यात काढले होते. आणि हे खुद्द नेहरूंचेच उद्गार किती सार्थ व योग्य आहेत याची साक्ष त्यांच्या साहित्यात व भाषणात सतत येत असते. " " Quit India " किंवा " Leonine Violence " असे अत्यंत मोजके परंतु समर्पक आणि अर्थवाही शब्दप्रयोग करण्याविषयी प्रसिद्ध असलेला गांधीजींनी नेहरूंच्या त्याच गुणांच्या शब्दयोजनेला शिफारसपत्र दिलेले आहे. या शिफारसपत्रात गांधीजी लिहितात : " भारतात जोपर्यंत इंग्रजी भाषा बोलली जाईल तोपर्यंत खादीला " स्वातंत्र्याचा पेहेराव " (Livery of freedom) असे तुम्ही संबोधलेलं आहे ते आमच्या लक्षात राहिल. त्या मनोवेधक वाक्यप्रयोगाच्या पाठीमागे असलेले विचार हिंदीत भाषांतरित करण्यासाठी एखाद्या प्रथम श्रेणीतील कवीची गरज भासेल. मला तर त्यात फक्त काव्य आढळतं असं नव्हे तर ज्या सत्याचं आकलन अजून आपल्याला झालं नाही, असं

एक महान सत्य त्यात प्रकट झालं आहे. " अचूक आणि समर्पक शब्द आणि वाक्यप्रयोग करण्यात नेहरू किती वाकबगार होते याची या शिफारसपत्रावरून सहज कल्पना येऊ शकेल. आणि याच कौशल्यामुळे " भवितव्याबरोबर केलेली कालनिश्चिती " (Tryst with destiny) असे अजरामर झालेले शब्दप्रयोग नेहरू सहजतेनं उच्चारीत असत.

आपल्या समग्र साहित्यात इतिहासातील व त्याचप्रमाणे अर्वाचीन जगातील थोर तत्त्ववेत्ते, सम्राट व राजे, लेखक, कवी क्रांतिकारक, चित्रकार, आप्तस्वकीय, सहकारी व प्रत्यक्ष त्यांच्या जीवनात प्रस्थान मिळालेल्या व्यक्ती यांची नेहरूंनी चित्रित केलेली व्यक्तिचित्रे हे त्यांच्या साहित्यातील प्रमुख आणि महत्त्वाचे आकर्षण ठरावे. त्या सर्वांची नुसती नामावली देण्याचं ठरविलं तर दोनतीन पाने तरी सहज खर्ची पडतील. ही व्यक्तिचित्रे ठळकपणे मूर्त स्वरूपात उभी करण्याचं सामर्थ्य, अभ्यासानं, ग्राहक बुद्धिमत्तेनं, वेधक विचारानं आणि कौशल्यपूर्ण शब्द आणि वाक्यरचनेनं नेहरूंना प्राप्त झालेलं होतं. तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, त्या त्या व्यक्तींचे स्वभाव, विचार आणि आचार यांच्या रेषांमधून स्वतःच्या भाषिक सामर्थ्याचे रंग भरून त्यांनी ती व्यक्तिचित्रे साकार केलेली आहेत. आणि ही सारी व्यक्तिचित्रे त्यांनी तटस्थ व त्रयस्थ वृत्तीने केल्यामुळे त्या व्यक्तिचित्रांत स्वाभाविक जिवंतपणा आल्याची जाणीव वाचकांच्या मनाला होते. कोणतंही व्यक्तिचित्र शब्दरूप करताना, नेहरू किती तटस्थ वृत्तीनं करीत असत याचं उदाहरण म्हणून, " Modern Review " या मासिकात " चाणक्य " हे टोपणनाव धारण करून, स्वतःचंच रेखाटलेलं व्यक्तिचित्र, देता येईल.

नेहरूंच्या सर्व साहित्यात लेखकाच्या मनाचा प्रांजळपणा आणि आशया-बद्दलची प्रगाढ निष्ठा दिसून येते. आपल्या आवडीच्या विषयावरच त्यांनी लेखन केलेलं आहे. ज्या विषयाचा त्यांचा अभ्यास होता त्याच विषयांना त्यांनी हात घातला होता. आणि महत्त्वाची गोष्ट अशी की, लेखनाच्या बाबतीत भरपूर वेळ मिळाला, अभ्यास आणि चिंतन झालेलं आहे, विशाल अनुभवांची समृद्धता मनात साठलेली आहे, अंगीकृत कार्यात मार्गदर्शनाची आवश्यकता भासत आहे आणि आपले विचार प्रगट करण्याची तळमळ मनाला लागली आहे, अशाच वेळी नेहरूंनी लेखन केलेलं आहे. कीर्ती आणि अर्थ यांच्या

प्राप्तीसाठी त्यांनी लेखणी उचलली नाही. त्यांच्या प्रत्येक शब्दाला मागणी होती; ते मागतील ती किंमत त्यांना मिळाली असती. परंतु, मनाच्या कलाविरुद्ध 'मागणी तसा पुरवठा' ही लेखनपद्धती त्यांनी स्वीकारली नाही. आणि म्हणून प्रांजळपणा आणि लेखनामागील निष्ठा त्यांच्या वाङ्मयात सतत आढळून येते. आणि जाणीवपूर्वक त्यांनी हे लेखन केलेलं आहे. ग्रंथलेखनाला आवश्यक असणाऱ्या मनाच्या अवस्थेची, इतर सुयोग्य पार्श्वभूमीची व आवश्यक अंगांची, त्यांना संपूर्ण माहिती होती. साहित्य वाचनीय आणि रंगतदार व्हावं यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता आहे याचं दिग्दर्शन त्यांनी आपल्या भगिनीला लिहिलेल्या एका पत्रात केलेलं आहे. नेहरू त्या पत्रात लिहितात : "उत्कृष्ट लेखन आणि उठावदारपणा या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. आशय हा त्यापेक्षा महत्त्वाचा आहे; परंतु, या सर्वांपेक्षाही संयमयुक्त निष्ठा लेखनात असावी लागते; त्यामुळंच ग्रंथाला रंगत येते आणि तो वाचकाला आवडतो." नेहरूंच्या साहित्यात आशयाची विशालता, उत्कृष्ट लेखनपद्धती, आकर्षकता, आणि संयमयुक्त निष्ठा दिसून येते ते त्यांना असलेल्या या जाणिवेमुळेच.

नेहरू–साहित्यातील या गुणांबरोबरच प्रकट होणारं लालित्य आणि काव्यात्मता यामुळं त्यांचं साहित्य लोकप्रिय झालं. परंतु, त्याबरोबरच नेहरूंना विनोदाचं वावडं नव्हतं याचही प्रत्यंतर मधूनमधून त्यांच्या साहित्यात येत राहतं. परंतु, त्यांचा विनोद फक्त उपहासाचं स्वरूप धारण करतो असं नाही. कधी कधी तो नर्म असतो. व तो वाचताना वाचकाच्या मनाची कळी उमलते, ओठांवर स्मित झळकतं. एवढंच त्याचं कार्य, परंतु, काही वेळा नेहरू उपहासाचाही आश्रय घेताना दिसतात. परंतु, या उपहासाचं स्वरूपही सौम्य व क्वचित बोचकही असतं. पण, त्या उपहासात रागद्वेषाची भावना प्रकट होत नाही. आणि त्यामुळं त्या उपहासानं उपहासविषयक व्यक्ती विव्हल होत नाहीत. जखमी होत नाहीत, इतकं त्या उपहासाचं स्वरूप सौम्य असतं. पण तरीही उपहासविषयक व्यक्तीचं सत्य स्वरूप प्रकट होऊन जातं. नेहरूंच्या उपहासगर्भ विनोदाचा उत्कृष्ट नमुना म्हणून, ब्रिटनचे त्या वेळचे प्रधान मंत्री नेव्हिल चेंबरलेन, हिटलर व मुसोलिनी यांची भेट घेण्यासाठी फ्रेंच मुख्य मंत्री माँ. दलादिये यांच्या समवेत, म्युनिक येथे जाणार होते, त्या वेळी नेहरूंनी त्य

परिस्थितीचं केलेलं वर्णन देता येईल " तेव्हा उद्या चेंबर्लेन हिटलर आणि मुसोलिनीला भेटणार आहेत. त्यांना यांपैकी एकच भारी आहे, मग त्या दोघा पोलादी व्यक्तींशी त्यांचा काय निभाव लागणार आहे ? कदाचित मि. चेंबर्लेन आणि माँ. दलादिये, कुटिल शब्दांच्या आवरणाखाली हिटलर म्हणेल त्याच्याशी सहमत होतील, आणि मग हिटलर, आणखी एक महदुपकार करण्यासाठी युद्ध काही दिवस किंवा आठवडे पुढं ढकलण्यास संमती देईल. तो एक महान विजय ठरेल आणि मग हिटलरचा शांतिदूत म्हणून गौरव केला जाईल. चेंबर्लेन जरी लायक प्रतिस्पर्धी असला तरी, मग शांततेचं नोबेल पारितोषिक हिटलरला अजूनही मिळण्याची शक्यता आहे. " (" चीन, स्पेन आणि युद्ध. ")

लोकसभेतील आपल्या भाषणांतही नेहरू उपहासगर्भ विनोदाची पखरण करीत असत आणि त्यामुळं तेथील वादविवादांत व चर्चेतही हास्याची खसखस पिके. २२–५–१९५२ रोजी केलेल्या भाषणात विरोधी पक्षाचं वर्णन करताना नेहरू उद्गारले होते : " विरोधी पक्षात सामील झालेले सन्मान्य सभासद, अनेकविध विचारप्रणालीचे प्रतिनिधित्व करतात–मी अत्यादराने हे बोलत आहे–आणि रंगानं त्यांचं प्रतिनिधित्व सिद्ध होत असेल तर येथे केशरी, लाल रंगाच्या सर्व छटा, गुलाबी, पिवळा आणि गडद निळा असे रंग दिसतात. "

लॉर्ड लिनलिथगो (भारताचे व्हाइसरॉय्) यांचे स्वभाववैशिष्ट्यही वर्णन करताना नेहरूंनी ते पुढील शब्दात केलं आहे : " शरीराने जड आणि मनानं मंद, खडकासारखा भक्कम आणि जवळजवळ खडकाप्रमाणेच जाणिवेची उणीव असणारा, जुन्या पिढीतील ब्रिटिश उमरावाचे गुणधर्म आणि दोष असलेला, गुंतगुंतीतून मार्ग शोधण्याचा प्रयत्न, सचोटीनं आणि हेतूच्या प्रामाणिकपणानं त्यानं केला. परंतु, त्याच्या मर्यादा अनेक होत्या, त्याचं मन जुन्या चाकोरीतून कार्य करीत होतं, सत्ताधारी वर्गातून आल्यामुळे, त्याच्या दूरदृष्टीला, त्या वर्गाच्या परंपरांमुळे, मर्यादा पडली होती; त्याला घेरणाऱ्या सदनी नोकरांच्या आणि इतरांच्या डोळ्यांनी तो पाहात असे, व त्यांच्याच कानांनी तो ऐकत असे, राजकीय आणि सामाजिक मूलभूत बदलेल्या स्वरूपाविषयी बोलणाऱ्या व्यक्तींवर त्याचा अविश्वास होता; भारतीय साम्राज्याच्या आणि भारतातील त्याच्या मुख्य प्रतिनिधीच्या उच्च कार्याविषयी गौरवपूर्ण ग्राहकता न प्रकट करणाऱ्या व्यक्तींचा तो तिरस्कार करी. "

९५९६२

नेहरूंच्या अशा उपहासगर्भ व नर्म विनोदाचं विशुद्ध स्वरूप वरील उताऱ्यावरून सहज कळून येण्यासारखं आहे. आपली मते व विचार सत्यस्वरूपांत प्रकट करावयाचे पण ते तसे उघड करताना कुणालाही दुखविण्याची, जखम करण्याची किंवा कुणाची निंदा करण्याची किंवा टर उडविण्याची असंस्कृत प्रवृत्ती नेहरूंची नव्हती. त्यांच्या मनात उफाळणाऱ्या विविध भावनांचं दर्शन घडवितांना अशिष्ट, निंदागर्भ, अश्लील किंवा बीभत्स शब्दांचा आधार त्यांनी कधीच घेतला नाही. म्हणूनच त्यांच्या साहित्यात त्यांच्या मनाचा सरळपणा आणि प्रांजळपणा याबरोबरच त्यांच्या थोर व्यक्तिमत्त्वातील सुसंस्कृतपणाचं दर्शन यथार्थतेनं घडून येतं. आणि हे दर्शन घडल्यावर प्रा. जी. गेस्ट् लेव्हो (G. Guest Levo), एन्. ए. माग्डालेन, ऑक्स्फोर्ड, यांनी नेहरूंचं साहित्य वाचल्यावर आपल्या मनातील भावना ज्या शब्दांत प्रकट केल्या (जुन्या पत्रांचा संग्रह; पत्र क्रमांक ३१३), तेच शब्द कोणाच्याही मुखातून बाहेर पडल्याशिवाय राहणार नाहीत :—

" तुमच्यापेक्षाही जास्त दीर्घकालीन जीवनात, मी, स्वाभाविकपणे, कित्येक भाषांतील अनेक ग्रंथ वाचले आहेत. एकाही लेखकाविषयी माझ्या मनात व्यक्तिगत आदराची भावना निर्माण होऊ शकली नव्हती. मला क्षमा करणार असाल तर, गेल्या चाळीस वर्षांत पुनर्दर्शन न घेतलेल्या–आणि त्याबरोबर घेतलेल्या आहेत अशी मला आशा आहे–काव्यपंक्तींतील काळ बदलून मी शेक्स्पिअरप्रमाणेच म्हणेन की :—

त्याचं जीवन सुसंस्कृत आहे आणि त्याच्यातील
सर्व घटक असे संघटित झाले आहेत की,
निसर्ग ताठ मान करून उठून सर्व जगाला
सांगेल " हाच तो महापुरुष. "

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वतंत्र
वसुक्रम.....९५९६२..... दि: .....निर्लेखित
जनांक .....२१२०..... नोंद दि: २०/३/०७

卐 卐 卐


REFBK-0015966